डॉलर बहू

मूळ कन्नड लेखिका : सुधा मूर्ती । अनुवाद : उमा वि. कुलकर्णी

SHOUT
SHARE
IT

MARATHI
Murti, Uma V
Dollar bahu
Novel
Pune, 2006
GBP7

ऽलर बहू

मूळ कन्नड लेखिका

सुधा मूर्ती

अनुवाद

उमा वि. कुलकर्णी

C153028399

■ **Dollar Bahu**
by © Sudha Murty

■ **डॉलर बहू / अनुवादित कादंबरी**
अनुवाद : उमा कुलकर्णी
१०९८/११ब, 'पार्थ हेरिटेज',
मॉडेल कॉलनी. पुणे १६.

■ मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०.
✆ ०२०-२४४७६९२४
E-mail : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

■ मुद्रक
जंगम ऑफसेट प्रा. लि.,
२५/१०, नांदेड फाटा,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

■ प्रथमावृत्ती
ऑक्टोबर, २००६

■ मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

■ किंमत
एकशे वीस रुपये

■ ISBN 81-7766-745-9

अमेरिकेत अनेक वर्षं राहून अजूनही
'डॉलर बहू' न झालेली
आजही भारतीय मनोभावना जपणारी बहीण,
जयश्री देशपांडे हीस...

-सुधा

हे पुस्तक खालील सर्व बंधनकारक अटींसह विकले गेले आहे :

प्रकाशक व पुस्तकाचा स्वामित्व हक्कधारक यांच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज हे पुस्तक ज्या स्वरुपात विकले गेले आहे, त्या खेरीज कोणत्याही अन्य बांधणीच्या स्वरुपात हे पुस्तक, त्याचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ प्रसृत करता येणार नाही.

या पुस्तकाच्या स्वामित्व हक्काचा (कॉपी राईट) भंग होईल, अशा रीतीने कोणालाही पुस्तकातील मजकूर हा मूळ, खंडित, संक्षिप्त अशा कोणत्याही स्वरुपात प्रकाशकाच्या परवानगीवाचून प्रसिद्ध करता येणार नाही, वा कोणत्याही स्वरुपात संग्रहित करता येणार नाही. ज्यात संग्रहित केलेला मजकूर पुन्हा जाणून घेता येतो, काढून घेता येतो अशा कोणत्याही पद्धतींमध्ये (यांत्रिक, इलेक्ट्रॉनिक, छायाप्रती काढणारी व अन्य प्रकारे रेखंन करणारी सर्व यंत्रे) पुस्तकातील सर्व मजकूर किंवा खंडित मजकूर साठवून नंतर त्याचे वितरण व प्रक्षेपण करता येणार नाही. असे करण्यासाठी या पुस्तकाचा स्वामित्व हक्कधारक व वर जाहीर केलेला प्रकाशक अशा दोघांची लेखी पूर्वपरवानगी लागेल.

KENT
ARTS & LIBRARIES
C153028399

बेंगळूरहून मिरजेकडे जाणाऱ्या कित्तूर-चन्नम्मा एक्सप्रेसची चंद्रू अस्वस्थ मनानं वाट पाहत होता.

त्याला स्टेशनवर येऊन बराच वेळ झाला होता, पण अजूनही गाडीचा पत्ता नव्हता.

चंद्रूचा धाकटा भाऊ गिरीशही त्याच्याबरोबर होता. पण 'आलोच एका मिनिटात दोन पेपर घेऊन!-' असं सांगून तो जो निघून गेला होता, तो अर्धा तास होऊन गेला तरी आला नव्हता. चंद्रू मनातल्या मनात चडफडत पुन्हा-पुन्हा घड्याळ पाहत होता.

रेल्वे सावकाश स्टेशनमध्ये शिरताना दिसली. ती सावकाश प्लॅटफॉर्मला लागली तेव्हा चंद्रूच्या मनाची अस्वस्थता थोडी कमी झाली. तरीही मनाच्या एका कोपऱ्यात कातरता भरली होती. वाटत होतं, आजवर न पाहिलेलं गाव - धारवाड! कसं आहे कोण जाणे!

आयुष्यात प्रथमच आपलं लाडकं आणि चिरपरिचित माहेर सोडून अपरिचित पतीमागून आनंदानं, तरीही कातर मनानं जाणाऱ्या नव-विवाहितेसारखी चंद्रूची मन:स्थिती झाली होती.

बेंगळूर, मंड्य, मैसूर, शिवमोगा ह्या प्रदेशापलीकडे चंद्रू आजवर कधीही गेला नव्हता. आता शिक्षण संपल्यावर पहिल्या-वहिल्या नोकरीच्या निमित्तानं तो धारवाडला निघाला होता.

धारवाडमध्ये त्याला नोकरी मिळाली होती. आज-काल नोकरी मिळणंच कठीण असल्यामुळे हाताला लागलेली पहिली नोकरी सोडण्याचा प्रश्नच नव्हता. गावाचा मोह मोठा, की पैशाचा मोह मोठा ? राष्ट्रीय बँकेत टेक्निकल ऑफिसरच्या हुद्द्यावर काम करायचं म्हणजे चांगलीच नोकरी म्हणायची! त्यामुळे निरुपायानं तो धारवाडला जायला तयार झाला होता.

कुठूनतरी अचानक समोर आलेला गिरीश म्हणाला, 'गाडी आली चंद्रू. चल, सामान दे.'

चंद्रू विचाराच्या तंद्रीतून भानावर आला. या गिरीशचा स्वभावच असा! क्षणभरही निवांत म्हणून राहणार नाही हा! सतत काही ना काही धावपळ चालूच असते याची!-

चंद्रू आपल्या जागेवर बसला. गाडी सुटताच त्यानं प्लॅटफॉर्मवरच्या गिरीशला

हात हलवून निरोप दिला. गाडीनं हळूहळू प्लॅटफॉर्म सोडला आणि ती धावू लागली. बघता-बघता गिरीशचा हलणारा हात नजरेआड झाला.

गाडीनं वेग घेताच चंद्रूनं आत नजर टाकली. शेजारपाजारचे प्रवासीही काही वेळ आपापलं सामान नीट लावण्यात आणि आपसात गप्पा मारण्यात गढून गेले.

'यंदा पाऊस काय करतोय कोण जाणे!'

'गेल्या वर्षी बरा झाला पाऊस! यम्मी केरि- म्हशींचं तळं पूर्ण भरून गेलं होतं.'

'त्याच्या मागच्या वर्षी- सांगतो मी- घटप्रभेचा धबधबा अस्सा भरून वाहत होता म्हणून सांगू! मस्त दिसत होता!'

चंद्रू ऐकत होता. मनातल्या मनात तो गडबडला होता. भोवतालची माणसं त्याच्या मातृभाषेतच- म्हणजे कन्नडमध्येच- बोलत होती. पण त्याला त्यातले कितीतरी शब्दांचे अर्थच समजत नव्हते! एखादी परक्या प्रांतातली भाषा ऐकावी तसं वाटून तो कावरा-बावरा झाला होता.

तपकिरी रंगाचा कोट आणि काळी टोपी घातलेले एक प्रौढ गृहस्थ तळहातावर तंबाखू अंगठ्यानं मळता-मळता शेजारी बसलेल्या पागोटेवाल्या गृहस्थांना बजावून सांगत होते, 'तू काहीही म्हण- पण मला तर हुक्केरी बाळप्पाची गाणीच आवडतात.'

यावर ते पागोटं आणि धोतरवाले गृहस्थ जोरात सांगत होते, 'असेल! पण मला मात्र बाले खाँ साहेबांची सतार फार आवडते.'

मुकाट्यानं बसलेल्या चंद्रूलाही बोलण्यात ओढत त्यांनी विचारलं, 'कुठल्या गावाला निघालाय?'

'धारवाडला.'

'असं होय! धारवाडला कुणाच्या घरी?'

अरेच्चा! हा काय प्रकार आहे? साऱ्या धारवाडमधल्या प्रत्येक घराची ओळख असल्यासारखं विचारताहेत हे!

'कुठल्याच घरी नाही.'

'मग? नोकरीसाठी निघालाय वाटतं!'

'होय.' चंद्रूनं निरुत्साहानं सांगितलं. पुढचं संभाषण टाळण्याचा हेतू त्यात स्पष्ट होता.

धारवाडमध्ये त्याचा दूरचा नातेवाईक कृष्णमूर्ती राहत होता. कृष्णमूर्ती, म्हणजे किटीच्या घरची माणसं मूळची बेंगळूरची असली तरी, गेली कितीतरी वर्षं धारवाडला राहत होती. किटीच्या वडिलांनी तर तिथं स्वत:चं घरच बांधलं होतं.

किटीलाही धारवाडमध्येच नोकरी लागली होती. तो आणि चंद्रू साधारण बरोबरीच्या वयाचेच होते. आता किटीची कन्नड भाषाही बेंगळूरी ढंग सोडून

धारवाडी ढंगाची झाली होती.

चंद्रूला घेऊन जाण्यासाठी आपण स्टेशनवर येत असल्याचं किटीनं कळवलं होतं. त्याच्या घरी जास्तीतजास्त आठवडाभर राहता येईल. वेगळी खोली किंवा घर बघण्यासाठी त्यानं किटीलाही सांगून ठेवलं होतं. किटीनं घर पाहून ठेवलंय की नाही, देव जाणे!

गाडी तुमकूरला थांबली. काळ्या टोपीवाल्या गृहस्थांनी चंद्रूला विचारलं, 'आमच्याबरोबर जेवताय काय ? चपात्या आहेत.'

चंद्रू चकित झाला. अपरिचित तरुणाला आपल्याबरोबर जेवायला बोलवण्याइतकं औदार्य किती माणसांत पाहायला मिळतं? नकळत त्याच्या आवाजात सौम्यपणा आला,

'नको-नको! थँक्स! मी जेवण करूनच घराबाहेर पडलो.'

सहप्रवाशांनी आपापले जेवणाचे डबे उघडले. चंद्रू बाहेरच्या मैदानावर नजर खिळवून उद्याचा विचार करण्यात गढून गेला.

सुरेख, सुमधुर स्वर! कुणीही मोहून जावं असे स्वर!

चकित झालेल्या चंद्रूच्या मनाला ग्रासून टाकणारे सारे विचार क्षणार्धात नाहीसे झाले आणि त्याचं मन त्या स्वरांवर एकाग्र झालं.

पार्टिशनच्या पलीकडून गाणं ऐकू येत होतं-

'वसंत बनी ती गाते कोकिळ
राजमुद्रेची तिला न आशा-'

कोकिळाकंठी कुणी गायिका पलीकडे अति-सुरेल स्वरात आत्ममग्न होऊन गात होती. कुठल्याही वाद्याची साथ नाही- साधं सरळ भावपूर्ण गाणं!

अगदी हलक्या आवाजात गाणं सुरू झालं. बघता-बघता डब्यातले इतर सारे आवाज थांबले. केवळ गाण्याचा आवाज चढत राहिला आणि काही क्षणातच त्यानं संपूर्ण डबा भारून टाकला. सारेच माना डोलावत तल्लीन होऊन गाणं ऐकत होते.

चंद्रू त्या गंधर्व-लोकातल्या गंधर्व-गायनात पूर्णपणे बुडून गेला होता. मागं राहिलेल्या बेंगळूरचं आणि पुढं येणाऱ्या धारवाडचं भानही काही क्षण त्याला राहिलं नाही.

गाणं संपलं. पाठोपाठ हसण्याचा किलकिलाट कानांवर आला तेव्हा चंद्रू भानावर आला. तो तरुणींचा आवाज ऐकताना त्याला आपण कित्तूर-एक्सप्रेसमध्ये असल्याची जाणीव झाली.

पाठोपाठ मागणी झाली, 'वन्स मोअर! वन्स मोअर, विनू.'

अच्छा ! या अभिनव लता मंगेशकरचं नाव 'विनू' आहे तर! पण विनू म्हणजे काय? वनिता? वंदना? त्या सुरेल स्वराच्या मालकिणीला पाहण्याची इच्छा चंद्रूच्या

मनात प्रबल झाली.

पार्टिशनमागून धारवाडी कन्नड भाषेत तोच स्वर पुन्हा ऐकू आला, 'नको गं बाई! पुरे आता माझं गाणं! साडेदहा वाजून गेले आहेत. लवकर झोपलं नाही तर धारवाडऐवजी पुढं लोंढ्याला उतरायची पाळी येईल!' त्या विनूनं आणखी गाणी म्हणायचा प्रस्ताव धुडकावून टाकला.

चंद्रूला त्या बोलण्यामुळे बरं वाटलं. म्हणजे ही विनू आणि तिच्या मैत्रिणीही धारवाडला उतरणार आहेत तर! चंद्रूचा उत्साह द्विगुणित झाला.

'विनू, तुलाच गान-गंधर्व पुरस्कार मिळायला हवा बघ! कालच्या स्पर्धेत तुझाच पहिला नंबर येणार याविषयी आमच्या मनात तरी तिळभरही शंका नव्हती!'

म्हणजे या सगळ्या बेंगळूरला कुठल्याशा गायनाच्या स्पर्धेसाठी आल्या होत्या तर! तिथं या विनूला पहिल्या क्रमांकाचं बक्षीस मिळालं तर त्यात काहीही आश्चर्य नाही- चंद्रूच्या अंतर्मनानं न पाहिलेल्या विनूच्या वतीनं निर्वाळा दिला.

'खरंच गं! काल तू 'तुंगा-तीर विहारी' गात होतीस तेव्हा जज्जांसह सगळेच कसे माना डोलावत होते!'

'ते सगळं ठीक आहे! पण आता गाणं बंद! उद्या दुपारी लेडीज-रूममध्ये हवं तर म्हणेन. समजलं?'

बहुधा मैत्रिणींना एवढं बजावत विनू उठून उभी राहिली असावी. काचेच्या बांगड्यांचे आवाज ऐकू आले. चंद्रूच्या ज्ञानात आणखी भर पडली- या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुली दिसताहेत.

'एक्सक्यूज मी! मिस्टर- उठता ना?' तोच आवाज. चंद्रूनं मान वर करून पाहिलं.

गोरापान वर्ण, मोठाले काळेभोर डोळे, सरळ टोकदार नाक, दाट काळेभोर केस- अपरिचित तरुणाबरोबर बोलत असल्यामुळे चेहऱ्यावर उमटलेले मिश्र भाव- एका हातात बेडशिट आणि उशी, दुसऱ्या हातात तिकीट.

'माझी सीट आहे ही.'

चंद्रूचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. तो तिच्याकडेच भान हरपून पाहत राहिला होता. धारवाडी काठा-पदराची साधी सुती साडी आणि लाल काचेच्या बांगड्या घातलेल्या निराभरण सुंदर युवतीनं त्याची ही गत केली होती!

'हा माझा बर्थ आहे.' तिनं पुन्हा सांगितलं तेव्हा चंद्रू भानावर आला.

तिच्या बोलण्याचा अर्थ समजताच तो उत्तरला, 'नाही. हा माझा बर्थ आहे- जी अठ्ठावीस!'

'नाही- हा पाहा- जी अठ्ठावीस-' तिनं तिकीट दाखवत म्हटलं. त्याच कोकिळकंठी सुंदरीच्या तोंडून बाहेर पडलेले शब्द त्याला पुन्हा गुंगवून गेले.

सुरेल स्वराची धनीण सुंदरही असली पाहिजे, असं काही नसतं. पण विनूचं सौंदर्यही स्वरांइतकंच अनुपम होतं.

दोघांनाही एकच बर्थ दिल्याचं दोघांच्याही लक्षात आलं. ज्यानं ही चूक केली तो क्लार्क आता बेंगळूरात आपल्या घरी पांघरूण ओढून गाढ झोपला असेल! पण आता काय करायचं?

चंद्रू उठला आणि टी. सी. ला शोधायला गेला. विनू जी अठ्ठावीस बर्थवर मट्कन बसली.

चंद्रूबरोबर आलेल्या टी. सी.नं स्थितप्रज्ञ वृत्तीनं दोघांच्याही तिकिटांवर नजर टाकली आणि ही एक नेहमीचीच सर्वसामान्य घटना असल्याप्रमाणे म्हणाला, 'विनिता - एफ - एकोणीस- जी अठ्ठावीस- आणि चंद्रशेखर - एम - चोवीस- जी अठ्ठावीस- दोघांनाही एकच नंबर दिलाय खरा! तूर्त काहीतरी ॲडजेस्ट करून घ्या. पुढच्या स्टेशनवर बघूया काय करता येईल ते!'

अशा प्रकारे काहीही निश्चित न सांगता, आडव्या भिंतीवर दिवा ठेवल्यागत बोलून तो निघून गेला. चंद्रूपुढे प्रश्न उभा राहिला- या देखण्या विनूबरोबर कसं 'ॲडजेस्ट' करायचं?

निरुपायानं चंद्रू म्हणाला, 'तुम्ही बर्थवर झोपा. आत्ता तरी मी होल्डॉल खोलून खालीच झोपतो.'

विनिताही संकोचून म्हणाली, 'माझ्यामुळे उगाच तुम्हाला त्रास.'

'छे :! यात तुमचा काय दोष?'

पुढं काही न बोलता विनिता पलीकडे वळून झोपली. चंद्रूही होल्डॉल खोलून आडवा झाला. न राहवून त्याची तिच्याकडे नजर गेली. विनिताची जाड आणि लांबसडक नागवेणीही विसावलेली त्याला दिसली.

डोळे मिटले तरी गाण्याचे ते स्वर चंद्रूच्या कानात रुणझुणत होते. गाडी मंद लयीत हेलकावत होती. त्याच तंद्रीत चंद्रूला गाढ झोप लागली.

घाईघाईनं एका हातात सूटकेस आणि दुसऱ्या हातात कसाबसा गुंडाळलेला होल्डॉल घेऊन लुंगी नेसून स्टेशनवर उतरलेल्या चंद्रूला कुणाच्यातरी हास्याचा गडगडाट ऐकू आला.

हौशी आणि छान-छोक़ीनं राहणाऱ्या चंद्रूच्या दृष्टीनं हे अगदीच अपमानास्पद होतं.

स्टेशनवर येणाऱ्या किटीला कसं टेचात सामोरं जायचं याविषयी त्यानं बरंच काही ठरवलं होतं. इस्त्रीचे रुबाबदार कपडे- त्यावर सेंटचा घमघमाट- ऑफिसरच्याच थाटात स्टेशनवर उतरायचा घाट चंद्रूनं घातला होता. पण प्रत्यक्षात घडलं ते

वेगळंच!

रेल्वे अलिप्तपणे पुढच्या प्रवासासाठी धावू लागली. चंद्रूनं धारवाड स्टेशनावरून नजर फिरवली.

छोटंसं स्टेशन. बेंगळूरमधल्या मल्लेश्वरम स्टेशनसारखं. स्वच्छ स्टेशन. मोजकीच माणसं इथं-तिथं वावरत होती. रेल्वे निघून गेल्यावर स्टेशन आणखी शांत वाटू लागलं.

चंद्रूनं अपेक्षेनं भोवताली पाहिलं, पण ती कोकिळकंठी रूपसुंदरी कुठंही दिसली नाही. ती आणि तिच्या मैत्रिणी केव्हा निघून गेल्या होत्या कोण जाणे!

हातातलं सामान ठेवून लुंगी सावरत चंद्रूनं पाहिलं- समोरच किटी उभा होता.

त्यानंच खदाखदा हसत विचारलं, 'हे काय रे चंद्रू? तू रेल्वेनं आलास की पायी चालत?' पाठोपाठ त्यानं जुन्या सलगीनं पाठीवर थाप मारली. त्या सलगीच्या थापेसरशी चंद्रूची पाठ वाकलीच!

'सॉरी किटी! काय सांगू तुला- भयंकर झोप आली होती. टी. सी. नं 'धारवाड आलं तुमचं! उठा -' म्हणून जागं केलं तेव्हाच जागा झालो!'

'टी. सी. नं उठवलं नसतं तर तू बेळगावला किंवा मिरजेलाच गेला असतास सरळ!'- म्हणत किटीनं चंद्रूच्या सामानाला हात घातला.

'पाच मिनिटं थांब, किटी! मी अशा अवतारात येणार नाही. आता कपडे बदलून येतो-' म्हणत चंद्रू वेटिंग रूमच्या दिशेनं गेला.

तो कपडे बदलून आला, तोवर सिटीबस निघून गेली होती. रिक्षावाल्याबरोबर किटी वाटाघाटी करत होता.

लुकड्या घोड्याचा टांगा बघून चंद्रू म्हणाला, 'किटी, तुमच्या गावातल्या रथातून जायचं काय?'

दोघंही टांग्यात चढले. आळस झटकून नुकतंच जागं झालेलं धारवाड शहर मंद हसत होतं. टांग्यातून जाताना चंद्रू आश्चर्यानं त्याचं निरीक्षण करत होता.

उंच चढाच्या रस्त्यावर घोडं धापा टाकू लागलं. हे चंद्रूला पाहावेना. तो म्हणाला, 'बाबा रे! मला स्वर्गाची काही कल्पना नाही! पण या घोड्याच्या नरक-यातना मला बघवत नाहीत.'

तो टांग्यातून खाली उतरला. पुन्हा उतार लागताच टांग्यात चढला. किटी मात्र याकडे नेहमीचीच गोष्ट असल्याप्रमाणे हसत बघत होता.

टांग्याचा आवाज ऐकून शांतम्मा बाहेर आल्या.

'ये चंद्रू, ये! बरा आहेस ना? कसा झाला प्रवास?'

'छान झाला.' चंद्रू म्हणाला. सुरेल स्वरांची सोबत असल्यावर प्रवास उत्तम होणारच ना!

'चंद्रू, आज मी रजाच काढलीय! तुला धारवाड गाव दाखवतो.' इडली खात किटीनं सांगितलं.

'ते राहू दे. आधी आपण घर बघूया.'

'अरे, असा काय करतोयस? इथंच आमच्या घरी का राहात नाहीस?'

'हा काही एक-दोन दिवसांचा प्रश्न नाही, किटी! इथं नोकरीसाठी मी जितके दिवस थांबेन, तितके दिवस मला खोली हवीच ना!'

'का रे? इथं येऊन कामावर हजर होण्याआधीच इथून जाण्याचा सूर काढतोयस!'

'तसं नव्हे रे! नाही म्हटलं तरी हे काही आपलं गाव- आपला प्रदेश नाही. इथं आपले कुणी मित्र नाहीत की कुणी नातेवाईक नाहीत. पहिलीच नोकरी सोडायची नाही म्हणून मी एवढ्या लांब आलोय. तिथंही दोन इंटरव्ह्यू देऊन आलोय. बेंगळूरमध्येच एखादी नोकरी मिळाली, पगार थोडा कमी असला तरी चालेल- पण मी लगोलग निघून जाईन हे मात्र नक्की!'

'बरं, तुझा आग्रहच असेल तर बघू या. चार जणांना सांगून ठेवू या. इथं लवकर घरं मिळतात. तुझ्या छोट्या ब्रह्मचाऱ्याच्या संसाराला एखादी छोटी खोलीही पुरेशी आहे.' किटी म्हणाला.

एका दिवसात सारं धारवाड पाहून झालं. धारवाड विद्यापीठाचा परिसर, सोमेश्वराचं देऊळ आणि कित्तूर चन्नम्मा पार्कही पाहून संपलं.

'चंद्रू, मला तर धारवाडची फारच सवय झाली आहे. इथंच शिक्षण झालंय. गावभर भरपूर मित्र आहेत. काही कारणानं परगावी जावं लागलंच तर माझा श्वास कोंडल्यासारखा होतो.'

'खरंच! प्रत्येकाला आपापल्या गावाविषयी असंच वाटतं!' चंद्रू उत्तरला.

पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे सर्वत्र हिरव्या रंगाचा महोत्सव चालला होता. शेकडो फुलांचे ढीग मनाला भुरळ घालत होते. धारवाडची तांबडी माती चपलांशी सलगी वाढवू पाहत होती. चाफ्याच्या सुगंधाबरोबर शेवंतीचं संमेलन चाललं होतं. धारवाडचं वातावरण कितीही अरसिक व्यक्ती असली तरी तिला रसिक करून टाकत होतं. धारवाडचा श्रावण मन मोहून टाकत होता.

किटीचा हा 'स्वर्ग' कितीही सुंदर असला तरी चंद्रूचा बेंगळूरवरचा मोह कणभरही कमी व्हायला तयार नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे - बेंगळूर म्हणजे नखरेल आकर्षक तरुणी तर धारवाड मुग्ध बालिश तरुणी!-

बेंगळूरहून येऊन तीन दिवस झाले होते. सकाळी शांतम्मा किटीला म्हणाल्या, 'तू चंद्रूसाठी खोली पाहिजे म्हणून सांगितलं होतंस का? माळमड्डीवरच्या भीमण्णा देसायांची जागा भाड्यानं द्यायची आहे म्हणे. तुझा तो शानबाग आला होता सांगायला.'

लगोलग चंद्रू आणि किटी चढ-उतारावर वसलेल्या माळमड्डीकडे निघाले.

तारेचं कंपाउंड असलेल्या विस्तीर्ण बागेनं वेढलेलं जुनं घर. लाल कौलांनी शाकारलेलं. भोवतालची बाग भरपूर फुलझाडं-फळझाडांनी भरलेली. कितीतरी प्रकारची झाडं! नीट रांगेत लावलेली पेरूची, आंब्याची आणि फणसाची झाडं, केळ्याच्या झाडांचं बन, फुलांची मुबलक झुडुपं, चाफा, जुई- मोगरा, पारिजात- अगदी कौतुक वाटावं असं बकुळीचंही झाड! विविध रंगांची आणि आकारांची डेलियाची फुलं.

चंद्रूला वाटलं, किटी म्हणत होता- घराभोवती बाग आहे- इथं तर बागेमध्येच घर दिसतंय! त्यानं बेंगळूरमध्ये असं झाडांनी घेरलेलं घर पाहिलंच नव्हतं. तीस बाय चाळीस फुटांच्या साईटवर तीनमजली घरं बांधलेल्या 'किष्किंधा नगरी'चीच त्याला सवय होती. मातीच्या कुंड्यांमधून रोपं लावून तयार केलेला बगिचाच त्यानं पाहिला होता. क्षयरोगग्रस्त मानव समूहानं व्यापलेल्या बेंगळूरमध्ये तो इतके दिवस राहिला होता. आता त्याच्यासमोर आरोग्यपूर्ण धारवाड उभं होतं. त्याला मनोमन हा फरक जाणवला.

घर दुमजली होतं. बहुतेक वरचा मजला भाड्यानं द्यायचा विचार आहे की काय कोण जाणे! चंद्रू मनोमन विचार करू लागला- 'जागा केवढी असेल? आपल्याला परवडेल की नाही?'

किटीनं घराच्या दारावर थाप मारली.

दरवाजा उघडला गेला आणि चंद्रू अवाक् होऊन उभा राहिला.

घराचा दरवाजा रेल्वे-प्रवासात भेटलेल्या गानकोकिळा सुंदरी विनितानं उघडला होता.

विनितेच्या चेहऱ्यावरही आश्चर्याचे भाव उमटले.

त्या दोघांच्याही प्रतिक्रियांकडे किटीचं लक्ष नव्हतं. त्यानं विचारलं, 'आहेत काय भीमण्णा?'

विनितेनं स्वत:ला सावरत म्हटलं, 'हो - आहेत. या. येतील एवढ्यात. बसा तुम्ही.' आणि हरिणीच्या वेगानं ती आत दिसेनाशी झाली.

जुनाट सोफा आणि जुन्या खुर्च्या पाहाताच घराच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येत होती.

चंद्रूनं मनोमन ठरवलं, काही झालं तरी हीच खोली आपण भाड्यानं घ्यायची. त्यानं अकारणच आणखीही एक ठरवलं- गाडीतल्या विनितेच्या भेटीविषयी किटीला काहीच सांगायला नको.

भीमण्णांनी सांगितलेल्या सगळ्या अटी मान्य करून खोलीचं पक्कं करून तिथून निघताना चंद्रू उल्हसित झाला होता. किटीची मात्र भुणभूण चालली होती,

'काही म्हण ! मला तरी भाडं जास्त वाटतंय! तू उगाच दडपणाखाली हो म्हणू नकोस. आणखी दोन दिवसांमध्ये याहून कमी भाड्यामध्ये याहून मोठं आणि नवं घर मिळू शकेल. आपण आणखी प्रयत्न करू या.'

पण चंद्रूनं मात्र नकारार्थी मान हलवली.

त्याची फार काही बोलायची इच्छा नव्हती. कारण विनितेनं त्याचं मन व्यापून टाकलं होतं. मनोमन तो उल्हसित झाला होता.

रोजच्यासारखाच सूर्योदय झाला. हातात पाण्याची बादली आणि झाडू घेऊन विनितानं दार उघडलं. एखादं दुर्मिळ दृश्य पाहावं तशी ती कौतुकानं सूर्योदयाचं निरीक्षण करू लागली. सोनेरी आकाश, पक्ष्यांचा किलबिलाट, विविध फुलांच्या सुगंधाच्या मिश्रणातून हवेत पसरलेला विलक्षण सुगंध! त्यात पारिजातकाच्या सड्याची भर पडलेली! विनिताचं मन उत्साहानं उभारलं गेलं.

हे नेहमीचंच होतं. विनिताचा स्वभावच तसा होता. काहीही सुंदरतेनं भरलेलं समोर आलं की तिचं मन आनंदानं नाचायला सुरुवात करत होतं. त्याचंच प्रतिबिंब चेहऱ्यावर पडल्यामुळे तिचा चेहरा सतत आनंदी दिसत असे.

आज तरी वेगळं असं काय घडलं होतं? नेहमीसारखाच सूर्योदय ना? पण विनितेच्या दृष्टीनं इतकी साधी गोष्ट नव्हती. हा अनुपम सूर्योदय केवळ आपल्यासाठीच झाला आहे- या भावनेनं ती आनंदानं मोहरून गेली होती.

साऱ्या बागेचा केर लोटत ती बकुळीच्या झाडापाशी आली. मंद पिवळ्या चंद्राप्रमाणे बकुळी आपलं अस्तित्व दर्शवत होती. हातातला झाडू बाजूला ठेवून विनिता हलकेच एकेक फूल गोळा करता-करता त्या गंधानं पुलकित होऊन गेली.

माडीवरच्या खिडकीतून चंद्रू विनिताचं फुलाबरोबर रमणं तिच्या न कळत पाहात होता. तिचं मात्र आणखी कुठंही लक्ष नव्हतं ती स्वत:च्या भावना-प्रपंचात मग्न होऊन गेली होती.

दूधवाला येताच विनिता आपल्या भाव-विश्वातून बाहेर आली. फुलं घेऊनच ती दुधाचं भांडं आणायला आत गेली.

भीमण्णा देसाई भरपूर बोलके गृहस्थ होते. गप्पांच्या आखाड्यात एकदा उतरले की कुणालाच ऐकत नसत. पण चंद्रूला त्यांच्या सरळ स्वभावाचाही अनुभव येत होता. चंद्रू राहायला आला त्याच दिवशी त्यांनी सांगितलं,

'अजिबात संकोच वाटू देऊ नका! काही पाहिजे असेल तर खुशाल मागून घ्यायचं. हेही तुमचंच घर म्हणून समजा, समजलं की नाही?'

या घरात कोण-कोण राहतंय, त्यांचं परस्परांशी नातं काय याचा चंद्रूला काहीच खुलासा होत नव्हता. एक मात्र खरं- विनिता मात्र क्षणभराचीही उसंत न

घेणारं सतत फिरणारं यंत्र झाली होती.

सकाळी दहा वाजता ऑफिसला जाऊन चंद्रू संध्याकाळी सहा वाजताच घरी परतत होता.

जाग आल्यापासून ऑफिसला जायला निघेपर्यंत सकाळच्या वेळी अनेकदा विनिताचं नाव त्याच्या कानांवर येत होतं.

'विनू, ताटं वाढलीस काय?'

'विनू, गिरणीला जाऊन आलीस ना?'

'विनू, धुतलेले कपडे कुठं ठेवलेस?'

'हे काय विनू! अजून फुलांचे गजरे केले नाहीस?'

'विनू, अगं, आमटीला खडाभर मीठ कमी पडलंय बघ!'

घरातली सगळ्या वयांची माणसं विनिताच्या नावाचा सतत जप करत होती. आणखीही एक गोष्ट त्याच्या लक्षात आली होती- प्रत्येकजण काही ना काही काम सांगण्यासाठीच तिला हाका मारत होतं!-

कोण आहे ही विनिता? या घरातली अनाथ मुलगी? घरातली कामवाली? सुरुवातीला चंद्रूला काहीच समजत नसे.

एक मात्र खरं- कॉलेजला जाते, म्हणजे ती घरातली मोलकरीण नसावी. भीमण्णांना ती 'काका' म्हणायची. म्हणजे अनाथही नसेल.

एका शनिवारचा दिवस. चंद्रू लवकरच ऑफिसमधून घरी येऊन झोपला होता. त्याच गंधर्व-गायनानं त्याला जाग आली. उठून खिडकीपाशी जाऊन त्यानं खाली पाहिलं. विनिता स्वत:च्याच नादात गाणं गुणगुणत झाडांना पाणी घालत होती.

कुणीतरी गर्दभ-स्वर त्यात मिसळून तिच्या गाण्यात खंड पाडला.

'हे काय गं? सतत गाणं म्हणत बागेतच राहिलीस तर इथली घरातली कामं कोण करणार? चल लवकर. परसात भांड्यांचा ढीग पडलाय! किती सांगायचं तुला? हे गाण्याचं वेड कमी होईल तर शपथ!'

त्या कर्कश आवाजासरशी विनितानं आपलं गाणं थांबवलं आणि ती आत गेली.

नाही म्हटलं तरी चंद्रू खिन्न झाला.

हा सुमधुर स्वर, ही गाण्यातली तन्मयता क्वचितच पाहायला मिळते.

चंद्रूनं सुरभीला- आपल्या लहान बहिणीला- अनेकदा सांगितलं होतं, 'कितीही खर्च झाला तरी मी पैसे देईन. तू गाणं शिक!' पण सुरभीनं तिकडे लक्षच दिलं नव्हतं. तिला आवाजाचीही देणगी नव्हती. शिवाय तिला त्याची आवडही नव्हती.

घरातल्या घुसमटून टाकणाऱ्या वातावरणातही विनिता पुन्हा-पुन्हा गात होती! कुणीही त्या गाण्याला प्रोत्साहन देत नव्हतं - कौतुकही करत नव्हतं. एवढंच नव्हे,

गाणाऱ्याला मध्येच अडवू नये एवढंही भान त्या घरातल्या माणसांना असल्याचं चंद्रूला दिसत नव्हतं.

का कुणास ठाऊक, विनिताचे कष्ट बघून चंद्रू अस्वस्थ होत होता. कदाचित स्वत: विनिताही त्यामुळे एवढी कष्टी नसावी. कारण त्यानं पाहिलं- हसतमुखानं आणखी एक गाणं गुणगुणत विनिता आंब्याच्या झाडाखाली भांडी विसळत होती.

जसे जसे दिवस जात होते, तसं तसं त्याला त्या घरातल्या माणसांच्या परस्परांशी असलेल्या नात्याविषयी समजू लागलं. विनिताला आई-वडील नव्हते. रामक्का तिची सावत्र आई. त्याही विधवा. त्यांना एक मुलगा होता- शोधूनही सापडणार नाही एवढा ढ मुलगा! त्यामुळे रामक्कांना हुशार विनितेचा अकारण संताप येत होता.

घरात वृद्ध आजी सीतम्माही होत्या. थोरले काका भीमण्णा आणि त्यांच्या पत्नी तुळसक्का आपल्या चार मुलांसह तिथंच राहात होते. त्याशिवाय घरात सतत पाहुण्यांची वर्दळ असे.

ते घर विनिताच्या आईचं होतं. वर्षापूर्वी विनिताचे वडील वारले होते. भीमण्णांची किरकोळ शेती होती. त्यावर जेमतेम पोट भरत होतं- तेवढंच. आता तेच या घराचे यजमान होते. एकूण पाहता आर्थिकदृष्ट्या त्यांचं घर सर्वसामान्य म्हटलं पाहिजे.

सगळ्यांनाच विनितेवर हुकूम चालवायला आवडत होतं. तिच्याच घरी आश्रय घेऊन राहणारे तिला हक्कानं कामं करायला सांगत. रामक्का तर सतत तिला धारेवर धरायच्या. पण भीमण्णा काकांचा मात्र विनितेवर खूपच जीव होता. दिवसभर वासराप्रमाणे स्वच्छंद हुंदडणाऱ्या आणि प्रत्येकाच्या हाकेला ओ देऊन कामं करणाऱ्या वसंत-लक्ष्मी विनितेला ते दररोज रात्री गाणी म्हणायला लावत. दिवसभराची कामं संपली आणि रात्रीची जेवणं आटोपली की नंतरची झाकपाक करणाऱ्या विनितेला ते बाहेरच्या अंगणातील आंब्याच्या किंवा बकुळीच्या वृक्षाखाली ठेवलेल्या बाजल्यावर बोलावत आणि म्हणत, 'विनू, हातातली कामं टाकून इथं ये बघू! आता इतरांना करू दे कामं. इथं बैस. एखादं पुरंदरदासाचं किंवा आणखी कुठल्यातरी दासाचं पद म्हण बघू!'

हा संवाद कानावर आला की माडीवरच्या चंद्रूचे कान आपोआप टवकारले जात. विनिता थोरल्या काकांपाशी बसून देवाची गाणी सुश्राव्य स्वरात गायला सुरुवात करायची. सारं वातावरणच भक्तिरसात बुडून जायचं.

भीमण्णांचा स्वभाव बोलका होता. त्यांच्याकडूनच चंद्रूला विनितेविषयी अधिकाधिक तपशील समजायचा. विनितेशी त्यानं गप्पा मारण्याचा प्रसंगच आला नव्हता. तिला तेवढा वेळही नव्हता. शिवाय अपरिचित तरुणाशी गप्पा तरी काय मारणार ती?

कर्नाटक कॉलेजमध्ये विनिता संगीत हा प्रमुख विषय घेऊन - त्यातही हिंदुस्थानी

संगीत- बी.ए. च्या दुसऱ्या वर्षाच्या वर्गात शिकत होती. अनेक संगीत-स्पर्धांमध्ये कॉलेजच्या वतीनं भाग घेऊन तिनं वेगवेगळ्या गावांमधून पुरस्कार मिळवून आणले होते. तूर्त तरी तिच्या लग्नाचा विचार कुणाच्याही मनात नव्हता. पैशाची व्यवस्था व्हायला हवी ना! बी. ए. झाल्यानंतर तिनं कुठं तरी नोकरी धरायला हवी, पैसे साठवायला हवेत- त्यानंतर लग्नाचा विचार करायचा. म्हणजे आणखी चार-पाच वर्षं तरी लग्नाचा विचार नव्हता.

पावसाळा संपून ऑक्टोबरचं कडक ऊन पडायला सुरुवात झाली होती. उन्हाळ्यात झाडावरून उतरवून, फोडून, चिंचोके काढून उन्हं दिलेली चिंच पावसाळ्यात दमट हवेमुळे ओलसर झाली होती. उन्हाचा कडाका वाढला तेव्हा ती चिंच एका टोपलीत घालून विनिता माडीवर निघाली. चंद्रूच्या खोलीलगतच गच्चीचं दार होतं. चिंचेची भली मोठी टोपली घेऊन विनिता माडीवर आली.

गच्चीत तट्ट्या अंथरून त्यावर चिंच पसरत विनितेनं विचारलं, 'इथं गच्चीत चिंच वाळत टाकली तर तुम्हाला त्रास नाही ना होणार?'

हे विनिताचं चंद्रूबरोबरचं पहिलं संभाषण!

ऑक्टोबरचं ऊन चटका देत होतं. आभाळ निरभ्र होतं. श्रावणातल्या फुलांनी निरोप घेतला असला तरी बकुळीला कुठला दुष्काळ? सदा सर्वदा सुगंधाचा स्रोत देणारा निरंतर प्रवाह तो! वर्षभर फुलांची उधळण करणारा वृक्ष-

एव्हाना चंद्रूला धारवाडच्या कन्नड भाषेतले अनेक शब्द समजू लागले होते. त्यामुळे विनिताच्या बोलण्यावर तोही धारवाडी ढंगात म्हणाला, 'नाही. टाका तुम्ही वाळत. चिंच तुमची- गच्चीही तुमचीच!-' त्याचं मन तर म्हणत होतं- विनिता, एवढंच काय! मीही तुझाच आहे!-

चंद्रूला तर तिच्याशी आणखी थोडं बोलायचं होतं. पण काय बोलायचं हे सुचेना. शेवटी एकदाचा चिंच वाळत घालण्याचा रूक्ष कार्यक्रमही संपला. आता ही टोपली घेऊन निघून जाईल हे लक्षात येऊन तोच म्हणाला, 'फार सुरेख गाता तुम्ही!' एवढंच नव्हे, तूही फार सुंदर आहेस! पण हे वाक्य त्याच्या मनातच राहिलं. सुरेख, सुशील, सतत उत्साहानं नाचणारं कारंजं-

विनितेच्या चेहऱ्यावर संकोच उमटला. ती उद्गारली, 'थँक्स.' त्यानं संभाषण वाढवण्याची संधी पकडत म्हटलं, 'तुम्ही रेडिओवरही गाऊ शकाल!-'

'हो, गाते ना! खूप वर्षांपासून गाते मी रेडिओवर! तुम्ही ऐकलं नाही कधी?'

चंद्रू वरमला, 'नाही! कधी नाही ऐकलं!'

'पुढच्या वेळी तुम्हाला आधीच सांगेन. आता वाट सोडता? जायचंय मला.'

स्वत:च्या नकळत तिच्या वाटेत आडवा उभा राहिलेला चंद्रू शरमून बाजूला

झाला.

विनिता रिकामी टोपली घेऊन पायऱ्या उतरून निघून गेली.

दिवस जात होते. चंद्रू धारवाड गावात आणि देसायाच्या घरात बऱ्यापैकी रुळला होता. अधून-मधून कधीतरी त्यांच्या घरी जेवायलाही जात होता. त्याही वेळी विनिता त्याच्याशी गप्पा मारत नसली तरी परिचयाचं स्मितहास्य तिच्या चेहऱ्यावर त्याला पाहायला मिळत होतं.

चंद्रूच्या बँकेत अधून-मधून क्रिकेटचं वेड वर उसळून येत होतं. केवळ कॉमेंट्री ऐकण्यावर त्यांचा उत्साह न थांबता मैदानावर मॅचेसही होत. त्या दिवशी चंद्रूही गावसकरच्या थाटात खेळायला गेला आणि जखमी होऊन कण्हत- विव्हळत घरी परतला. एक वेगवान चेंडू मनगटावर जोरात आपटून हाड दुखावलं होतं. डॉक्टरांनी आठवड्याभरासाठी हाताला प्लॅस्टर घातलं होतं. चंद्रूनं किटीच्या घरी जायचा निर्णय घेतला. समोर भेटलेल्या विनितेला त्यानं ते सांगितलं.

हे ऐकताच भीमण्णा पटकन बाहेर आले आणि म्हणाले, 'असं का म्हणता?'

'किटी मला बेंगळूरला पोहोचवण्याची व्यवस्था करेल.'

'अशा अवस्थेत तुम्ही परगावी जाण्याइतका प्रवास करू नये. नोकरीही अजून पक्की झालेली नाही तुमची! इथं आमच्या घरात माणसं राहात नाहीत काय? तुमच्या जेवणा-खाण्याकडे आम्ही बघू. तुम्ही ती काळजी करू नका!'

भीमण्णांनी दिलेला शब्द त्यांनी आणि त्यांच्या घरच्या माणसांनी शब्दश: पाळला. नंतर चंद्रूनंही किटीच्या घरी जायचा विचार पूर्णपणे सोडून दिला.

भीमण्णांनी आपल्या लाऊड-स्पीकरसारख्या आवाजात आज्ञा सोडली, 'विनू, चंद्रशेखरांना वेळच्या वेळी जेवायला वाढायची जबाबदारी तुझी! त्यांना आपल्यासारखी भाजी-भाकरी वाढायची नाही. सार-भात वाढायचं. आणि हो- चहा नको- कॉफी द्यायची- समजलं?'

चंद्रूलाही जाणवलं, नाहीतरी आणखी कोण ही जबाबदारी अंगावर घेणं शक्य आहे या घरी? आधीच भरपूर कामांची जबाबदारी पेलत असणाऱ्या विनितेवर ही आणखी जबाबदारी!

इथं आल्यापासून चंद्रूचं विनितेवर लक्ष होतं. एवढ्या दिवसांत त्यानं एकदाही तिला रडताना, रागावताना किंवा दु:ख करताना पाहिलं नव्हतं. ही आपल्या सख्या बकुळ, पारिजात, मोगरा, जाई-जुई यांना पाणी घालताना अश्रूही ढाळून पुन्हा मंद-स्मिता होते की काय?

हिचं लग्न होऊन ही जेव्हा सासरी निघून जाईल, तेव्हाच घरातल्या सगळ्यांना हिचं महत्त्व कळेल!-

एवढ्यात विनिता कॉफीचा कप घेऊन माडीवर आली. तिला पाहताच चंद्रूला

साऱ्याचा विसर पडला- मनात येणाऱ्या विचारांचाही!

सुट्टीमधल्या एके दिवशी दुपारच्या निवांत वेळी चंद्रूची वामकुक्षी चालली होती. डोळा लागत असतानाच काही मुलींच्या हसण्याचा किलकिलाट त्याच्या कानांवर आला आणि डोळ्यांवरची झोप पार उडालीच.

त्यानं बाहेर डोकावून पाहिलं- फणसाच्या सावलीत कांबळं अंथरून त्यावर विनिताच्या मैत्रिणी गप्पा मारत बसल्या होता. दिवाळीसाठी साडी खरेदी करण्याविषयी त्यांची चर्चा चालली असावी.

मैत्रिणी आपापल्या साड्यांविषयी सांगत होत्या. विनिताही म्हणाली, 'मला जांभळा रंग भारी आवडतो बाई! मी तर काकांना जांभळ्या रंगाचीच साडी आणायला सांगणार आहे.'

तिच्या बोलण्यातला रंगाचा तपशील चंद्रूला समजला नाही. तो थोडा गोंधळला. कुठला रंग हिला आवडत असेल?

रात्री भीमण्णांनी सगळ्यांसाठी साड्या-लुगडी आणली असावीत. ते म्हणत होते, 'विनू, जांभळी साडी खूप शोधली- पण मिळाली नाही. त्याऐवजी ही निळी आणलीय बघ! पुढच्या वर्षी जांभळी आणू या. चालेल ना?'

'न चालायला काय झालं, काका? निळा रंगही सुरेख आहे हा! आवडला हाही रंग!'

हे ऐकताना चंद्रूचं मन सखेद आश्चर्यानं भरून गेलं. त्याची बहीण सुरभी विनितेच्या बरोबरीचीच असेल. गेल्या महिन्यात तो बंगळूरला गेला होता. त्या वेळी तिनं चंद्रूला 'मला डार्क ब्ल्यूला शॉकिंग पिंक बॉर्डर असलेलीच साडी हवी-' म्हणून सांगत संपूर्ण दिवसभर चिक्कपेठेतल्या प्रत्येक दुकानातून घुमवलं होतं. तरी तसली साडी मिळालीच नाही. शेवटी दुसरे दिवशी कुठल्या तरी दुकानातून ती शोधून काढून, अव्वाच्या सव्वा किंमत देऊन तिनं ती विकत आणली होती. वर तिनं चंद्रूला साडी दाखवत विचारलं होतं, 'कसं आहे माझं सिलेक्शन?' खरं तर त्याच्या जिभेवर आलं होतं- 'अतिशय वाईट! तुझ्या सावळ्या रंगाला हा रंग अजिबात रुचत नाही!' पण त्यानं स्वत:ला आवरलं होतं.

हेही खरंच! त्याला धारवाडची रोखठोक बोलण्याची पद्धत अंगवळणी पडली नव्हती ना!

इथं मात्र विनिता मनाविरुद्ध घडणारी प्रत्येक घटना हसतमुखानं स्वीकारत होती. कदाचित परिस्थितीमुळे तिला तसं वागणं भाग पडत असावं- चंद्रूला वाटलं. सुरभीला पैसे देणारा आणि माया करणारा थोरला भाऊ आहे- एक नव्हे, दोन-दोन थोरले भाऊ! शिवाय आई-वडील आहेत. विनिताला कोण होतं? विनिता तारुण्यसुलभ भाव-भावना, हौशी आणि अपेक्षा सहजपणे हसत-हसत बाजूला सारत होती.

तिच्या हसण्यातून सुखाची तृप्ती व्यक्त होण्याऐवजी विषादही व्यक्त होत असावा काय? कुणास ठाऊक! केवळ तीच याचं उत्तर देऊ शकेल.

दुसरे दिवशी संधी साधून चंद्रूनं तिला विचारलं, 'जांभळा म्हणजे कुठला रंग?'

'जांभूळ म्हणजे तुमच्या बंगळूरच्या भाषेत 'नेरळे!' का बरं? का विचारलंत?'

'काही नाही- सहजच विचारलं.' तो म्हणाला.

आपली एवढी सेवा जिनं केली, त्या विनितेला जांभळ्या रंगाची एक साडी घेऊन देणं त्याला मुळीच अशक्य नव्हतं. पण इथल्या संकुचित मनाच्या समाजात त्याचा चुकीचा अर्थ लावून विनितेला त्रास होईल याची जाणीव असल्यामुळे तो गप्प राहिला.

किटी अधूनमधून घरी यायचा. एकदा त्यानं म्हटलं तर सहज किंवा म्हटलं तर थट्टेनं विचारलं, 'का रे चंद्रू! तू तर धारवाडशी चांगलाच मिळून-मिसळून गेलास! काय विशेष?'

'काही नाही रे! राहायला लागल्यावर मलाही हे गाव आवडायला लागलंय तुझ्यासारखंच!'

'एवढंच?'

'होय. का बरं?'

'काही नाही! म्हटलं, देसायांच्या घराचं काही खास आकर्षण नाही ना? विनिता उत्तम गाते ना?'

'तुला कसं ठाऊक?'

'कसं ठाऊक? अरे, धारवाडमध्ये सगळ्यांनाच ठाऊक आहे हे! ती रेडिओ-आर्टिस्ट आहे ना?'

'तुला का रे एवढा इंटरेस्ट?'

'नाही बाबा! अम्मानं माझ्यासाठी बेंगळूरची मुलगी ठरवली आहे. तुझं काय?'

चंद्रूनं लगोलग विषय बदलला.

बेंगळूरच्या 'इस्त्रो' कंपनीत नोकरी मिळाल्याची तार चंद्रूला मिळाली आणि चंद्रूला अनावर आनंद झाला.

आता तो पुन्हा आपल्या प्रिय बेंगळूरमध्ये राहू शकत होता. घरचं अन्न खात घरीच राहता येईल. शिवाय ती नोकरीही बदलीची नव्हती.

त्याहीपेक्षा महत्त्वाची एक गोष्ट त्या नोकरीत होती, ती म्हणजे, अमेरिकेत जाण्याची संधी!

चंद्रूच्या स्वप्नातला प्रदेश बेंगळूर नव्हता- तिथून कितीतरी लांब असलेला

श्रीमंत देश अमेरिका!

शिक्षणही अमेरिकेत घ्यावं असं चंद्रूला कितीही वाटलं तरी ते शक्य नव्हतं. कारण त्याची घरची आर्थिक परिस्थिती तशी नव्हती. त्यामुळे चंद्रू नोकरी शोधतानाच सावधपणे त्या देशात प्रवेश मिळवून देऊ शकेल अशाच नोकरीच्या शोधात होता.

'इस्त्रो'मधल्या मुलाखतीतही त्याला विचारलं होतं- 'तुम्ही सिलेक्ट झालात तर अमेरिकेला जायची तयारी आहे ना? पासपोर्ट तयार ठेवा तुम्ही!'

धारवाडच्या बँकेतल्या नोकरीत ही शक्यता नाही. योग्य नोकरी मिळेपर्यंत काहीतरी करून पैसे मिळवत राहायचं म्हणून चंद्रूनं ही नोकरी पत्करली होती.

चंद्रूनं आनंदानं सामानाची बांधाबांध केली. इथं येऊन त्याला वर्ष झालं होतं. तो जाणार असल्याचं समजताच भीमण्णा आपण होऊन त्याच्या खोलीत आले.

'हे काय? तुम्ही तुमच्या गावी निघालात म्हणे! आणखी चांगली नोकरी मिळाली ना? जाऊन या! तुम्ही राहत होता तेव्हा काळजी नव्हती बघा! बरंय, जाऊन या तुम्ही.'

'हो ना!'

'पुन्हा या गावात आला तर आमच्याकडेच उतरायचं! समजलं? उगाच या त्या मित्राकडे जायचं नाही- आधीच सांगून ठेवतो!'

गावाला जाण्याआधी किटीच्या घरी आणि भीमण्णांच्या घरी आवर्जून जेवायला बोलवण्यात आलं. चंद्रूनंही भीमण्णांना आग्रहानं सांगितलं, 'भीमण्णा, बेंगळूरला याल तेव्हा आमच्या घरी नक्की यायचं!'

'यायचं आहे खरं! राजाजीनगरला माझी धाकटी बहीण इंदूही राहते. तीही बोलावतेय कधीची! एकदा येऊ दोन्ही घरी!'

रात्री निघताना चंद्रूला विनितेची आठवण झाली. तिच्याशी काय बोलावं- काय द्यावं हे त्याला समजेनासं झालं. अखेर बेंद्रेंच्या गीतांचा संग्रह तिच्या हाती ठेवत तो म्हणाला, 'हे तुमच्यासाठी! तुमचं रेडिओवरचं गाणं मी तर ऐकू शकलो नाही. आमच्या गावात धारवाड स्टेशन ऐकू येत नाही.'

विनिता हसली; पण त्यात खिन्नता होती.

साऱ्या घरात भीमण्णांपेक्षाही अधिक मनापासून तिचं गाणं ऐकणारा हा तरुण तिचा एकमेव श्रोता होता.

आता तोही निघून चालला आहे.

कदाचित ही त्याच्याबरोबरची अखेरची भेट असेल.

तो काही पुन्हा धारवाडला येणार नाही. आपल्याला तरी बेंगळूरला कशाला जायचा प्रसंग येतोय म्हणा!

याची जाणीव असल्यामुळेच तिच्या हसण्यामागे विषाद होता.

पण नशिबाचा खेळ कुणाला ठाऊक असतो? त्या दोघांनाही त्याची कल्पना नव्हती.

संस्कृतचे मास्तर शामण्णांची चंद्रशेखर, गिरीश आणि सुरभी ही तीन मुलं. पूर्वी कधीतरी त्यांनी जयनगरमध्ये तीस बाय चाळीसच्या प्लॉटवर एक छोटंसं साधं घर बांधलं होतं. घरासमोरच्या रिकाम्या जागेत छोटीशी बाग होती- पण खरं तर तिथं आणखी बांधकाम करून छोट्या घराचं बंगल्यात रूपांतर करायचं, असा गौरम्मांचा विचार होता. मुलं मोठी होऊन पगार मिळवू लागली की आपलं ते स्वप्न पुरं करून घ्यायचा त्यांचा विचार होता.

नवऱ्याच्या पगारात घराचं बांधकाम करण्याइतकी अनुकूलता गौरम्मांना मिळाली नव्हती. मोजका पगार, मुलांची शिक्षणं, वरकमाई नाही- अशा परिस्थितीत गौरम्मा मनातलं स्वप्न बाजूला सारून काटकसरीनं संसार करत होत्या.

शामण्णांचा स्वभाव मात्र शांत आणि समाधानी होता. आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी सारे त्यांच्याशी आदरानं वागत.

गौरम्मांनाही संसार चालवण्याचं शहाणपण भरपूर होतं. कुठंही कर्ज न करता, टुकीनं संसार करण्यात त्या वाकबगार होत्या. सारी कामं स्वत:च करून त्या मोलकरणीचे पैसेही वाचवत होत्या. स्वत:च्या किरकोळ हौसा-मौजा मारत आणि कष्ट करत त्यांनी आपली मुलं वाढवली होती. आता ती सुशिक्षित मुलंच त्यांची संपत्ती होती.

स्वत:ची कर्तव्यं करून संपली की, शामण्णांचं वागणं विरक्त माणसासारखं असे; पण गौरम्मांचं तसं नव्हतं. त्यांना संसारात बराच रस होता. काटकसरीच्या संसारात त्यांच्या अनेक आशा-आकांक्षा अर्धवट राहिल्या होत्या. ज्या आशा पुऱ्या झाल्या, त्यांचं प्रमाणही गौरम्मांच्या दृष्टीनं समाधानकारक नव्हतं. हळदी-कुंकवाच्या किंवा लग्नाकार्याच्या निमित्तानं स्नेही आणि नातेवाइकांच्या घरी गेलं की, त्यांचं मन भारी रेशमी साड्या, सोन्या-हिऱ्याचे चमकदार दागिने, नवी करकरीत गाडी याकडे ओढलं जात होतं. मनात येई,

'किती नशीबवान आहेत हे! एवढे मेले कष्ट करकरून थोडं बऱ्यापैकी लुगडं घ्यायचं म्हटलं तरी जमत नाही! आयुष्यात कधी तरी माझ्या वाट्याला हे ऐश्वर्य येईल काय?'

मुलं किरकोळ नोकऱ्या करत राहिली तरी, आपलं नष्टचर्य संपणार नाही, त्यांनी मोठ्या पगाराच्या नोकऱ्या धरल्या तरच हे शक्य आहे, हे त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीला कधीच समजलं होतं.

श्रीमंतीनं लगडलेली पुण्यभूमी अमेरिका त्यांच्या दृष्टीनं प्रत्यक्ष श्रीविष्णूच्या

वैकुंठापेक्षाही परमश्रेष्ठ होती! जर आपली मुलं अमेरिकेत गेली तरच तिथला डॉलर मिळवून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त श्रीमंत होता येईल हे त्यांना ठाऊक झालं होतं.

आपली या जन्मीची आणि मागच्या जन्मीची पुण्याई असेल तर, का आपली मुलंही अमेरिकेला जाणार नाहीत? यक्षिणीच्या जादूच्या छडीप्रमाणे असलेला डॉलर देश त्यांच्या जीवनाचं परमध्येय झालं होतं.

अशा गौरम्मांचा थोरला आणि लाडका मुलगा चंद्रू! गव्हर्नमेंट कोट्यातली सीट मिळवून इंजिनियर झालेला हुशार मुलगा. वडिलांसारखा सावळ्या रंगाचा नव्हे, त्यानं आईचा गोरापान रंग उचलला होता. उंची थोडी बेताची असली तरी बुटका म्हणता येणार नाही अशी आकृती. गिरीशच्या तुलनेत याची उंची थोडी कमी वाटते- एवढंच!

चंद्रूनं आईच्या रंगाबरोबर तिचा महत्त्वाकांक्षी स्वभाव उचलला होता. त्यामुळे माय-लेकरांचं पटायचंही खूप!

गिरीशचं मात्र सगळंच याउलट होतं.

बोलणं बेताचं. सतत कुठल्या ना कुठल्या कामात गढून राहणं हा त्याच्या स्वभावाचाच एक भाग झाला होता. स्वभावत:च तो समाधानी होता. या बाबतीत तो अगदी वडिलांवर गेला होता.

बुद्धिमत्तेच्या बाबतीतही चंद्रूशी तुलना करता तो डावा होता. म्हणजे अगदी 'ढ'ही नव्हता. दरवर्षी बऱ्या मार्कांनी पास होत त्यानं बी. कॉम. ची डिग्री मिळवली होती. बँकेत क्लार्क म्हणून बऱ्यापैकी नोकरीही त्यानं मिळवली होती. त्या नोकरीविषयी त्याला कुठल्याही प्रकारची खंत नव्हती. बँक सुटल्यावर तो सत्त्राशे साठ ठिकाणी भटकत असे. राघवेंद्र स्वामींच्या आराधनेचा तीन दिवसांचा उत्सव आला की, सुरुवातीपासूनच त्याचा त्यात पुढाकार असे. कुठली मयतीची बातमी आली तरी काळ-वेळ न म्हणता चार मित्रांना घेऊन तो मदतीसाठी हजर असे. परवाच त्याच्या मित्राच्या बहिणीचं लग्न होतं तेव्हा हा तिपटूरला केवळ नारळ आणण्यासाठी म्हणून गेला होता!

अशा माणसाला पैसे मिळवायला कसं काय जमणार?

गौरम्मांनी आपल्या या धाकट्या लेकराला हजारदा नाना परीनं व्यावहारिक जगताविषयी समजावून सांगितलं होतं. आई काही सांगू लागली की तो हसत म्हणायचा,

'अम्मा, अण्णांनीच सांगितलं नाही काय- 'परोपकारं इदं शरीरं' म्हणून?'

मुलापुढे निरुत्तर झालेल्या गौरम्मांचा संतापाचा रोख मग नवऱ्याकडे वळायचा, 'तुम्हीच त्याला नाही ते शिकवलंय! तो कसा मोठा माणूस होईल!'

यावर शामण्णा म्हणायचे, 'असू दे गं! तुझा चंद्रू मोठा माणूस होतोय ना? याला होऊ दे माझ्यासारखा- त्यालाही तुझ्यासारखी चांगली बायको मिळेल आणि त्याचाही संसार चांगला होईल.'

चंद्रूला 'इस्त्रो'मधलं काम खूपच आवडलं. तोही केवळ बुद्धिवानच नव्हता, निष्ठेनं काम करणं हा त्याचा स्वभावच होता. त्यामुळे तिथल्या वरिष्ठांचीही त्यावर लवकरच मर्जी बसली.

दिसायला देखणा असलेल्या चंद्रूवर अनेक वधूपित्यांची नजर होती; पण चंद्रू आणि गौरम्मा यांचा एवढ्यात त्याचं लग्न करण्याचा विचार न करण्याचा निर्णय होता. एक-दोन वर्षं नोकरी करून थोडाफार पैसा साठवल्यानंतर घरापुढच्या जागेवर किंवा वरती बांधकाम करून घ्यायचा त्यांचा विचार होता. शिवाय अमेरिका! तेच त्या दोघांच्या जीवनाचं महत्त्वाचं ध्येय होतं. त्यामुळं चंद्रू चौकशीसाठी आलेल्या वधूपित्यांची निराशा करत होता.

शामण्णांची आणखी दोन वर्षं नोकरी राहिली होती. तेवढ्या अवधीत सुरभीचं लग्न उरकून घ्यायचा त्यांचा विचार होता.

गिरीशचा पगार बेताचाच होता. त्याचं कुणालाच फारसं कौतुक नव्हतं. जेमतेम पोटापाण्यापुरते पैसे त्याला मिळत. त्यामुळे घराचं बांधकाम आणि सुरभीचं लग्न या दोन्ही गोष्टी चंद्रूच्या पगारावर अवलंबून होत्या. यानंतर उत्तम आयुष्य जगायचं असेल तर चंद्रूच्याच सुकाणूची गरज असल्याबद्दल गौरम्मांना खात्री होती.

एक दिवस ती आनंदाची बातमी आली. इस्त्रो कंपनीनं चंद्रूला कंपनीच्या कामासाठी अमेरिकेतील फ्लॉरिडा राज्यात पाठवण्याचं ठरवलं.

बातमी ऐकताच गौरम्मांना अपरिमित आनंद झाला. तारुण्य माघारी यावं तसा त्यांच्या मनात उत्साह भरला. चंद्रू एका वर्षासाठी त्या कुबेराच्या देशात निघाला होता.

सुरभी तर हुरळून गेली होती. ती सारखी म्हणत होती, 'चंद्रू, तू येशील तेव्हा माझ्यासाठी कमीत कमी सहा साड्या तरी आणल्याच पाहिजेत हं! आणि याशिवाय सिटीझन वॉच!'

गौरम्माही सांगत होत्या, 'तिथं केशर, वेलदोडे, बदाम वगैरे चांगले मिळतात म्हणे. आणि सोनंही फार स्वस्त असतं ना? येताना आणायला विसरू नकोस.'

गिरीश आणि शामण्णा मात्र या बाबतीत मौन बाळगून होते.

गौरम्मा आणि चंद्रूची अनेक वर्षांची आशा फळाला आली होती. चंद्रूनं साऱ्या फॉर्मॅलिटिज् उरकून अमेरिकेच्या दिशेनं प्रयाण केलं.

चंद्रू अमेरिकेला उतरला. त्याच्या कल्पनेपेक्षा हा देश कितीतरी वेगळा होता!

क्षणाक्षणाला नवेपण आत्मसात करणारा आणि शिकवणारा, सतत श्री-

संपत्तीची अनेकविध पद्धतीनं उधळण करणारा देश!

पाण्याचा दुष्काळ नाही, विजेची तक्रार नाही, घराची कटकट नाही! मानवाच्या मूलभूत गरजा पुऱ्या करण्यासाठी अति तत्पर असलेला देश!

आपला पाच हजार वर्षांचा पुरातन देश! चालुक्य-राष्ट्रकूटांचा... वगैरे वगैरे. कवींनी आपापल्या कवितांमधून ज्या देशाच्या ऐश्वर्याचं बेसुमार वर्णन केलंय, तो आज दारिद्र्य आणि अंधश्रद्धांमुळे पोकळ होऊन गेलेला आपला देश! असल्या जराजर्जर आणि असंख्य रोगांनी ग्रासलेल्या आपल्या देशाची तरुण-संपन्न अमेरिकेशी कशी तुलना होऊ शकेल! जमीन-अस्मानाची कधी तुलना होऊ शकते काय?

किती नेटका देश हा! कुणाचीही मदत नसताना इथं आपण घर शोधू शकतो. जगातल्या कुठल्याही कानाकोपऱ्यातल्या व्यक्तीशी क्षणार्धात संपर्क साधू शकतो.

मुख्य म्हणजे कुणीही घर-गाडी-फोन या सुखसोयी मिळवू शकतो. आपल्या भारतात मात्र केवळ श्रीमंत म्हणवणारेच या सुखसोयींचा उपभोग घेऊ शकतात.

प्रथम भेटीतच चंद्रू अमेरिकेवर मोहित होऊन गेला. किती भव्य देश हा! इथं राहणारे किती सुखी आहेत!

चंद्रूची नोकरीही चांगली होती. भारतात तो करत असलेल्या कामापेक्षा इथलं काम महत्त्वाचं होतं. केलेल्या कामाचा मोबदलाही चौपटीपेक्षाही जास्त होता! त्यामुळे हुशार आणि मुत्सद्दी चंद्रूनं नोकरीमध्ये यशाची कमान चढती ठेवली होती. कामाचं आणि त्यामुळं मिळणारं समाधान तो ओतप्रोत उपभोगत होता. त्याचा सारा दिवस उत्साहानं भरलेला असे.

संध्याकाळी घरी परतल्यावर मात्र घरच्या माणसांची आठवण होणं स्वाभाविक होतं. आईला पत्र लिहिताना अमेरिकेतला भाजीपाला, इथं मिळणारी फळं, फळांच्या रसाचे विविध प्रकार, आइस्क्रीमची समृद्धी यांविषयी आस्थेनं लिहित होता. इथं उपलब्ध असलेली छोटी-छोटी यंत्रे, गार्बेज कॅन- केराच्या बादल्या यांची वर्णनं त्याच्या पत्रात भरपूर होती. सामानाच्या काचेच्या बाटल्या रिकाम्या झाल्या की, त्याला न चुकता आईची आठवण यायची. तो लिहायचा, 'अम्मा, तू इथं असतीस, तर त्या सुरेख बाटल्यांमध्ये लोणचं भरून ठेवलं असतंस!'

अमेरिकेत खाण्यापिण्याची कशी चंगळ आहे, इथली माणसं कशी प्रामाणिक आहेत, कसे पैसे टाकून पेपर घेऊन जातात- कसे बसमध्ये कंडक्टर नसतात- याविषयीही तो न थकता विस्तारानं लिहित होता.

इथल्या पैशाचा- डॉलरचा सगळ्यांनाच मोह पडतो. इथला एक डॉलर इतका बलवान आहे की, त्यासाठी आपल्याकडील चाळीस रुपये द्यावे लागतात! या डॉलरमध्ये एवढी मंत्रशक्ती आहे की डॉलर असेल तर जगात कुठंही जाता येतं! डॉलर असेल तर साऱ्या जगात मान मिळतो.

चंद्रूचं पत्र आलं की संपलंच! त्या दिवशी डाळ आणि भाजी हमखास कच्ची राहायची, भात करपून जायचा, कॉफीमध्ये दोन-दोनदा साखर पडून गोडमिट्ट होऊन जायची! सारामध्ये मीठ गायब असे आणि भाजीमध्ये ते दोनदा पडलेलं असे.

त्यामुळे शामण्णा आणि गिरीश जेवताना हमखास म्हणायचे, 'आज चंद्रूचं पत्र आलेलं दिसतंय!'

पण गौरम्मांचं तिकडंही लक्ष नसे. त्या तर मनोमन अमेरिकेत जाऊन पोहोचलेल्या असत.

चंद्रूचं ट्रेनिंग संपत आलं होतं. आणखी दोन-तीन आठवड्यांनी भारतात परतून आपल्या ऑफिसमधील लोकांना ट्रेनिंग देण्याची जबाबदारी त्याला स्वीकारायची होती.

भारतात माघारी जाण्याच्या विचारानं चंद्रू अस्वस्थ होत होता. इथलं तंत्रज्ञान, आकर्षक देश- त्याहीपेक्षा इथल्या डॉलर शक्तीची त्याला प्रचंड भुरळ पडली होती.

इथं आल्यावर लवकरच त्याला आणखीही एक गोष्ट समजली होती. त्याच्या आधी इस्त्रोमधील चार-पाच तरुणांना अमेरिकेत येण्याची संधी मिळाली होती. ती पकडून ते इथं आले होते आणि संधी साधून इथल्या वेगळ्या कंपनीमध्ये त्यांनी नोकऱ्या धरल्या होत्या. अशा प्रकारे 'स्किपिंग' करून कामाला हजर होणाऱ्या तरुणांना इथल्या नव्या कंपन्यांमध्ये सांगण्यात येई, 'तुम्ही काही काळजी करू नका- तुम्हांला आम्ही आमच्या लॉयर्सच्या मदतीनं ग्रीनकार्ड मिळवून देऊ!'

ग्रीनकार्ड म्हणजे तिथं राहून हवं ते काम किंवा नोकरी करण्याचं परवानगी पत्र!

ग्रीनकार्ड हातात असलं की, देशात कुठंही काम करता येईल!

खरं तर अशा प्रकारे 'स्किप' करून अमेरिकेत स्थिरावणारे भारतातल्या आपल्या कंपनीलाही बाँड लिहून देऊनच आलेले असतात, हे चंद्रूला ठाऊक होतं. बाँडचा भंग केल्यामुळे मूळची कंपनी कोर्टात खेचू शकते, हे ठाऊक असूनही 'त्या वेळी पाहता येईल काय करायचं ते!' अशा प्रकारची मनोवृत्ती या 'पुळपुट्यां'ची असल्याचंही तो पाहत होता.

इथं आलेल्या दिवसांपासून चंद्रूचं याकडे लक्ष गेलं होतं. त्याचा जवळचा मित्र राजीव आणि त्याचा मित्र श्रीकांत हे दोघेही अशा प्रकारे अमेरिकेत विरघळून गेले होते. इस्त्रो कंपनीला त्यानंही त्या दोघांचा ठाऊक असलेला पत्ता समजू दिला नव्हता.

एकदा ग्रीनकार्ड हातात पडलं की, त्यानंतर मात्र हे सारे परागंदा झालेले अज्ञातवासी पुन्हा प्रगट होतात, मातृभूमीकडे धाव घेतात, तिथली एखादी मुलगी पसंत करून लग्न करतात आणि परत येतात. अशा मुलांना श्रीमंत घरातल्या

सुशिक्षित मुलीही मिळतात, हे चंद्रूही पाहत होता. मग तिथं त्यांचं 'सुखी' असं स्थिर जीवन सुरू होतं. मग ते त्याच डॉलर-भूमीचे प्रजाजन होऊन जातात.

ग्रीनकार्ड मिळण्यासाठी एक वर्ष लागेल- कदाचित दोन वर्षंही लागतील. काही जणांच्या बाबतीत तर त्याहीपेक्षा जास्त वेळही लागायचा. ग्रीनकार्ड न मिळवता भारताला निघून गेलं की इथं पुन्हा येण्याचं दार बंद झालेलं असायचं!

एक ना एक दिवस आपल्याला ग्रीनकार्ड मिळेल याविषयी चंद्रूची खात्री होती. फक्त त्यासाठी शबरीनं रामाची वाट पाहिली, त्या निष्ठेनं वाट पाहिली पाहिजे एवढंच.

चंद्रू विचार करत होता. अगदी सुरुवातीला त्याचं मन गोंधळलं असलं तरी दिवस जातील तसे त्यालाही 'स्किप' होण्यात काही गैर नाही हे पटू लागलं. एवढ्या समृद्ध देशात राहायची त्याची जबरदस्त इच्छा होती. एकदा भारतात परतलं की, पुन्हा इथं येण्याची संधी मिळणार नाही कदाचित!

त्यानं आईला पत्र लिहून आपल्या मनातले विचार कळवले. अखेरीस लिहिलं, 'तूर्त माझा इथंच राहायचा विचार आहे, हे घरी आणखी कुणाला सांगू नकोस. ग्रीनकार्ड हातात़ पडेपर्यंत मला भारतात यायला जमणार नाही.'

पत्र वाचताच गौरम्मांचा आनंद गगनात मावेना! आपला मुलगा यानंतर अमेरिकेत राहणार! डॉलरच्या रूपानं तो भरपूर पैसा मिळवेल आणि इथं पाठवेल! एक डॉलर म्हणजे चाळीस रुपये! आपणही मैत्रिणींपुढे 'आमचा चंद्रू अमेरिकेत राहतो-' असं अभिमानानं सांगू शकू!

चंद्रूचं लक्ष पेपरमधल्या एका जाहिरातीनं खेचून घेतलं. गवतांची कुरणं असलेल्या प्रदेशातल्या, अत्यंत कमी वस्ती असलेल्या, मिनिसोटामधल्या कंपनीनं जाहिरात दिली होती. त्यात कंपनीनं ग्रीनकार्ड मिळवून देण्याचीही जबाबदारी स्वत:कडे घेतली होती!

कुणीही जायला तयार नसलेला नीरस प्रदेश तो! हिवाळ्यामध्ये तर उणे त्रेपन्न फॅरनहिट इतकं कमी तापमान असलेला प्रदेश! जास्तीचा पगार दिला तरी, अशा प्रदेशात जायला माणसं तयार नसताना चंद्रूला मात्र हे योग्य स्थान आणि योग्य नोकरी आहे, असं तीव्रपणे वाटलं. अज्ञातवासासाठी हेच विराटनगर म्हणून योग्य होतं. फोनवर बोलणं झालं. इंटरव्ह्यूसाठी जाऊन आला. कुठल्याही खळखळीशिवाय काम झालं.

कुणालाही कळू न देता गाडी विकून, कंपनीनं दिलेल्या घरात रात्री दिवा लावून ठेवून चंद्रू तिथून बेपत्ता झाला.

दुसरे दिवशी चंद्रू कामावर आलाच नाही. घरी जाऊन पाहिलं तर दिवा जळत होता. आठवडा गेला, तरी चंद्रूचा पत्ता नव्हता. फ्लोरिडा ऑफिसच्या बॉसनं फोन

केला. चंद्रूनं टेलिफोनचं पुढच्या आठवड्याचं जास्तीचं बिल भरून पोबारा केला होता.

अमेरिकेतील त्याचे ज्येष्ठ अधिकारी निराशेनं म्हणाले, 'तो कुठंही गेलेला नाही. इथंच कुठंतरी स्किप झालाय! घाणेरडी माणसं ही! कशाचीच चाड नाही. आपल्या मातृभूमीला जाणं टाळण्यासाठी ही सगळी नाटकं करतात! देशप्रेम नाही- डॉलरच्या आशेपोटी असं वागतात. अशा लोकांना आपण दिलेलं ट्रेनिंग पूर्णपणे फुकट गेलं!'

त्यांनी मनोमन चंद्रू आणि चंद्रूसारख्यांना शापलं.

राजाजीनगरकडून विजयनगरकडे जाणारी बस गच्च भरून आली तेव्हा विनिताच्या छातीची धडधड आणखी वाढली.

ही बस चुकली तर शाळेत पोहोचायला तासभर उशीर होणार! लाल शाईचा शेरा! आधीच तात्पुरती नोकरी मिळाली होती. असे लाल शेरे पडले तर नोकरी कशी टिकेल?

विनितेनं सारं धैर्य एकवटलं आणि समरांगणात शत्रूवर तुटून पडणाऱ्या कित्तूर चन्नम्माप्रमाणे कंडक्टरच्या आक्षेपाकडे दुर्लक्ष करून ती बसमध्ये घुसली. बसमध्ये प्रवेश मिळताच तिनं विजयी मुद्रेनं सभोवताली बघत सुस्कारा सोडला आणि आधारासाठी खांबाला टेकली.

कंडक्टरनं विचारलं, 'कुठं जायचंय?'

'जयनगर-'

तिनं पर्स उघडली- आत फक्त एक शंभरची नोट होती. काल ट्यूशनच्या मुलानं दिलेली नोट. तिनं पर्समध्ये हात घालून शोधले, आजूबाजूच्या कप्प्यांच्या चेन उघडून पाहिलं- एक रुपयाही हाताला लागला नाही.

तिनं अपराधी भावनेनं ती नोट कंडक्टरपुढे धरली.

'पाच रुपयेही सुटे नाहीत. एवढे सुटे कुठून देऊ? असू दे, तुमचे यजमान काढताहेत.'

विनिता आश्चर्यचकित झाली- कोण हा माझा यजमान? या प्रौढ कंडक्टरनं नवा पैसाही खर्च न करता या क्षणी कुणाशी माझं लग्न लावलं?

तिनं वळून पाहिलं. मागं उभा असलेला उंच युवक हसत सुटे पैसे देत कंडक्टरला म्हणाला, 'दोन जयनगर-'

'बघा! सुटे पैसे असून नाही म्हणताय!' म्हणत कंडक्टरनं दोन जयनगरची तिकिटं विनितेच्या हातावर ठेवली.

हा कोण लागून गेलाय? स्वत:ला कोण समजतो? भूपती? राजा? माझं

तिकीट यानं का काढावं?

संताप दर्शवत विनितानं सांगितलं, 'मिस्टर! जयनगरला उतरल्यावर तुमचे पैसे परत करेन!'

'असू द्या हो.'

'तुम्हाला कदाचित हे चालेल! पण मी दुसऱ्यांचे पैसे घेत नसते!'

एवढ्यात विनिताला बसायला जागा मिळाली.

विनिता राजाजीनगरमध्ये आपल्या आत्याच्या घरी राहात होती. दररोज राजाजीनगरहून जयनगरपर्यंतचा खडतर प्रवास! जयनगरच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाल्यामुळे काही इलाजच नव्हता.

तिच्या जीवनातले धारवाडमधले रम्य दिवस कधीच निघून गेले होते. मायाबाजारातलं एखादं आकर्षक दृश्य नाहीसं व्हावं तसं झालं होतं.

थोरल्या काकांचा, भीमण्णांचा हृदयाघातानं अचानक मृत्यू झाला आणि त्या कुटुंबाचा आधारस्तंभच मोडून गेला.

तुळसक्का दावणगेरेमध्ये नोकरी करणाऱ्या आपल्या थोरल्या मुलाकडे निघून गेल्या.

रामक्का आपल्या सख्ख्या मुलाला सोबत घेऊन मासूरला आपल्या माहेरी निघून गेल्या.

तिथं फक्त आजी सीतम्मा आणि नात विनिता याच दोघी राहिल्या. सीतम्मांनी सगळ्या मुलांकडे थोडे-थोडे दिवस राहायचं असं ठरलं.

आता फक्त विनिताच राहिली.

तिची जबाबदारी कुणालाच नको होती. तिचं लग्न करायचं म्हटलं तर पैसे नव्हते. आता या वयात आलेल्या मुलीनं कुठं राहायचं हा एक प्रश्नच होता.

अखेर आत्या इंदक्का आणि तिचे पती रामराय यांनी मोठं मन करून तिला बेंगळूरला आणलं होतं. 'मोठं गाव आहे- लवकर कुठं तरी नोकरी मिळेल. हातात नोकरी असली की लग्नही लवकर जमेल. लग्न ठरलं की धारवाडचं घर विकता येईल. तोच पैसा लग्नासाठी वापरता येईल-' असा विचार साऱ्यांनीच केला. धारवाडच्या घराला कुलूप लावलं आणि माडी मात्र भाड्यानं दिली. तेवढाच झाडांची देखभाल करणाऱ्या माळ्याचा पगार निघेल.

धारवाडचं घर आणि बाग सोडून येताना विनितेला अत्यंत क्लेश झाले होते. तिनं आत्याला सांगितलं, 'घर मात्र विकू नका. आईला तिच्या माहेरकडून आलंय ते. माझा तर या बागेत सारा जीव अडकलाय!'

'खरंय बाई! पटतंय तुझं. जर कुणी सरदार हुंड्याशिवाय तुझ्याशी लग्न करायला तयार झाला तरच तू म्हणतेस तसं घर राखता येईल!'

पण व्यवहारात हे कसं शक्य होईल?

व्यावहारिक जग कसंही असलं तरी विनितेचं मात्र ते घर आणि त्या बागेशी, बागेतल्या प्रत्येक झाडाशी, तिथल्या पाना-फुलाशी अव्यक्त असं गाढ नातं जडलं होतं. तिथलं प्रत्येक झाड तिचं सख्खं भावंडं होतं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरू नये. ही बाग आणि हे घर सोडून ती कशी राहील?

पण तिच्या मनाचा कोण विचार करणार? निरुपायानं शेवटी तिनं बागेतल्या प्रत्येक झाडा-झुडुपांवरून हात फिरवून त्यांचा निरोप घेतला. मन घट्ट करून ती जनारण्य असलेल्या बेंगळूरला आली होती.

मोठ्या गावाची सुख-दु:खंही वेगळी. घराजवळ नोकरी कुठून मिळणार? विनिता सकाळी घरातली कामं आवरून, ट्यूशन उरकून जयनगरच्या शाळेत नोकरीसाठी येत-जात होती.

आता तिला प्रत्येक पैशाचं महत्त्व चांगलंच समजत होतं. त्यासाठी तिचे कष्ट चालले होते.

तरीही तिच्या चेहऱ्यावरचं हास्य लोपलं नव्हतं. तेच तर तिचं वैशिष्ट्य होतं!

बस जयनगरला थांबली. सारे विचार मागं सारून विनिता बसमधून उतरली. तिच्या पाठोपाठ तो उंच तरुणही खाली उतरला.

तिनं त्याला हटकलं, 'मिस्टर! थोडं थांबा. मी सुटे पैसे आणून देते.'

'गिरीश माझं नाव. कॅनरा बँकेत क्लार्क आहे-' त्यानं स्वत:चा परिचय सांगितला.

'ते ठीक आहे! तुम्ही इथंच थांबा. आलेच मी सुटे पैसे घेऊन.'

एवढ्या पटकन शंभर रुपयांची चिल्लर मिळणार नाही, हे गिरीशला ठाऊक असलं तरी आता ही सुंदर, स्वाभिमानी तरुणी करते तरी काय हे पाहत तो उभा राहिला.

विनिता निराश होऊन परतली. एकदम तिला सुचलं, 'तुम्ही बँकेतच नोकरी करता ना? मी संध्याकाळी बँकेत येऊन तुमच्याकडून सुटे पैसे घेईन!' आणि तिनं ती शंभरची नोट गिरीशच्या हातावर ठेवली.

'तुमचं नाव?'

'विनिता देसाई. ती शाळा दिसते ना? तिथंच मी शिकवते. आता उशीर झाला. निघू?'

विनिता नमस्कार करून निघून गेली.

गिरीश ती गेलेल्या दिशेकडे पाहून हसला. वेगानं जाताना तिच्या जाड वेणीचा फटका त्याला बसल्याचं तिच्या लक्षात आलं नाही.

शाळेत जाऊन पोहोचल्यावर विनिताला भीती वाटू लागली. कोण हा गिरीश

कोण जाणे! अशा अपरिचितावर विश्वास ठेवून मी तरी कशी शंभर रुपयांची नोट दिली? त्यानं फसवलं असेल तर? शंभर रुपये फुकापासरी गेलेच म्हणायचे! छे! वेडेपणाच झाला हा! महिनाभर केलेल्या कामाची कमाई होती ती.

पाठोपाठ विनितेला स्वत:ला वाटलेल्या भीतीचा रागही आला. जे झालं ते घडून गेलंय. त्यावर आता फार उलट-सुलट विचार करून काहीच उपयोग नाही.

संध्याकाळी ती मन घट्ट करून कॅनरा बँकेपाशी गेली. त्यानं नाव काय सांगितलं होतं? गिरीश की रमेश?

या विचारात ती तिथं पोहोचली तेव्हा तो बँकेच्या बाहेर तिची वाट पाहात उभा होता.

'वाटच बघत होतो. तुम्ही आला नसता तर तुमच्या शाळेत येऊन तुमचे पैसे द्यायचा विचार करत होतो.'

'शाळेत कुणी तुमच्या ओळखीचं आहे का?'

गिरीश मंद हसत म्हणाला, 'तिथं शामण्णा नावाचे संस्कृतचे शिक्षक आहेत ना? त्यांची ओळख आहे.'

'होय? केव्हापासूनची ओळख आहे?' विनितानं कुतूहलानं विचारलं.

'खूप वर्षांची ओळख आहे. मला यायला जमलं नसतं तरी मी त्यांच्याकडून पैसे पाठवले असते. हं, हे घ्या तुमचे पैसे-' म्हणत त्यानं एक बंद लखोटा तिच्या हाती ठेवला.

'थँक्स-' म्हणत तो घेऊन विनिता निघून गेली.

बसमध्ये बसल्यावर तिनं लखोटा खोलून पाहिला. त्यात शंभर रुपयांची चिल्लर होती. गिरीशनं बसचे पैसे त्यातून मोडून घेतले नव्हते.

विनिताला पाहिल्यावर आणि ती वडिलांच्या शाळेतच नोकरी करत असल्याचं समजल्यानंतर गिरीशच्या मनात प्रथमच स्वत:च्या लग्नाविषयी विचार आला.

गिरीशच्या लग्नाचा विचार गौरम्मांच्या मनात आला नव्हता. पण चंद्रूच्या पत्रामुळे अशा विचारांना तोंड फुटलं होतं.

त्यानं नुकतंच आईला पत्र लिहून कळवलं होतं, 'मला ग्रीनकार्ड मिळायला किती वेळ लागेल हे सांगता येत नाही. कदाचित आणखी दोन वर्षंही लागू शकतील. तुम्ही गिरीशचं लग्न करावं हे उत्तम!'

या पत्रानंतर गौरम्मांनी वधू-पित्यांना तसं कळवलं.

लग्नाचा विषय घरात गंभीरपणे चर्चिला जाऊ लागला तेव्हा गिरीशनं थोडं दुर्लक्षच केलं, त्यानंतर मात्र त्यानं वडिलांनाच थेट विचारलं,

'अण्णा, तुमच्या शाळेत विनिता देसाई म्हणून शिक्षिका आहेत ना?'

'होय. अगदी मंगळागौरीसारखी आहे! फार चांगली मुलगी आहे. आपल्यापैकीच

पण धारवाडची आहे ती.'

'आज मी त्यांना बसमध्ये पाहिलं.'

गिरीशचं मन जाणून शामण्णा तो नसताना गौरम्मांना म्हणाले, 'गौरी, मी विनितेला ओळखतो. फार गुणी मुलगी आहे. तिला आई-वडील नाहीत. इथंच नातेवाईकांकडे राहते. आपल्या गिरीशचंही आता लग्नाचं वय आहे. आपण विचारायचं काय?'

'आपण होऊन मुलीच्या घरी जाऊन 'तुमची मुलगी आमच्या मुलाला द्या' म्हणून तोंड वेंगाडायचं हे मला तरी पटत नाही. आपल्याकडेच काहीतरी खोट आहे, असं लोकांना वाटायचं. त्यांनी विचारलं तर बघू या-' गौरम्मांनी वरमाईच्या थाटात म्हटलं. त्यांच्या मनात आलं होतं ते वेगळंच! आई-वडील नसलेल्या मुलीला माहेरपण कोण करणार? जावयाचं कोडकौतुक कोण करणार?

शामण्णांना गौरम्मांचा स्वभाव काही अपरिचित नव्हता. त्यांनी एक मध्यस्थ तयार करून त्यांच्याकरवी इंदक्कांना निरोप पाठवला आणि वधू-परीक्षेचं नाटकही ठरवलं.

रात्री कांदा चिरत इंदक्का म्हणाल्या,

'विनू, या रविवारी ट्यूशन ठेवू नकोस बरं!'

'का गं, आत्या?'

'रविवारी मुलाकडची माणसं तुला बघायला येणार आहेत. पण एक मात्र आधीच सांगते- ते काही आपल्या गावाकडचे नाहीत. इकडचे आहेत. तू काय म्हणतेस? चालेल ना तुला?'

'मुलगा ठीक असला की झालं! मग ते कुठले का असेनात!' मध्येच रामराय म्हणाले.

विनिता म्हणजे त्यांच्या बायकोच्या भावाची मुलगी. लग्न होऊन सासरी गेली की खूप झालं! उगाच नाही तो चिकित्सकपणा कशाला दाखवत बसायचा?

रामरायांच्या मनातले विचार जाणून विनिताही म्हणाली, 'अगदी खरंय तुमचं, मामा!'

तिलाही वाटलं होतं- माणसं ती माणसंच ना? बेंगळूरमध्ये चांगली माणसं असतात आणि धारवाडची कितीतरी बिघडलेली माणसं तिनं पाहिली होती. आपल्या शाळेतल्या शामण्णा मास्तरांसारखा माणूस जगात तरी शोधून सापडेल काय?

तिनं नि:श्वास सोडला- आपल्या नशिबात कसली माणसं आणि कसला नवरा आहे कोण जाणे!

'मुलगा बँकेत क्लार्क म्हणून नोकरीला आहे. खाऊन-पिऊन सुखी माणसं आहेत. फारशी गडगंज नाहीत. एक मुलगा अमेरिकेला आहे म्हणे. तो आणखी

दोन वर्षांनी भारतात येणार आहे म्हणे. म्हणून आधी धाकट्याचं लग्न करणार आहेत. आणखी एक मुलगी आहे. तिचं लग्न झालं की जबाबदारी संपली. तुझी इंजिनियर-डॉक्टर किंवा ऑफिसरच पाहिजे अशी अट नाही ना?'

'नाही गं आत्या. तसं काहीही म्हणणं नाही. चार पैसे कमी मिळत असले तरी काही म्हणणं नाही- पण माणसं शांत आणि समाधानी असावीत. उगाच गोंधळ-कटकट मात्र असू नये. मीही नोकरी करेन. कष्टाला माझी ना नाही; पण मन प्रसन्न हवं.'

विनितेनं मनातलं मोकळेपणानं सांगितलं.

तो तिचा गाढ विश्वासही होता.

मनाविरुद्धच गिरीश मुलगी बघायला निघाला. वाटेत सुरभी म्हणाली,

'इतके दिवस घरात फक्त अण्णा तेवढेच टीचर होते- आता दोन टीचर होतील!'

'ते एवढ्यात कसं ठरेल? मी मुलगी पाहिल्याशिवाय लग्नाला कसा तयार होईन?'

'गिरी, ही मुलगी अण्णांच्याच शाळेत शिकवतेय म्हणे!'

'होय?' गिरीश चमकला, 'नाव काय मुलीचं?'

'तूच विचार ना तिथं गेल्यावर! नाहीतरी मुलगी बघायची म्हणजे नाव काय वगैरे विचारायचं असतं ना?'

'आधी तू मुकाट्यानं नाव सांग बघू!'

'विनिता देसाई!'

नाव ऐकताच गिरीशचं मन आनंदानं भरून गेलं. विनितेचा स्वाभिमान त्यानं पाहिला होता आणि त्याला तो फार आवडलाही होता. तिला पुन्हा भेटावं असं शंभरदा त्याच्या मनात येऊन गेलं होतं; पण त्यासाठी त्याला आधी राजाजीनगरमधल्या आपल्या मित्राकडे जायला हवं होतं, रात्री तिथं मुक्काम करून सकाळी नऊची बस पकडली पाहिजे होती तरच या मोहिनीची भेट होणं शक्य आहे!

त्याला आता विनितेची माहिती मिळाली होती; पण तरीही तीच आपली वाग्दत्त वधू असल्याची मात्र त्याला कल्पना नव्हती.

'विनिता, आतला ट्रे घेऊन ये बघू!'

खालच्या मानेनं ट्रे घेऊन येणाऱ्या विनितेकडे बघून गिरीशच्या चेहऱ्यावर हसू उमटलं होतं.

'बाळ, एखादं देवाचं गाणं म्हणशील काय?' शामण्णांनी विचारलं तेव्हा तिनं मान वर करून पाहिलं. गिरीशवर नजर जाताच तिच्याही ओठांवर हसू उमटलं.

त्यानंतर तिनं एक देवाचं गाणं सुरेलपणे रंगून जाऊन म्हटलं. गौरम्मा आणि

सुरभीलाही विनिता आवडली.

रामरायांनी शामण्णांना स्पष्टच सांगितलं, 'धारवाडला तिच्या आईकडून तिला मिळालेलं घर आहे. ते आम्ही तिच्या लग्नासाठी म्हणून ठेवलंय. तुम्ही तुमचं मत सांगितलं तर आम्हांला ते विकण्याची व्यवस्था करता येईल. शक्यतो लवकर तुमचं मत कळवा.'

'आमच्या विनूविषयी आम्ही फार काही सांगत नाही. तुम्ही तिला दररोज शाळेत पाहताच. तुम्ही तुमचा निर्णय लवकर सांगाल तर बरं होईल!' इंदक्का म्हणाल्या.

वरमाईच्या ठेक्यात गौरम्मा म्हणाल्या, 'उद्या आम्ही तुम्हांला कळवू!' आणि सगळे तिथून बाहेर पडले.

मिनिसोटामध्ये चंद्रू बऱ्यापैकी रुळला होता. ग्रीनकार्डसाठी त्यानं अर्ज दिला होता. तिथल्या वकिलांनी मोघम सांगितलं,

'काहीही सांगता येत नाही. कदाचित लगेच मिळून जाईल, किंवा बराच उशीरही लागेल कदाचित!'

त्यामुळे त्याची अवस्था त्रिशंकूसारखी होऊन बसली होती. आता कुठल्याही कारणासाठी भारतात गेलं तर परत येण्यासाठी व्हिसाचा प्रश्न होता. त्यामुळे घरी आणि आपल्या माणसांची कितीही आठवण झाली तरी त्याचा नाइलाज होता.

त्याच्या मित्रांपैकी काहीजणांना ग्रीनकार्ड मिळाल्याचं त्याला समजलं. ते मित्र लग्न ठरवण्यासाठी म्हणून ढीगभर सामान घेऊन भारतात आपापल्या गावी गेले होते. तिथं तीन दिवसांत तीस मुली बघून, त्यांतली एक निवडायची आणि लग्न करून इथं यायचं असा त्यांचा प्लॅन होता. कुणी मुलीची व्हिडिओ कॅसेट पाहूनही लग्न ठरवलं होतं.

एवढे दिवस अमेरिकेत राहिल्यामुळे चंद्रूला तिथल्या सुख-साधनांची अपरूपाई राहिली नव्हती. आता त्याची त्याला सवय होऊन गेली होती.

उलट आता त्याला तिथं एकटेपणाची जाणीव होऊ लागली होती. त्याच्या मनात अधूनमधून लग्नाचे विचारही डोकावून जात होते. आतापर्यंत डॉलर्स-अमेरिका-ग्रीनकार्ड यातच संपूर्णपणे बुडून गेल्यामुळे आणखी कुठल्याही विचारांनी मनात प्रवेश केला नव्हता. आता त्या साऱ्या अडचणी दूर होऊन जीवन नेहमीप्रमाणे झाल्यावर लग्नाचा विचार येणं स्वाभाविकच होतं म्हणा!

लग्नाचा विचार मनात येताच त्याला न चुकता विनिताची आठवण येत होती.

त्याला विनिता मनापासून आवडली होती. त्याचं तिच्यावर प्रेम होतं असंही म्हणता येणार नाही. जेव्हा लग्नाचा विचारच मनात नव्हता, तेव्हा तो तिला पूर्णपणे

विसरून गेला होता. आता लग्नाच्या विचारानंतर तिची आठवण येत होती. त्यानं तिच्यापुढे कुठल्याही प्रकारे मनातली भावना व्यक्त केली नव्हती. शिवाय त्याला ती आवडली होती- तिला त्याच्याविषयी काय वाटत होतं, हेही त्याला ठाऊक नव्हतं.

एकदा आठवण झाल्यानंतर मात्र त्याला सारखं मनात येऊ लागलं- आता विनिता कशी असेल? तिचं लग्न झालं असेल काय? तिच्या घरची परिस्थिती पाहता एवढ्यात लग्न व्हायची शक्यता कमी आहे. ती कुठं तरी नोकरी करत असेल. ही शक्यता मात्र त्याला जास्त वाटली.

त्याला वाटलं, तिला पत्र लिहून आपल्या मनातली भावना व्यक्त का करू नये? पण मनात आशंका उमटली. विनितेला पत्र बघून काय वाटेल? तिला आवडेल की नाही? पुन्हा वाटलं- काय हरकत आहे? समोरासमोर भावना व्यक्त करण्यापेक्षा पत्र लिहायचा विचार केव्हाही चांगला! शिवाय आपण मनातली भावना व्यक्तच केली नाही, तर ती तिच्यापर्यंत पोहोचणार तरी कशी?

अखेर विचार करकरून त्यानं विनितेच्या नावे एक पत्र लिहिलं-

विनिता यांना,

माझं हे पत्र पाहून तुम्हांला आश्चर्य वाटेल; पण तुम्ही हे वाचून गैरसमज करून घेऊ नये.

मला अमेरिकेला येऊन अडीच वर्षं झाली आहेत. तुमच्या मनात असेल आणि आणखी कुठल्याही प्रकारची अडचण नसेल तर तुम्ही माझी आणखी थोडी वाट पाहाल का? मला अजूनही ग्रीनकार्ड मिळालेलं नाही. त्यासाठी आणखी काही दिवस लागतील असं दिसतं.

तुमची यासाठी तयारी असेल तर पत्रामागे दिलेल्या पत्त्यावर पत्र लिहा. तुमचा नकार असला तरी मला त्याचा राग नाही. तुमच्या निर्णयासाठी तुम्ही स्वतंत्र आहात.

घरात थोरांना नमस्कार.

इति

चंद्रू

दिवसांमागून दिवस गेले, महिनेही गेले तरी विनितेकडून उत्तर आलं नाही. चंद्रूला काळजी वाटू लागली- पत्र आणखी कुणाच्या तरी हाती पडलं नसेल ना? अमेरिकेत काही वर्षं राहिल्यामुळे आपला अशा गोष्टींकडे बघण्याचा दृष्टिकोन मोकळा असतो. धारवाडच्या माळमड्डीवर राहणाऱ्यांची दृष्टी वेगळी असते.

चंद्रूला स्वत:च्या अविचारीपणाचा राग आला.

अखेर एक दिवस पाकीट आलं. त्यानं लिहिलेलं पत्रच माघारी येऊन त्याला पोहोचलं होतं. पत्त्यावर ही व्यक्ती राहत नसल्याच्या शेऱ्यासहित पत्र आलं होतं.

आपलं पत्र आणखी कुणाच्या हातात पडलं नाही म्हणून सुस्कारा सोडत असतानाच चंद्रू गोंधळून गेला. कुठे गेली विनिता?

मनात पालवलेल्या आशा-आकांक्षा आणि गुपिताच्या त्या पत्रासोबत चिंध्या करून चंद्रूनं त्या कचऱ्याच्या टोपलीत टाकल्या. त्याचं मन निराशेनं भरून गेलं. आंब्याचं मोहोरलेलं झाड कोकिळेच्या कूजनाची आतुरतेनं वाट पाहत होतं- पण कोकिळा वेगळ्याच वृक्षावरच्या घरट्यात शिरली होती.

गौरम्मांनी शामण्णांना स्पष्टपणे सांगितलं होतं,

'अहो, बेंगळूरमध्ये घर असतं तर गोष्ट वेगळी! धारवाडमधलं घर घेऊन काय करायचं? आपल्याला काय उपयोग धारवाडमधल्या घराचा? आपल्या घरचं हे पहिलं लग्न आहे. त्यासाठी परगावचे भरपूर नातेवाईक जमतील. सगळे विचारतील- मुलीकडच्यांनी काय काय दिलं? त्यांना म्हणावं, आमच्या गावात तीन दिवसांसाठी एक चांगलं कार्यालय धरा आणि छान लग्न करून द्या. आपल्याला हुंडा मुळीच नको. म्हणावं, सालंकृत कन्यादान करून द्या. त्यांच्याच मुलीला सोनं घालू द्या. आम्हांला काही नको. लग्नाला माणसं येतील त्यांना जेवण आणि खाणं-पिणं मात्र उत्तम करा म्हणावं. ती माणसं काय पुन्हा-पुन्हा आपल्या घरी येणार आहेत? नंतर एक उत्तम रिसेप्शन करून द्या म्हणजे झालं!'

'गौरी, आपण यात लक्ष घालू नये. विनिता आणि गिरीशलाच घराच्या संदर्भात जे ठरवायचं ते ठरवू द्या. स्वत:च्या मालकीचं घर विकून गावभरच्या नातेवाईकांकडून शाबासकी मिळण्यात काय अर्थ आहे? माझं मत असं आहे!' शामण्णांनी सांगितलं.

गिरीशनं आई-वडिलांची मतं ऐकून घेतली. विनिताशी बोलल्यानंतरच धारवाडच्या घरासंदर्भातला निर्णय घ्यायचा, हे त्याचं पक्कं ठरलं होतं.

लग्न ठरल्याच्या आनंदापेक्षा धारवाडचं घर विकण्याच्या विचारानं विनिता दग्ध झाली होती. पण मनातला दाह कुणापुढे व्यक्त करणार? घर जुनं होतं, काही ठिकाणी पडझडही झाली होती; पण ते घर म्हणजे तिच्या लहानपणी मृत्यू पावलेल्या आईची आठवण होती. आता तिचं असं या जगात केवळ ते एक घरच होतं. तिचं बालपण त्या घरात गेलं होतं. रात्रीच्या काळोखातही ती कुठलं झाड कुठं आहे हे दाखवू शकत होती.

झाडा-वृक्षांच्या सान्निध्यात वाढलेल्या विनिताच्या मनात दु:ख-वेदना ठसठसू लागली की, याच झाडा-वृक्षांच्या सान्निध्यात तिचा निचरा होऊन विनिता पुन्हा

आनंदित होत असे. ती बाग- तो निसर्ग तिच्या दृष्टीनं केवळ स्थावर मालमत्ता नव्हती, तोच तिचा सखा-सांगाती होता. घरात भरपूर कामाचं ओझं असलं तरी झाडांच्या आणि सुरांच्या सावलीत तिला कष्टाचाच नव्हे; साऱ्या जगाचाच विसर पडत होता.

केवळ तीन दिवसांच्या उत्सवासाठी असलं जिवाभावाचं घर आणि बाग विकून टाकणं हा विचारच तिला अत्यंत हिंस्र वाटत होता. बाग आणि घर विकून आलेल्या पैशांमधून सोनं-नाणं, रेशमी साड्या, चांदीची भांडी घ्यायची- त्या साड्यांनी आपला देह झाकायचा- तिला सारंच असह्य होत होतं.

पण तिला कुणीही 'या संदर्भात तुला काय वाटतं?' असं विचारलं नव्हतं. शिवाय ते व्यवहार्यही नव्हतं. धारवाडचं घर विकल्याशिवाय लग्न होणंच शक्य नव्हतं. त्यामुळे आता तिच्यापुढे केवळ दोनच पर्याय होते- लग्न की घर? मन काहीही म्हणत असलं तरी तिला घरावरचा मोह सारावा लागणार, हे तिलाही समजत होतं.

घशाशी आलेला आवंढा गिळत विनिता बसमधून उतरली. समोर गिरीश होता. तिनं पटकन डोळे टिपले; पण गिरीशच्या तीक्ष्ण नजरेनं हे जाणलं होतं.

'विनिता, थोडं काम आहे. रजा टाकून येणार का?'

'हं-' म्हणत तिनं मान डोलावली आणि ती गिरीशबरोबर चालू लागली.

पावलं गिरीशबरोबर पडत असली तरी, विनितेच्या मनात अनेक आशंका उमटत होत्या. याआधी ती कधीच एखाद्या तरुणाबरोबर अशी फिरायला बाहेर पडली नव्हती. तरीही मनाच्या कोपऱ्यात एक आशा डोकावत होती- आपला पती होणाऱ्या या तरुणाला आपण आपल्या मनातली भावना बोलून दाखवली तर घर विकणं टाळता येईल का?

लालबागमध्ये सकाळच्या वेळी नेहमीप्रमाणे कोवळ्या प्रेमिकांची वर्दळ होती. एका चाफ्याच्या वृक्षाखाली असलेल्या दगडी बाकाच्या टोकावर बसत विनितेनं विचारलं, 'काय बरं? कशाला बोलावलंत मला?'

'थोडं काम होतं? तुमच्या धारवाडच्या घराच्या संदर्भात थोडं बोलायचं होतं.'

विनितेच्या हृदयाची धडधड वाढली.

गिरीश पुढं म्हणाला, 'धारवाडचं घर विकून लग्न करायला माझा विरोध आहे, हेच तुम्हांला सांगायचं होतं! तुमचं या बाबतीत काय मत आहे?'

मस्तकावर मध्यान्हीचा सूर्य तळपत असताना हजारो कारंजी एकाच क्षणी सर्व बाजूंनी उसळावीत तसा विनितेला अनुभव आला. सुकून निष्प्राण झालेल्या वेलीवर अमृत-सिंचन व्हावं तशी ती डवरून आली.

गिरीश पुढं म्हणाला, 'आजच्या दिवसांत एक घर बांधणं किती कठीण आहे,

हे मला ठाऊक आहे! आमचं छोटं घर आहे. माडीवरच्या दोन खोल्या बांधण्यासाठी आम्ही वीस वर्षं धडपडत होतो तरी जमत नव्हतं. आता आमचा थोरला भाऊच अमेरिकेत असतो. तो तिथं डॉलर्स वाचवून आम्हांला पाठवून देतोय. म्हणून आम्ही माडीवरच्या खोल्यांचं बांधकाम काढलं आहे. केवळ दोन खोल्या वाढवायला दोन लाखांपेक्षा जास्त खर्च आला आहे.'

विनिता मूकपणे गिरीशचं बोलणं ऐकत होती.

'दोन दिवसांसाठी सगळे पाहुणे जमतील; 'लाडू उत्तम होते, अमुक छान होतं, तमुक रुचकर होतं' म्हणत निघून जातील; पण एकदा हातातून गेलेलं घर पुन्हा मिळणार आहे काय?'

आता तीही म्हणाली, 'मलाही तसंच वाटत होतं. पण तुम्ही काय म्हणाल म्हणून काही बोलले नाही.'

तिच्या आवाजातला आनंद लपत नव्हता. चेहराही समाधानानं फुलला होता.

'विनिता, आपण राघवेंद्रस्वामींच्या मठात अगदी साधेपणानं लग्न करू या. मी तुला एक साडी आणि मंगळसूत्र एवढंच देईन. एक वेळ जेवण देऊ या. या सगळ्या नातेवाईकांना थेट मठात बोलवायचं आणि तिथून परस्पर निरोप द्यायचा. माझा सगळा पगार मिळून साडेतीन हजार रुपये आहे. आईच्या हातात दोन सोन्याच्या बांगड्या आहेत आणि घर. एवढीच आमची संपत्ती. याशिवाय आणखीही एक मूल्यवान ऐवज तुझ्याकडे असेल!'

'तो कोणता?' विनिता बुचकळ्यात पडली.

'मी!'

'त्या बाबतीत माझ्याइतकी श्रीमंत मीच!' विनिता लाजून; पण मनापासून म्हणाली.

'गिरीशचं लग्न ठरलंय. तुला त्यासाठी इथं आलंच पाहिजे. केव्हा जमेल ते कळव. म्हणजे तसा मुहूर्त ठरवता येईल.

तू घरातला थोरला मुलगा! खरं पाहता आधी तुझं लग्न व्हायला पाहिजे. तू कळवलंस म्हणून आधी गिरीशचं लग्न ठरवलं आहे एवढंच.

मुलगी तुझ्या वडिलांच्या शाळेत नोकरी करते. पेन्शनर झाल्यानंतर तू पाठवलेल्या पैशांमधून माडीवरच्या दोन खोल्यांच्या बांधकामावर तुझे वडील लक्ष ठेवत आहेत. चंद्रू, तू नसतास तर आमचे हे दिवस कसे गेले असते, या विचारानंही मन घाबरं होतं!'

आईचं विस्तृत पत्र वाचून चंद्रूला आनंद झाला. पत्रात गिरीशच्या बायको होणाऱ्या मुलीचं नाव लिहायचं राहून गेलं होतं. गिरीश किंवा शामण्णांना पत्र

लिहायची सवय नव्हती. त्यामुळे आईच्या पत्रातून जेवढं समजत होतं तेवढंच.

आईनं भरपूर आग्रहानं लिहिलं असलं तरी, आता भारतात जाण्यात शहाणपणा नाही, हे चंद्रूला समजत होतं. भावाच्या लग्नाचं कौतुक म्हणून भारतात गेलेल्या वेळीच जर ग्रीनकार्ड मिळण्याची संधी हुकली तर आपल्यावर कायमचे अविवाहित राहण्याची पाळी येईल! तीन वर्षं इथल्या जीवनाची सवय झाली आहे. संधी हुकली तर पुन्हा बेंगळूरमधल्या त्या खुराड्यासारख्या घरात गर्दी करून दाटीवाटीनं आयुष्यभर राहावं लागेल.

त्याऐवजी आता लग्नासाठी म्हणून शंभर डॉलर पाठवले तर त्यांना चार हजार रुपये मिळतील. काहीतरी खर्च करून खूष होतील.

पण आता विनिता कुठं असेल? तिची साथ ज्याला लाभेल तो मात्र खरोखरच नशिबवान म्हटला पाहिजे. तो दररोज तिची सुरेल गाणी ऐकू शकेल! तिच्यासारखी मुलगी दिवा घेऊन शोधत फिरलं तरी दुसरी सापडणार नाही! त्यासाठीही नशीब हवं ना!

चंद्रूनं सुस्कारा सोडला.

सासरी विनितेचे दिवस आनंदात चालले होते. तिच्यावर पित्याप्रमाणे वात्सल्याचा वर्षाव करणारे सासरे तिची मुलीप्रमाणे काळजी घेत होते. हृदयात प्रेमाला परमस्थान देणारा पती गिरीश होता!

सासूबाईंनीही तिला कधी एखाद्या का होईना, कटू शब्दानं दुखवलं नव्हतं; पण त्यांच्या वागण्यात सासऱ्यांइतकी आत्मीयता नव्हती. त्यांचा स्वभावही फारसा बोलका नव्हता. त्यांच्या अंतर्मनात काय दडलंय हे विनितेला संपूर्णपणे कधीच उमजत नव्हतं. त्यांच्या बोलण्यात आणि मनातल्या भावनेत भेद असल्याचा अनुभव अधूनमधून विनितेला येत होता. त्यांच्या बोलण्यात भावनेपेक्षा व्यावहारिक कर्तव्याचा भाग अधिक असे.

हे विनितेच्या लक्षात आलं तरी तिला वाटायचं, इतर सासवांपेक्षा हे कितीतरी चांगलं, नाही का? त्या निदान घालून-पाडून बोलत नाहीत- वाईट वागत नाहीत.

सुरभीच्या वागण्यात अजूनही अल्लडपणा होता. तिला अजूनही फक्त सिनेमा, साड्या, खाणं-पिणं, मैत्रिणींबरोबर फिरणं यातच आनंद वाटत होता. कॉलेज संपवून ती घरातच असली तरी घरातल्या कुठल्याही कामाला ती हात लावत नव्हती. आईही मुलीत आपले पंचप्राण असावेत, अशा प्रकारे मुलीला जपत होती! सुरभी म्हणजे राजकुमारी आहे, तिला कुणीही कुठलंही काम सांगायचंच नाही, हे गृहीतच होतं. चुकून कुणी काही काम सांगितलंच तर त्या म्हणायच्या,

'अय्यो! ती आणखी कितीसे दिवस इथं राहणार आहे? इथं आहे तितके

दिवस तिला आरामात असू द्या ना!'

सुरभीच्याच वयाची विनिता पहाटे पाच वाजता उठायची. सुरभी मात्र नऊ वाजता उठायची. त्यानंतरचा सारा वेळ ती टीव्ही पाहण्यात आणि नटण्यामुरडण्यात घालवत असे.

तसं पाहिलं तर त्या घरातही श्रीमंतीचं कुठलंही लक्षण नव्हतं. तरीही विनिता सुखी होती. पतीबरोबर प्रेम आणि जीवनातले अनुभव वाटून घेत तिचा समाधानी जीवनक्रम चालला होता. केवळ पैसा आणि दागदागिन्यांमुळे स्त्री सुखी होते, या भ्रमात ती कधीच नव्हती.

कधी-कधी तिला एका गोष्टीची मात्र खंत वाटत असे. गिरीशच्या स्वभावात कुठलीही खोट नव्हती. त्याच्यामध्ये असलेला संगीतप्रेमाचा अभाव ही एकच गोष्ट विनितेला अधूनमधून खट्टू करत होती; पण ही गोष्ट इतकी छोटी होती की, विनिता कधी त्याचा उच्चारही करत नव्हती.

शामण्णांना मात्र तिच्या संगीत-कलेचं कौतुक होतं. ते दररोज तिच्याकडून दोन-चार गाणी-भजनं ऐकत. त्यांनी तर तिला आणखी संगीत शिकायचाही आग्रह केला होता.

धारवाडमध्ये विनितेचं हिंदुस्थानी संगीतात शिक्षण झालं होतं. बेंगळूमध्ये तसा गुरू भेटणंही कठीणच होतं. शिवाय तिला संगीताकडून आत्मतृप्तीखेरीज आणखी कशाचीच अपेक्षा नव्हती. वसंतबनात गाणाऱ्या कोकिळेला कुठं राजदरबारातल्या उच्च स्थानाची अपेक्षा असते?

अलीकडे तिची नोकरी सरकारी झाली होती. त्यामुळे तिचा पगारही समाधानकारक होता. धारवाडचं घर न विकल्यामुळे तिच्या मनात समाधानाबरोबरच गिरीशविषयी कृतज्ञभावना काठोकाठ भरलेली असे.

गिरीशही नेहमीप्रमाणेच राहात होता. त्यांच्या श्रीमंत नसलेल्या जीवनात समाधान काठोकाठ भरलेलं होतं. दिवस कसे जात होते, ते त्या दोघांनाही कळत नव्हतं.

शशिकला विनितेच्या शाळेतच नोकरी करत होती. त्या दोघींचं पटायचंही खूप. दोघी एकाच वेळी नोकरीला लागल्या होत्या. शशी अजून नोकरीत कायम झाली नव्हती. दोघीही परस्परांची सुख-दुःखे एकमेकींना सांगायच्या.

त्या दिवशी शशी शाळेत आली तेव्हा तिचा चेहरा उल्हासानं फुलला होता. मनातला आनंद लपवण्याचा शशीचा प्रयत्न विफल होत होता.

तिला पाहताच विनितेनं विचारलं, 'काय गं? काय बातमी आहे? एवढा कसला आनंद?'

'आत्ता नको! लंच-टाईममध्ये सांगते-' शशी उद्गारली.

'सांग तर!'

'अंहं- दुपारी पवित्रा हॉटेलला जाऊ या. तिथं सांगेन.'
'पार्टी आहे?'
शशी हसली.
दुपारी लंच-टाइमला दोघी ठरल्याप्रमाणे पवित्रा हॉटेलच्या माडीवर गेल्या.
खुर्चीवर बसल्या-बसल्या विनिता म्हणाली, 'शशी, अभिनंदन!'
'विनू, तुला कसं समजलं?'
'तुझा चेहरा बघून!'
शशीचा चेहरा आणखी लाल झाला. ती सांगू लागली,
'आमच्या वडिलांच्या मित्राचा मुलगा. शंकर त्याचं नाव.'
'लग्न कधी?'
'आणखी दोन-तीन महिन्यांनंतर होईल असं वाटतं. आजच त्यांचे वडील घरी येऊन गेले. एवढ्यात मुहूर्त नाही.'
'कार्यालय मिळाल्यानंतर लग्न होईल म्हण ना! मुहूर्ताचं काही विशेष नाही!' विनिता हसत म्हणाली.
'मला नोकरी सोडावी लागेल, विनू!'
'शंकर कुठली नोकरी करतात? काय शिकलेत ते?'
शशीचा चेहरा उतरला. शंकर मैसूरमध्ये राहात होते. एम. एस्सी चौथ्या क्रमांकानं पास होऊनही त्यांना बरी नोकरी मिळाली नव्हती. आता ते तात्पुरती क्लासेसमध्ये शिकवण्याची नोकरी करत होते.
'मग एवढ्यात लग्नाचा का विचार करताहेत?'
'दोन्ही घरांमध्ये खूप वर्षांचे स्नेहसंबंध आहेत. माझी आईच म्हणाली- नोकरीची वाट बघत लग्न पुढं टाकायला नको. मीही नोकरी करून संसाराला हातभार लावू शकेन किंवा दोघं मिळून क्लासेस सुरू करू.'
'हं. तेही खरंच म्हणा! उगाच लग्न का पुढं ढकलायचं? बरं! साखरपुडा कधी?'
'त्यांच्या घरी साखरपुडा करायची पद्धत नाही म्हणे. एकदम लग्नच. विनू, मला मात्र काही वेळा भीती वाटते बघ!'
'भीती कसली?'
'सगळं ठीक होईल ना?'
'होईल गं! सगळं ठीक होईल. माझाच अनुभव सांगते. दोघं मिळून कष्टाची तयारी ठेवा. धैर्य गमावू नका.'
भविष्यात काय दडलंय ते कुणास ठाऊक! तरीही विनिता तिच्या मनाचं धैर्य वाढवत होती.

शशी म्हणाली, 'आजच नोकरीचा राजीनामा देते. दोन महिन्यांची नोटीस देणं आवश्यक आहे ना!'

दोघी उठल्या. हिनं आणखी थोडा विचार करून राजीनामा द्यावा, असा विचार करत विनिता तिच्याबरोबर चालू लागली.

अलीकडे शशीनं शाळेला येणं सोडून दिलं होतं. त्यामुळे विनितेला एकटेपणाची भावना जाणवत होती. 'शशी सुखी आहे ना, मग झालं तर!' अशी ती स्वत:ची समजूत काढत होती. आपल्या प्रिय मैत्रिणीच्या लग्नाला काय भेट द्यावी याचा ती विचार करत असतानाच एक दिवस ती बातमी आली.

'विनिता, तुला समजलं? शशीचं लग्न मोडलं!' शाळेतल्या ज्येष्ठ शिक्षिका सुशीला मॅडमनी तिला विचारलं.

'नाही! मला ठाऊक नाही!' विनिता बसलेल्या धक्क्यातून स्वत:ला सावरत म्हणाली.

'तुम्ही दोघी एवढ्या मैत्रिणी असूनही काही बोलली नाही ती? फार त्रास झालाय तिला!'

पुढचं बोलणं विनिताच्या कानात शिरलंच नाही. काय झालं असेल? शंकरला अपघात झाला असेल काय? त्याचं वेगळ्या एखाद्या मुलीशी प्रेमप्रकरण असेल काय? पण शशीशी त्याचा अनेक वर्षांचा परिचय होता आणि त्याच्या मर्जीनंच हे लग्न ठरलं होतं. मग का मोडलं असेल लग्न? विनिताच्या जिवाची तडफड झाली.

शाळा सुटल्यावर विनितेनं सरळ शशीच्या घराची वाट पकडली.

दारात विनितेला पाहताच शशीच्या मनावरचा ताबा सुटला. ती हुंदके देऊन रडू लागली.

विनितेनं घरावरून नजर फिरवली. घरभर पदोपदी लग्नाची तयारी दिसत होती. घराची रंग-रंगोटी झाली होती. एका कोपऱ्यात तांदळाची पोती रचलेली दिसत होती.

विनितेला पाहताच शशीची आई म्हणाली, 'विनिता, तूच हिची समजूत काढ बाई! शशी थोडं अतीच करतेय. ह्या सगळ्या ऋणानुबंधाच्या गोष्टी असतात. आपलं नशीब तेवढं बलवत्तर हवं. नशिबात नसेल तर काय करायचं? गेले दोन दिवस हिनं अन्नाला स्पर्श केलेला नाही!'

एवढी मोठी घटना घडलेली असताना शाब्दिक वेदांताला काही अर्थ नाही हे विनितेला समजत होतं.

शशीच तिला 'इथं नको, चल-' म्हणत माडीवर घेऊन गेली. माडीवरच्या गच्चीत मंद वारं वाहत होतं. समोर पसरलेल्या अथांग बेंगळूरचे दिवे दिसत होते.

तिथल्या चटईवर बसत विनितेनं विचारलं, 'शशी, शंकरची प्रकृती बरी आहे

ना?'

शशीच्या डोळ्यांमधले अश्रू अदृश्य होऊन त्यांची जागा संतापानं घेतली.

'त्याला कसली धाड भरलेय? चांगला टोणग्यासारखा माजलाय! त्याच्यामुळे आमचा अपमान झालाय. मला तर जीवनाचाच कंटाळा आला आहे. विश्वासघातकी नराधम मेला!'

'अशी कोड्यात बोलू नकोस बाई! काय झालं ते नीटपणे सांग ना! का मोडलं लग्न?'

भावनावेगानं शशीला बोलणं सुचत नव्हतं.

'सांग ना!'

विनितेनं पुन्हा-पुन्हा म्हटलं तेव्हा ती उद्गारली, 'त्यानं स्वत:ला विकलंय!'

'म्हणजे? मला नाही समजलं.'

'आमच्या समाजापैकी बरेच अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. त्यांच्यापैकी एकजण आपल्या वीस वर्षांच्या मुलीला घेऊन इथं आले होते. त्यांनी वृत्तपत्रात जाहिरात दिली- आमच्या मुलीशी जो लग्न करेल, त्याला अमेरिकेला घेऊन जाऊ, म्हणून!'

'शंकर गेला?'

'फक्त शंकरच नव्हेत, कितीतरी सुशिक्षित तरुणांनी ती जाहिरात वाचून अर्ज टाकले होते म्हणे! डॉक्टर, सी. ए., इंजिनिअर कितीतरी उच्चशिक्षित तरुण! शंकरनंही गमतीनं त्यासाठी अर्ज टाकला होता म्हणे. पण त्या मुलीला नेमका हाच आवडला!'

'हे काय गं? एखाद्या नोकरीचा इंटरव्ह्यू झाला हा! मग पुढं काय झालं?'

'मग काय! हाही तयार झाला. त्याला वाटलं, आपल्याला संपूर्ण आयुष्यात पुन्हा कितीही धडपड केली तरी अशी संधी मिळणार नाही. कशाला संधी सोडायची? मला त्यानं क्षमा कर म्हणून पत्र लिहिलं आहे.'

'तू त्याचं नरडं धरायचंस! गप्प का बसलीस?'

'खरं सांगू? ते त्याचं पत्र वाचून मला त्याची किळस आली. एवढ्या वर्षांची ओळख, नातं, भावना-सरळ पायदळी तुडवून डॉलर आणि ग्रीनकार्डसाठी त्या मुलीचे पाय चाटणारा शंकर! छी!'

'त्याचे आई-वडील काय म्हणतात?'

'माझे आई-वडील त्यांना जाऊन भेटले. हा कुठल्या गावाचा विपरीत न्याय? म्हणून विचारलं तर म्हणताहेत- अहो, आमच्या मुलाचं तिकडं उज्ज्वल भविष्य आहे! आम्ही का त्याचं नुकसान करू? तो इथं राहिला तर आमच्यासारखाच दरिद्री राहील. सारं जीवन सरलं तरी एक घर बांधायला जमणार नाही, आमच्या मुलींच्या

लग्नाचं कर्जही फेडता येणार नाही. म्हणून आम्हीच त्याला हे लग्न करायला सांगितलंय!

'तूही नोकरी सोडलीस ना!'

'होय. त्यावरही शंकरनं उपाय सुचवलाय. त्यानं सांगितलंय- शशीच्या लग्नाला येईल तेवढा खर्च मी अमेरिकेला गेल्यावर डॉलरच्या रूपात पाठवून देईन म्हणून!'

'म्हणजे काय! डॉलरच देव होऊन बसलाय म्हणायचा!'

'देव की भूत कोण जाणे! पण डॉलरचं मोहिनीरूप असं आहे खरं! माझ्या जीवनाचा मात्र तमाशा होऊन गेला बघ! लग्न मोडलं म्हटल्यावर लोक मुलीतच काहीतरी दोष असेल असं म्हणतात ना! आता मी काय करू?'

विनिताला काय बोलावं ते सुचलं नाही. शशीच पुढं म्हणाली, 'हेही जाऊ दे. पण इतकी वर्षं मनात शंकरलाच नवरा मानून मी राहिले. एका दिवसात ती भावना कशी उपटून-निपटून काढून टाकता येईल? अमेरिकेचा मोह आणि डॉलरची आशा यासाठी शंकरनं माझा हकनाक बळी दिला.'

शशीच्या दु:खाला हुंदक्याच्या रूपानं वाट फुटली होती. तिचं सारं शरीर हुंदक्यांनी हिंदकळत होतं.

विनिता असहाय्यपणे तिचा आक्रोश पाहत राहिली.

त्या दिवशी चंद्रू अत्यंत आनंदात होता. त्याला प्रमोशन मिळालं होतं.

अमेरिकेला 'लँड ऑफ ऑपॉरच्युनेटीज' म्हणतात ते खोटं नाही. तुम्ही कुणीही असलात तरी चालेल. बढतीच्या पायऱ्या भराभर चढू शकता. फक्त तेवढी तुमची कुवत हवी. बढतीच्या मार्गात भारताप्रमाणे जाती, कुळ, सिनिऑरिटी, भाषा, राजकारण- यांपैकी कशाचाच अडसर येत नाही. उत्तम काम केलं की, लगोलग बढती मिळते. तसंच, कामाची फळं योग्य प्रकारे देऊ शकलं नाही, तर एका पत्राद्वारे त्याला घरीही पाठवलं जातं!

चंद्रूच्या आनंदाला आणखीही एक कारण होतं. आजच त्याचं ग्रीनकार्ड आलं होतं! संपूर्ण जीवन सार्थकी लागल्याची भावना त्याच्या मनात भरून राहिली होती. आयुष्यात कधीही लक्ष्मी प्रसन्न न झालेल्या शिक्षकाचा तो मुलगा. सारं आयुष्य पैशाच्या चणचणीत गेलेलं. आता तोच चंद्रू अमेरिकेचा अधिकृत नागरिक झाला होता! त्याच्या आजवरच्या साधनेचं हे एक फलित!

आता तो राजरोसपणे भारतात जाऊ शकत होता. तो आता आपल्या माणसांना भेटू शकत होता. हेही त्याच्या आनंदाचं एक कारण होतं.

तो घरी परतला तेव्हा एक जाड पाकीट त्याची वाट पाहत होतं. म्हणजे त्यात बरीच पत्रं असतील. म्हणजे भरपूर बातम्या! कदाचित सुरभीच्या मागण्यांची यादीही

असेल.

त्यानं कॉफी-मशीनमधून मनासारखी कॉफी करून घेतली आणि कॉफीचा मग समोर ठेवून सावकाश पाकीट फोडलं.

पाकिटात गिरीशचं पत्र आणि त्यात गुंडाळलेले काही फोटो होते.

'प्रिय चंद्रू,

तू आमच्या लग्नाला हजर राहिला असतास तर फार बरं झालं असतं. लग्न साधेपणानं झालं. आम्हा दोघांनाही भपकेबाज लग्न करायचं नव्हतं.

सोबत आमच्या लग्नातले काही फोटो पाठवत आहे. विनितेची तुझ्याशी ओळख आहे असं ती सांगत होती. तिनं तुला नमस्कार सांगितला आहे.

गिरीश.'

चंद्रूनं फोटो पाहिले आणि तो निश्चल झाला. त्याच्या मनाला भावलेली विनिता, सतत चैतन्यपूर्ण राहणारी विनिता त्याच्या भावाची पत्नी झाली होती. लग्नपत्रिकेत त्यानं विनिता नाव वाचलं होतं, पण असेल कुणीतरी असा विचार करून त्यानं तिकडे फारसं लक्ष दिलं नव्हतं.

आता जे घडलं होतं, त्याची त्यानं कल्पनाही केली नव्हती. संपूर्ण धारवाडची वसंतलक्ष्मी विनिता हीच जयनगरमधल्या शाळेत शिकवणारी शिक्षिका निघाली होती! कुठून कुठं जोडला गेला हा संबंध?'

चंद्रूला धक्का बसला होता. त्याचं विनितेवरचं प्रेम एकांगी होतं. शिवाय अव्यक्त प्रेम होतं ते!

आता त्याच विनितेचं लग्न झालं आहे, तेही आणखी कुणाशी नव्हे, आपल्याच भावाशी, आपल्याच घरची ती सून होऊन आली आहे.

चंद्रू उभ्या उभ्या कोसळला. सकाळपासून उल्हास-उत्साहानं नाचणारं त्याचं मन कोलमडून गेलं होतं.

क्षणभरच त्याच्या मनात येऊन गेलं- या ग्रीनकार्डचा मोह नसता तर याआधीच भारतात जाऊन विनितेशी विवाहबद्ध होता आलं असतं.

त्यानं फोटो पाहिले.

विनिता वधूच्या वेषात साधी आणि सुंदर दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरील मंद हास्य हजार हिऱ्यांच्या तेजापेक्षा अधिक तेजानं झळकत होतं. तिच्या चेहऱ्यावरची तृप्त भावना फोटोतही लपत नव्हती.

केवळ रूपाच्याच बाबतीत नव्हे; तिचा स्वभाव, सुमधुर कंठ, तिचं मृदु अंत:करण- कुठल्याही दृष्टीनं पाहिलं तरी ती कुणाही पुरुषाचं मन वेधून घेणारी होती.

प्रत्येक सासूनं अपेक्षा करावी अशी सून होती ती! चंद्रूनं तिचा सालस आणि

लाघवी स्वभाव जवळून पाहिला होता. कितीही कजाग सासू असली तरी तिचं मन जिंकून घेण्याचा नम्रपणा आणि प्रेमळपणा विनितेच्या स्वभावात होता.

तसा स्वभाव नसता तर सावत्र आईच्या कजागपणाचा बाऊ न करता, मनातलं दु:ख, चार-दोन अश्रूंबरोबर बाहेर टाकून पुन्हा 'चिक्कव्वा'- धाकटी आई म्हणत ती सांगेल ती कामं करायला पदर खोचून तयार झाली नसती. स्वत: चंद्रूनंच तिथल्या वास्तव्यात असले अनेक प्रसंग पाहिले होते. त्याला तिच्या त्या गुणांचंच आकर्षण वाटलं होतं.

असो! यानंतर आई-वडिलांची चिंता करायचं कारण नाही असं चंद्रूला तीव्रपणे जाणवलं. पोटच्या मुलीपेक्षा अधिक विश्वासानं विनिता घराकडे बघेल यात शंका नाही.

या विचारानं काही क्षण बरं वाटलं तरी, चंद्रूला गिरीशविषयी असूया वाटली. गिरीश आपल्याइतका देखणा नाही, आपल्याइतका त्याला पगार नाही, रसिकतेच्या बाबतीतही तो आपल्यापेक्षा डावा आहे. त्याला गप्पांचं तंत्रही फारसं साधत नाही. तरीही रत्नासारखी बायको त्याला मिळाली ना! सख्खा भाऊ कितीही लाडका असला तरी अशा संदर्भात तो एक वेगळा पुरुषच ना!

मत्सर हा तर माणसाचा मूलभूत स्वभावच असतो ना? त्यामुळे चंद्रूच्या मस्तकात शेकडो विचार भावनांचा गोंधळ उठला त्यात काय नवल? त्याच्या मनात आजवर अनोळखी असलेल्या भाव-भावनांचं मिश्रण झालं होतं.

चंद्रूला पूर्वीच्या मन:स्थितीत स्वत:ला आणायला दोन दिवस लागले.

लग्न ठरल्यावर गिरीशचा थोरला भाऊ अमेरिकेत असल्याचं विनिताला समजलं असलं तरी, तो चंद्रू असेल अशी तिला कल्पना नव्हती.

लग्नानंतर सासरी आल्यावर तिनं थोरल्या दिराचा फोटो पाहिला तेव्हा तिला आश्चर्य वाटलं.

धारवाडला त्यांच्या घरी भाड्यानं राहणारा चंद्रू सभ्य तरुण होता. तिचं गाणं आवडल्याचं स्पष्टपणे सांगायचा- संकोच वाटत असला तरी, त्याच्या दृष्टीतून ते तिच्या लक्षात येत होतं. आपलं गाणं तोही ऐकत आहे, हे तिलाही तेव्हा ठाऊक असायचं. आता तोच तरुण आपला थोरला दीर आहे.

बस्स! तिला चंद्रूविषयी एवढीच भावना होती.

चंद्रूला मनोमन वाटलं- आपण तिला लिहिलेलं पत्र तिच्या किंवा आणखी कुणाच्याही हातात न पडता पुन्हा आपल्याच हातात आलं, हे फार चांगलं झालं. लग्न ठरल्यानंतर किंवा झाल्यानंतर ते तिच्या हातात पडलं असतं तर किती अनर्थ झाला असता! मूर्ख रखवालदारानं म्हाताऱ्या पोस्टमनला पत्ता दिला नाही ते बरंच

झालं! नाहीतर बिचाऱ्या विनितेच्या संसारात सुरुवातीपासूनच वादळांना सुरुवात झाली असती!

आज चंद्रू मातृभूमीला परतणार होता. साडेतीन वर्षांनंतर! घरात एखाद्या उत्सवाचं वातावरण भरून राहिलं होतं.

गौरम्मा आणि सुरभी चंद्रूच्या स्वागतासाठी एअरपोर्टला जायला तयार झाल्या होत्या. शामण्णा मात्र म्हणाले, 'गावात आलाय तो घरी येणार नाही काय? मी येणार नाही.'

सासूबाईंचा उत्साह पाहून विनिता म्हणाली, 'तुम्ही सगळेजण जाऊन या. भावजींना काय आवडतं ते सांगून जा. मी सगळा स्वयंपाक तयार करून ठेवेन.'

'टोमॅटोचं सार कर, आंबोड्या, रायतं आणि कायरस कर. चंद्रूला फार आवडतं.'

गौरम्मा आणि सुरभीनं नीट केस विंचरले आणि ठेवणीतल्या साड्या नेसून दोघी तयार झाल्या. विनिताची कामाची निष्ठा आणि कामं करण्याची पद्धत त्या दोघींना मनापासून आवडली होती. गौरम्मांच्याही मनात आलं, 'चंद्रूलाही एक अशीच बायको मिळाली तर कसलीही काळजी राहणार नाही!'

विमानातून उतरून बाहेर येत असलेल्या चंद्रूला पाहताच गौरम्मांना मस्तकावरच्या कडक उन्हाचा विसर पडला आणि भावनावेगानं त्यांचे डोळे पाणावले. त्यांच्याप्रमाणेच परदेशाहून आलेल्या आपल्या माणसांचं स्वागत करायला अनेक माता, पिता, पत्नी, भावंडं, मित्रपरिवार कौतुकानं जमले होते.

गौरम्मा टक लावून चंद्रूकडे पाहात होत्या. तो आणखी गोरा झाल्याचं त्यांना जाणवलं. अंगा-पिंडानंही तो आता भरला होता.

दोन मोठाल्या, जाडजूड बॅगा गिरीश टॅक्सीमधून उतरवून घेत असतानाच चंद्रूनं घरात येऊन वडिलांचे पाय धरले.

नंतर त्याची शोधक नजर स्वयंपाकघराच्या दाराशी उभ्या असलेल्या विनितेवर पडली आणि त्यानं विचारलं, 'ओळखलंत की नाही? कशा आहात?'

'छान आहे. तुम्ही कसे आहात?'

विनितेनं बेंगळूरची बोलण्याची ढब आत्मसात केलेली पाहून चंद्रू म्हणाला, 'अरे वा! तुम्ही तर आमची भाषा पूर्णपणे आत्मसात केलीय!'

'करायलाच हवी ना! तुमच्या घरचीच झालेय ना मी! तुम्ही धारवाडमध्ये होता, त्याच वेळी मी शिकायला सुरुवात केली होती.'

धारवाडचे दिवस आठवताच क्षणभर चंद्रू विद्ध झाला. पण लगेच त्यानं स्वत:ला सावरलं. आता ती आपल्या धाकट्या भावाची बायको आहे, हे भान जाऊ देता कामा नये.

धारवाडमधल्या विनितेपेक्षा ही विनिता अधिक सुंदर दिसत होती. त्या वेळी तिच्या व्यक्तिमत्त्वात बालिशपणाचा बराच अंश होता. आता त्या अर्धस्फुट कळीचं संपूर्ण उमललेल्या फुलामध्ये रूपांतर झालं होतं. त्या वेळी वयाचा अल्लडपणा असला तरी मानसिक स्वास्थ्य आणि मन:शांतीचा अभाव होता. आता तिच्या चेहऱ्यावर मानसिक समाधान प्रसन्नपणे विलसत होतं.

चंद्रूनं इतकं सामान आणलं होतं की, काही विचारता सोय नाही! शाम्पू, सोप, काचेची आकर्षक भांडी, डिनर सेट, केशराच्या डब्या, काजू, बदाम, बेदाणे, कॅमेरा, व्हीसीआर, साड्या, अत्तराच्या बाटल्या, चॉकलेट्स-

मुलानं आणलेलं सामान पाहता-पाहता गौरम्मांना स्वर्गच हाताशी आल्यासारखं वाटत होतं. गरिबीतल्या काटकसरी संसारातून अथांग समुद्राचं दर्शन व्हावं, तसं होऊन त्या दिपून गेल्या होत्या.

चंद्रूनं सांगितलं, 'अम्मा, एक साडी तुला, एक सुरभीला आणि विनितेला आणली आहे. बाकीचं सामान कुणाला कसं द्यायचं हे तूच पाहा. मला झोप आलीय. झोपतो मी-'

एवढं सांगून चंद्रू झोपण्यासाठी उठला.

अमेरिकेतून आपल्या मुलानं एवढ्या हौसेनं आणलेलं सामान वाटून टाकणं गौरम्मांच्या स्वभावात बसण्यासारखं नव्हतं. त्यांना ते अशक्य होतं. त्यांनी सारं सामान नीट ठेवून दिलं.

चंद्रू आल्यापासून गौरम्मांनी स्वयंपाकघरात पाऊल ठेवणं सोडून दिलं होतं. विनितेनंही त्यात काही गैर आहे, असं मानलं नाही. बऱ्याच वर्षांनी मुलाची भेट होत आहे, मुलाशी गप्पा मारायच्या असतील- असा विचार करून तिनं दोन्ही वेळच्या स्वयंपाकाची जबाबदारी स्वत:कडे घेतली होती. चंद्रूला भेटायला येणाऱ्या मित्रमंडळी आणि नातेवाईकांसाठी ती न कंटाळता कॉफी आणि खाणं करत होती. त्यासाठी तिनं आठवडाभराची रजाच काढली होती. सुरभीला तर कधीच कामं करायची सवय नव्हती. त्यात आता भावानं आणून दिलेल्या नाना प्रसाधनाच्या वस्तू घेऊन ती सतत आरशापुढे बसत होती. नाहीतर भावाबरोबर फिरायला जात होती.

चंद्रूची जेमतेम तीन आठवडे रजा होती. एवढ्यात त्याला ढिगानं आमंत्रणं आली होती! त्यातले बरेचसे वधू-पिते होते. रूपानं देखणा, अमेरिकेत राहणारा, सुशिक्षित, अविवाहित तरुण म्हटल्यावर त्याच्यावर अशा वधू-पित्यांचा डोळा असणं स्वाभाविक होतं म्हणा!

त्याशिवाय जुने कॉलेजमधले वर्गमित्र, क्रिकेट-क्लबमधले मित्र, इस्त्रोमधले जुने सहकर्मचारी यांना भेटायला तोही जाऊन येत होता. अर्थात ऑफिसमध्ये

जाऊन बॉसला भेटण्याइतकं नैतिक धैर्य त्याच्यापाशी नव्हतं. आपण आजच्या जगाव्यतिरिक्त काही वेगळं केलेलं नाही असा तो बोलताना आपली बाजू मांडत असला तरी, वर्षभर त्या कंपनीच्या खर्चानं ट्रेनिंग घेतल्यानंतर ती नोकरी सोडून जाणं म्हणजे विश्वासघात आहे, हे त्याच्याही अंतर्मनात त्याला जाणवत होतं. अशा वेळी भारतासारख्या गरीब देशात खितपत पडण्यापेक्षा आपण कसं योग्य केलं, यावरचा त्याचा वाद अधिक तीव्र होत होता.

चंद्रूसाठी गौरम्मांनी अनेक मुली बघून त्यांतली एक फायनल लिस्ट तयार केली होती. त्यात चार मुलींचा समावेश होता. त्या पाहून अखेर चंद्रूनं निर्णय घ्यायचा होता.

या साऱ्या गोंधळात चंद्रू मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या दमून गेला होता.

गेल्या तीन वर्षांत त्याच्या काही सवयीही बदलून गेल्या होत्या. साधं नळाचं पाणी प्यायलं किंवा काही बाहेरचं खाल्लं की पोट बिघडत होतं. इथं आल्याच्या दुसऱ्या दिवसापासून त्याचं पोट दुखू लागलं होतं. अशा अवस्थेत तीन मिनिटांमध्ये जीवनाचा जोडीदार निवडण्याचा निर्णय घेणं म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती.

मोठीच मानसिक जबाबदारी ती!

चंद्रूचा कॉलेजमधला मित्र रविचंद्र आता डॉक्टर झाला होता. त्यानं स्वत:चं क्लिनिक काढलं होतं. जयनगरमध्येच ते असल्याचंही कुणीतरी म्हणालं. पोटदुखीनं बेजार झालेला चंद्रू त्याच्याकडे जायला निघाला.

खूप दिवसांनी भेटलेल्या मित्राला पाहून रवीलाही आनंद झाला.

त्यानं चंद्रूला तपासत विचारलं, 'काय मित्रा! कशी आहे अमेरिका?'

'उत्तम आहे की अमेरिका! माझं पोट बरं नाही. लवकर बरं कर बघू!'

'हं! वधू-परीक्षेच्या निमित्तानं दररोज चार-दोन घरी जाऊन चांगलंचुंगलं खात असशील! आता तुझी पहिली प्रतिकारशक्ती राहिलेली नाही. बाहेरचं साधं पाणी पिऊ नकोस. बिसलरी पी. ह्या गोळ्या घे.'

'बरं निघतो. फी किती?'

'नको. राहू दे रे. डॉलरवाल्याला काय फी सांगायची?'

'तसं नाही हं चालायचं! अमेरिकेत जाऊन मीही भरपूर व्यवहार शिकलोय.'

यावर तो क्षणभर काही बोलला नाही. नंतर म्हणाला, 'तू आग्रहच करतो आहेस म्हणून सांगतो. शंभर रुपये.'

'ठीक आहे–' म्हणत शंभरची नोट त्याच्या हातात देत चंद्रूनं विचारलं, 'पुन्हा केव्हा भेट?'

'तुझ्या लग्नाच्या दिवशी! तेही रविवारी असेल तरच यायला जमेल. काही वेळा मलाही वाटतं, उगाच ही मेडिकल लाईन घेतली. मुकाट्यानं इंजिनिअर झालो

असतो तर अमेरिकेत सुखानं राहिलो असतो. इथली गर्दी नकोशी झाली आहे!' नोट खिशात सारत रवी म्हणाला.

मंद हसत चंद्रू तिथून बाहेर पडला. त्याची नोकरी, त्याचं राहण्याचं ठिकाण याविषयी प्रत्येकाला असूया वाटत होती!

आता चंद्रूला भारत 'रिक्‌वॅन विंकल' सारखा वाटत होता. सगळ्या किंमती गगनाला भिडल्या होत्या. लोकांची सगळीकडे गर्दी वाढली होती. कुठंही गेलं तरी गर्दीच गर्दी! सगळीकडे रांगा. लांबच लांब रांगा. रस्ते बिघडून गेलेले. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना दुकानं उभी राहिली होती.

कृष्णप्पा सावकार भरपूर श्रीमंत होते. पैसे कर्जाऊ देणे हाच त्यांचा व्यवसाय होता. त्यांनी अपार पैसा मिळवला होता. घरात तीन गाड्या होत्या. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी होती.

चंद्रू अमेरिकेतून येण्याआधीच कृष्णप्पांनी गौरम्मांना आपल्या घरी नेऊन आपली मुलगी दाखवली होती.

घरात तांडव करत असलेली धनसंपत्ती नजरेत भरत होती. जणू काही अती चंचल लक्ष्मी पाय मोडल्यामुळे त्यांच्या घरी कायमची वास्तव्यासाठी थांबली होती! गौरम्मांनी आधीच त्यांच्या श्रीमंतीविषयी भरपूर ऐकलं होतं. पण प्रत्यक्ष ती श्रीमंती पाहताना मात्र त्यांचा जीव घाबरा झाला. त्यांना वाटलं, जगात खरोखरच एवढी श्रीमंत माणसं असतात तर!

घरभर फक्त चांदीची भांडी दिसत होती. देवाचा देव्हारा चांदीचा होता. देव्हाऱ्याचा कळस आणि खांब सोन्यानं मढवलेले होते. एक ना दोन!

अशा घरातली मुलगी जमुना.

सर्वसाधारण रूपाची. पण अत्यंत विनयशील! गौरम्मांच्या पायांना स्पर्श करून तिनं नमस्कार केला. सुरभीशीही ती मोठ्या स्नेहानं गप्पा मारत होती.

जमुनेच्या अंगावरचे दागदागिने बघून गौरम्मा चकित झाल्या होत्या. कितीतरी प्रकारचे दागिने! हातात सोळा बांगड्या, शिवाय हिऱ्याचे कंगन, हिऱ्याची कानातली, गळ्यात विविध प्रकारच्या चेन्स, मोठ्या काठाची कांजीवरम् साडी!

घरी परतताना सुरभी आणि गौरम्मांना वाटत होतं, चंद्रूनंही जमुनेला पसंत केलं तर किती छान होईल!

जमुनेच्या वडिलांची उटीला असलेली टी-इस्टेट पाहण्यासाठी कृष्णप्पांनी शामण्णा, गौरम्मा आणि सुरभीला आग्रहानं बोलावलं होतं.

पण शामण्णांनी निक्षून सांगितलं, 'गौरी, मला तर हे मुळीच पसंत नाही. अजून लग्नाच्या दृष्टीनं काहीच घडलेलं नाही. आपण त्यांचा उगाच पाहुणचार का घ्यायचा? उगाच आपण काहीतरी आशा बाळगणं योग्य नाही. मी तरी येणार

नाही.'

'तुम्हाला यायचं नसेल तर येऊ नका! उगाच तुमचे जुन्या काळचे काहीतरी आदर्श! एवढ्या आग्रहानं त्यांनी बोलावलंय. आपण गेलो नाही, तर त्यांना वाटेल- केवढी यांची मस्ती! तुम्ही येणार नसाल तर मी आणि सुरभी जाऊन येऊ.'

उटीमध्ये दोन दिवस पाहुणचार घेऊन येताना निरोपाच्या म्हणून वितभर काठाच्या रेशमी साड्या दोघींनाही मिळाल्या होत्या.

निरोप देताना कृष्णप्पांनी हात जोडून विनयानं म्हटलं, 'तुमच्या घरची सून व्हायचं भाग्य माझ्या जमुनेच्या नशिबात आहे की नाही देव जाणे! पण आपले परस्परांशी जुळलेले ऋणानुबंध असेच असू देत!'

घरी आल्यावर गौरम्मा कौतुकानं सांगत होत्या- दोनच दिवसांत सुरभी आणि जमुना यांचा सख्ख्या बहिणींप्रमाणे स्नेह जुळला होता!

आता चंद्रू आला होता. त्यानं जमुनेला बघावं अशी गौरम्मांची फार इच्छा होती. त्यांनी सुचवलं, 'चंद्रू, तू आणि सुरभी मुलीला बघायला जा. आम्ही त्यांचं घर, त्यांचा स्वभाव, त्यांच्या घरची बोलण्या-वागण्याची पद्धत पाहिली आहे. मला तर सगळ्या दृष्टीनं हे स्थळ पटलंय. एवढी श्रीमंती असून अत्यंत विनयशील माणसं आहेत!'

'अम्मा, रिक्षासाठी सुटे पैसे लागतील. शंभर रुपये सुटे आहेत?'

हे ऐकून गिरीश हसत म्हणाला, 'चंद्रू, बेंगळूर काही एवढं बिघडलेलं नाही. इथल्या इथं जयनगरला जाऊन येण्यासाठी एवढ्या पैशांची गरज नाही.'

'मलाही तसंच वाटलं होतं. पण आजच अनुभव आला.'

'का? काय झालं?'

'पोट दुखतंय म्हणून डॉक्टरकडे गेलो होतो. जुना मित्र म्हणून रवीचंद्राकडे गेलो. पोटदुखीवर औषध लिहून द्यायला त्यानं शंभर रुपये फी घेतली.'

'शंभर रुपये? असं कसं शक्य आहे? कालच मीही गेलो होतो त्याच्याकडे. डोकं दुखतंय म्हणून. चाळीस रुपये दिले मी.'

चंद्रू अवाक् झाला. आपल्याला एवढी फी का आकारली? आपला मित्र म्हणवणारा डॉक्टरही आपल्याकडून अधिक पैसे उकळतो! आपण अमेरिकेत राहतो म्हणून? केवळ यासाठी अडीच पट जास्तीची फी यानं घ्यावी?

रवीनं विचार केला असेल- एक डॉलर म्हणजे चाळीस रुपये. अडीच डॉलर्स फी म्हणजे काही जास्त झाली नाही!

चंद्रू अवाक् होऊन उभा होता- कितीतरी वेळ!

रात्री जमुनाला पाहायला येण्यासाठी कृष्णप्पांनी गाडी पाठवून दिली होती. सुरभी आणि चंद्रू मुलगी पाहायला गेले.

दिव्याच्या प्रकाशात जमुनेच्या अंगावरचे हिऱ्याचे दागिने लखलखत होते. कपडेही भारी आणि उठावदार वाटले.

चंद्रूच्या मनानं कौल दिला, विनितेच्या तुलनेत पाहिलं तर ही खूपच डावी आहे.

कृष्णप्पा आणि त्यांच्या पत्नी नम्रपणे बसले होते.

तसं पाहिलं तर जमुनाही सर्वसामान्य चारचौघींसारखी मुलगी होती. बी. एस्सी. पर्यंत तिचं शिक्षण झालं होतं. त्यानंतर ती घरातच होती. वीणा वाजवण्याचं जुजबी शिक्षण तिनं घेतलं होतं. शिवाय भरतकाम, इकेबाना, इंटिरियर डेकोरेशन, बाटीक यांसारख्या कलाही हौसेनं शिकली होती.

किरकोळ निरर्थक गप्पांना कंटाळून चंद्रूनं स्पष्टच विचारलं, 'मी तुमच्या मुलीशी थोड्या गप्पा मारू काय?'

'अहो, अवश्य बोला. त्यात काय एवढं!' कृष्णप्पा म्हणाले.

खोलीत चंद्रू आणि जमुना दोघेच राहिले.

चंद्रूनं सांगितलं, 'तुम्हांला आमच्या घरच्या परिस्थितीची माहिती आहे की नाही, ठाऊक नाही. धाकट्या बहिणीच्या लग्नाची जबाबदारी पूर्णपणे माझ्यावर आहे. आमचं घराणं श्रीमंत नाही. हे आधी सांगावं हे बरं, नाही का?'

'पण तुम्ही तिथंच राहणार की इथं परतणार?'

'आता माझा तिथंच राहण्याचा विचार आहे. तिथलंही जीवन एकांगी असतं. इथं बेंगळूरमध्ये जशा तुम्हाला हव्या तेव्हा, हव्या तेवढ्या मैत्रिणी मिळू शकतात, तसं तिथं नाही.'

'मैत्री करण्याचा स्वभाव असेल तर कुठंही मैत्रिणी मिळू शकतात.'

'आई-वडिलांच्या तुम्ही एकुलत्या एक आहात. दरवर्षी आई-वडिलांना भेटायला जाणार म्हणाल- पण मला तो खर्च परवडणार नाही.'

'तसं काही नाही. माझ्या दिल्ली-कलकत्त्यात राहणाऱ्या मैत्रिणी दोन-दोन वर्षं माहेरी येत नाहीत. माझ्या आई-वडिलांना भेटावंसं वाटलंच तर ते येतील खर्च करून!'

जमुना चंद्रूनं सांगितलेल्या सगळ्या परिस्थितीसाठी तयार असल्याचं दिसत होतं. गौरम्मांनी कधीच हिरवा बावटा दाखवला होता.

पुढच्या आठवड्यात चंद्रूचं लग्न ठरलं. घरात एकच गडबड उडाली. एवढ्या कमी अवधीत कसं सगळं जमवायचं? चंद्रूनं हिंडण्यासाठी एक टॅक्सी ठरवली. त्यानं गौरम्मांच्या हाती लग्नाचा खर्च करण्यासाठी एक लाख रुपये ठेवले. साऱ्या जीवनात, वयाच्या छप्पन वर्षांपर्यंत गौरम्मांनी कधीच एवढे पैसे पाहिले नव्हते! गौरम्मांना काय करू अन् काय नको असं झालं होतं.

त्या म्हणाल्या, 'चंद्रू, अरे ती एवढ्या बड्या घरची मुलगी! आपल्याकडून तिला पाच भारी साड्या आणि दोन घसघशीत बांगड्या तरी नको का द्यायला?'

चंद्रूनं समजावलं, 'अम्मा, अमेरिकेत फारसं कुणी साड्या नेसत नाही. दोन साड्या पुरेत. उलट तुम्ही सगळ्याजणी इथं साड्या नेसता. वेगवेगळ्या समारंभांना जाता. तुम्हीच चांगल्या साड्या घ्या.'

सगळ्या खर्चाचा हिशोब करून पाहिला तेव्हा बांगड्यांसाठी पैसे राहिले नसल्याचं गौरम्मांच्या लक्षात आलं. शिवाय विहिणीलाही भारी साडी घ्यायला हवी होती. यावरही चंद्रू म्हणाला, 'सोनं नको घ्यायला. तिथंच सोनं थोडंफार स्वस्त मिळेल.'

पण गौरम्मांना हे पटलं नाही. त्यांनी स्वत:च्या हातातल्या दोन्ही बांगड्या काढल्या आणि नवीन डिझाईनच्या दोन बांगड्या बनवल्या.

ही गोष्ट आणखी कुणाच्याही लक्षात आली नव्हती. पण घरात वावरत असलेल्या विनितेच्या नजरेनं मात्र ती टिपली होती.

शामण्णांना तर यातलं काहीच पटलं नव्हतं.

'गहाणवटीचा धंदा करणाऱ्याच्या मुलीला पैशाची किंमत नसते-' असं त्यांना वाटत होतं. त्यांच्या सात्त्विक जीवन पद्धतीत गहाणवटीचा धंदा करणं म्हणजेच अपराध होता. अशा घरातली मुलगी आपल्यासारख्या शिक्षकी पेशा असणाऱ्याच्या घरी योग्य ठरणार नाही, असं त्यांचं प्रामाणिक मत होतं. पण चंद्रूनं मुलगी पसंत केल्यावर ते तरी काय बोलणार?

गरीब शाळामास्तराच्या बायकोचा खर्चिकपणा पाहून ते दचकले होते. हा सगळा डॉलर-महिमा असल्याचं त्यांनाही ठाऊक होतं. यक्षिणीप्रमाणे डॉलर काहीही जादू घडवू शकेल, हे त्यांना ठाऊक होतं.

चंद्रूलाही याची पुरेपूर जाणीव होती. अमेरिकेत साठवलेल्या तीन हजार डॉलर्समुळे इथं आपली जन्मदात्री किती आनंद घेत आहे, हे पाहून त्यालाही स्वत:चा अभिमान वाटत होता. डॉलर-देशाचं कौतुक करताना त्याला शब्द आणि वेळ अपुरा पडत होता.

गिरीशचं लग्न अत्यंत साधेपणानं झालं होतं. विनितेच्या माहेरी आई-वडीलच नसल्यामुळे हौस-मौज कोण करणार? शिवाय गिरीशनं सुरुवातीलाच 'माझं लग्न माझ्या इच्छेप्रमाणे झालं पाहिजे' असं बजावलं होतं.

त्यामुळे गौरम्मांच्या मनातल्या आशा-आकांक्षांवर थंडगार पाणी ओतल्यासारखं झालं होतं. आता चंद्रूनं मात्र तसं केलं नव्हतं. साऱ्या नातेवाईकांना हेवा वाटावा, भाऊबंधांच्या पोटात दुखावं असं लग्न करण्याची संधी चंद्रूनं देऊन आईचे पांग फेडले होते! मागं आपल्या गरिबीमुळे जे नातेवाईक आपल्याशी तुच्छतेने वागले,

त्यांच्या तोंडावर डॉलर-महिमा फेकण्याची संधी गौरम्मांना त्यांच्या पोटच्या मुलानं मिळवून दिली होती.

अमेरिकेत राहणारा मुलगा, मोठ्या सावकाराची मुलगी सून म्हणून आलेली. सगळे नावाजत असलेल्या 'चामराज कल्याण मंडपा'त तीन दिवस लग्नाचा थाट चालला होता. फुलांचं भरपूर डेकोरेशन, संगीताचा विशेष कार्यक्रम, आरती-अक्षतांचा थाट- सगळेजण असूयेनं लग्नाचं वैभव पाहत होते.

घरात लग्नाआधी प्रचंड काम होतं. गिरीशनं बाहेरची सगळी कामं पाहिली आणि विनितेनं घरची खिंड लढवली. हे जोडपं कुठंही दिसत नसलं तरी नांगराला जुंपलेल्या बैलजोडीप्रमाणे दोघंही अविश्रांत राबत होते.

पण डोळ्यांवर पैशाची झापड आल्यामुळे सुरभी आणि गौरम्मांना यातलं काहीही दिसत नव्हतं. त्या दोघींना आता फक्त जमुनाच दिसत होती.

लग्नाच्या बस्त्याची खरेदी करताना मात्र चंद्रूनं मुद्दाम सांगितलं, 'अम्मा, गिरीशच्या बायकोसाठीही एक उत्तम साडी घे.'

'का? तिच्या लग्नातली आहेत लुगडी. शिवाय तू अमेरिकेतून आणलेली साडीही आहेच. उगाच आता जास्तीचा खर्च!'

'असू दे. तिच्यासाठी भारी रेशमीच घे.'

गौरम्मांना हे पटलं नाही. पण मुलगा पैसे देत असल्यामुळे त्या गप्प राहिल्या.

चंद्रूनं जांभळ्या रंगाची भारी साडी विनितेसाठी वेगळी काढली तेव्हा गौरम्मांनी भुवया उडवल्या. सहा हजाराची साडी!

'अरे चंद्रू, एवढी महागाईची साडी कशाला रे तिला?' न राहवून गौरम्मांनी विचारलं.

चंद्रू शांतपणे म्हणाला, 'अम्मा, मी धारवाडमध्ये असताना हात मोडला होता ते आठवतंय ना? मी त्यांच्या घरचा भाडेकरू होतो. तरीही त्यांनी माझं खूप केलं होतं.'

जमुनानं मात्र फारसा विचार न करता नवऱ्याचे पन्नास हजार आणि वडिलांचे लाखभर रुपये खर्च करून भरपूर साड्यांची मनसोक्त खरेदी केली.

सुरभीनंही हट्टानं पाच-सहा भारी साड्या घेतल्या.

घरी आल्यावर चंद्रूनं विनितेला तिची साडी दाखवली. तेव्हा ती आनंद आणि संकोचानं म्हणाली, 'उगाच का माझ्यासाठी एवढी भारी साडी घेतलीत?'

'मुद्दाम आणलीय मी ती! मी तुमच्या गावी असताना तुम्ही माझ्यासाठी जे काही केलंत, त्याची ही अत्यंत छोटीशी परत-भेट आहे!' चंद्रूनं सांगितलं.

त्याला आठवलं, विनितेनं मोठ्या हौसेनं जांभळी साडी मागितली असता तिला निळी साडी मिळाली होती. अनेक निराशा सहज स्वीकारणाऱ्या विनितेच्या

दृष्टीनं ही घटना नेहमीसारखीच साधी होती. त्यामुळे कदाचित तिला या घटनेचा विसरही पडला असावा. पण चंद्रूला तो प्रसंग अजूनही जशाचा तसा आठवत होता.

तो मनात म्हणाला- त्याच वेळी तुझी इच्छा पूर्ण करावंसं वाटलं तरी, सामाजिक कारणांमुळे मी माझ्या इच्छेला दडपून टाकलं होतं. आता थोरला दीर या नात्यानं तुला ही साडी देऊन मी माझी इच्छा पूर्ण करतोय.

त्याला ठाऊक होतं, आजच्या त्या घरच्या परिस्थितीत विनिता स्वत: मिळवती असूनही अशी भारी साडी विकत घेऊ शकणार नाही. त्याच्या नजरेनं तिच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद टिपला होता.

चंद्रूचं लग्न थाटामाटात पार पडलं. सारं बेंगळूरच लग्नाला आलंय की काय, असं वाटण्याइतकी गर्दी झाली होती. राजकारणी, धनाढ्य माणसं, अधिकारी आले होते.

दोन्ही मुलांच्या लग्नाचा थाट एकाच लग्नात अनुभवायला आल्यामुळे गौरम्मा अभिमानानं फुलून आल्या होत्या.

अगदी तृप्त-तृप्त झाल्या होत्या.

त्यातच जमुनाच्या आई निरोपाच्या वेळी डोळे पुसत म्हणाल्या, 'गौरम्मा, माझ्या जमुनाला तुम्ही तुमच्या सुरभीसारखीच माना. काही चूक झाली असेल तर क्षमा करा. लग्नात काही त्रुटी राहिल्या असतील तर राग मानू नये.'

लखलखणाऱ्या प्रत्येक वस्तूला हिराच मानणाऱ्या गौरम्मा विहिणीच्या नाटकी बोलण्यावर भाळल्या. शिवाय त्या बोलण्यासोबत असलेली निरोपाची जरतारी साडी आणि ओटीच्या थाटामुळे त्यांचा त्या बोलण्यातल्या प्रामाणिकपणावर विश्वास बसला.

जी शक्ती पैशांमध्ये आहे, ती कधीच गुणांमध्ये नसते. ज्यांच्याकडे पैसे नाही, तेच पैशाविषयी उपरोधानं बोलतात!

चंद्रूची सुट्टी संपत आली होती. आणखी दहा दिवसांनी त्याला पुन्हा अमेरिकेला जायचं होतं. हनीमूनसाठी चंद्रू आणि जमुना उटी-मद्रासला जाऊन आले. व्हिसाच्या कामासाठी जाणं आवश्यकही होतं.

बघता-बघता चंद्रूच्या निघण्याचा दिवसही आला. गौरम्मांचे डोळे पाण्यानं भरले. आईला अभिमान वाटावा असा मुलगा आईच्या साऱ्या इच्छा पुऱ्या करून निघाला होता.

चंद्रूनं सांगितलं, 'अम्मा, यानंतर सुरभीच्या लग्नासाठीच मी येईन. जमुनाचा व्हिसा मिळून तिला यायला बरेच दिवस लागतील. व्हिसा मिळेपर्यंत तिला इथेच राहू दे.'

'राहू दे ना! अरे, तीच या घरची थोरली सून आहे! आमचे स्वभाव आणि आपल्या घरच्या पद्धतीशी तिलाही जुळवून घ्यायला वेळ मिळेल.'

चंद्रूच्या विमानानं आकाशात झेप घेताच जमुना थेट माहेरी निघून गेली. निघण्याआधी सासूला तिनं लाघवीपणे सांगितलं, 'आमच्या घरी फोन आहे ना! अमेरिकेला पोहोचल्यावर ते फोनवर कळवणार आहेत. त्यामुळे आता आईकडेच जाते. लग्नासाठी आलेल्या नातेवाईकांचाही निरोप घेऊन येते. चालेल ना?'

'तसंच कर. यायची अजिबात घाई करू नकोस. तेही तुझंच घर आहे ना!' गौरम्मा म्हणाल्या.

त्यानंतर जमुना आली ती 'आज मी निघाले' म्हणून सांगण्यासाठीच! कोईमत्तूरची मावशी, दिल्लीचे काका, मुंबईचे मामा अशा सगळ्यांच्या घरी जाऊन ती व्हिसा आल्यावरच परतली होती.

गौरम्मांना मात्र ती लटक्या वैतागानं म्हणाली, 'छे! अगदी वैताग आलाय मला! सगळे सांगत होते- अमेरिकेचा व्हिसा लवकर मिळत नाही म्हणून! म्हणून मी सगळ्या नातेवाईकांना भेटायला गेले होते. आधी ठाऊक असतं तर मी मुळीच गेले नसते. तुमच्याबरोबर आणि सुरभीबरोबर थोडे दिवस का होईना, राहायची फार इच्छा होती. अगदी निराशा झाली!'

शामण्णांना त्यामागचं नाटक समजलं.

पण डॉलर-सुनेच्या प्रभावामुळे अंध झालेल्या गौरम्मांना मात्र ते दिसलं नाही. जमुनेचं सारं बोलणं त्यांना शब्दश: पटलं.

'असू दे गं! किती निर्मळ मनाची आहेस तू! सुरभीच्या लग्नाच्या आधी मात्र दोन महिने ये. लग्नघरात तूच महालक्ष्मीसारखी वावरली पाहिजेस! लग्नानंतरही दोन महिने राहून जा. म्हणजे माझंही समाधान होईल. आता तू आनंदानं जाऊन ये.'

विनिता मूकपणे गौरम्मांचं वागणं-बोलणं पाहात होती.

जमुना तिच्याशी अवाक्षरही बोलली नव्हती. अगदी समोरासमोर येण्याचे प्रसंग आले तरी एखाद्या अपरिचित व्यक्तीबरोबर बोलावं तसं जमुनाचं बोलणं- वागणं होतं. ही गहाणवटीचा व्यवहार करणाऱ्या घरात जन्मलेली मुलगी आहे, हे विनितेच्या चलाख बुद्धीला जाणवल्याशिवाय कसं राहील? ती गरीब घरातून आली असली तरी बुद्धीची तिथं कमतरता नव्हती.

जमुना अमेरिकेला निघाली. तिला विमानतळावर सोडून आल्यावर गौरम्मा म्हणाल्या, 'किती नम्र स्वभावाची आहे ही जमुना! अशी सून मिळण्यासाठी मागच्या जन्मीचं पुण्यच पदरी असायला पाहिजे.'

शामण्णा खिडकीबाहेर पाहात होते. त्यांनी जीवनाकडून विवेकाचे धडे घेतले होते. अनुभवातून खूप शहाणपण ते शिकले होते. त्यांच्या मनात येत होतं- जगात

गौरीसारखी माणसंच भरपूर असतात... श्रीमंत माणसं भेटली की अवघडल्यासारखी होतात– पण तरीही त्यांचा आदर-सत्कार करतात.

आपल्यापेक्षा गरीब माणसं भेटली की, हीच माणसं त्यांना हीन लेखतात आणि त्यांना अवमानानं वागवतात.

खराखुरा स्नेह परस्परांविषयी अशी टोकाची भावना कधीच ठेवत नाहीत.

पण पैशाच्या मोहजालात गुरफटून गेलेल्या गौरम्मांना मनाच्या तरल स्वरूपाची कल्पना कशी येणार?

चंद्रूच्या लग्नानंतर घरात एक नवीन पद्धत सुरू झाली. घरची सून होऊनही अपरिचित असलेल्या जमुनेचं वर्णन सदोदित सुरू झालं. सतत तिच्या असलेल्या नसलेल्या गुणांचा महिमा असलेली गाणी घरभर ऐकू येऊ लागली.

एवढ्यावर ते थांबलं नाही.

प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जमुना आणि विनितेची तुलना सुरू झाली.

चंद्रूचं लग्न ठरेपर्यंत विनिता त्या घरची लाडकी सून होती. तिच्या शब्दाला घरात किंमत होती. गौरम्माही मोकळेपणानं म्हणायच्या, 'आमची विनिता घरी आली आणि मी निवृत्त झाले बघा!'

पण आता मात्र त्या भावनेची पुसटशी छायाही त्यांच्या बोलण्या-वागण्यात दिसत नव्हती. विनितेलाही हे जाणवत होतं. नाहीतरी जगात धनवंतांची तळी उचलून येळकोटाचा घोष करतात ना? पैसा असेल तर माणसाला सूर्याचं स्थान मिळतं आणि नसेल तर श्वानाची अवस्था प्राप्त होते.

हळूहळू घरात नसलेल्या जमुनेचं स्थान प्रत्यक्ष सूर्यासारखं होऊ लागलं आणि विनितेची अवस्था कुत्र्यासारखी झाली.

घरी कुणी आलं की, चंद्रूचं लग्न, लग्नाचा अल्बम, व्हीडीओ कॅसेट हेच विषय बोलले जात. जमुनाच्या घरच्यांनी दिलेल्या दागिन्यांच्या यादीचं वाचन, जमुनाचा सरळ स्वभाव याचं गुणगान सुरू होई. जमुनेनं आपले सगळे दागिने माहेरी ठेवल्यामुळे ते दाखवता येत नसल्याची खंत न करता गौरम्मा सांगत, 'अहो, आमचं घर एवढंसं! इथं किती चांदीची भांडी ठेवायची? शिवाय नसती जबाबदारी आपण तरी कशाला उगाच अंगावर घ्यायची?

हा विषय सुरू झाला की, शामण्णा काहीतरी निमित्त काढून घराबाहेर निघून जात. पण स्वयंपाकघरातल्या विनितेनं कुठं जायचं?

या विषयात अधिक भर घालण्यासाठी अधूनमधून जमुनेची पत्रं येत होती. प्रवासाची वर्णने, विविध रेशमी साड्यांमधले रंगीबेरंगी फोटो, गाडीच्या मॉडेलची चर्चा, अमेरिकेमधली आश्चर्ये यांचा त्यात समावेश असे.

असं एखादं पत्र आलं की, गौरम्मांचे पाय जमिनीवर पडेनासे होत. गिरीश

आणि शामण्णा अलिप्त होऊन जात. सुरभी आणि गौरम्मा मात्र मंत्रमुग्ध होऊन जात. विनितेचा सारा दिवस मात्र खिन्नतेत जात असे.

त्या दिवशी अर्धा दिवसच शाळा होती. टीचर्स रूममध्ये मुलांच्या वर्गापेक्षा जास्तीचा दंगा होता.

शाळेतल्या प्रौढ शिक्षिका सुशीला यांना विनितेविषयी विशेष आस्था होती. विनिता मनापासून आपलं काम करते, शक्य तेवढी सगळ्यांना मदत करते, कुणाशी भांडत नाही, मुलांचाही तिच्यावर विशेष लोभ आहे, नेहमी हसतमुख असते- या साऱ्यांचं त्यांना फार कौतुक होतं.

त्या विनिताला म्हणाल्या, 'आपण सगळ्याजणी मिळून 'मुघले आझम' बघायला जायचं? गाणी फार छान आहेत.'

'होय मॅडम, मागं कॉलेजमध्ये शिकताना मी पाहिलाय तो सिनेमा. गाणी फारच चांगली आहेत.'

विनिता काही क्षण भूतकाळात रमली. धारवाडच्या रीगल थिएटरात मैत्रिणींबरोबर तिनं तो सिनेमा पाहिला होता. किती सुंदर दिवस होते ते! क्लास चुकवून सिनेमाला जाऊन आल्यानंतर कितीतरी दिवस मैत्रिणी लेडीज रूममध्ये तिला 'मुहोब्बत की झूटी कहानी पे रोये' गायला लावत. लेडीज रूमलगतच्या वर्गात इकॉनॉमिक्सचा कंटाळवाणा क्लास चालला होता. वर्गातल्या मुलांनीही आरडाओरडा केला होता, 'सर, इकॉनॉमिक्स नको. कॉलेजच्या मधुबालेसारख्या असणाऱ्या लता मंगेशकरकडून 'मुहोब्बत की झूटी-' ऐकायचं आहे!' तसं त्यांनी नोटीस बोर्डावरही लिहून ठेवलं होतं. वर्गातली ती सगळी मुलं आणि मुली आता कुठं असतील? मी ही इथं अशी आहे! ते सुंदर दिवस कुठं निघून गेले?

'मग? काय ठरलं? जायचं ना?'

विनिता भानावर आली.

'नको. मी घरी सासूबाईंना सांगितलं नाही. पुन्हा कधीतरी येईन.'

'चला हो जाऊ या! मी सांगेन तुमच्या सासूबाईंना.'

जवळ कुणी नाही, हे पाहून त्या विनितेच्या कानाशी कुजबुजल्या, 'विनिता, तुम्हाला आणखीही एक सांगायचं होतं.'

विनिता ऐकू लागली. काय सांगायचंय यांना?

'तुमचे सासरे किती मानी आहेत, हे मला ठाऊक आहे. त्यांचा स्वभावही आम्ही अनेक वर्षे पाहिला आहे. म्हणून मुद्दाम तुम्हांला सांगतेय मी.'

'काय झालं?'

नाही म्हटलं तरी विनितेच्या आवाजात चिंता डोकावू लागली.

'आठ-दहा दिवसांपूर्वी मी मॅटिनीला गेले होते. बाल्कनीमध्ये पुढच्या रांगेत

तुमची सुरभी एका मुलाबरोबर बसली होती. ती मला ओळखत नाही. पण मी तिला ओळखते. अंधारात दोघांची बरीच घसट चालली होती.'

विनितेला कुणीतरी अचानक मस्तकावर प्रहार केल्यासारखं झालं.

'तो मुलगा कोण होता? तुम्ही त्याला ओळखता काय?'

'होय. आमच्या गल्लीच्या टोकालाच राहतो तो. गोपीनाथ त्याचं नाव. मुलगा दिसायला खूपच देखणा आहे. बी. एस्सी. झालाय. अजून तरी त्याला नोकरी मिळालेली नाही. कुठंतरी पार्टटाईम नोकरी करतो असं ऐकलं होतं. बाकी मुलगा काही वाईट नाही. कुठलंही व्यसन नाही. तुम्हीच आणखी चौकशी करा.'

सारं ऐकून विनिता बधिर होऊन बसून राहिली.

सुरभीला नवरा अत्यंत देखणा हवा होता. शिवाय तिच्या पत्रिकेप्रमाणे तिला सासू नसलेल्या घरी देणं आवश्यक होतं. त्यामुळे तिचं लग्न जुळायला वेळ लागत होता. उन्हा-पावसाची फिकीर न करता सुरभीचे आई-वडील-भाऊ तिच्या लग्नासाठी धडपडत होते. एखादं लग्नाचं स्थळ समजलं की, विलंब न लावता ते त्यांच्याशी संपर्क साधत.

असं असताना सुरभी अशा निरुद्योगी मुलाशी का स्नेह वाढवत आहे?

जड मनानं विनिता घराच्या दिशेनं चालू लागली. सिनेमा पाहायचा उत्साह ओसरून गेला होता. भावंडांचं प्रेम न मिळालेल्या विनितेचा सुरभीवर जीव जडला होता. तिलाही आपल्याप्रमाणे चांगला पती मिळावा म्हणून ती दररोज देवाला प्रार्थना करायची.

परवाच कुणीतरी म्हणत होतं, दुर्गापरमेश्वरीला नवस बोलला तर मनासारखा पती मिळतो. तिनं सुरभीसाठी नवस बोलला होता, दर्शनाला जाऊन आली होती. येताना देवीच्या प्रसादाच्या काळ्या बांगड्या आणून तिनं सुरभीला दिल्या होत्या.

विनितेच्या मनात आलं, खरोखरच सुरभीचा या गोपीनाथवर जीव जडला असेल काय? सुरभीलाच या संदर्भात विचारलं तर? पण कुठलाही चोर आपली चोरी मान्य करत नसतो हे तिला आठवलं.

कदाचित अंधारात सुशीला मॅडमनी सुरभीऐवजी आणखी कुणाला तरी पाहिलं नसेल कशावरून?

या विचारासरशी विनितेचा गोंधळ उडाला. गिरीशला ही बातमी सांगायचाही तिला संकोच वाटला.

ही केवळ फुटकळ बातमी नव्हती. सुशीलाही उगाच काहीतरी, खात्री झाल्याशिवाय बोलणाऱ्या बाई नव्हत्या.

प्रत्यक्ष नजरेनं पाहिलं तरी पुन्हा खात्री करून घे म्हणून मोठी माणसं सांगतात ना? आणखी थोडे दिवस वाट पाहणं चांगलं, असं विनितेनं ठरवलं.

फार दिवस वाट पाहावी लागणार नाही, याची तिलाही तेव्हा कल्पना नव्हती.

सोबत नोकरी करणाऱ्या राजलक्ष्मीचं लग्न ठरलं होतं. लग्नानंतर नोकरी सोडून तिला दिल्लीला जावं लागणार होतं. त्यामुळे तिनं राजीनामा दिला होता.

राजलक्ष्मीला निरोप देण्यासाठी एक पार्टी द्यायचं ठरवलं. 'चालुक्य'मध्ये पार्टी ठरली होती. संपूर्ण पार्टीची जबाबदारी विनितेवर होती. त्यामुळे विनिता ठरलेल्या वेळेआधी अर्धा तास चालुक्य हॉटेलवर आली.

पार्टीची व्यवस्था चालली होती. योग्य त्या सूचना करून विनिता खिडकीकडेच्या टेबलापाशी विसावली. बाहेर उन्हाचा कडाका जाणवत होता. ग्लासभर ज्यूसची ऑर्डर देऊन ती खिडकीबाहेर पाहात बसून राहिली.

बाहेरचं दृश्य पाहून ती घाबरी झाली.

सुशीला मॅडमनी सांगितलं होतं त्यात आता शंका राहिली नव्हती.

तिनं पुन्हा-पुन्हा खात्री करून घेतली. होय. तिची नणंद सुरभीच होती ती! एका सुस्वरूप तरुणाबरोबर विडा खात रिक्षाची वाट पाहत होती. तिनं विनितेला पाहण्याचा प्रश्नच नव्हता.

रिक्षा थांबली. सुरभी आणि तो तरुण– बहुतेक गोपीनाथ– दोघंही तिथून निघून गेले.

आता सुशीला मॅडमनी जे सांगितलं होतं, त्यावर अविश्वास दाखवण्याचं कारणच नव्हतं.

विनितानंही निर्णय घेतला- यानंतर गप्प बसण्यात अर्थ नाही. घरातल्या वडील माणसांच्या कानांवर घालावं हे उत्तम!

रविवारचा दिवस. सगळे घरातच होते. विनितेनं सारी हकीकत गिरीशच्या कानांवर घातली होती.

गिरीश म्हणाला, 'अण्णांना सांगितलं पाहिजे.'

सासूबाईंना सांगायला विनितेला संकोच वाटला- अंहं- भीती वाटली.

'अण्णा, एक सांगू? सुरभी माझ्या बहिणीसारखी आहे-'

खिडकीवरची धूळ झटकत असलेले शामण्णा मागं वळले. विनितेकडे पाहत त्यांनी विचारलं, 'कशाची पूर्वतयारी ही? मी काही तुला आज ओळखत नाही! सुरभीच काय, सगळं घरच तुझं नाही काय?'

'तसं नाही- सुरभीची गोपीनाथ नावाच्या मुलाशी बरीच मैत्री आहे म्हणे-'

'मैत्री? कशा प्रकारची मैत्री? तुला कुणी सांगितलं?'

'सुशीला मॅडमनी सांगितलं; पण त्या वेळी मी त्यावर विश्वास ठेवला नाही. काल मीही पाहिलं.'

परसातून आलेल्या गौरम्मा मागं उभ्या असल्याचं विनितेनं पाहिलं नव्हतं.

त्यांनी विचारलं, 'कोण हा गोपीनाथ? काय करतो?'

गौरम्मांच्या स्वरातल्या कठोरपणानं विनिता घाबरी झाली. परक्या व्यक्तीनं आपल्या पिल्लांना हात लावल्यावर मांजरीला राग येतो, तसा तो राग होता.

'मला नक्की ठाऊक नाही, पण बी. एस्सी. झालाय आणि पार्टटाईम नोकरी करतो असं समजलं.'

'आपल्याला कळू न देता मुलाला भेटली आहे ही? आपली सुरभी अशी नाहीच!'

गौरम्मांच्या मातृहृदयानं ग्वाही दिली- आपली सुरभी अशी वागणंच शक्य नाही!

'आपण सुरभीलाच विचारू या. उगाच अपसेट व्हायचं कारण नाही!' एवढं बोलून शामण्णांनी विषय तिथंच थांबवला.

गौरम्मा अपार दुःखात बुडून गेल्या होत्या.

सुनेनं हे गुपित शोधून काढल्यामुळे त्यांच्या दुःखाची तीव्रता वाढली होती. सुरभीनं किती मामुली मुलगा शोधला याचं दुःख त्यांना पराकोटीचं झालं होतं.

चंद्रू अमेरिकेहून येऊन गेल्यापासून आणि जमुनेचे तिकडचे फोटो पाहिल्यापासून त्यांचा आणखी एक विचार पक्का होत चालला होता. कर्ज काढावं किंवा प्रसंगी घर विकावं लागलं तरी हरकत नाही, सुरभीचं अमेरिकेत असलेल्या मुलाशीच लग्न लावून दिलं पाहिजे. तिनंही वैभवपूर्ण जीवन जगलं पाहिजे.

पण शामण्णांचे विचार वेगळेच होते.

त्यांना वाटत होतं, हा गोपी खरोखरच चांगला मुलगा असेल आणि त्याची कष्ट करायची तयारी असेल तर, सुरभीच्या मनाप्रमाणे तिचं त्याच्याशी लग्न लावून द्यायला काहीच हरकत नाही. फार तर त्याला नोकरी लागेपर्यंत थांबावं लागेल. सुरभी आपली एकुलती एक मुलगी- ती सतत आपल्यासमोर राहील. तिच्या अडी-अडचणींच्या वेळी आपणही मदत करू शकू.

देवळातून घरी परतलेल्या सुरभीला घरातल्या बदललेल्या वातावरणाचा वास आला. संतापानं गौरम्मा लालबुंद झाल्या होत्या. खिन्न होऊन कामं करणारी वहिनी, नेहमीपेक्षा वेगळ्या मूडमध्ये असलेले अण्णा! घरात गोपी-प्रकरण समजलं असेल काय? वहिनीच नोकरीच्या निमित्तानं घराबाहेर पडत असते. या विनिता वहिनीनंच सांगितलं असेल-

तिचं वय गोपीच्या प्रेमात पडायचंच होतं. सारं जगच तिला प्रेममय वाटत होतं. देखण्या गोपीनंही नोकरीचा गंभीरपणे विचार केला नव्हता. शिक्षणात बेताचा असला तरी सगळे त्याच्या स्वभावाविषयी बरं बोलत होते. कॉलेजमध्ये असल्यापासून त्या दोघांची ओळख होती. घरात सांगायची त्यालाही भीती वाटत होती. त्यामुळे

चोरून त्यांच्या भेटी होत.

तूर्त गोपी एका कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये पार्टटाईम शिकवण्याची नोकरी करत होता. त्यानं अजून लग्नाचाही विचार केला नव्हता.

गौरम्मांना यातलं काहीच उमजत नव्हतं. सुरभीनं त्यांना आपल्याला गोपीविषयी जे वाटतं ते सांगितलं.

सारं ऐकून त्या आणखी दु:खी झाल्या. म्हणाल्या, 'सुरभी, तू अजून लहान आहेस. तुला काहीही कळत नाही. गोपीशी लग्न केलंस तर काय मिळणार आहे तुला? एकेक पैसा साठवत संसार करावा लागेल तुला! विनिताचं पाहतेस ना? किती राबावं लागतं तिला! एवढं करून जेमतेम चार हजार रुपयेही पगार नाही मिळत! अमेरिकेच्या हिशेबानं पाहिलं तर शंभर डॉलर सुद्धा पगार मिळत नाही. तेच जमुनेचं पाहिलंस की नाही? ती इथं येईल तेव्हा लाखो रुपये सहज खर्च करेल. फोटोमध्ये पाहिल्यास नं कसल्या भारी गाड्या आणि घरं? तुला सुखानं जगायचं असेल तर या दरिद्री प्रेमाचा नाद सोडून दे!'

सुरभीवर प्रभाव टाकण्यासाठी त्यांनी पुन्हा अमेरिका-पुराण सुरू केलं.

स्वयंपाकघरातून सारं ऐकणाऱ्या विनितेचा स्वत:च्या कानांवर विश्वास बसत नव्हता. काय सांगतेय हे आई मुलीला? ज्याच्यावर मन बसलं, त्याच्याशी लग्न करायचं की जिथं डॉलरचा ओघ आहे, तिथं करायचं?

संध्याकाळी घरी आलेला गिरीश सांगत होता, 'अम्मा, सगळीकडे मी चौकशी केली. गोपी चांगला मुलगा आहे. आई नाही. वडील अत्यंत सभ्य आहेत. वडील कारकून म्हणून निवृत्त झालेत. हा एकुलता एक मुलगा. कसलंही व्यसन नाही. कॉम्प्युटरचं ज्ञान आता घेतोय. नोकरी निश्चित मिळेल.'

'कुठली नोकरी मिळेल? किती पगार मिळेल?'

'ऑपरेटर होईल. आणखी कष्ट घेतले तर आणखी चांगली नोकरी मिळून शकेल. कॉम्प्युटर-सेल्स-लाईनीत शिरला तर चांगलं जगता येईल एवढं नक्की कमावू शकेल. मला वाटतं, विचार करायला काही हरकत नाही.'

'तुझ्या मुलीला तू दिली असतीस का अशा मुलाला?'

'न जन्मलेल्या मुलीला मध्ये आणून हा प्रश्न विचारलास तर मी काय उत्तर देऊ, अम्मा? तरीही सांगतो. माझ्या मुलीनं गोपीसारख्या मुलावर प्रेम केलं, तर तिचं मन न मोडता मी जरूर लग्न लावून देईन!'

'पण मी देणार नाही! मला अमेरिकेत नोकरी करणाराच जावई पाहिजे!'

आईच्या स्वभावाची कल्पना असल्यामुळे गिरीश गप्प बसला.

आईला प्रेमाविषयी सांगणाऱ्या सुरभीला मात्र आईचं बोलणं तत्क्षणी पटलं! सासूचं डॉलर-प्रेम अपरिचित नसलं तरी आजच्या त्यांच्या वागण्यामुळे विनितेच्या

मनावर आघात झाला होता.

गोपी-प्रकरणामुळे गौरम्माही सावध झाल्या. त्यांनी अनेक विवाह-एजंटस्शी संपर्क साधला आणि सांगितलं 'आम्हांला इथला मुलगा नको. परदेशात- त्यातही अमेरिकेतलं स्थळ सांगा. कितीही खर्च झाला तरी चालेल.'

आपली मुलगी सुखात राहावी असं कुठल्याही आईला वाटणं स्वाभाविकच म्हटलं पाहिजे. सुनेनं सुखात राहावं असं वाटणं मात्र अस्वाभाविक आहे! मुलांना कर्जाच्या खड्ड्यात लोटून मुलींना स्वर्ग-सुखाच्या शिखरावर चढवणं योग्य आहे असं कोण म्हणेल? शिवाय सुख-समाधान ही काही पैसे खर्च करून मिळणारी गोष्ट नव्हे. डॉलरही ते देऊ शकत नाही. तरीही ही गौरी अशी का वागते?- शामण्णा अधिकच गंभीर होत होते.

गौरम्मांनी मात्र कुणाचंही ऐकायचं नाही, असा अचल निर्धार केला होता. एजंटस्ही तोंडापुढे सांगायचे, 'ठीक आहे. तसं स्थळ असेल तर जरूर कळवू!' मागं मात्र म्हणायचे, 'गौरम्मांचा नवा विक्षिप्तपणा पाहिलात ना? सोवळ्या ओवळ्याचं अवडंबर, हातात काचेच्या बांगड्या आणि अंबाडा घालणाऱ्या गौरम्मा मुलगा अमेरिकेत गेल्यावर किती बदलल्या आहेत! जगात तेवढा एकच देश आहे, इतर सगळी माणसं भिकारी आहेत अशा प्रकारे बोलतात या!'

नाविकानं एकाग्रपणे ध्रुवताऱ्यावर लक्ष ठेवावं तसं त्या केवळ अमेरिकेवर डोळा ठेवून होत्या.

गोपी-प्रकरणानंतर मायलेकींनी विनितेशी बोलणं कमी केलं. त्यांना वाटलं, हिनंच गिरीशचे कान फुंकून सुरभीचं गोपीशी लग्न का करू नये हे पटवलं असावं.

लग्न ठरवणारे एक दलाल लक्ष्मणराय एक दिवस त्यांच्या घरी आले.

'शामराय, माझ्या मित्राचा- राजारायांचा मुलगा अमेरिकेत राहतो. शेखर त्याचं नाव. त्याला विचारणार काय सुरभीसाठी?'

स्वयंपाकघरात चुलीवरचं दूध अगदी उतू येत होतं. तिथं दुर्लक्ष करून गौरम्मा लगबगीनं उठल्या. पायात येणाऱ्या साडीच्या निऱ्यांकडे दुर्लक्ष करत त्या बाहेर धावल्या. त्यांच्या कानावर 'अमेरिका' हा परवलीचा शब्द पडला होता.

पुराणात कृष्णाच्या बासरीच्या स्वरांनी वेडावून गोपीकन्या धावत यायच्या, असं वर्णन करतात- तीही असलीच काहीतरी मंत्रशक्ती असावी!

'आपल्या सुरभीची पत्रिका द्या.'

'थोडं थांबा बघू! लक्ष्मणराय, त्यांच्या अपेक्षा काय आहेत ते तरी समजू द्या!' शामण्णा म्हणाले.

'त्यांच्या सगळ्या अपेक्षा आम्हांला मान्य आहेत.' गौरम्मा मध्येच म्हणाल्या.

'त्यांच्या अपेक्षा बेताच्याच आहेत. हिऱ्याच्या कुड्या, अमेरिकेचं तिकीट, दोन

किलो चांदी, पन्नास तोळे सोनं एवढं मला ठाऊक आहे. शिवाय तीन दिवसांचं चांगलं लग्न. योग्य तो मानपान. हुंडा मात्र अजिबात नको!'

'बाप रे! फार झालं हे! दोन-तीन लाखांचं हेच बजेट झालं!' शामण्णा म्हणाले.

तिकडे लक्ष न देता गौरम्मा म्हणाल्या,

'नाहीतरी आम्हांला कुठं चार-दोन मुली उजवायच्या आहेत? ते मागतील तेवढं सगळं आम्ही देऊ. मुलांना आम्ही शिक्षण दिलंय ना? ते फेडतील बहिणीच्या लग्नाचं कर्ज! गरज पडली तर घरही विकायला हरकत नाही!'

'काय बोलतेस गौरी तू? या वयात घर विकून आपण काय करायचं? अमेरिकेला जायचं की भाड्याचं घर घेऊन राहायचं? माणसानं अंथरूण पाहून पाय पसरायला पाहिजेत. आपण या फंदात पडायला नको!' शामण्णांनी नाना प्रकारे विनवलं.

तरीही गौरम्मांनी आपला हेका सोडला नाही, 'आपण भाड्याच्या घरात राहू; पण माझ्या मुलीनं अमेरिकेत सुखात राहिलं पाहिजे!'

लक्ष्मणरायांनी मध्यस्थी स्वीकारली. दुसरे दिवशी शेखर येत असल्याचीही त्यांनी बातमी आणली. गौरम्मा हरखून गेल्या. लेकीचं लग्नच ठरल्यासारखा त्यांना आनंद झाला.

दिसायला सुरभी चारचौघींसारखीच होती. आईच्या नजरेला मात्र ती स्वर्गसुंदरी वाटत होती.

सतत प्रणयरम्य कादंबऱ्या वाचण्यात गढून जाणारी सुरभी आईला विदुषी वाटत होती.

सकाळी नऊ वाजता अंथरुणातून उठणाऱ्या आळशी मुलीला त्या कौतुकानं 'हळूबाई' म्हणत.

केवळ चित्रपटातली गाणी ऐकण्यात वेळ घालवणारी सुरभी गौरम्मांच्या दृष्टीनं संगीतप्रिया होती.

गौरम्मांनी सारं घर दोनदा धुऊन-पुसून काढलं. सुनेला सांगून उपीट, वडे, शिरा करायला लावला.

विनिता गर्भारशी होती. तरीही नणंदेला बघायला पाहुणे येताहेत म्हटल्यावर स्वत:ला जपत तिनं सगळी तयारी दिवसभर राबून केली.

ठरलेल्या वेळी सगळं घर तयार झालं; पण कुणीच आलं नाही.

गिरीश म्हणाला, 'एकाच दिवसात चार-सहा मुली बघण्याचा प्लॅन असेल म्हणून उशीर झाला असेल.'

अखेर दीड-दोन तास उशिरा शेखर, त्याचे वडील, बहीण आणि चार-सहा

अपरिचित मित्र येऊन पोहोचले. आल्यानंतर त्यांनी आपल्याकडून उशीर झाल्याबद्दल क्षमाही मागितली नाही.

राजारायांची तीक्ष्ण नजर नंतर साऱ्या घरावरून फिरली. कुठंच श्रीमंतीचं दर्शन होत नव्हतं. त्यांच्या चेहऱ्यावर भाव उमटले- ही दरिद्री माणसं माझ्या मुलाला काय देतील! त्यांनी मनातल्या मनात लक्ष्मणरायांना शिव्या घातल्या- या म्हाताऱ्यानं उगाच आमच्या मुलाचा वेळ फुकट घालवला! त्यांच्या चेहऱ्यावर निरुत्साह दिसू लागला.

सुरभी गरम केलेलं खाणं घेऊन बाहेर आली. तिच्या सावळ्या रंगावर पांढरी पावडर उठून दिसत होती. जमुनानं आपल्या जुन्या साड्या तिला दिल्या होत्या. त्यांतली हिरवी साडी ती नेसली होती- पण तो रंग तिला मुळीच शोभत नव्हता.

शेखरनं चेहरा दुसरीकडे वळवला. त्याची नजर विनितेवर पडली. गर्भारशी विनितेची गणना सुंदर स्त्रियांमध्ये सहजच होत होती.

लक्ष्मणराय उगाच काहीतरी अनावश्यक गप्पा मारत प्रसंग साजरा करू पाहात होते.

गिरीशनं विचारलं, 'माझा थोरला भाऊही अमेरिकेत असतो. तुम्ही कुठं नोकरी करता?'

अमेरिकन स्टाईलमध्ये शेखर उत्तरला, 'शिकॅगोमध्ये.'

'किती वर्षं तुम्ही अमेरिकेत आहात?'

गिरीशच्या कन्नड प्रश्नांवर शेखर अमेरिकन इंग्लिशमध्ये उत्तर देत म्हणाला, 'दहा वर्षं.'

'कुठल्या कंपनीत तुम्ही आहात?'

'वेस्टिंग हाऊस! आणखी काही प्रश्न आहेत?' शेखरनं तीव्रपणे विचारलं.

'काही नाही-' म्हणत गिरीश गप्प बसला; पण अपमान त्याला चांगलाच झोंबला.

सगळे उठले. गौरम्मांनी सांगितलं, 'तुमचा अभिप्राय लवकर कळवलात तर बरं होईल. मला माझ्या सुनेला कळवावं लागेल. ती अमेरिकेहून येणार आहे लग्नासाठी!'

माना हलवत पाहुणे निघून गेले.

त्यांची पाठ वळताच गौरम्मा गिरीशवर करवादल्या, 'एवढे प्रश्न कशाला विचारलेस रे तू? त्यांना आवडलं नाही ते! त्यांनी रागावून नकार दिला तर?'

'अम्मा, एवढ्या लांबच्या देशाला मुलीला देतोय आपण! कुत्र्याचं पिल्लू नव्हे! नोकरी कुठं करता म्हणून विचारलं तर त्यात राग येण्यासारखं काय आहे? फसलं जाऊ नये म्हणून मी विचारलं. काय चुकलं त्यात?'

'खरंय तुझं!' शामण्णांनी त्याला पाठिंबा दिला.

'मला वाटतं, त्यांना आपली सुरभी पसंत पडेल! सुरभी, तुला काय वाटतं?'

'अम्मा, पण वय थोडं जास्त वाटतं नाही?'

'काही नाही! आठ वर्षांचं अंतर म्हणजे फार नाही. सगळं चांगलं आहे. आता तू काहीतरी खुसपट नको काढू! जमुनाला कळवायला पाहिजे-'

विनिता मुकाट्यानं पुढ्यातली कामं करत होती. तिला या संदर्भात कुणीही विचारलं नव्हतं. संसारात ज्याच्या मताला काहीही किंमत नाही, तो परकाच म्हणायचा! विनितेला तीव्रपणे वाटत होतं.

एवढ्यात गिरीशची हाक कानावर आली, 'विनू, चल, एक चक्कर मारून येऊ या. येताना भाजीही आणता येईल.'

'खरंच जाऊन ये, विनू! दिवसभर खूप दमलीस तूही काम करून, त्यात दोन जीवांची! जा, मोकळ्या हवेत थोडी फिरून ये.' शामण्णांनी त्याला पुस्ती जोडली.

शामण्णांना विनिताच्या परिस्थितीची पूर्णपणे जाणीव होती. त्यांची तिच्यावर माया जडली होती.

घराबाहेर पडून थोडं अंतर चालल्यावर गिरीश म्हणाला, 'काही म्हण विनू! आपल्या अपरिचित लोकांकडे सुरभीला द्यायची मला भीती वाटते. या शेखरविषयी आपल्याला कुठून माहिती मिळू शकेल?'

विनिताही विचारात पडली. मग म्हणाली, 'तुमच्या भावाचे मदन नावाचे मित्र आहेत ना? त्यांच्या बहिणीलाही यांनी पाहिलं होतं म्हणे. लक्ष्मणरायांनीच तसं सांगितल्याचं मला आठवतंय. ती मुलगी पाहिलीय मी. देखणी आहे. का जमलं नाही कोण जाणे! चार पावलं असेच चालत गेलो तर त्यांचं घर लागतं. भेटून चौकशी करायची काय?'

गिरीशला हे पटलं.

दोघं मदनच्या घरी पोहोचले तेव्हा अनपेक्षितपणे मदनला पाहून चकित झाले. हा केव्हा आला अमेरिकेहून?

मदनचे वडील वयस्कर होते. त्यांच्यापुढे गिरीशनं शेखरविषयी सगळं सांगितलं. त्यानंतर चौकशी केली, 'मुलगा कसा आहे? तुम्हाला काही कल्पना?'

'आम्हांला काही ठाऊक नाही रे! आमचं आणि त्यांचं मुहूर्ताच्या बाबतीत जमलं नाही. आम्ही कौल लावला तर डावा कौल लागला. म्हणून आम्ही नकार दिला.'

मदन त्या दोघांना गेटापर्यंत पोहोचवायला आला होता. त्यानं मात्र स्पष्टपणे सांगितलं, 'गिरी, आमचे आप्पा आहेत जुन्या काळातले! हजार खोट्या गोष्टी सांगून एक लग्न जुळवावं यावर त्यांचा विश्वास आहे; पण मी हे मानत नाही. त्या

वेळी डायव्होर्स नव्हते, आता सर्रास होतात. मला जे काही समजलं ते सांगतो. तुम्हांला त्यानंतर जो निर्णय घ्यायचा असेल तो घ्या. मला मात्र यात अडकवू नका.'

'काय सांग-'

'आम्ही दोघंही शिकागोमध्ये राहात होतो; पण परस्परांकडे कधी गेलो नव्हतो. पन्नास मैल अंतर दोघांच्या घरात होतं. एका रविवारी आपल्या भागातला मुलगा इथं आलाय म्हणून भेटायला गेलो. उगाच फॉर्मॅलिटि कशाला, असा विचार करून फोन न करताच गेलो. घरात शेखर नव्हता. टूरवर गेला होता. घरात एक गोरी स्त्री होती. लग्नाशिवाय म्हणजे लिव्ह टुगेदर म्हणतात ना, तशी याच्याबरोबर राहात होती. दहा मिनिटं बसून जुजबी गप्पा मारून आलो. गेली दोन वर्ष ते एकत्र राहात असल्याचंही समजलं. त्यामुळे मी हे लग्न ठरवायला विरोध केला.'

'असं झालं होय?'

'हं. आधी माझा विरोध बघून माझी बहीणच माझ्याबरोबर भांडायला उठली. मी अमेरिकेत यायला नको आहे म्हणून तू मोडता घालतोयस म्हणत राहिली. जेव्हा सारं सांगितलं तेव्हा कुठं गप्प बसली.'

मदनशी बोलल्यावर गिरीशला डोक्यावरचं ओझं कमी झाल्यासारखं झालं. दोघांनीही त्याचे मनापासून आभार मानत म्हटलं, 'हे सांगून तुम्ही एक लग्न ठरवल्याइतकं पुण्य मिळवलंय! थँक्स!'

घरी परतताना दोघंही गप्पच होते. आता याविषयी बोलण्यासारखं काही राहिलंच नव्हतं.

रात्री जेवायला बसले होते तेव्हा गौरम्मांच्या मनात सुरभीचं लग्न कसं करून द्यायचं, हाच एक विषय होता. कार्यालय कुठलं सोयीचं होईल, पाहुण्यांची व्यवस्था कशी करायची, लग्नाला नातेवाईकांपैकी कुणाला बोलवायचं, कपडे कुठं घ्यायचे, सोनं-नाणं कुठं घ्यायचं, याविषयी बोलत होत्या; पण कुणीच त्यात सहभागी होत नव्हतं.

सगळं असह्य होऊन गिरीश उद्विग्नपणे म्हणाला, 'अण्णा, एक सांगायचं आहे. या शेखरनं पसंती कळवली तरी तुम्ही संमती देऊ नका.'

'का?' गौरम्मांनी चिडून विचारलं.

'मी शेखरची माहिती काढली आहे. त्याची एक गोरी मैत्रीण आहे असं समजलं.'

'आमचं बरं न बघवणाऱ्या कुणीतरी असूयेपोटी सांगितलं असेल.'

'अम्मा, आपल्याशी उत्तम संबंध असणाऱ्यांनीच सांगितलंय हे! रात्री पाहिलेल्या विहिरीत दिवसा का म्हणून पडायचं?'

शामण्णांनी विचारलं, 'कुणी सांगितलं हे?'

घडलेली सारी घटना गिरीशनं सविस्तरपणे सांगितली आणि शेवटी म्हणाला, 'माझी इच्छा मी सांगितली. यानंतर तुम्हांला जे करायचं आहे ते करा.'

एवढ्यात त्याला बाहेरून कुणीतरी हाक मारली. गिरीश बाहेर निघून गेला.

आता सुरभीनं हुंदके देऊन रडायला सुरुवात केली. घरातलं वातावरण गंभीर झालं. विनिता रडणाऱ्या सुरभीशेजारी बसून म्हणाली, 'सुरभी, अशी हताश होऊ नकोस. मीच तुझ्या भावाला घेऊन मदनरावांच्या घरी गेले होते. तुला यापेक्षा कितीतरी चांगला नवरा भेटेल. तू एवढा मनस्ताप करून घ्यायच्या लायकीचा तो मुलगा नाही!'

ठसठसणाऱ्या करटावर कढत पोटीस लावावं तसं झालं. निराशा आणि अपमान यामुळे उफाळलेला गौरम्मांचा संताप विनितेवर उसळला. मुलावरचाही संताप त्यात मिसळला.

सून गर्भारशी आहे याचं भान न ठेवता त्या उसळल्या, 'तूच गिरीशला असलं काहीतरी शिकवतेस! एवढ्या खोलात शिरायचा त्याचा स्वभावच नाही. तूच मायावी जादूगारीण-'

विनिता थक्क झाली. दुखावून ती उद्‌गारली, 'अम्मा, काय बोलता तुम्ही हे!'

यावर सुरभीही म्हणाली, 'खरं बोलतेय अम्मा. मी अमेरिकेला जाऊ नये म्हणून तुम्हाला माझ्या लग्नात जितक्या अडचणी आणता येतील तितक्या तुम्ही आणताहात! तुम्हांला माझ्याविषयी असूया वाटते! मीही तुमच्यासारखं इथंच राब-राबून पैसा-पैसा साठवण्यात आयुष्य घालवावं अशी तुमची इच्छा आहे! उलट जमुनावहिनी किती मोठ्या मनाच्या आहेत! किती उदार आहेत! मी श्रीमंत होईन म्हणून तुम्हांला असूया वाटते. माझ्या अमेरिकेतल्या मुलाबरोबरच्या लग्नासाठी घर विकलं जाईल, अशी भीती वाटते म्हणून लग्न मोडताय तुम्ही! स्वार्थी!'

शांत स्वभावाचे शामण्णा खवळून ओरडले, 'तोंड बंद कर, सुरभी!'

सुरभी त्यांनाही म्हणाली, 'अण्णा, तुम्ही पांढरं आहे ते सारं दूधच समजता. त्यांच्या मनातले कुटील हेतू तुम्हांला समजणार नाहीत. म्हणूनच म्हणतात, कुळगोत्र बघून मुलगी घरी आणावी. मोठ्या घरातून आलेल्या जमुनावहिनी मोठ्या मनाच्या आहेत! किती उदार स्वभाव आहे त्यांचा!'

शामण्णा हात उगारत म्हणाले, 'सुरभी, जीभ आवरती घे!'

विनितेला परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं. आपल्यावर कधी-काळी असा आरोप करण्यात येईल, हे तिच्या ध्यानीमनीही नव्हतं. तिनं शामण्णांना आवरलं. डोळ्यांमधलं पाणी तिच्या दोन्ही गालांवरून ओघळलं. ते पुसायचंही विनिताला भान नव्हतं. भरल्या ताटातल्या अन्नात ते अश्रू मिसळून गेले.

'सुरभी, तुला काया-वाचा-मनानं बहीण मानून मी तुझ्या लग्नाच्या संदर्भात

लक्ष घातलं. यानंतर तुमच्या घरातल्या कुठल्याही बाबतीत मी लक्ष घालणार नाही. मला क्षमा करा!' एवढं म्हणून जेवण अर्धवट टाकून विनिता आत निघून गेली.

अस्वस्थ शामण्णांच्या हातातला घास तसाच राहिला.

पण सुरभी आणि गौरम्मा मात्र गर्भारशी विनिता अर्धपोटी उठून गेली, याची फिकीर न करता जेवत होत्या.

डॉलरनं सर्वप्रथम त्या घरात आपलं अशांत पाऊल टाकलं होतं.

सुरभीचं लग्न ठरलं. मुलगा हैद्राबादमध्ये बँकेत नोकरी करत होता. सुरेश त्याचं नाव. ऑफिसर होता. घरची कुठलीही जबाबदारी त्याच्यावर नव्हती. एकुलत्या एक बहिणीचं लग्न झालं होतं. घरात सासू नव्हती. सुरभी नशीबवानच म्हणायची! स्वत:चं घर होतं. वडील होते. घरची गाडी होती. अमेरिकेतली नोकरी नाही एवढं सोडलं तर काहीही खटकण्यासारखं नव्हतं.

विनितेनं मात्र लग्नाच्या संदर्भात कुठल्याही बाबतीत लक्ष घातलं नव्हतं. सुरभीच्या कठोर बोलण्यानंतर विनिताही 'किती केलं तरी बहीण ती बहीणच आणि नणंद ती नणंदच' या विचारावर येऊन ठेपली होती.

सासू आणि नणंदेच्या स्वभावाचा परिचय त्याच प्रसंगी झाला होता. त्यांच्या स्वार्थी स्वभावाचा नीच आविष्कार पाहताच विनिता अंतर्मुख झाली होती. तिची कुणाशीही बोलण्याची इच्छाच निघून गेली होती.

गिरीशचा मुळातला स्वभाव अबोल होता त्यात नाही म्हटलं तरी सुरभी त्याची रक्ताची बहीण होती. त्यामुळे तो त्या घटनेतून सहज बाहेर येऊ शकला होता.

सुरुवातीपासूनच अशा घटना हृदयात दडवून जगण्याची सवय असलेल्या विनितेनंही दु:ख अंतर्मनात दडवलं आणि अलिप्तपणे वावरू लागली.

या सर्व प्रकारात खऱ्या वेदना झाल्या त्या शामण्णांना! त्यांच्या नंदगोकुळा सारख्या संसारात अदृश्य का होईना, पण भेग पडली होती. डॉलरनं ती पाडली होती!

सुरभीच्या लग्नाची तयारी जोरात चालली होती.

चंद्रूनं सूटचं कापड पाठवलं होतं, तर जमुनेनं सुरभीला शंभर डॉलर्स पाठवून दिले. सोबत चंद्रूचं पत्र होतं-

'आम्हांला यंदा रजा कमी आहे. जमुनाही बँकेत नोकरी करते. त्यामुळे लग्नाची तारीख ठरताच लगेच कळवा, म्हणजे दोन आठवडे आधी येता येईल. शक्यतो सगळ्यांना सोयीचा दिवस ठरवा.'

ऑगस्ट महिन्यात विनितेच्या बाळंतपणाचे दिवस येत होते. त्यानंतर, म्हणजे डिसेंबर महिन्यात लग्नाचा मुहूर्त ठेवणं शक्य होतं. पण त्यासाठी पाहुणे तयार नव्हते.

विनितानं आपलं बाळंतपण धारवाडमध्ये करून घ्यायचं ठरवलं होतं. गिरीश

आणि शामण्णांनी तिला नाना परीनं समजावलं तरी ती आपल्या विचारावर ठाम होती. त्या दोघांनाही तिनं समजावलं, 'आमच्या गावात किती तरी दवाखाने आहेत. माझ्या आजी बाळंतपण करायला येतील. मी बाळंतपणासाठी धारवाडच्या माझ्या घरी जाईन. कमलापुरांचा दवाखाना घरापासून खूप जवळ आहे.'

जुलै महिन्यात मुहूर्त पाहणं सगळ्यांच्या सोयीचं होतं. घरी फोन होता. मुहूर्ताची बातमी फोन करून जमुनेला सांगितली.

बातमी ऐकताच तिनं सांगितलं, 'आम्ही जुलै महिन्यात युरोपच्या प्रवासाला जाणार आहोत. तो प्रवास कॅन्सल करणं शक्य नाही.'

हे पैशाचं युद्ध! डॉलरविरुद्ध रुपयाचं युद्ध!

तिनं स्पष्टच सांगितलं, 'मी यायला हवं असेल, तर माझ्या सोयीनं लग्नाची तारीख ठरवा! विनिता येणं आवश्यक असेल, तर तिच्या सोयीनं ठरवा!'

शामण्णांनी समजावलं, 'गौरी, बाळंतपणाची तारीख मागं-पुढं करणं कुणाच्याही हातात नाही. आपण विनिताच्या सोयीनंच तारीख ठरवू या. जमुनेनं या वर्षी युरोप-प्रवास केला नाही, तर काय बिघडणार आहे? पुढच्या वर्षी ते जाऊ शकतात. एकच बहीण आहे. आठ दिवस सुट्टी मिळाली तरी येऊन जाऊ दे त्यांना.'

'तसं नाही हो! जमुना रागावली आणि लग्नालाच आली नाही तर काय करायचं? तिला जे सोयीचं असेल, तसंच आपण केलं पाहिजे. तुम्हा पुरुषांना यातलं काही समजत नाही. तुम्ही नका इकडे लक्ष देऊ!'

पण विनितेला सारा अर्थ समजला होता.

सुरभीच्या लग्नासाठी चंद्रूनं दोन लाख रुपये दिले होते. गिरीशनंही बँकेतून कर्ज काढून पन्नास हजार रुपये दिले होते. चंद्रूनं अधिक पैसे दिले असल्यामुळे त्याला जे सोयीचं असेल, तसंच असा गौरम्मांचा निर्णय दिसत होता. म्हणजेच जमुना जे म्हणेल, तेच ऐकण्यात येणार हे नक्की होतं. वयामुळे प्रौढत्व आलं असलं, तरी डॉलरच्या नादामुळे गौरम्माही जमुनेमागे पोरकटपणे धावत होत्या.

अशा प्रकारे सुरभीचं लग्न ऑगस्ट महिन्यातच ठरलं. अगदी विनितेच्या बाळंतपणाच्या दिवसांजवळचाच मुहूर्त ठेवला गेला. हे ठरवत असतानाच 'तू आलीस किंवा नाही आलीस तरी हरकत नाही, जमुना येणार आहे' हे दाखवून देण्यात येत होतं.

'जमुना माझी थोरली सून. अमेरिकेत असते. सावकार कृष्णप्पा ठाऊक आहेत ना? त्यांची मुलगी!' असं लग्नघरात अभिमानानं सांगता येईल. विनितेविषयी काय सांगणार?

येताना जमुना भरपूर भेटवस्तू घेऊन येईल, असंही त्यामागं गणित होतं.

विनिताचा बाळंतपणासाठी धारवाडला जाण्याचा दिवस ठरला. शामण्णा अस्वस्थ

होऊन आत-बाहेर करत होते. अधून-मधून तिला म्हणत होते, 'सगळी नीट तयारी आहे ना? तू अजिबात चिंता करू नकोस, विनू! सगळं नीट होईल!'

त्यांच्या वागण्यातून व्यक्त होणारी काळजी पाहून विनिता म्हणाली, 'अण्णा, आमचं धारवाड म्हणजे काही खेडं नाही. आजूबाजूला माणसं आहेत. माझीही बागेच्यामध्ये झाडा-झुडपांनी घेरलेल्या घरात राहायची इच्छा आहे. काळजी करण्यासारखं काही नाहीच.'

गौरम्मा मात्र प्रथमच फणकारून म्हणाल्या, 'कुठलं धारवाड कोण जाणे! तिथंच बाळंतपण व्हावं म्हणून हट्ट करतेय! इथं आम्ही नाही का करणार बाळंतपण?'

सारं तोंडदेखलंच असल्याचं ठाऊक असल्यामुळे विनिताही त्यांच्याशी वाद घालायला जात नव्हती.

चंद्रू आणि जमुना भारतात आले. त्याच दिवशी विनितेला मुलगा झाला. शामण्णांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. मुलगा-सून आल्यामुळे गौरम्मांनाही नवतारुण्य आलं होतं.

लग्नाला अजून पंधरा दिवस होते.

जमुनेनं कुठल्याही कामाची जबाबदारी अंगावर घेतली नाही. प्रकृतीचं निमित्त सांगून ती आईच्या घरी निघून गेली आणि लग्नाआधी केवळ दोन दिवस परतली.

लग्नघरातही दर पाच मिनिटाला एक रेशमी साडी बदलून जमुना व्हिडिओ कॅमेऱ्यापुढे मिरवत राहिली. फिरून-मिरवून ती इतकी थकली की विचारता सोय नाही!

काही का असेना, सुरभीचं लग्न मात्र थाटात झालं. मुलीला दोन किलो चांदी, भरपूर सोनं, रेशमी साड्या, घरासाठी लागणारं आधुनिक सामान, फॅन वगैरे सारं गौरम्मांनी दिलं.

जमुनेला गौरम्मांचा हा उधळेपणा अजिबात आवडला नाही. आपण दूर अमेरिकेत थंडी-बर्फात कामं करून आणि काटकसर करून साठवलेले डॉलर्स अशा फालतू कारणांसाठी खर्च करायचे? जे मिळवतात, त्यांनाच पैशाचं महत्त्व ठाऊक असतं!

तरीही तोंडानं वाईट बोलून वाईटपणा घेण्याइतकी ती कच्ची नव्हती. यावरचा मार्ग सोपा होता. यानंतर डॉलर्स पाठवणं कमी करायचं! एवढंच.

गिरीश बाळाला बघण्यासाठी लगोलग जाऊन आला होता.

त्यानं आणि विनितानं बाळासाठी 'हर्ष' नाव चांगलं आहे असं योजून ठेवलं. कारण ती शामण्णांची इच्छा होती.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी सुरभी हैद्राबादला गेली. लगेच चंद्रू, विनिता आणि बाळाला बघायला धारवाडला निघाला. जमुना माहेरी गेली.

लग्नघरातली कामं शिल्लक असल्यामुळे गौरम्मा धारवाडला आल्या नाहीत. लग्नघरात आणि इतरही वेळी प्रत्येक भेटणाऱ्या व्यक्तीला त्यांनी सुनावलं, 'आमच्या जमुनेनं चार हजार डॉलर दिले लग्नासाठी! नाहीतर लग्न होणंच शक्य नव्हतं! खरं तर कन्यादानाचं सारं पुण्य जमुनेला मिळायला पाहिजे!'

त्यात कुठंही गिरीशचं नाव नव्हतं.

चंद्रूच्या तीक्ष्ण बुद्धीला मात्र घरातल्या वातावरणामधला बदल लक्षात आला होता. या घराला आपलं घर समजून एवढी वर्षं राबणारी विनिता सुरभीच्या लग्नाच्या वेळीच माहेरी बाळंतपणासाठी गेली होती.

अण्णांचा चेहरा कष्टी होता.

लग्नघराच्या धामधुमीत गौरम्मा किंवा सुरभीच्या तोंडून एकदाही 'विनिता असायला हवी होती. विनिता असती, तर बरं झालं असतं.'- अशा प्रकारचं एकही वाक्य ऐकू आलं नव्हतं. गिरीशबरोबर कुणी बाळासाठी कपडे किंवा बाळलेणी पाठवली नव्हती.

आपल्या सुंदर आणि शांत घरात ही अशांतीची वावटळ कुठून आली असेल? याला जबाबदार कोण?

मी? की जमुना? चंद्रू गोंधळून गेला होता.

आठ वर्षांनंतर चंद्रू धारवाडला येत होता.

या आठ वर्षांमध्ये किती तरी घडून गेलं होतं!

त्या वेळी जो चंद्रू धडधडत्या अंत:करणानं या गावी आला होता, तोच चंद्रू आत्मविश्वासासह इथं येत होता.

त्या वेळी रेल्वेमध्ये ज्या विनितेनं आपल्या मधुर गाण्यानं त्याचं लक्ष वेधून घेतलं होतं, तीच विनिता आता त्याची भावजय झाली होती.

त्या वेळी 'सेकंड क्लासचा बर्थ मिळाला तर नशीब' मानणारा चंद्रू आता फर्स्ट क्लासच, काय विमानानं प्रवास करायलाही कंटाळून गेला होता.

त्या वेळी अमेरिकाच आपल्या जीवनाचं अंतिम ध्येय आहे असं मानणारा चंद्रू आता म्हणत होता, 'तोही एक श्रीमंत देश आहे, एवढंच-'

त्या वेळी त्याचं भूगोलाचं ज्ञान मैसूर-मंड्य एवढ्यापुरतंच मर्यादित होतं. आता मात्र सारं जग त्यात सामावलं होतं.

याचबरोबर या खेपेच्या प्रवासात त्यानं एक महत्त्वाचं सत्य जाणलं होतं-

डॉलरच्या रूपानं धन कमावत असल्यामुळे सगळे आपल्याला आज मान देताहेत, आत्मीयता दाखवताहेत, हेवाही करताहेत. पण खरं प्रेम आणि खरा विश्वास आपण गमावला आहे.

कितीही पैसा मिळवला तरी प्रेम-विश्वास मिळत नाही. उलट पैशाच्या भरतीमध्ये

अशा नाजूक भावना मरण पावतात.

या खेपेला चंद्रू धारवाडमधल्या एका हॉटेलमध्ये उतरला होता. एवढ्या वर्षांमध्ये धारवाडही बरंच बदललं होतं. रस्त्यावरची गर्दी आणि रिक्षांची संख्या वाढली होती. ज्या 'अत्तीकोळ्ळ' भागात पूर्वी काहीही नव्हतं, तिथंही आता घरं झाली होती. रस्त्यात दिसणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या वेशभूषेतही बरीच आधुनिकता आली होती.

चंद्रू विनितेला भेटायला तिच्या घरी गेला.

त्या घराच्या भोवताली मात्र फारसा फरक झाला नव्हता. भोवतालच्या बागेचा तजेला मात्र पूर्वीसारखा राहिला नव्हता. तेही साहजिक होतं म्हणा! त्या झाडांना वेळच्या वेळी पाणी मिळण्याची व्यवस्था केली असती, तरी विनितेची माया आणि प्रेम नसेल तर तजेला कसा येणार?

चंद्रूला पाहून विनिता मात्र आश्चर्यचकित झाली. आपल्या बाळाला बघायला चंद्रू एवढ्या लांब आवर्जून येईल अशी तिनं स्वप्नातही अपेक्षा केली नव्हती.

तिची आजी सीतक्का चंद्रूजवळ बसल्या. निरखून बघत 'अरे, चंद्रू ना तू? कसा आहेस? बरा आहेस ना?' वगैरे चौकशी केली.

'होय. तुम्ही कशा आहात?' त्यानंही चौकशी केली.

एवढ्यात विनिता खोलीबाहेर आली.

'लग्न कसं झालं? अण्णा कसे आहेत?' तिनंही चौकशी केली.

'सगळे छान आहेत. बाळाला दाखवणार नाही?'

विनितेच्या चेहऱ्यावर अभिमान आणि आनंद उमटला. त्या नव्या मातेनं कौतुकानं छोटा गोमटेश्वर त्याच्यापुढे धरला. नवजात बालक कुणासारखं आहे यावर कौतुकाची चर्चा झाली, पण काहीच निष्कर्ष निघाला नाही.

त्यानंतर चंद्रू मोकळेपणानं गप्पा मारू लागला.

मध्येच काही तरी आठवून त्यानं विचारलं, 'तुम्हाला अजून ते गाणं येतं?'

'कुठलं?'

'वसंत-बनी ती गाते कोकिळ–'

'न यायला काय झालं?'

'तुम्ही अजूनही गाता?'

काही क्षण मौनात गेले. त्यानंतर त्याच्याकडे पाहत विनितेनं सांगितलं, 'भोवतालच्या परिस्थितीमुळे कोकिळेचं गाणं मूक झालंय!'

'का? असं का व्हावं? कोकिळेला राजदंडाचं भय नसतं आणि राजमुद्रेची आशाही नसते. राजमुद्रेच्या भयानं गाणं बंद केलं?'

'कुठला राजा आणि कुठला आम्रवृक्ष! सगळी झाडं नष्ट झाली, सिमेंटचे इमले

उठले, पैशाचं महत्त्व शिगेला पोहोचलं! आता कशी कोकिळा गाणं म्हणेल? आणि ते ऐकणार तरी कोण?'

'असं का म्हणता? पैसे मिळवण्यासाठी नोकरी धरल्यावर गाणं सोडूनच द्यावं असं तुम्ही मानता का?'

'पैसे? अंहं डॉलर!' बोलता-बोलता विनिता गप्प झाली.

तिच्या मौनाचा अर्थ चंद्रूलाही समजला होता.

'विनिता, मलाही अतिशय निराशा वाटते.'

'तुम्हाला? तुम्हीच असे म्हणालात तर आमच्यासारख्यांची काय गत? तुम्ही एवढे श्रीमंत! जमुना तर साक्षात लक्ष्मीच! सतत तुमच्या नावाचा जप करणारी आई आणि बहीण! काय कमी आहे तुम्हाला?'

'विनिता, उलट तुम्हालाच मी म्हणतो, काय झालंय? तुम्ही तुमच्या माणसांमध्ये आहात. कानावर तुमची भाषा सतत येते. तुमच्या मुलावर तुम्ही तुमचे संस्कार करू शकता. तुम्हाला माझ्यासारखं दुहेरी जीवन तर जगावं लागत नाही ना!'

'नदीपलीकडचं कुरण नेहमीच हिरवंगार दिसत असतं!'

'हेच बोलणं तुम्हालाही लागू पडत नाही काय?'

तिला चंद्रूच्या बोलण्याचा अर्थ समजेना. आपल्याला वाटतं तसा चंद्रू तिथं सुखी नाही असं दिसतं. म्हणजे त्या अमेरिकेतही दु:खी माणसं असतात तर!

'विनिता, तुम्हाला तिथल्या जीवनाची कल्पना नाही. सेलमध्ये खरेदी करायची आणि डॉलरला चाळीसनं गुणायचं! असं जगणारी मंडळी सुखी असतात काय? तिथं हजार डॉलर्समध्ये सामान्य काम करत राहायचं आणि इथं येऊन आपल्याला चाळीस हजार रुपये पगार मिळतो असं सांगून भाव खायचा- हे योग्य आहे काय? तिथल्या दु:खांचा उल्लेखही न करता इथं कुबेराप्रमाणे वागणाऱ्यांवर विश्वास ठेवू नका.'

चंद्रूला जमुनाविषयी काही सुचवायचं असेल काय?

'विनिता, तिथं डॉलर मिळवण्यासाठी आम्ही आपली माणसं, घर-दार सगळं सोडून कष्ट करत राहतो. तिथं केवळ भारतीय माणसांबरोबर मिसळतो. तिथल्या समाजाचा अविभाज्य अंग होऊ शकत नाही. कितीही वर्षं तिथं राहिलं तरी एक प्रकारचा जीवघेणा एकटेपणा आम्हांला छळत राहतो. त्यासाठी आम्ही तिथं अनेक देवळं आणि मठ स्थापन करतो.'

चंद्रूचं बोलणं ऐकून अस्वस्थ झालेली विनिता कळवळून म्हणाली, 'मग तिथं का राहता? इथं का निघून येत नाही?'

'पैशाच्या दलदलीत आणि मोहाच्या जाळ्यात सापडलोय आम्ही! आमच्या लायकीपेक्षा फार उत्तम नोकरी तिथं मिळते. जाती, भाषा, प्रदेशाचं राजकारण नाही.

सुखानं आपलं काम आपण करू शकतो. इथं आलो तरी तशी नोकरी मिळणार नाही. देहालाही तिथल्या सुखासीन जीवनाची सवय झाली आहे. माझंच पाहा ना! एकेकाळी कसा जगत होतो- आता गाडी नसेल, तर घराबाहेर पडायला मी तयार नसतो. तिथलं सगळं सोडून मी इथं आलो तर आणखी दु:खी होईन.'

प्रथमच चंद्रू विनितेशी अंतर्मनातल्या सुख-दु:खाविषयी बोलला होता. तिच्या स्नेहमय स्वभावाची त्याला याच धारवाडमध्ये ओळख झाली होती. तिनं कधीही त्याचं मूल्यमापन डॉलरच्या पार्श्वभूमीवर केलं नव्हतं.

त्यानं विचारलं, 'विनिता, तुम्हीही पहिल्यासारख्या उत्साही आणि आनंदी राहिला नाहीत. का बरं?'

'खरं सांगू? तुम्हाला राग नाही ना येणार? तुमच्या आई-बहिणीला दोष दिला तर चालेल?'

'खरं तेच सांगा.'

'तुमच्या डॉलरनं आपल्या घराचा सत्यानाश केला आहे. आम्ही काहीही केलं, कितीही केलं तरी अम्मा त्याची तुलना तुमच्या डॉलरशी करतात. सुरभीच्या लग्नासाठी आम्ही दोघांनीही कर्ज काढून पैसे उभे केले. शारीरिक कष्टही भरपूर घेतले. तरीही तिच्या लग्नाची तारीख ठरवताना त्यांनी केवळ जमुनेची सोय पाहिली. आपल्याबरोबर गेली चार वर्षे असलेल्या सुनेची त्यांना आठवणही आली नाही. डॉलर-सुनेचं महत्त्व त्यांना अधिक वाटलं!'

चंद्रू तिचं बोलणं ऐकत होता.

'आताही माझी खात्री आहे. लग्नघरात त्या जमुनेच्या कृपेमुळे लग्न झालं असंच म्हणाल्या असतील. माझं नावही त्यांनी काढलं नसेल!'

चंद्रूला आश्चर्य वाटलं. धारवाडच्या एका कोपऱ्यात असलेल्या बाळंतीण विनितेला ही कसली दृष्टी आहे म्हणायची? ही दृष्टी नाही- विनितेच्या इतक्या वर्षांच्या अनुभवातून उमटलेले ते शब्द होते.

खंतावलेला चंद्रू बेंगळूरला परतला.

हर्षला घेऊन विनिता बेंगळूरला आल्याला सहा महिने उलटून गेले होते. आता हर्ष पालथा पडून रांगायचा प्रयत्न करत होता. घरात त्याचा एकसारखा काही ना काही गोंधळ सुरू असे. आजोबांचा तर त्याला इतका लळा लागला होता की शामण्णांचा आवाज ऐकला की त्यांच्याकडे झेप घ्यायचा. आजोबा-नातवाची चांगलीच मैत्री जुळली होती.

आता घरात माणसंही बेताची होती. सुरभी अधून-मधून येत होती. तिचं सासरचं जीवन आनंदात चाललं होतं. पाहुणे मंडळी मात्र अगदी खास होती. कृष्णप्पा सावकारही अलीकडे त्यांच्या घराकडे फिरकत नव्हते. कारणही ठाऊक

नव्हतं.

त्या दिवशी गौरम्मा दोशाचं पीठ रुबत होत्या. एकाएकी त्यांच्या छातीचा भाग दुखू लागला. कसला तरी मार बसला असावा एवढाच त्यांनी विचार केला आणि तिकडे फारसं लक्ष दिलं नाही. दुसऱ्या दिवशी अंघोळीच्या वेळी त्यांनी चाचपून पाहिलं- एखादी गाठ असावी, असं काहीतरी त्यांच्या हाताला लागलं. मिठाचा शेक दिला तर गळू फुटून जाईल असा विचार करून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केलं.

आठवडा गेला तरी गाठ जशीच्या तशीच होती. ते पाहून मात्र गौरम्मा थोड्या घाबरल्या. सकाळी शाळेला जायच्या घाईत असलेल्या विनितेला त्यांनी बोलावून ती गाठ दाखवली.

विनितेनं लगेच रजा टाकली आणि डॉक्टरांकडे त्यांना घेऊन जाण्याची तयारी केली. विनितेला गांभीर्य समजलं असलं, तरी तिनं याविषयी नवरा किंवा सासऱ्यांना सांगितलं नाही.

अगदी घराबाहेर पडताना तिनं शामण्णांना सांगितलं, 'आम्ही थोड्या डॉक्टरांकडे जाऊन येतो हं! काही काळजी करू नका.'

डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी केली आणि गौरम्मांना बाहेर बसायला सांगितलं. नंतर त्यांनी विनिताला विचारलं, 'त्यांच्याशी तुमचं काय नातं आहे?'

'माझ्या सासूबाई आहेत. काय झालंय त्यांना?'

'त्यांच्या ब्रेस्टमध्ये गाठ आहे. बायप्सी करून तपासलं पाहिजे. त्यानंतर काय ते कळेल.'

'म्हणजे? फार त्रास होईल त्यांना?'

'फार नाही. त्या गाठीची तपासणी अत्यावश्यक आहे. कॅन्सर असेल किंवा नसेलही. पण खात्री करून घेतली पाहिजे. शक्य तितक्या लवकर. तुम्ही त्यांना एवढ्यात काहीच सांगू नका.'

विनिता जड मनानं बाहेर आली. तिला पाहताच गौरम्मा म्हणाल्या, 'काही नाही ना? काही क्रीम लावायला दिलं की नाही?'

'नाही. लवकर गुण येईल म्हणे!' विनिता पटकन म्हणाली.

विनिता विचारात पडली. शामण्णा वयस्कर म्हणून त्यांना सांगायचं नाही, लांब राहणाऱ्या चंद्रूला उगाच का चिंता, म्हणून त्याला सांगायचं नाही. सुरभीला प्रसंगाचं गांभीर्यच कमी, म्हणून तिला कळवायचं नाही.

रात्री तिनं गौरम्मांच्या छातीतल्या गाठीविषयी गिरीशच्या कानावर घातलं. ते ऐकताच भावनाप्रधान गिरीशचे डोळे पाण्यानं भरले.

'डॉक्टर काय म्हणाले? कॅन्सर?'

विनितेनंच त्याला समजावलं, 'तसं काहीही डॉक्टरांनी सांगितलेलं नाही.

आता छोटंसं ऑपरेशन करून ते गाठ काढून टाकणार आहेत, एवढंच. कॅन्सर नसण्याचीही शक्यता आहेच ना?'

दुसऱ्या दिवशीही विनिताच गौरम्मांना दवाखान्यात घेऊन गेली. आता मात्र गौरम्माही गंभीर झाल्या. आपल्याला काहीतरी झालं आहे. सून सांगायला तयार नाही. मुलगा मात्र घाबरलाय हे त्यांच्या लक्षात आलं.

सुनेच्या मनोधैर्याचं क्षणभर त्यांनाही कौतुक वाटलं. तेवढंच.

आपल्याला काही झालं तर सुरभीचं काय होईल?

याआधी त्यांच्यावर दवाखान्यात जायचा प्रसंग आला नव्हता. त्यामुळे दवाखाना म्हटल्यावर त्यांना भीती वाटली होती. त्यात ऑपरेशन!

विनिता मात्र सावधपणे त्यांना सांगत होती, 'अम्मा, ही छोटीशी गाठ आहे, ती काढून टाकणार आहेत. मी इथंच बाहेर आहे. तुम्ही अजिबात घाबरायचं कारण नाही. मी कौल लावून विचारलंय- सगळं चांगलं होईल म्हणून कौल मिळालाय!'

तिचं समजुतीचं बोलणं ऐकताना गौरम्मा संकोचून गेल्या होत्या.

नंतरही एक-दोन दिवस त्यांना दवाखान्यात राहावं लागलं. स्त्रियांचा वॉर्ड असल्यामुळे रात्री विनिताच तिथं राहत होती. वांतीची भावना झाली की तीच पॅन देत होती. बाकीही हवं-नको पाहत होती. कशाचाही कंटाळा करत नव्हती.

वॉर्डमधल्या आजूबाजूच्या आया-बाया सकाळी म्हणायच्या, 'किती चांगली आहे तुमची मुलगी! संपूर्ण रात्रभर जागी असते! तुमचं सगळं कशी नीट करते.'

'माझी मुलगी हैद्राबादला असते. ही माझी सून! आणखी एक सून आहे. दूर अमेरिकेत राहते ना, म्हणून आली नाही.'

दुखण्यातही रुपयापेक्षा डॉलरचाच मोह त्यांच्यावर प्रभाव पाडून होता.

जेव्हा रिपोर्टमध्येही कॅन्सर नसल्याचं समजलं, तेव्हा गिरीश आणि विनितेला फार आनंद झाला. गिरीशनं प्रथमच चंद्रूला सविस्तरपणे पत्र लिहिलं.

आठवडाभर गौरम्मांचं ड्रेसिंग आणि विश्रांती चालली होती. त्याआधी दोन महिने गिरीशनं मंगळूर-उडपी-कारवार-गोकर्ण अशी समुद्रकिनाऱ्याची गावे पाहण्यासाठी ट्रीप ठरवली होती.

हॉस्पिटलमधून घरी आल्यावर शामण्णांनी सांगितलं, 'तुम्ही ठरवल्याप्रमाणे जाऊन या. मी घरात असतोच. मी पाहीन तिच्याकडे.'

पण विनितेनं ते मानलं नाही. तिनं सांगितलं, 'गोकर्ण-उडुपी कुठं पळून जात नाहीत. पुढच्या वर्षीही हवं तर जाता येईल.'

'हे पाहा, एवढ्यात जमुना येणार आहे असं पार्वतम्मा सांगत होत्या. त्यांच्या नात्यातलं कुणाचं तरी लग्न आहे म्हणे. मला बरं नाही म्हणून तुम्ही तिला कळवा- ती धावत येईल आणि आठवडाभर इथं राहील. सुरभीलाही बोलावून घेईन. तिलाही

जमुनेबरोबर राहिल्यासारखं होईल. तुम्ही दोघंही खुशाल जाऊन या!' गौरम्मा म्हणाल्या.

हे ऐकून शामण्णांची मान खाली गेली.

आपल्या युरोपच्या ट्रीपसाठी जमुनेनं सुरभीचं लग्न पुढे ढकलायला लावलं होतं! विनितेला वाटलं, आपणच अयशस्वी आहोत. किती केलं तरी आपण यांना त्या डॉलर-सुनेपासून दूर नेऊ शकत नाही. ऑपरेशनची जखम सुकण्याआधीच यांना आपला विसरही पडला.

अखेर जे व्हायचं तेच झालं म्हणा!

जमुना काही आली नाही. विनिता मात्र ट्रीप रहित करून घरातच राहिली.

चंद्रूनं पत्राचं उत्तर पाठवलं. त्यात तीनशे डॉलर्सचा चेक होता. शिवाय त्यानं लिहिलं होतं-

'पैशानं मदत करणं तसं सोपं असतं. पैसे पाठवता येतात. पण जे शारीरिक मदत करतात, त्यांना मात्र विसरता कामा नये. प्रेम आणि विश्वास केवळ धनानं विकत घेणं अशक्य आहे.'

पत्र कचऱ्याच्या टोपलीत पडलं आणि चेक बँकेत रवाना झाला.

ऑफिसच्या कामानिमित्त चंद्रू बेंगळूरला आला. त्याला भेटण्यासाठी सुरेश आणि सुरभी आले होते. चंद्रूनं बातमी आणली- जमुनेला दिवस राहिले होते.

समोर खेळणाऱ्या नातवापेक्षा गौरम्मा अमेरिकेतल्या न जन्मलेल्या नातवाची अधिक चिंता करू लागल्या. त्या कौतुकानं चौकशी करू लागल्या, 'जमुना कशी आहे रे? केव्हा बाळंतपण तिचं? लोणचं घेऊन जाशील काय? आणखी कसले डोहाळे लागले आहेत तिला?'

समोर गोंडस हर्ष खेळत होता, आजोबांशी लडिवाळपणे बोबड्या शब्दांत गप्पा मारत होता. दिसायला तर विनितेसारखाच लोभस दिसत होता; पण विनिता मात्र कोमेजून गेली होती. बाळंतपणात धारवाडमध्ये दिसत होती, त्यापेक्षाही रोडावली होती ती. चेहऱ्यावर पहिल्यासारखी तरतरीही दिसत नव्हती. तिला कशातही फारसा रस राहिला नव्हता. यांत्रिकपणे तिची कामं चालली होती.

त्यानं अगदी प्रथम धारवाडमध्ये ज्या विनितेला पाहिलं होतं, ती ही नव्हतीच!

गौरम्मा तर तिच्याशी कारणाशिवाय एक शब्दही बोलत नव्हत्या. स्नेहाचा एकही धागा तिथं दिसत नव्हता. डॉलरच्या दगडाखाली तो पूर्णपणे नष्ट होऊन गेला होता.

चंद्रूनं येताना हर्षसाठी भारी आकर्षक खेळणी आणली होती. ती पाहून आनंदित होण्याऐवजी विनिता म्हणाली,

'कशाला आमच्या मुलासाठी तुम्ही एवढी भारी खेळणी आणलीत? तुम्हालाही

बाळ होईल. त्याच्यासाठी तुम्ही काढून ठेवू शकाल. तुम्ही प्रत्येक वेळी भारी भेटवस्तू आणल्या तर आमच्यासारख्यांनी कशी परतफेड करायची?'

हे ऐकून चंद्रू दिग्मूढ झाला.

'काय झालंय हिला? अशी का ही श्रीमंती-गरिबीचंच बोलत राहतेय?'

'विनिता, हर्ष आमच्या घरचा पहिला नातू आहे. त्याच्यासाठी मी मला वाटलं ते घेऊन आलोय. माझ्या मुलाला मी इथं घेऊन येईल तेव्हा तुम्हाला जे करायचं ते करा, जे द्यायचं ते द्या.' एवढं सांगून त्यानं विषय बदलला.

जमुनेच्या बाळंतपणासाठी गौरम्मांना वर्षभरासाठी अमेरिकेला जाण्याची तीव्र अपेक्षा होती. पण शामण्णांनी मात्र ठाम नकार दिला. त्यांनी स्पष्टच सांगितलं, 'चंद्रू, मी हर्षला सोडून वर्षभर राहणं शक्यच नाही! त्यात माझ्या प्रकृतीच्या तक्रारी असतात. काही कमी-जास्त झालं तर तुम्हांला परदेशात त्रास होईल. तुझ्या आईलाच आशा आहे- तिला घेऊन जा.'

आणखी दोन महिन्यांनंतर गौरम्मांचं अमेरिकेत जायचं पक्कं ठरलं. त्या तर हुरळून गेल्या, 'जमुनाला काय पाहिजे ते कळव हं! मी येताना घेऊन येईन!'

चंद्रूनं आईच्या प्रवासाची सारी व्यवस्था केली आणि तो निघून गेला.

त्यानंतर गौरम्मांच्या बोलण्यात अमेरिकेच्या प्रवासाव्यतिरिक्त दुसरा विषयच येईना! शामण्णांचं डोकं पिकून गेलं. राघवेंद्रस्वामींच्या मठात संध्याकाळी जमणाऱ्या सगळ्या मैत्रिणींना हजारदा त्याविषयी सांगून झालं. शेजार-पाजारच्यांनाही सांगून झालं. नंजनगूडच्या नंजुडेश्वराला अभिषेक सांगून त्यांनी जमुनाचं बाळंतपण सुखरूप होऊ दे म्हणून साकडं घातलं. सुरभीबरोबर दुकानात जाऊन त्यांनी जमुनेसाठी पाच हजारांची हिरवी रेशमी साडी आणली.

विनिता मूकपणे सगळं पाहत होती. यातलं काहीही तिच्या गर्भारपणात तिच्या वाटेला आलं नव्हतं. गौरम्मांनी त्या वेळी स्पष्टच सांगितलं होतं, 'गिरीशनं दिली तर तुला साडी घे.' सुरभीच्या लग्नाचा खर्च असल्यामुळे गिरीशला ते शक्यही नव्हतं. आता जमुनेला मात्र त्यांनी स्वत: साडी आणली होती.

गावाला जायचा दिवस जवळ येऊ लागला. वेगवेगळे मसाले, वेगवेगळ्या प्रकारच्या चटण्या-लोणची, कडबोळी, चकल्या तयार झाल्या. फारसं लक्ष न देणारा गिरीशही म्हणाला, 'अम्मा, तू काही तिथं खाद्य-पदार्थांचं दुकान काढायला निघाली नाहीस! त्यातलं थोडं या मुलासाठीही ठेव ना!'

यावर त्यांनीही ठणकावून सांगितलं, 'तुला हवं असेल तर विनितेला सांग! ती करून देईल. शिवाय इथं दुकानं आहेत. तिथं जमुनाला कुणी नाही!' आणि सगळं सामान नीट भरून घेतलं.

जमुनाच्या माहेरकडूनही ढीगभर सामान आलं. गौरम्मांना आणखी आनंद

झाला.

'ही पाहा चार रेशमी लुगडी आणि चार सुती लुगडी घेते. चार भारी साड्या घेते. पुरतील की नाही? बाळासाठी सोन्याची साखळी करून घेऊ की नुसतं वळंच असू दे? इथून कुणी येणार असलं, तर त्यांच्याबरोबर काय पाठवायचं ते मी कळवेन. तेवढं पाठवून द्या.'

शामण्णांचा संयम सुटला.

'वर्षभरच कशाला, पाच वर्षं राहून ये मुलाकडे. तू काही चंद्रावर निघाली नाहीस! तुझ्यासारखी हजारो माणसं दररोज जात-येत असतात. तू निघशील त्या दिवशी निवांत झोप काढेन मी!' शामण्णांचं हे बोलणं ऐकल्यावर तर गौरम्मांना रडू कोसळलं.

'जळला मेला आमचा जन्म! तुम्ही तर मला कुठंही नेलं नाही. आपल्या चंद्रूमुळे अमेरिकेला जायला निघाले! तुम्ही घरचे यजमान! तुम्हीच असं बोललं तर कसं?'

कधीही यजमान नसलेले शामण्णा तिथून उठून निघून गेले. विनिताही आत गेली. तिला आपलं गरोदरपण आठवत होतं. ते जाऊ दे, हर्षच्या बारशाच्या वेळी त्यांनी फक्त शंभर रुपये दिले होते. न जन्मलेल्या बाळाचं आतापासून कौतुक आणि डोळ्यांसमोरच्या नातवाकडे पूर्णपणे डोळेझाक! सतत तिथल्याच गोष्टी बोलत होत्या. इथल्या घराची किंवा नातवाची त्यांना काळजीच वाटत नव्हती. त्या एकदा तरी 'विनिता, घराकडे आणि हर्षकडे नीट लक्ष दे. त्याच्यावर रागावू नकोस' असं तोंडदेखलं का होईना, म्हणतील अशी विनितेची अपेक्षा काही पूर्ण झाली नाही. ती मनोमन दुखावली.

गौरम्मांना भेटायला सुरभी आणि सुरेश आले. त्यांनीही जमुनासाठी कोचमपल्ली साडी आणि तिच्या बाळासाठी खेळणी आणली होती. हर्षसाठी मात्र काहीही नव्हतं. विनितेनं तिकडेही दुर्लक्ष केलं. पण मनात कळ उठलीच.

रात्री सुरभीनं आईपुढे विषय काढला.

'अम्मा, हेही म्हणताहेत, आपणही अमेरिकेला जाऊ. तिथंच नोकरी करेन.'

गौरम्मा हरकून म्हणाल्या, 'वा! फारच छान! सुरेश, तुम्ही लगोलग तिथं या. मीही असेनच.'

'तसं नव्हे अम्मा! तिथली परीक्षा दिल्यानंतरच तिथं नोकरी मिळते म्हणे. त्याशिवाय नोकरी मिळत नाही.'

'तुला कुणी सांगितलं हे?'

'यांनीच सांगितलं. लग्नाआधीच त्यांनी सगळी चौकशी करून ठेवली होती.'

'तुझा नवरा हुशार आहे बाई! सहज पास होईल ती परीक्षा!'

'त्यासाठी खूप खर्च असतो, म्हणतात. तिथं येण्याचा विमानाचा खर्च. आम्हां दोघांनाही वर्षभर तिथं राहावं लागेल!' सुरभी सावधपणे म्हणाली.

गौरम्मा मोठ्या विश्वासानं म्हणाल्या, 'त्यात विचार कसला करायचा? चंद्रूचं घर आहेच ना? तिथं तुम्ही दोघंही राहा. असा कितीसा खर्च येणार आहे दोघांचा? विमानाच्या खर्चाच्या दृष्टीनंही चंद्रू मदत करेल. तुम्हांला नोकरी मिळाल्यावर द्या त्यांचे पैसे परत हवं तर!'

सुरभी साशंक स्वरात म्हणाली, 'चंद्रू तयार झाला तरी जमुनावहिनी तयार होईल काय?'

'होईल तर! माझी खात्री आहे. श्रीमंत घरात वाढलेय ती! त्यामुळे मनाचा तेवढा मोठेपणा असेलच. शिवाय तिलाही सोबत होईल ना! सुरेश घरचा जावई. जमुना त्याच्याशी नम्रपणे वागेल. कशाला काळजी करता? मी स्वत: सांगेन ना त्या दोघांनाही!'

आईनं एवढं आश्वासन देताच सुरभी अमेरिकेची स्वप्नं बघत सुखानं झोपी गेली.

दुसरे दिवशी शामण्णांना ही बातमी समजली तेव्हा त्यांनी बजावलं, 'तू यात अडकू नकोस गौरी! मुलांची लग्नं लावून दिली की आपली जबाबदारी संपली. कुणाला घरात ठेवून घ्यायचं आणि कुणाला नाही याचा निर्णय ज्याचा त्यानं घ्यायचा असतो. आपण कोण त्यांना सांगणार? स्वत:च्या हिमतीवर त्यांना चंद्रावर जायचं तर जाऊ दे. तू नसती जबाबदारी अंगावर घेऊ नकोस!'

'काहीतरीच काय तुमचं? बहिणीच्या नवऱ्याला मदत करायला आपला चंद्रू तयार होणार नाही असं तुम्हाला कसं वाटतं? एका वर्षाचा तर प्रश्न आहे. त्यानंतर ते नोकरी धरून वेगळेच राहणार आहेत.'

'तिथं कशी काय पद्धत आहे कुणास ठाऊक!' शामण्णा म्हणाले.

'तुम्ही अमेरिका पाहिलीय काय? तुमचं हे नेहमीचंच आहे! उगाच काहीतरी खुसपट काढता! मी तर जमुनाला सांगणारच!' गौरम्माचा स्वर कठोर झाला होता.

गौरम्मांना बेंगळूरहून निघतानाच गिरीगौडांची सोबत मिळाली. तेही चंद्रूच्या गावीच जाणार होते. त्यामुळे गौरम्मांच्या अमेरिका प्रवासाची सुरुवात तर निश्चितीनं झाली.

बेंगळूर-मुंबई-लंडन-न्यूयॉर्क-मिनिसोटा असा त्यांचा प्रवास होता.

एअर-होस्टेसनं दिलेला कुठलाही शाकाहारी पदार्थ गौरम्मांनी तोंडात घातला नाही. केवळ फळांचा रस पीत त्या प्रवास करीत राहिल्या.

त्यांनी आयुष्यात कधीही अंघोळ न करता जेवण केलं नव्हतं. एवढ्या लांबच्या प्रवासात अंघोळ करायला कुठून जमणार?

गौरम्मांचा हा पहिला विदेश प्रवास होता. त्याचबरोबर त्या पहिल्यांदा विमानात बसल्या होत्या. त्यामुळं त्यांना सगळं नवंच वाटत होतं. क्षणोक्षणी त्या आश्चर्यचकित होत होत्या.

गिरीगौडांच्याही हे लक्षात आल्यामुळे सीटचा पट्टा बांधणं त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे टॉयलेट कसा वापरायचा वगैरे गोष्टी त्यांनी गौरम्मांना समजावून सांगितल्या.

एरोड्रमवर चंद्रूला पाहताच गौरम्मांना साऱ्या प्रवासाचा शिणवटा क्षणार्धात निघून गेल्यासारखं वाटलं. सारा कंटाळाही निघून गेला.

गिरीगौडाही 'चंद्रू, माझी जबाबदारी संपली! तुमच्या आईंना तुमच्या ताब्यात दिलंय!' म्हणत हसत निघून गेले.

चंद्रू गौरम्मांचं सामान गाडीत ठेवत होता. गौरम्मा लगेच उत्तेजित होऊन म्हणाल्या, 'याच गाडीचा फोटो जमुनानं पाठवला होता ना रे चंद्रू?'

पाठोपाठ त्यांनी विचारलं, 'अरे हो! जमुना का आली नाही एअरपोर्टवर?'

'ती कामावर गेलीय. यायला उशीर होईल तिला.'

'गर्भारशी! अजून कामावर जाते?' गौरम्मांचा जीव कासावीस झाला.

'अम्मा, इथं डिलव्हरीच्या दिवसापर्यंत बायका कामावर जातात.'

'होय!' त्यांना आश्चर्य वाटलं. मुलाच्या आलिशान गाडीत बसताना मात्र त्यांचं मन तृप्तीनं भरून गेलं होतं.

चंद्रूनं आईभोवती सीट-बेल्ट बांधला.

'अरे काय हे? मी काय लहान बाळ आहे? काढ बघू हा पट्टा!'

'नाही, अम्मा! इथं तसा कायदाच आहे.'

मनात कुठं तरी जमुनाही प्रेमानं एअरपोर्टवर भेटायला येईल अशी अपेक्षा होती. ती भारतात आलेल्या प्रत्येक वेळी कितीही अडचण असली तरी त्या पोहोचवायला जायच्याच ना! तिची आई आली नाही तरी त्या जायच्या.

गाडी वेगानं धावत होती. काचेच्या खिडकीतून बाहेरचं जग दिसत होतं. ही अमेरिका! भूलोकीचा स्वर्ग हा! इथं येण्यासाठी कितीतरी माणसं वाट पाहत असतात! चंद्रूमुळंच आपल्याला इथं येणं शक्य झालं! केवळ चंद्रूमुळे! जर चंद्रूही गिरीशप्रमाणे तिथंच राहिला असता, तर आपल्याला या महान देशाचं दर्शनच झालं नसत.

या भावनेनं गौरम्मा रोमांचित झाल्या.

विस्तीर्ण रस्ते, रस्त्यांच्या दोन्ही बाजूला मोठाले वृक्ष, रस्त्यावर अगणित गाड्या! संपूर्ण वातावरणात फक्त गाड्यांचाच आवाज भरला होता. बाहेर रक्त गोठवणारी थंडी असली तरी आत सुखावह उबदार वातावरण! गाडीचं ऐश्वर्य बघून गौरम्मा चकित होऊन गेल्या.

आपल्या देशात आणि या देशात किती अंतर आहे! तिथली माणसांची गर्दी, त्यातून धावणाऱ्या सायकली, रिक्षा, बैलगाड्या, गाढवं, हातगाड्या आणि मोटारी. इथं त्यातलं काहीच दिसत नव्हतं. केवळ वेगानं धावणाऱ्या गाड्याच दिसत होत्या.

गौरम्मांनी पुराणांमध्ये नागलोक, पाताळलोक, किन्नर लोकांविषयी ऐकलं होतं. हा कुठला लोक?

चंद्रूच्या बोलण्यानं त्या भानावर आल्या.

तो चौकशी करत होता, 'घरी सगळे कसे आहेत? हर्ष कसा आहे?'

'अतिशय खोडकर झालाय! मीही येणार म्हणून पदर धरून रडत बसला होता. पण आजोबा येणार नाहीत म्हटल्यावर मीही येत नाही म्हणून गप्प बसला. यांचाही फार जीव आहे त्याच्यावर!' त्यांनीही नातवाचं कौतुक केलं.

'खरंय! हर्ष नशिबवान आहे. आजी-आजोबांचं प्रेम मिळतंय त्याला! अण्णाही यायला हवे होते.'

'त्यांचा स्वभाव तुलाही ठाऊक आहेच. त्यांना काहीही नकोच असतं. इथं येऊन इथलं वैभव बघायला काय हरकत होती? अगदी संन्याशासारखं बोलतात. ते जाऊ दे. जमुनेचे बाळंतपणाचे दिवस केव्हा येतात?'

'बहुतेक पुढच्या आठवड्यात होईल. तू आल्यावर ती घरातच राहणार आहे. मुलगी छान पोसलीय असं डॉक्टर म्हणत होते.'

गौरम्मा निराश झाल्या.

'अरे, तू थोरला मुलगा. पहिला मुलगाच झाला असता तर बरं झालं असतं.'

'आपलं काय श्रीरामचंद्राचं राज्य आहे की काय? राज्य चालवायला राजकुमारच पाहिजे असं म्हणायला? आपण आपली चार चौघांसारखी माणसं. मूल नॉर्मल असलं तरी खूपच झालं.'

चंद्रूचे हे विचार टी. नरसीपूरमध्ये चौथीपर्यंत शिकलेल्या गौरम्मांना कसे समजणार?

भरपूर मोठं अंगण असलं तरी त्याला कंपाऊंड नव्हतं. घराभोवती भलं मोठं गवताचं लॉन होतं. अधूनमधून फुलांची झाडं दिसत होती. घराजवळ गाडी नेण्यासाठी सिमेंटचा रस्ता होता.

गौरम्मांच्या मनात आलं, कुठल्या ऑफिसपाशी आलो आपण?

त्या वेळी चंद्रू म्हणाला, 'अम्मा, घर आलं. उतर.'

जयनगरमधल्या तीस बाय चाळीसच्या प्लॉटवर, अजिबात जागा न सोडता बांधलेलं छोटंसं घर- माडी असली तरी घर छोटंसं होतं- ते कुठं आणि हा भव्य राजवाडा कुठं! आपल्या मुलाचं हे घर! या घराच्या मालकाची मी आई! गौरम्मा अभिमानानं फुलून आल्या.

मुलाबरोबर पायऱ्या चढून दारापाशी आल्यावर दार उघडलं. जिनं दार उघडलं ती आपली सून जमुना? त्यांचा क्षणभर स्वत:वर विश्वास बसला नाही.

सुरभीच्या लग्नात पावलो-पावली रेशमी साड्या बदलणारी, अंगभर विविध दाग-दागिने घालून साक्षात लक्ष्मी भासणारी जमुना आणि या जमुनामध्ये कितीतरी अंतर होते.

केसांचा छोटासा बॉब, अंगात सैल डगल्याप्रमाणे लांबलचक गाऊन, रितं कपाळ, रिते हात, गळ्यात मंगळसूत्राचा पत्ता नव्हता, नाकात चमकी नव्हती. तिचा सावळा वर्ण मात्र उजळला होता. प्लेझर टाऊनमध्ये मासे विकणाऱ्या सर्वसामान्य बाईसारखी ती दिसत होती.

तिनंही हसत चौकशी केली, 'अम्मा, बऱ्या आहात ना?'

'छान आहे!'- म्हणत गौरम्मांनी घरात प्रवेश केला.

त्यांच्या कल्पनेपेक्षाही तो परिसर वेगळा होता. त्यांना वाटलं होतं, आपल्याला पाहताच जमुना वाकून नमस्कार करेल. आपण आनंदानं बेंगळूरहून सांभाळून आणलेल्या अक्षता तिच्या मस्तकावर टाकत आशीर्वाद द्यायचा असं त्यांनी ठरवलं होतं. सून सकल-सौभाग्यसूचक आभरणे घालूनच आपलं स्वागत करेल अशी त्यांची खात्री होती.

जमुना आत निघून गेली. मऊ सोफ्यावर बसून गौरम्मा सूक्ष्मपणे सभोवताली पाहू लागल्या.

एखाद्या श्रीमंताचं ते घर दिसत होतं. जमिनीवर गालिचे, खिडक्यांना सुरेख भारी पडदे, भला मोठा रंगीत टी. व्ही., शोकेसमध्ये चांदी आणि चंदनाच्या शोभेच्या महाग-महाग वस्तू, शिसवी लाकडाचं भलं मोठं डायनिंग टेबल, भिंतीवर लटकणाऱ्या अनेक भारी वस्तू.

बेंगळूरच्या कृष्णप्पा सावकारांच्या घरापेक्षाही अधिक वैभव तिथं होतं.

जमुनानं विचारलं, 'अम्मा, कॉफी देऊ?'

'नको गं बाई! अंघोळ केल्याशिवाय मी कधीच कॉफी प्यायले नाही. आधी मला न्हाणी-घर दाखव.'

जमुनानं त्यांना न्हाणीघर दाखवलं.

'इथं टॉयलेट आहे. इथं अंघोळ करून सोवळं कसं राखता येईल? नुसती अंघोळीची न्हाणी दाखव.'

जमुनेनं चंद्रूकडे पाहिलं.

'अम्मा, इथं असंच असतं. एकाच ठिकाणी दोन्ही असतं. आपल्याकडे जसा संडास आणि न्हाणी वेगवेगळे असतात तसं नसतं इथं. इथल्या प्रत्येक न्हाणीघरात अशीच व्यवस्था आहे.'

'म्हणजे? इथं आणखी न्हाणीघरं आहेत? एका घराला एका संडास आणि न्हाणी असते ना?' गौरम्मांनी डोळे विस्फारून म्हटलं.

'तसं काही नाही. आपल्या घरात तीन आहेत. तू आपली डोळे मिटून अंघोळ कर बघू! म्हणजे टॉयलेट कमोड दिसणार नाही!' चंद्रू हसत म्हणाला.

'चंद्रू, मी कधीही टबमध्ये अंघोळ केली नाही. एक बादली दे बघू! टबमध्ये बादली ठेवून अंघोळ करून घेते.' गौरम्मांनी आपल्या परीनं त्यातून मार्ग काढला.

पण चंद्रूच्या घरी बादली नव्हती. आधी हा मुद्दा त्याच्याही लक्षात आला नव्हता. इंडियन स्टोअर्समधून बादली आणायची ठरवून त्यानं घरातल्या मोठ्या पातेल्यात समशीतोष्ण पाणी काढून आईला अंघोळ करायला सांगितलं.

थोड्या असमाधानानंच गौरम्मांनी अंघोळ उरकली आणि सोवळ्याचं लुगडं नेसून बाहेर आल्या. बाहेर अंधार होत आला होता. घड्याळ पाहिलं- चार वाजले होते.

'चंद्रू, एवढ्यात अंधार झाला?'

'होय अम्मा! इथं हिवाळ्यात असंच असतं.'

कॉफी प्यायल्यावर गौरम्मा घर बघायला उठल्या.

'आमचं अगदी सर्वसामान्य घर आहे. फक्त पाच बेडरूम्स आहेत. फक्त दोन गॅरेज आहेत-' म्हणत चंद्रूनं सगळं घर फिरून दाखवलं.

प्रत्येक बेडरूममध्ये एकेक पलंग, त्यावर रेशमी आच्छादन, मऊ गादी, ड्रेसिंग टेबल- साऱ्याच वस्तू एकापेक्षा एक सुंदर होत्या. तरीही चंद्रू याला साधं घरच म्हणत होता!

'चंद्रू, अगदी राजवाड्यासारखं थाटाचं घर आहे तुझं!'

'अम्मा, इथं सगळ्यांची घरं अशीच असतात. अण्णा आम्हांला शाळेत शिकवायचे, ते आठवतं. मलय पर्वतावरच्या भिल्ल स्त्रिया चंदनाचीच लाकडं स्वयंपाक करण्यासाठी जाळतात म्हणे! तसंच आहे इथं!'

गौरम्मांच्या डोक्यात तो काय म्हणतो ते शिरलं नाही. जमुना त्यांना स्वयंपाकघरात घेऊन गेली.

किती स्वच्छ आहे स्वयंपाकघर! नव्यानं बांधल्यासारखं वाटतंय! मायक्रोवेव्ह, गॅस, ग्राईंडर, भला मोठा फ्रीज!

'जमुना, आणखी किती दिवस कामावर जाणार?'

'फक्त उद्या जाऊन येईन. बाळंतपणानंतर दोन महिन्यांनंतर पुन्हा कामावर जाईन.'

'लहान मूल म्हटल्यावर तू का नोकरी करायची? गिरीशचा बेताचा पगार आहे म्हणून विनिता मूल झालं तरी नोकरी करते. तुम्हाला काय कमी आहे? एवढा मोठा

राजवाडा– दोन-दोन गाड्या!'

जमुनेनं चंद्रूला खूण केली- तुमच्या बावळट आईला समजावून सांगा अशा अर्थाची! चंद्रूच्या ते ध्यानात आलं. तो म्हणाला, 'अम्मा, हत्तीचं ओझं हत्तीला आणि बकरीचं ओझं बकरीला! हे घर, या घरातलं सगळं फर्निचर, गाड्या सगळं काही हप्त्यानं घेतलं आहे. दर महिन्याला सगळ्यांचे हप्ते भरलेच पाहिजेत ना! आता तर तूही आहेस बाळाकडे बघायला. जमुनाचाही वेळ जात नाही. वरू दे नोकरी. पुढंच पुढं बघता येईल.'

चंद्रूनं विषय संपवला. त्या निमित्तानं गौरम्मांना हप्त्याच्या व्यवहाराचा परिचय झाला. किती छान सोय आहे ही! आपल्याकडेही अशी सोय असती तर आपल्यालाही असंच थाटात राहता आलं असतं! दर महिन्याला हप्ते भरत राहिलो असतो!

दुसऱ्या दिवशी जमुना आणि चंद्रू नोकरीवर निघून गेले. त्या भल्या मोठ्या घरात गौरम्मा एकट्याच राहिल्या.

भारतात रात्र असेल तेव्हा इथला दिवस. इथं रात्र असताना तिथला दिवस त्यामुळे गौरम्मांना झोपेचा थोडा त्रास वाटला.

आता त्यांना सुरभीची आठवण झाली. एवढं मोठं घर आहे! जमुना नको म्हणणार नाही. सुरभीही जमुनाला मदत करेल, तिच्या मुलाला सांभाळेल. सुरभीलाही मुलांची भरपूर हौस आहे. बेंगळूरला आली की हर्षला क्षणभरही सोडत नाही. चंद्रूही नको म्हणणार नाही.

त्यांना जुनी आठवण आली. त्या चंद्रूच्या खेपेला बाळंतपणासाठी माहेरी गेल्या होत्या. दोन वर्षं तिथंच राहिल्या. कारण शामण्णा वर्षभरासाठी ट्रेनिंगला गेले होते. शामण्णांना आई-वडील कुणीच नव्हतं. गौरम्मांच्या भावानं आणि भावजयीनं गौरम्मा आणि चंद्रूला दोन वर्षं आपल्या घरी ठेवून घेतलं. एवढंच नव्हे, तर जाताना त्यांनी लुगडंही नेसवलं होतं. त्यांची परिस्थितीही फारशी बरी नव्हती.

सुरभीला येऊ नको म्हणायला यांना तर काहीही कारणच नाही!

सुरभी इथं आली की आपली दोन मुलं अमेरिकेत! मग मनात येईल तेव्हा इथं येता येईल.

या विचारानंच गौरम्मा हुरळून गेल्या.

गौरम्मांना येऊन आठवडा झाला होता.

चंद्रू त्यांना घेऊन डिपार्टमेंट-स्टोअरला जाऊन आला होता.

केवढं मोठं ते किराणा मालाचं दुकान! प्रत्येक पदार्थ नीट स्वच्छ करूनच ठेवला होता. काय त्या भाज्या! काय ते धान्य! काय ते विविध प्रकारचे फळांचे रस! दूध, दही, सरबत, पन्हं, ताक- सगळं काही तिथं मिळत होतं. विविध प्रकारचं आईस्क्रीम! पलीकडचा मांसाहारी पदार्थांचा विभाग वगळता गौरम्मांना

दुकान फारच आवडलं. सारं बघताना दोन डोळे अपुरे पडताहेत असं जाणवलं.

आठवड्याभरात गौरम्मा हळूहळू घरात रुळल्या होत्या. स्वयंपाक करणं, मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करणं- सगळं त्यांनी शिकून घेतलं होतं. थोडा-फार उष्ट्या-खरकट्याचा प्रश्न जाणवायचा- त्याहीपेक्षा खरा कंटाळा यायचा तो भांडी घासायचा!

बेंगळूरच्या गरिबीच्या संसारात निंगी धुणं-भांडी करून जायची. इथं मात्र त्यासाठी कुणीही नव्हतं. त्यामुळे वॉशिंग-मशीनमध्ये कपडे धुवायला सगळेच शिकले होते.

जमुना बाळंतीण होण्याआधी तिचं डोहाळजेवण करायची गौरम्मांची इच्छा होती. तिच्यापुढे ही इच्छा त्यांनी मांडली,

'जमुना, गावाहून मी मुद्दाम हिरवी साडी, हिरव्या बांगड्या आणल्या आहेत. कोचमपल्ली साडी सुरभीनंही पाठवली आहे. चकली, कडबोळी वगैरेही घेऊन आलेय मी. चार सवाष्णींना बोलाव एखाद्या संध्याकाळी. आरती करून ओटी भरता येईल.'

'अम्मा, ते कसं जमणार?'

'का गं?'

'वर्किंग डे असेल तर कुणीही येत नाही. बाळाच्या बारशालाच बोलवू या.'

गौरम्मांच्या उत्साहावर थंडगार पाणी ओतलं गेलं. तरीही त्यांनी तिला देवापुढे बसवून साडी आणि हिरव्या बांगड्या दिल्या. आरतीही केली.

पण जमुनानं हिरव्या साडीची घडीच मोडली नाही. हिरव्या बांगड्याही बॉक्समधून बाहेर आल्याच नाहीत.

गौरम्मांना मात्र याचं वाईट वाटलं.

प्रसूति-वेदना सुरू झाल्यावर जमुना रडू लागली. डॉक्टरांनी सांगितलेल्या दिवशीच प्रसूति-वेदना सुरू झाल्या होत्या. गौरम्मा आपल्या पद्धतीनं तिची समजूत काढू लागल्या, 'शांत राहा. स्वत:ला आवर. मलाही तीन मुलं झाली आहेत. हे दु:ख सोसावं लागतंच बाई माणसाला!'

पण जमुनेचं रडणं कमी झालं नाही.

एवढ्यात चंद्रू आला. त्यानं गाडी बाहेर काढली. गौरम्मांनी विचारलं, 'मी येऊ काय रे?'

'नको अम्मा. तिथं फक्त मला आत सोडतात. मी नंतर दवाखान्यातून फोन करेन.'

चंद्रू आणि जमुना दवाखान्यात निघून गेले. गौरम्मांना हे सगळं विचित्र वाटत

होतं. पण या देशात अशाच कितीतरी विचित्र वाटणाऱ्या पद्धती सर्वसामान्य मानल्या जात असाव्यात हे त्यांच्या लक्षात येऊ लागलं होतं.

अखेर त्या फोनपाशी बातमी ऐकायला बसून राहिल्या. तिरुपतीच्या वेंकटरमणाला आणि नंजनगूडच्या नंजुंडेश्वराला नवस बोलून त्यांनी थोडे पैसे बांधून वेगळे ठेवून दिले होते.

चंद्रूचा फोन आला, 'मुलगी नॉर्मल आहे. बाळंतपण सरळ झालं. दोघीही छान आहेत.'

संध्याकाळी गौरम्मा चंद्रूबरोबर बाळाला बघायला निघाल्या. बाळ आईसारखंच सावळ्या रंगाचं होतं. तिथल्या इतर गोऱ्यापान मुलांमध्ये तर तिचा सावळा रंग आणखी गडद वाटत होता.

तिसऱ्या दिवशी जमुना घरी आली.

गौरम्मा मनोमन अस्वस्थ झाल्या होत्या. खरं तर दहा दिवस सोयराचे असतात. ही तर घरभर सारं शिवते! खरोखरच यांना सोयर नाही आणि सूतकही नाही! सोवळं-ओवळं ठाऊकच नाही.

पण काहीही इलाज नसल्यामुळे त्या गप्प बसल्या.

बाळाला वेगळ्या खोलीत झोपवायची व्यवस्था करण्यात आली होती. पाळणाही विचित्र होता. बाळासाठी असंख्य खेळणी, रंगीबेरंगी पडदे, अनेक चित्रे वगैरे तयारी केली होती.

बाळाला त्याच्या खोलीत झोपवून जमुना आपल्या खोलीत जायला निघाली तेव्हा मात्र न राहवून त्या म्हणाल्या, 'जमुना, एवढं लहान बाळ ते! एकटंच त्या खोलीत कसं गं झोपेल? पाहिजे तर माझ्यापाशी त्याला झोपू दे.'

'नको. उद्या तुम्ही गावाला गेलात तर मला त्रास होईल. आतापासूनच तिला वेगळं एकटीनं राहायची सवय करते.' पुढं त्यांनी काही बोलू नये म्हणून ती तडक निघून गेली.

त्यांना हर्षची आठवण झाली. अगदी तान्हा असल्यापासून तो आजोबांच्या शेजारीच झोपायचा. त्यामुळे त्याला आजोबांचा खूपच लळा लागला होता. पहिल्यापासूनच लांब राहिलं तर लळा लागणार तरी कसा? वाढणार कसा?

जमुना बाळाला छोट्या टबमध्ये अंघोळ घालत होती. न राहवून त्या म्हणाल्या, 'दे तिला. मी न्हाऊ घालते. तेलाचं कुठं आहे? मुलं तान्ही असताना तेल-पाण्यात आणि झोपेतच पोसली जातात.'

जमुनेला हे पटलं नाही. ती म्हणाली, 'इथं मुलांना असं वाढवत नाहीत. मुलांना कसं वाढवावं यावर पुस्तकं मिळतात!'

गौरम्मा तान्ह्या बाळांना उत्तम न्हाऊ घालतात, हे त्यांच्या आळीत सगळ्यांना

ठाऊक होतं. घरात बाळंतीण असली की, त्या घरातली प्रौढ बाई त्यांना आवर्जून भेटत असे आणि सांगत असे, 'तुमच्यासारखं कुणीही न्हाऊ घालत नाही गौरम्मा! तुम्हाला वेळ असेल तर बाळाला न्हायला घालायला येता का थोडे दिवस?' मग गौरम्माही मोठ्या प्रेमानं दररोज बाळाला न्हाऊ घालायला जात.

अशा प्रकारे त्यांनी कितीतरी बाळांना न्हायला घातलं होतं. ही मुलं मोठी होऊन परीक्षांमध्ये पास झाली की, त्यांच्या आया मुलांना घेऊन येऊन गौरम्मांना नमस्कार करायला लावत आणि आवर्जून सांगत, 'तुम्ही न्हाऊ-माखू घातलं ना? आता पास झालाय बघा!'

गौरम्माही एखादं पुण्यकार्य केल्याच्या भावनेनं हे सारं करत होत्या. अजूनही हर्षलाही त्यांनीच न्हायला घातलं होतं. आजही विनितेला सासूसारखं मुलाला न्हायला घालता येत नाही.

एकाएकी गौरम्मांना वाटलं, 'मी इथं निघून आले, हर्षला कोण न्हाऊ घालत असेल?'

दोन महिने झाले आणि जमुनेचं बाळंतपण संपलंच. ओळखीच्या काही कुटुंबांना बोलावून मुलीचं बारसं करायचं जमुनेनं ठरवलं होतं.

गौरम्मा उत्साहानं खाद्यपदार्थ करण्याचा विचार करू लागल्या. त्या पद्धतीनं त्या कामालाही लागल्या. तीसेक माणसं अपेक्षित होती. शनिवारी संध्याकाळी कार्यक्रम ठरला होता. सगळ्यांसाठी शिरा, बिशीबेळे हुळी अन्न, पुरी असा बेत ठरला. त्या तयारीला लागल्या.

मुलीचा शुक्रवारचा जन्म असल्यामुळे एखादं लक्ष्मीचं नाव ठेवावं ही गौरम्मांची अपेक्षा होती. पण त्यांच्या अपेक्षेची चौकशी कोण करणार? हॉस्पिटलमध्ये असतानाच बाळाचं नाव 'मानसी' म्हणून नोंदलं होतं.

हा फक्त नावापुरता बारशाचा विधी होता.

ठरलेल्या वेळी माणसं जमली. जमलेल्यांपैकी थोडी माणसं उत्तर भारतातली आणि काही कर्नाटकातली होती. काही तमीळ माणसंही होती. सगळे भारतीयच होते, पण सगळ्यांच्या मधली संभाषणाची भाषा मात्र इंग्लिश होती.

मानसीसाठी अनेक प्रकारच्या भेटवस्तू आल्या होत्या. काही लहानसे फ्रॉक्स पन्नास डॉलर्स एवढ्या किंमतीचे होते! गौरम्मांना तर वाटलं, एवढ्या पैशांत उत्तमपैकी रेशमी परकर-पोलकं, तेही मोठ्या मुलीचं, आलं असतं. नाहीतर सोन्याची चेन आली असती.

कार्यक्रम संपला. चंद्रू गाडी स्वच्छ करण्यासाठी बाहेर गेला. जमलेली मित्रमंडळी समाधानानं निघून गेली होती. जमुनाही दमली होती. बाळाला झोपवून ती उमाबरोबर ड्रॉईंग रूममध्ये पाय पसरून निवांत बसली होती. गौरम्मा दमून झोपल्या होत्या.

उमा जमुनेची कन्नड भाषिक मैत्रीण. दोघींच्या गप्पा चालल्या होत्या.

उमा म्हणत होती, 'जमुना, या वर्षी मुलगी झाली ना! पुढच्या वर्षी मुलगा होऊ दे. म्हणजे घर भरून जाईल!'

'नको गं बाई! अजिबात नको.'

'का? तुला काय कमी आहे?'

'आमचं काय विशेष? चार-चौघांसारखी आम्हीही सामान्य माणसं. आम्हांला तर लहान कुटुंबच आवडतं.'

'का गं? मला म्हणतेस ते?'

'आमच्या घरी आम्ही दोघंच भावंडं. माझ्या आईलाही फार नातेवाईक आलेलं आवडायचं नाही. त्यामुळे कुणी आलं तरी रात्री आम्ही त्यांना घरात राहायचा आग्रहच करत नव्हतो. नाही म्हटलं तरी प्रायव्हसी जाते. काही म्हण! नातेवाईकांच्या भेटी लग्नघरातच ठीक आहेत!'

'हो बाई! मलाही तसंच वाटतं!' जमुना म्हणाली.

'गेल्या महिन्यात माझा दीर कामासाठी म्हणून आला होता तो एक महिनाभर राहिला. इतका वैताग आला म्हणून सांगू! आपल्याला याच आयुष्याची सवय झालेली असते. आठ दिवसांचा एकदम स्वयंपाक करून ठेवायचा आणि रोज त्यातलं गरम करून खायची आपली सवय! या लोकांना ते आवडत नाही. गावाकडे जाऊन 'वहिनीनं शिळं अन्न वाढलं' म्हणून सांगतील! मला तर असे कुणी फार दिवस राहायला आले की कधी जातील असं होऊन जातं!' उमा म्हणाली.

'खरंय तुझं! कशाचाही अतिरेक चांगला नव्हे. जमेल तेवढे डॉलर्स उचलून दिले तर कौतुक होतं. पण घरात कुणी शिरलं तर मात्र भांडण-वाद-मानसिक त्रास होतो. म्हणून मला एकत्र राहणं अजिबात आवडत नाही. शिवाय मला तशा प्रकारचा त्रासही नाही.'

'ते कसं?'

'माझा दीर एका किरकोळ नोकरीत आहे. त्याची इथं यायची ताकदच नाही! विमानाचा खर्च कसा करणार? नणंदेचा नवरा बँकेत चांगल्या पोस्टवर नोकरी करतो. तेही इथं येणार नाहीत. कुणी इथं येणार-राहणार-शिकणार म्हटलं तर मात्र खरोखरच वैताग आहे.'

गौरम्मा दमल्या असल्या तरी त्यांना झोप आली नव्हती. त्या दोघींच्या गप्पा त्या ऐकत होत्या. जमुनाही आपल्या मनातलं मोकळेपणानं बोलत होती.

त्या गप्पांमधून एक मात्र निश्चित झालं-सुरेशला जमुना शिक्षणासाठी आपल्या घरी ठेवून घेणं शक्य नाही. सुरभीला बोलावून घ्यायचा तर प्रश्नच नव्हता.

चंद्रू काय करेल? बायकोच्या विरोधात राहून तो कधीही आपल्या बहिणीला किंवा मेहुण्याला मदत करणं शक्य नाही. चंद्रूच्या स्वभावात ते बसतच नाही. गिरीशच्या स्वभावात आणि याच्या स्वभावात फार अंतर आहे. कितीतरी वेळा गिरीश विनितेचं काहीही ऐकत नसे. त्यानं स्वत: काहीतरी ठरवलं तर कुणी काही म्हटलं तरी तो स्वत:चंच खरं करायचा.

पण एका दृष्टीनं पाहिलं तर चंद्रूचंही बरोबरच नाही काय? एवढ्या लांब राहायचं, जवळपास कुणी नातेवाईक नाहीत. नवऱ्याला बायको आणि बायकोला नवरा अशी परिस्थिती. अशा वेळी असं जमवून घेतलं तरच संसार चालायचा. संसारात भांडणंही कमी होतील. भारतात मात्र बायकोबरोबर भांडून आलेल्या मुलाचं आई आनंदानं स्वागतच करते. बायकोशी जुळवून घे असं कधीच सांगत नाही! एवढं सामाजिक पद्धतीचं वैयक्तिक आयुष्यावर दडपण येतं. तिथून बाहेर पडून इथं आलेले नवरे मात्र आपल्या बायकांचं म्हणणं ऐकतात असं दिसतं.

नेहमीप्रमाणे 'युगादि' म्हणजे गुढीपाडवा आला.

पण बेंगळूरमधला 'युगादि' आणि अमेरिकेतला 'युगादि' यांमध्ये पराकोटीचा फरक होता. स्वाभाविकच आहे म्हणा! त्यात हा गुढीपाडवा 'वर्किंग डे'ला आल्यावर कोण काय करणार?

गौरम्मांनी स्वत:च्या सोयीसाठी राघवेंद्रस्वामींच्या मठाचं पंचांग आणलं होतं. त्याच्या मदतीनं त्या आजच गुढीपाडवा असल्याच्या निर्णयापर्यंत आल्या.

घरात कुठल्याही प्रकारचं सणाचं वातावरण नव्हतं.

सकाळी उठून चंद्रूनं आपल्या वाट्याची कामं केली होती. भांडी, कपबशा, ग्लास धुऊन जागच्या जागी ठेवले. त्यानंतर त्यानं कपड्यांना इस्त्री केली.

इथं आल्या-आल्या गौरम्मांना पुरुष मुलानं-तेही अमेरिकेत राहणाऱ्या पुरुष मुलानं स्वयंपाकघरात भांडी घासणं, भाजी चिरणं, बायकोला मदत करणं पाहून मनस्ताप होत होता. एकदा असं झालं-

'हे काय रे चंद्रू! आपल्या घरी कुणा पुरुषानं असली कामं केल्याचं कधी पाहिलंयस काय?'

'अम्मा, तिथं कामाला माणसं मिळतात. तिथं तुम्ही पुरुषांचे जरा जास्तच लाड करता!'

जमुना चिडली. रागाच्या भरात तिनं बाळाचा हात ओढला. बाळ रडू लागलं. ती म्हणाली, 'भारतात असताना मला तरी काय येत होतं? मी नाही का इथं येऊन शिकले? घरातली सगळी कामं मीच करायची काय?'

जमुनाचा संताप पाहून गौरम्मा घाबरल्या.

तिच्या जागी विनिता असती तर? एक तर तिनं अशी दुरुत्तरं दिली नसती

आणि गौरम्मांनी ती ऐकून घेतली नसती!

तरीही त्या म्हणाल्या, 'काही का असेना जमुना! मी इथं असेपर्यंत त्यानं स्वयंपाकघरातलं काम करायला नको. त्याच्या वाटणीचं जे काही काम असेल ते मला सांग. मी करेन. घरच्या मुलानं काम करणं मला बघवत नाही.'

'तुम्ही असेपर्यंत तुम्ही कराल. त्यानंतर त्यांनीच करायला हवीत ना? शिवाय ते काही एकटेच जगावेगळं काही करत नाहीत!' जमुनेची भांडणाची खुमखुमी अजूनही होती.

गौरम्मा अपमान सहन न होऊन धुमसत म्हणाल्या, 'सासूला उलट उत्तरं देतेय! आमचा गिरीश स्वयंपाकघरात फिरकत सुद्धा नाही. त्याला पाणी हवं असलं तरी आम्हीच बाहेर देऊन येतो! विनिता संध्याकाळचं सगळं काम करते. बाहेर कितीही काम केलं तरी घरातली कामं बायकांनीच करायची असतात.'

अठ्ठावन्न वर्षांच्या, फारसं शिक्षण न घेतलेल्या, फारसं जग न पाहिलेल्या आईबरोबर उगाच भांडण कशाला, असा विचार करून चंद्रू मध्येच म्हणाला, 'जमुना, तुला उशीर होतोय! तू चल पाहू! अम्मा, भांडी विसळणं, भाजी चिरणं यातली काहीही कामं मी तू असेपर्यंत करणार नाही. पण इतर कामं मला करू दे.'

'असं का म्हणतोस?'

'ही अमेरिका आहे अम्मा! भारताप्रमाणे इथं कामाला माणसं मिळत नाहीत. मिळाले तरी त्यांना दर तासाला पाच डॉलर द्यावे लागतात! मला ते कसं परवडणार? शिवाय जमुना म्हणाली त्यात काय चूक आहे? हे घर माझंही आहे ना? माझ्या घरचं काम मी केलं तर काय चुकलं?'

डॉलर आणणाऱ्या मुलाबरोबर गौरम्मा वाद कसा घालणार?

हा मागचा प्रसंग आठवणीत असल्यामुळे त्यांनी मुलगा काम करत असला तरी तिकडे काणाडोळा केला. इस्त्री करायच्या कपड्यांच्या ढिगामध्ये बायकोची पोलकी, ब्लाऊज, स्कर्ट बघून त्यांना वैताग आला तरी त्या गप्प बसल्या.

आंब्याच्या पानांचं तोरण नाही, कडुलिंब आणि गुळाचा पदार्थ नाही, नव्या कोऱ्या वस्त्रांची सळसळ नाही, पोळ्यांचा खमंग वास नाही, पंचागाची पूजा नाही, जवसाची शेतं नाहीत- हा कसला गुढीपाडवा?

आईच्या मन:स्थितीचा अंदाज घेत चंद्रूनं कपड्यांना इस्त्री करत विचारलं, 'काय विशेष, अम्मा?'

'आज गुढीपाडवा!'

'होय? इथं आल्यापासून सगळे सण विसरले गेलेत बघ! जमुना, तुझा काय प्रोग्रॅम?'

बाळाला डायपर बांधत ती उत्तरली, 'आज काही नाही. या वीक-एंडला जयाच्या घरी युगादि साजरा केला जातो ना? त्याचीच चौकशी करेन.'

'असं कसं? आज गुरुवारी युगादि आहे. शनिवारी कसा युगादि येईल?'

'इथली हीच पद्धत आहे. फक्त युगादिच नव्हे, दिवाळी-दसरा-गणपती-संक्रांत सगळेच सण त्या त्या आठवड्याच्या वीक-एंडलाच साजरे करायचे.'

हे ऐकून गौरम्मा अवाक् झाल्या.

'सगळे सण अशाच प्रकारे वीक-एंडला जयाच्याच घरी करता का?'

'इथं प्रत्येकानं एकेक सण वाटून घेतला आहे. जयाकडे युगादि, उमाकडे गणेशचतुर्थी, सुधाकडे संक्रांत अशाप्रकारे प्रत्येकजण–' चंद्रूनं समजावून सांगितलं.

'होय? तर मग तुमचा सण कुठला?'

'अजून तरी कुठलाही सण केला नाही. आता तर सगळे सण बुक्ड आहेत.'

चंद्रू ऑफिसला निघून गेला.

घर 'व्हॅक्यूम' करण्यासाठी जमुना बेसमेंटमध्ये गेली.

गौरम्मा जमुनेच्या स्वभावाचं निरीक्षण करत होत्या. आपल्या कुवतीनुसार तिला जाणून घ्यायची त्यांची धडपड चालली होती.

बेंगळूरला आल्यावर हीच जमुना मनमोकळी आणि गपिष्ट वाटत होती. इथं मात्र ती घुम्यासारखी वाटत होती. चंद्रू तिचं सगळं ऐकत होता. बेंगळूरला आल्यावर पाण्याप्रमाणे खर्च करणारे चंद्रू आणि जमुना डॉलर खर्च करताना अत्यंत कंजूषपणे वागत होते. पाच डॉलर वाचवण्यासाठी वीस मैल ड्राइव्ह करून जात होते!

वीक-एंड सोडला तर यांना वेळच नव्हता. दोघं सतत कामात असत.

तसं बघायला गेलं तर त्यात काय चूक आहे? कामाच्या दिवशी सण साजरा करत वेळ काढणं कसं शक्य आहे? भारतात सणाची सगळ्यांनाच सुटी असल्यामुळे ते शक्य असतं. इथं तसा सगळ्यांचा सण म्हणजे ख्रिसमस. तेव्हा सगळ्यांनाच सुटी असते. आपलं घरदार, भावंडं, नातेवाईक, मित्रमंडळी, परिसर- सगळ्यांपासून दूर असणारी ही मंडळी सगळ्यांच्या सोयीच्या दिवशी सण साजरा करत असतील तर त्यात काय चुकलं?

वीक-एंडला सगळे 'युगादि'च्या सेलिब्रेशनसाठी उत्साहानं जयाच्या घरी जायला निघाले.

जमुनाही तयार झाली होती. मोठ्या काठाची रेशमी साडी, हिऱ्याची कानातली, हातात वेगवेगळ्या प्रकारच्या सोन्याच्या बांगड्या, गळ्यात नाना प्रकारची आभूषणे घालून एका मोठ्या चांदीच्या भांड्यात तिनं केशरी भात करून घेतला.

तिला या थाटात पाहताच गौरम्मा चकित झाल्या. लग्नघरातल्या नवऱ्या मुलीनं रिसेप्शनच्या वेळी नटावं, तेवढं, अंहं- त्यापेक्षाही जास्तच जमुना नटली होती.

अगदी काढायचंच म्हटलं तर, केसांतल्या भरगच्च गजऱ्याची तेवढी कमी होती!

मुलींनी चांगले कपडे घालावेत, दागिने घालावेत अशी गौरम्मांना नेहमीच हौस होती. तरीही जमुनेचं नटणं पाहून मात्र त्यांना 'हे थोडं जास्तच झालं!' असं वाटलं.

तरी त्या काही बोलल्या नाहीत. उगाच डॉलर-सुनेच्या उत्साहावर पाणी फिरायचं! हळूहळू गौरम्मा सावध होत होत्या.

चंद्रू मात्र हे नेहमीचंच असल्याप्रमाणे तिकडे फारसं लक्ष देत नव्हता.

जयाचं घर खूपच मोठं होतं. स्विमिंग पूल, टीव्ही रूम, स्टडीरूम, लायब्ररी- अशा आणखी अनेक व्यवस्था तिच्या घराला होत्या. या गावातील सर्व भारतीयांमध्ये जयाच सर्वांत श्रीमंत असल्याचं दिसत होतं. पण तिच्या वागण्या-बोलण्यात कसल्याही प्रकारचा गर्व दिसत नव्हता.

भल्या मोठ्या हॉलच्या मधोमध लाकडी पाटावर नंदादीप ठेवला होता. मोठ्या मापट्यामध्ये तांदूळ भरले होते. कडुलिंब-गूळ नसला तरी वातावरणात सणाचा उत्साह भरला होता. रंगीबेरंगी कागदांनी हॉल नटवला होता. जयाच्या दोन्ही मुली सुंदर जरीची परकर-पोलकी लेवून आणि सोन्याचे दागिने घालून राजकुमारींसारख्या दिसत होत्या. तिथं आलेले भारतीय वेगवेगळ्या भाषांमध्ये बोलत असले तरी मुलं मात्र परस्परांशी इंग्लिशमध्ये बोलत होती.

तिथं आलेल्यांपैकी बऱ्याच बायका जमुनासारख्या नटल्या होत्या. प्रचंड किंमती साड्या, हिऱ्याचे आणि सोन्याचे भारी दागिने, गळ्यात वेगवेगळ्या प्रकारचे हार! गरीब मास्तरांची पत्नी म्हणून आयुष्य काढलेल्या निरलंकार गौरम्मा- होय, हातातल्या दोन बांगड्याही त्यांनी याच सुनेला दिल्या ना!- भेदरून जाऊन सभोवताली पाहत होत्या.

त्यांच्या अल्प ज्ञानाप्रमाणे बेंगळूरमधलं 'प्रतिभा-नंदन ज्वेलरी'च दागिन्याचं सर्वांत मोठं दुकान होतं. पण इथं असलेल्या प्रत्येकीचे दागिने एकत्र केले तर तसली आठ-दहा दुकानं तयार होतील! त्यांच्या अंगावरच्या भारी साड्या एकत्र केल्या तर चिकपेटेतल्या कुठल्याही दुकानातल्या भारी साड्यांपेक्षा जास्त किंमतीच्या भरतील! काय हे वैभव! गौरम्मा अवाक् होऊन सारं ऐश्वर्य पाहत होत्या. स्टेपकट, थोडी लालसर छटा, छोटंसं कुंकू, अंगावर भारी साडी नेसलेली एक युवती गौरम्मांकडे येऊन म्हणाली, 'तुम्ही मला ओळखलंत का?'

गौरम्मांनी निरखून पाहिलं. कुठंतरी-कधीतरी पाहिल्याचं अस्पष्ट आठवत होतं.

'नाव आठवत नाही. पण कुठंतरी पाहिलंय खरं!'

तीही मंद हसत म्हणाली, 'मी तुमच्या यजमानांची विद्यार्थिनी. चित्रा माझं नाव. लहान असताना मी तुमच्या घरी खूप वेळा यायची. फार पूर्वी!'

विस्मरणाचा खडक बाजूला सरला. 'अरेच्चा! तू चित्रा!' त्या म्हणाल्या. पण

मनात आश्चर्य उमटलं. ही त्या वेळी कशी होती! सडसडीत बांबूच्या बाहुलीसारखी! आता कशी दिसतेय! रसरशीत टोमॅटोसारखी!

त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव वाचत ती आणखी म्हणाली, 'मी शंकरण्णांची मुलगी चित्रा! आता खूपच वेगळी दिसतेय ना? तुम्ही मला खूपच दिवसांनी पाहताय!'

गौरम्मांच्या मनाचा आणखी गोंधळ उडाला.

शंकरण्णांची मुलगी चित्रा आणि इथं? हिच्या लग्नाला शामण्णा मास्तर गेले होते. नंतर ती विधवा झाल्याची बातमीही ऐकल्याचं गौरम्मांना आठवत होतं!

चित्रानंच पुढं विचारलं, 'अम्मा, सर चांगले आहेत? ते का आले नाहीत?'

'पुन्हा कधीतरी येतील ते.'

चित्रानं विचारलं, 'अम्मा उद्या रविवारी सकाळी आमच्या घरी याल काय?'

'तूच मला घेऊन जायला पाहिजेस!' गौरम्मा उत्साहानं म्हणाल्या. आपली भाषा बोलणाऱ्यांच्या घरी जायचा उत्साह तर होताच, त्याचबरोबर ही चित्रा इथं कशी आली हे जाणून घेण्याची उत्सुकताही प्रबल होती.

'मी येईन तुम्हांला घेऊन जायला! तुमच्या सुनेकडून तुमचा पत्ता घेते–'

चित्रा टेबलावर ठेवलेलं हळद-कुंकू, ओटीचं पाकीट, लालहिरवी सफरचंद, खाऊची पिशवी घेऊन निघून गेली.

जयानं सगळ्यांसाठी जिलेबी, बेसन लाडू, खारी बुंदी या पदार्थांची पाकिटं तयार करून ठेवली होती. शिवाय घरी आलेल्यांना बिशीबेळे अन्न, दहीभात, सॅलड वगैरे खायलाही ठेवलं होतं.

सगळे निघाले. जयानं प्रत्येकाचा निरोप घेतला. तेव्हा न राहवून गौरम्मा म्हणाल्या, 'तुम्ही एकटीनं एवढा सगळा स्वयंपाक केला? सुमारे दोनशे माणसं तरी जमली असतील! मला बोलावलं असतं तर आले असते मदतीला!'

गौरम्मांचं ते मनापासून बोलणं ऐकून जयाला आनंद झाला.

'आंटी, मी शिकॅगो स्वीट होमला ऑर्डर दिली होती. मला एकटीला एवढं सगळं जमणं कसं शक्य आहे?'

'तसं नव्हे. आजचा स्वयंपाकही मोठं काम होतं.'

'होय, देवळातल्या पुजाऱ्यांच्या पत्नीला सांगितलं होतं. त्या आल्या होत्या. त्यांनीच सारं करून ठेवलं होतं. आंटी, तुम्ही आणखी एखाद्या दिवशी या! आज सगळ्या गोंधळात नीट गप्पाच झाल्या नाहीत!' जयाच्या बोलण्यातून भरपूर प्रेम व्यक्त होत होतं.

गाडीतून घरी परतताना बाळ झोपलं होतं.

गौरम्मांनी विचारलं, 'चंद्रू, जया दरवर्षी एवढा खर्च करून युगादि सण साजरा

करते?'

'होय. मी आल्यापासून पाहतोय. त्याच करतात.'

'त्यांच्याकडे भरपूर पैसा आहे! कितीही खर्च केला तरी संपणार नाही एवढा पैसा! मोठेपणा दाखवायला म्हणून त्या मुद्दाम पुढाकार घेतात!'

जमुना असूयेनं म्हणाली.

'तसं नव्हे जमुना! या देशात पैसा कमी आहे असा कोण आहे? तरीही आपापल्या माणसांसाठी तिनं केलं ना? मग 'होय तिनं केलं' एवढं तरी आपण म्हटलं पाहिजे.' गौरम्मा सौम्यपणे म्हणाल्या.

हेच विनितेनं म्हटलं असतं तर त्यांनी रागावून हेच सांगितलं असतं की नाही! हा भेद का?

'चंद्रू, उद्या शंकरण्णांची मुलगी चित्रा मला घेऊन जाणार आहे आपल्या घरी!'

'अम्मा, तुझी कशी तिच्याशी ओळख?'

'तुला आठवत नाही? आपल्या शाळेत शंकरण्णा शिपाई म्हणून काम करायचा. त्याची मुलगी चित्रा. तिला तिच्या मामाला दिली होती.'

'कुणाविषयी बोलताय? चित्रा जोसेफविषयी?' मध्येच जमुनानं विचारलं.

'नाही. शंकरण्णांच्या मुलीविषयी.'

'मला ते काही ठाऊक नाही. पण आज तू जिच्याशी बोलत होतीस, ती चित्रा जोसेफ होती एवढं मला ठाऊक आहे.' चंद्रू म्हणाला.

जमुनाही म्हणाली, 'होय. मलाही पक्कं ठाऊक आहे. आधी ते लॉसएंजिल्सला होते. आता इथं आले आहेत. जया सगळ्या इंडियन्सना बोलावत असते.'

आता गौरम्मा गडबडल्या. एखाद्या रहस्यमय कादंबरीसारखी वाटत होती ही चित्राची कथा!

'अम्मा, तू आपण होऊन चित्राला तिच्या खाजगी आयुष्याविषयी विचारू नकोस. काय आहे कोण जाणे! उगाच दुखावल्या जातील!' चंद्रूनं आईचा स्वभाव ठाऊक असल्यामुळे बजावलं.

दुसरे दिवशी चित्रा आली. आजचा तिचा वेश आणखी वेगळाच होता. जीन्स पँट आणि टी शर्ट अशा वेशात ती होती. कपाळावर कुंकू आणि गळ्यात मंगळसूत्र होतं.

'तुमच्या अम्मांना घेऊन जाणं आणि पुन्हा आणून सोडणं ही माझी जबाबदारी' एवढंच जमुनाला सांगून त्यांनी गाडीचं दार उघडलं. गौरम्मा विस्मित होऊन तिच्या पाठोपाठ निघाल्या.

हजार प्रश्न जिभेच्या टोकावर आले होते. तरी गौरम्मांनी स्वत:ला मोठ्या कष्टानं आवरलं होतं.

उलट चित्राच लाह्या फुटाव्यात तशी पटपट बोलत होती. बोलायला ती आसुसलेली दिसत होती.

'अम्मा, तुम्हांला बघितलं आणि माझीच आई आल्यासारखं मला वाटलं. कितीतरी वर्षं झाली होती तुम्हांला भेटून!'

'पण तू केव्हा आलीस इथं?'

गाडी इंडियन स्टोअरपाशी उभी करत चित्रा म्हणाली, 'सहा वर्षं झाली. या गावातलं इंडियन स्टोअर काही फारसं मोठं नाही. पण बरंच्च सामान इथं मिळतंय.'

सामोसे-लाडवासारखे खाद्यपदार्थ, उत्तर भारतातल्या पद्धतीनं बनवलेल्या अनेक भाज्या, पालक पनीर, चना यांसारख्या भाज्या तयार करून फ्रीजमध्ये ठेवल्या होत्या. तिथं कन्नड-तेलुगू-तामिळ असा फरकही नव्हता.

'अम्मा, तुम्हांला जेवायला काय हवं ते सांगा. आपण घेऊन जाऊ या.'

'मला काल रात्रीचंच जेवण जास्त झालंय. तशी सवय नाही ना! फळं आणि दूध एवढंच पुरे मला.'

चित्रानं आंबा आणि फणसाचे टिन घेतले आणि त्या पुन्हा पुढं निघाल्या.

'चित्रा, सिनेमाची कॅसेट घेतलीस काय? कुठला सिनेमा?'

'अम्मा, आपल्याला सिनेमाच्या कॅसेटची गरज नाही. माझं आयुष्यच एक सिनेमाची कथा आहे. तुम्हांला ठाऊक असेल ना?'

'नाही.'

चित्रा मनमोकळेपणानं बोलू लागली.

'मी पी. यु. सी. ला चांगले गुण मिळवून पास झाले. अप्पा सतत आजारीच असायचे. दम्याचा त्रास होता. घरची गरिबी. त्यात मीच थोरली मुलगी. कॉलेजला कोण पाठवणार? लवकर लग्न करून सगळ्यांनाच जबाबदारीतून मोकळं व्हायचं होतं.'

'होय. मेलकोटेमध्ये झालं ना तुझं लग्न? हे, शाळेतले इतर मास्तर, मॅडम मेलकोटेला तुझ्या लग्नासाठी गेल्याचं आठवतं मला.'

'होय. तुमची स्मरणशक्ती फारच चांगली आहे. माझ्या मामाशीच- मानप्पा त्याचं नाव- माझं लग्न लावून देण्यात आलं. तेव्हा मी होते सतरा वर्षांची.'

'अगदीच अजाण वय ते!'

'मानप्पा माझ्यापेक्षा दहा वर्षांनी मोठे होते. त्याला दारूचं व्यसन होतं. शिवाय जुगारही खेळायचा. हे सगळ्यांना ठाऊक होतं हं! तरी घरात कुणीही या लग्नाला विरोध केला नाही! उलट सगळे म्हणत राहिले- मीच फार नशीबवान. हुंडा, खर्च न करता नवरा मिळाला!'

मागच्या आठवणींमुळे चित्राच्या डोळ्यांमध्ये पाणी साचलं होतं. त्या वेळच्या

मानसिक वेदनेनं आताही तिचं मन पिळवटून गेलं होतं.

मानप्पाला शिक्षणाचा गंधही नव्हता. बेंगळूरमधली तरतरीत आणि हुशार मुलगी त्याच्याकडे कशी नांदली कुणास ठाऊक! अखेर दारूच्या नशेत सायकल चालवताना ट्रकवर आदळून तो मृत्यू पावला.

चित्रा पुढं सांगत होती, 'मानप्पा वारला तेव्हा मी अठरा वर्षांची होते. लग्न झाल्या झाल्या वर्षभरातच कुंकू पुसलं गेलं. नतद्रष्ट नक्षत्रावर जन्मलेली अपशकुनी मुलगी म्हणून सगळ्यांनी दोष दिला. माझी सासू माझी आजीच होती ना! पण तिनं सासू होऊनच मला भरपूर छळलं.'

'होय. त्या वेळी यांनीच तुझ्या वडिलांना सांगून तुला बेंगळूरला घेऊन यायला सांगितलं ना!'

'खरंय अम्मा! त्या वेळी सरांनी जे उपकार केले, ते मी आयुष्यात विसरणार नाही. नाहीतर आजही मी मेलकोटेमध्ये उष्टी-खरकटी भांडी घासत राहिले असते!'

'तू बेंगळूरमध्ये असताना टायपिंग क्लासला जात होतीस ना?'

'तीही तुमचीच दया! तुम्हाला ते आठवतंय की नाही कोण जाणे! मला मात्र आठवतंय. सर दरमहा पंधरा-वीस रुपये द्यायचे. त्यामुळे मी टायपिंग शिकले.'

हे मात्र गौरम्मांना ठाऊक नव्हतं. शामण्णांनी हे घरी सांगितलं नव्हतं. पण हे शामण्णांच्या स्वभावानुसारच होतं. चार पैसे देऊन त्यांनी शंकरप्पाला 'तिला काहीतरी शिकव-तिला स्वत:च्या पायावर उभी राहू दे' असं बजावलं असलं पाहिजे.

'तुमच्या सगळ्यांच्या पाठबळामुळे मी आज इथं आहे. टायपिंग संपल्यावर मला तिथं लहान नोकरी मिळाली. चारशे रुपये पगार होता. पण काम भरपूर असायचं. याच वेळी वडिलांची नोकरी संपली. आम्ही गावाच्या दुसऱ्या टोकाला राहायला गेलो. त्यामुळे तुमच्याशी भेटी होण्याचं प्रमाणही कमी झालं.'

'होय. पुढं तुझ्याविषयी काहीच समजलं नाही.'

गाडी काही वेळ मूकपणे धावत राहिली. रस्ता यांत्रिकपणे मागे पडत होता. खिडकीबाहेरचं जग बघायची गौरम्मांची हौस राहिली नव्हती. त्यांच्या मनात चित्राच्या जीवनाविषयीचे विचार तरळत होते.

गरिबीमुळे गांजलेली चित्रा, विधवा चित्रा, टायपिस्ट चित्रा- आत्ता समोर असलेल्या चित्राचं स्वरूपच वेगळं होतं!

'कंपनीमध्ये काम करत असताना गोविंद भेटला. तोही आमच्याच जातीचा. काम करता करता ओळख झाली. तो आमच्या घरीही यायचा. एक दिवस त्यानं मला लग्नाचंही विचारलं. सगळ्यांना आनंद झाला. खोटं कशाला सांगू? मलाही आनंद झाला.'

'तो कुठल्या गावाचा?'

'चित्रदुर्गकडच्या एका खेड्यातला. त्या वेळेपर्यंत माझाही पगार आठशे रुपये झाला होता. माझ्या पाठीवर एक भाऊ आणि दोन बहिणींची जबाबदारी होती. घरची जबाबदारी होती- पण लग्नाची आशाही होती ना! त्याला सांगितलं- लग्नानंतर निम्मा पगार भावंडांना आणि निम्मा तुला देईन.'

बिचारी! काय हिचं जीवन! गौरम्मा कळवळल्या. भावंडांची जबाबदारी, त्यात वैधव्याचा साज! ह्यालाच जीवन म्हणायचं काय?

'मी गोविंदालाच लग्नाची तारीख ठरविण्याविषयी विचारलं. त्याच वेळी माझ्या आधीच्या लग्नाविषयी आणि पाठोपाठ आलेल्या वैधव्याविषयी सांगितलं. नवरा-बायकोच्या नात्यात काहीही गुपित राहू नये ना!'

'होय. अगदी बरोबर आहे तुझं!'

'पण त्याचा परिणाम काय झाला ठाऊक आहे? दुसऱ्या दिवसापासून गोविंदानं माझ्याशी बोलणंच सोडून दिलं.'

'का?'

'त्यानं माझ्यावर आरोप केला- तू मला फसवलंस म्हणून. नंतर त्यानं सुनावलं- मी कशाला विधवेशी लग्न करू? माझ्यासाठी मुलींची लाईन लागली आहे! खूप वाईट शब्दांत त्यानं माझा पाणउतारा केला.'

'मग तू काय केलंस?'

'काय करणार? खूप मनस्ताप झाला. पण नोकरी सोडता येत नव्हती. दररोज गोविंद समोर दिसायचा. पण त्यानं बोलणं टाकलं होतं. जीव द्यावा असंही वाटलं. मी विधवा म्हटल्यावर गोविंदाचं माझ्यावरचं प्रेम क्षणार्धात आटलं! त्याचं माझ्यावर प्रेमच नव्हतं, म्हणायचं काय? यानंतर माझं जीवन असंच राहील काय? सारं आयुष्य निष्प्रेम अवस्थेत काढायचं काय?'

'अगदी चक्रव्यूहात सापडल्यासारखी तुझी अवस्था झाली म्हणायची!'

'एक दिवस तर मी इतकी वैतागले होते की, मरून जावंसं वाटलं होतं. त्या वेळी सौम्याचं पत्र आलं.'

'कोण ही सौम्या?'

'मी जिथं काम करत होते, त्या कंपनीच्या मालकाची मुलगी सौम्या. ती आणि तिचा नवरा केशव अमेरिकेत डॉक्टर असल्याचं मलाही ठाऊक होतं. लॉसएंजिल्समध्ये ते राहतात. सौम्याला जुळी मुलं झाली होती. घरचं आणि हॉस्पिटलचं बघणं तिला कठीण जात होतं. शिवाय लग्नानंतर दहा वर्षांनी झालेली जुळी मुलं सांभाळण्याची जबाबदारी होती. दोन्ही मुलीच आहेत. माया आणि ममता. एखादी इंग्लिश येणारी चुणचुणीत मुलगी मदतीसाठी पाठवा म्हणून तिनं वडिलांना लिहिलं होतं.'

'असं! अशी तू इथं आलीस!'

'होय. नशीब कसं कुठं घेऊन येतं ते सांगता येत नाही. त्या वेळी मला तर जीवच नकोसा झाला होता. बेंगळूर सोडून कुठंतरी पळून जावंसं वाटत होतं. मी लगोलग इथं यायला तयारी दर्शवली. आमच्या कंपनीच्या मालकांनी लगोलग व्हिसा-पासपोर्टचं काम केलं आणि मला पाठवायची व्यवस्था केली. माझा तिथला संपूर्ण महिन्याचा पगार त्यांनी माझ्या वडिलांना द्यायची तयारी दाखवली.'

'एका दृष्टीनं हे बरंच झालं ना!'

'होय. सगळ्या दृष्टींनीच चांगलं झालं. आधी खूप घाबरले होते मी! रेल्वेतही त्याआधी मी बसले नव्हते. विमानप्रवास- अमेरिका वगैरे का मान्य केलं मी? असंही वाटलं. मात्र मी देवाची शपथ घेऊन सांगते, सौम्या आणि केशवनं मला कधीही घरच्या नोकरासारखं वागवलं नाही. नात्यातल्या माणसाबरोबर वागावं तसंच ते वागायचे. त्यांनी मला खूप जीव लावला. त्या मुलींचा मलाही लळा लागला. पोटच्या मुलांसारखं मी त्यांना सांभाळलं. काहीही राखून न ठेवता त्यांच्यावर माया केली. नाही तरी दुसरं काही करण्यासारखं नव्हतंच म्हणा! सारं जीवन अंधारानं भरलेलं असताना त्यांच्या रूपानं देवानं मला प्रकाश दाखवला होता ना! कुठल्या जन्मीचं ऋण होतं कोण जाणे!'

आता तिच्या डोळ्यांमध्ये दु:खाऐवजी कृतज्ञतेचे अश्रू होते. त्यात कुठल्याही भाषा-जाति-पंथाचा स्पर्श नव्हता. परमपवित्र अशा माणसा-माणसातल्या संबंधाची आर्द्रता त्यात होती.

बोलता-बोलता घरचा रस्ता चुकला होता. ते लक्षात येताच चित्रा म्हणाली, 'बघितलंत अम्मा? दररोज या रस्त्यानं मी ऑफिसला जाते. त्यामुळे मी विसरून या रस्त्याला आले.'

'तू नोकरी करतेस?'

'होय. सौम्याच्या घरी असताना मी पुढं शिकू लागले. इथं संध्याकाळच्या वेळी अनेक छोटे-मोठे कोर्सेस असतात. केशव आणि सौम्यानं मला आग्रहानं शिकायला लावलं. ड्रायव्हिंगही शिकवलं. मीच घरी लागणाऱ्या सामानाची खरेदी करत होते. स्वयंपाक करत होते. मुलांनाही सांभाळत होते. संध्याकाळी क्लासलाही जात होते.'

'आता कुठं काम करतेस?'

'बँकेत. संध्याकाळच्या क्लासमध्येच मला जोसेफ भेटला.'

'जोसेफ?'

'होय. अमेरिकन तरुण. माझ्याच वयाचा आहे. त्याची आई नर्स आहे. जोसेफही दिवसा काम करून रात्री क्लासला येत होता. आधी मी त्याच्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. पण त्याच्या आईमुळे आम्हां दोघांचीही ओळख झाली. नर्स

असल्यामुळे सौम्या-केशवशी त्याच्या आईची ओळख झाली होती. लवकरच ओळखीचं रूपांतर स्नेह आणि प्रेमात झालं.'

चित्राच्या चेहऱ्यावर आपली प्रेमकथा सांगताना नववधूचे भाव फुलले होते.

'जोसेफलाही मी आधीच्या माझ्या पूर्वायुष्याविषयी आणि माझ्या वैधव्याविषयी सांगितलं. मागचा बेंगळूरमधला अनुभव होताच ना! यावर तो काय म्हणाला ठाऊक आहे?' तिच्या चेहऱ्यावर हसू होतं.

'काय?'

'म्हणाला- यानंतर पुन्हा होऊ नकोस म्हणजे झालं!' नाही म्हटलं तरी गौरम्मांना हसू आलं. ते आवरत त्यांनी विचारलं, 'यावर सौम्या काय म्हणाली?'

'ती म्हणाली- जोसेफ फार चांगला मुलगा आहे. जाति-धर्म-देश याचा विचार न करता, खरोखरच तुम्हां दोघांमध्ये अंडरस्टँडिंग असेल तर अवश्य लग्न करा. आमच्या घरच्या कामामध्ये तू तुझं जीवन पूर्णपणे गाडून टाकू नकोस. तू गेल्यामुळे आम्हांला अडचण होईल यात शंका नाही. पण मुली मोठ्या होतील. तुझं भविष्यही तितकंच महत्त्वाचं आहे ना!'

'केवढं मोठं मन तिचं!'

'होय. त्या दोघांनी संमती देताच आम्ही लग्न केलं. माझी सासू आमच्याबरोबर राहात नाही. वेगळी राहते. दर शनिवारी-रविवारी आम्ही तिच्याकडे जातो किंवा ती आमच्याकडे येते. मला कुठल्याही प्रकारे तिचा त्रास नाही.'

'तुझा धर्म?' तिचं नाव ऐकल्यापासून मनात सलणारा प्रश्न अखेर गौरम्मांनी विचारलाच.

'जोसेफनं सांगितलं- तू ज्या धर्मात जन्मलीस आणि आत्तापर्यंत ज्या धर्माचं आचरण करतेस त्या धर्मावर तुझी श्रद्धा असेल तर तू त्याच धर्माची राहा. माझ्या धर्माचं मी पालन करतो. माझ्या कुठल्याही प्रकारच्या धर्माचरणामध्ये त्यांची आडकाठी नसते. मीही त्याच्या धर्माचरणात आडवी येत नाही. मी देवळात जाते, मंगळसूत्र घालते-'

'अगं, मानवधर्म सगळ्या धर्मांपेक्षा श्रेष्ठ आहे- तुम्ही दोघंही तो मानता ना!' गौरम्मांना काय बोलावं ते न कळल्यामुळे त्या म्हणाल्या. पाठोपाठ त्यांनाही वाटलं, हेच खरंय ना!

चित्रानं गाडी पुन्हा योग्य मार्गावर आणली.

दोघी घरी आल्या तेव्हा गोरा जोसेफ बायकोची वाट पाहत होता.

'उशीर झाला चित्रा!' त्याचा प्रश्न गौरम्मांना समजला नाही.

चित्रानं गौरम्मांविषयी त्याला आधीच सांगून ठेवलं असावं. त्यानं त्यांचा हात हातात घेऊन शेकहँड केला. गौरम्मा संकोचून गेल्या.

गौरम्मांनी भरल्या मनानं चित्राच्या घरी फळं आणि दुधाचा स्वीकार केला. त्यांच्यासमोरच वाढलेल्या, विधवा होऊन पुन्हा संसार करत असलेल्या चित्राच्या सुखी जीवनाकडे पाहताना त्यांचं मन भरून आलं होतं.

चित्राचं घर छोटं होतं. तिच्या नवऱ्याचीही बँकेत नोकरी होती. आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असली तरी घरभर आनंद आणि समाधान भरून असल्याचं जाणवत होतं. दोघंही एकमेकाची काळजी करत असल्याचं लक्षात येत होतं.

एका कोपऱ्यात मले-महादेवाचं चित्र होतं. त्याला चंदनाचा हार घातला होता. शेजारीच मेरीची मूर्ती होती. समोर मेणबत्ती ठेवली होती.

चित्रा आणि जोसेफ जेवले. दिवसभर भरपूर गप्पा झाल्या. संध्याकाळी घरी जायची वेळ झाली.

गौरम्मांनी विचारलं, 'चित्रा, शंकरण्णा येऊन गेला काय?'

'सुरुवातीला मी इथंच लग्न करून राहणार म्हटल्यावर रागावून पत्र लिहायचं सोडून दिलं होतं. आता राग ओसरलाय त्यांचाही. मी दर महिन्याला दोनशे डॉलर्स पाठवते. म्हणजे सुमारे आठ हजार रुपये. दोन्ही बहिणींची लग्नं झाली. धाकट्या भावाला शिक्षणात रस वाटला नाही. मलाही भारतात जाऊन यायला जमलं नाही. पैसे हवेत ना तेवढे! तरीही मी इथं सुखात आहे, त्यामुळे अप्पा-अम्माही सुखात आहेत.'

गौरम्मा ऐकत होत्या. डॉलरमध्ये पैसे मिळवूनही यांना चणचण आहे म्हणायची!

'पैसे साठवून पुढच्या वर्षी अप्पा-अम्मांना इथं बोलवणार आहे. त्यातही अम्मा येईल की नाही कोण जाणे!'

चित्रा इथं आली, तिचं आणि तिच्या घरच्यांचं आयुष्य चांगलं झालं. हीच चित्रा भारतात राहिली असती तर काय झालं असतं? केवळ विधवा आहे म्हटल्यावर गोविंदानं तिला सोडून दिलं ना! अगदी लग्नाचा नवरा जगला असता तरी हिचं त्यानं छळून-छळून भुस्कट पाडलं असतं. हा परदेशीचा फिरंगी, गोरा नवरा, परक्या देशातला हा अमेरिकन नवराच तिचा खराखुरा जीवन-सांगाती झाला! खरा मानव झाला.

निघायची वेळ झाली. चित्रा गप्पच होती. रीतीप्रमाणे तिनं गौरम्मांपुढे हळदी-कुंकवाचं तबक धरायला हवं होतं. पण गौरम्मांसारख्या रूढीप्रिय कर्मठ स्त्रीला एकदा विधवा होऊन पुन्हा सवाष्ण झालेल्या चित्रानं हळदी-कुंकू देणं खपेल काय हा एक प्रश्नच होता.

गौरम्मा आपण होऊन म्हणाल्या, 'निघते. कुंकवाचं घे-'

तिनं कुंकवाचं तबक त्यांच्यापुढे धरताच त्यांनी स्वत: हळद-कुंकू लावून घेतलं आणि नंतर तिलाही लावलं. नंतर तिच्या मस्तकावर अक्षता टाकत मनापासून

आशीर्वाद दिला, 'दीर्घ सुमंगली भव!'

अक्षतांच्या ओझ्यानं वाकलेली चित्रा त्यांच्या पायावर वाकली. तिला हुंदका फुटला. डोळ्यांमधले अश्रू त्यांच्या पायांवर सांडले.

ते आनंदाश्रू होते.

चित्राचं पाहून जोसेफनंही गौरम्मांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला.

गौरम्मांनीही तोंड भरून- अर्थात कन्नडमध्ये- आशीर्वाद दिला, 'असेच अमेरिकेत शंभर वर्षं सुखानं राजा-राणीसारखे राहा!'

निघताना गौरम्मांच्या हातात चित्रानं एक छोटी पेटी ठेवली.

'हे काय गं?'

'अम्मा, ही दागिन्यांची पेटी आहे. ती दागिन्यांनी भरून देण्याइतकं ऐश्वर्य माझ्याकडे नाही. तुमची मुलं ती भरून देतील. तुम्ही त्या वेळी मदत केली म्हणून मी टायपिंग शिकले. त्याचाच पुढं कॉम्प्युटर शिकताना उपयोग झाला. त्यामुळेच मला इथं बँकेत नोकरी मिळाली. तुम्हीच मला अन्नाची वाट दाखवली.'

गौरम्मांना शामण्णांची आठवण येत होती. शाळामास्तर म्हणून नोकरी करताना त्यांना पैसे साठवायला कदाचित जमलं नसेल, पण प्रेम आणि मायेनं त्यांनी अनेकांना मार्गदर्शन केलं ना! नाहीतरी चित्रा मेलकोटमध्येच खितपत पडली असती.

चंद्रू आपल्या कामात यशस्वी होता. पण तो आधीचा चंद्रू राहिला नव्हता. एखादा किडा आतून लाकडाला पोखरत राहावा तसं काहीतरी, व्यक्त करता न येण्यासारखं त्याला आतल्या आत टोकरत होतं.

त्याच्या काही प्रौढ मित्रांची मुलं आता वयात आली होती. अशा मुलांचे आई-वडील घाबरे झाले होते. काही वेळा तर चंद्रूलाही गावी निघून जावं असं वाटत होतं. पण जमुना त्यासाठी मुळीच तयार नव्हती.

तिच्या मनात भारताविषयी तिरस्कार होता.

इथलं स्वातंत्र्य आणि इथं मिळणाऱ्या सुखसोयी यावर ती भाळून गेली होती. त्यामुळे चंद्रू तिच्याशी या विषयावर कितीही पोटतिडकीनं बोलला तरी ती 'इतरांचं जे होईल, तेच आपलंही होईल' असं म्हणून तो विषयच झटकून टाकायची.

चंद्रूच्या मित्राची- वेंकटूची मुलगी तेरा वर्षांची झाली होती. वेंकट तिच्या बाबतीत अतिशय चिंतातुर झाला होता. तिला कुणाचे फोन येतात, तिचे मित्र-मैत्रिणी कोण आहेत, तिला घरी यायला उशीर का झाला वगैरे प्रश्न त्याला सतत सतावत होते. स्वत:बरोबरच त्यानं आपल्या पत्नीची- शांतीची मन:शांतीही नष्ट केली होती. चंद्रूपुढे हे सारं सांगून शांती अश्रू ढाळायची.

चंद्रूनं एकदा वेंकटशी या विषयावर बोलायचा प्रयत्न केला त्या वेळी वेंकटनं

सुनावलं, 'चंद्रू, उद्या तुझी मुलगीही मोठी होऊन अमेरिकन मुलींसारखी डेटिंग करू लागली तर तू काय करशील? तुला भीती वाटत नाही? आपण सगळे मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो आहोत.'

हे जमुनाला सांगितलं तर जमुना म्हणायची, 'त्या वेळी बघू या. दोन रट्टे द्यायचे तेव्हा!'

पण चंद्रूला हे पटत नव्हतं.

'असं कसं जमुना? लहानपणापासून आपण मुलांना इतर अमेरिकन मुलांप्रमाणेच उत्तम कपडेलत्ते देऊन वाढवतो, त्यांच्या बरोबरीनं शाळेत पाठवतो. आपण त्याचा अभिमानही बाळगतो. पण मुलं वयात येऊन अमेरिकन मुलांसारखी वागू लागली की, मग मात्र आपण घाबरतो. त्यांना विरोध करायला लागतो. मुलांना हा विरोधाभास कसा लक्षात येईल?'

'तुम्ही मुलीला डेटसाठी जा म्हणून सांगाल?'

'नाही. मी परिस्थितीचं विश्लेषण करून सांगेन. काही वेळा अमेरिकन दृष्टीनं आणि काही वेळा भारतीय दृष्टिकोनातून मुलांकडे बघणं चुकीचं आहे. याच मानसिक ओढाताणीमुळे वेंकट असा वागतोय.'

जमुना कामावर हजर व्हायचा दिवस आला. तिनं सासूला दुधाची बाटलीची स्वच्छता आणि दुधाच्या-रसाच्या वेळांविषयी सांगितलं.

'अगं, तान्ह्या बाळाला आईचं दूध पाहिजे!' न राहवून गौरम्मांनी सांगितलं.

जमुना म्हणाली, 'माझंच दूध काढून मी फ्रीजमध्ये ठेवून जाते. तुम्ही तेच थोडं गरम करून तिला पाजा.'

गौरम्मांना ही पद्धत ठाऊक नव्हती.

'तू दुपारी येऊन पाजून जात जा ना! विनिता रोज रिक्षानं घरी येऊन जायची.'

जमुना लगेच तुच्छतेनं म्हणाली, 'विनितेची गोष्ट वेगळी! ही अमेरिका आहे!'

गौरम्मांना कळेना, देश कुठलाही झाला तरी आईचं दूध ते आईचंच ना! इथं अमेरिकेचा प्रश्न कुठं आला?

चंद्रू आणि जमुना कामावर निघून गेले.

सारं वातावरण नि:शब्द होऊन गेलं. स्वभावत: थोडं बोलणाऱ्या गौरम्मांना भीती वाटण्यासारखी ती नीरवता होती.

लहानगी मानसी सतत झोपलेली असायची. घरात आणखी काही कामही नव्हतं.

रस्त्यावरूनही कसले आवाज येत नव्हते. भाजीवाले किंवा फेरीवाल्यांचे आवाजही नव्हते. काळच थांबलाय की काय असं वाटण्यासारखी नि:शब्दता.

बेंगळूरमधल्या घरीही काही वेळा त्यांना घरात एकटं राहावं लागे. त्या एकांतात

आणि इथल्या एकांतात जमीन-अस्मानाचा फरक होता. त्यांना इथल्या नि:शब्द वातावरणाची भीती वाटू लागली. बेंगळूरमधल्या एकांताची मात्र त्यांनाही अधून-मधून ओढ लागत असे. इथल्या शांततेत मात्र सतत कुणीतरी बोलून खंड पाडावा असं वाटत राहतं.

सुरुवातीला तिथल्या सुपर स्टोअर मार्केटस्चं जे कौतुक वाटत होतं ते राहिलं नव्हतं. टी. व्ही. ची अपूर्वाई राहिली नव्हती. सारखं सारखं टी. व्ही.त तरी काय बघायचं, असं त्यांना वाटू लागलं.

बेंगळूरला असताना विनिता कामावरून घरी आली की, त्या राममंदिराला निघून जात. तिथं त्यांच्या वयाच्या आणखीही काही बायका जमत होत्या. सगळ्याजणी आपापल्या सुनांच्या चहाड्या एकमेकींना सांगत, स्वत: सून असताना कशा आज्ञाधारक होतो, आपल्या दुर्दैवानं असली सून आपल्या नशिबी आली वगैरे सांगून मन हलकं करत होत्या. देवळातलं हे 'पुराण' संपवून घरी येईपर्यंत विनिता गरम-गरम स्वयंपाक करून अंथरूणं घालून ठेवायची.

इथं मात्र तसं नव्हतं. जमुना आणि चंद्रू दोघंही संध्याकाळी दमून यायचे. विनिता? तीही दमून यायची काय? गौरम्मांना आठवेच ना!

फारसं न बोलता मायक्रोवेव्हमध्ये गरम केलेलं अन्न वाढून घेऊन जेवलं की तो दिवस संपायचाच. बाहेर कुठं जायचं असेल तर आतुरतेनं रविवारची वाट पाहायची.

शनिवारी-रविवारी अधूनमधून चंद्रू त्यांना कुणीतरी भारतीयांच्या घरी घेऊन जात होता. बहुतेक वेळा घरातच आठवडाभराची कामं असल्यामुळे जमुना यायची नाही. कन्नड माणसांच्या घरी गेलं तर गौरम्मांना काहीतरी बोलायची, तेही कन्नडमध्ये, संधी मिळायची. गौरम्मांना आणखी कुठल्या भाषेत बोलता येत नव्हतं.

काही रविवारी चंद्रूलाही घरासमोरचं गवत कापण्याचं काम असे. गाडी दुरुस्तीची कामंही असत. अशा प्रकारे तोही सतत काही ना काही कामांत गुंतलेला असे. त्यातही तो गौरम्मांसाठी वेळ काढत असे. काही वेळेला तेही गौरम्मांना नकोसं वाटे.

इथं घरी कुणीतरी आलं तर किती छान होईल! पण एवढ्या लांबच्या खेड्यात कोण येणार? बेंगळूरला मात्र सतत कुणी ना कुणी येत-जात. शामण्णांचे विद्यार्थी, नातेवाईक, गिरीश तर सतत कुठल्या ना कुठल्या कार्यात गुंतलेला असल्यामुळेही ती माणसंही वरचेवर येत.

गौरम्मांचा स्वभाव तसा बडबडा म्हणता येणार नाही. पण त्यांना माणसांची खूप सवय होती. वेळी-अवेळी कितीही माणसं आली तरी न कंटाळता त्या स्वयंपाक करून त्यांना जेवायला वाढायच्या. एखाद्या पदार्थाचं कुणी विशेष कौतुक केलं तर स्वत:च्या वाटणीचंही त्यांना वाढत. त्यांच्या या अतिउदारपणामुळे महिन्याच्या

किराणा-सामानाचा खर्च दुपटीनं वाढला तरी विनितेच्या कोमेजलेल्या चेहऱ्याकडे त्या दुर्लक्ष करीत.

इथं चंद्रूच्या घरी येणाऱ्यानं फोन करून येणं आवश्यक होतं. अगदी जवळचं माणूस यायचं म्हणजे चाळीस मैलांवरून येणार!

अशा वेळी एकदा चंद्रूनं विचारलं,

'अम्मा, राधाकृष्ण नांवाचे माझे एक मित्र आपल्या बायको-मुलीसह आपल्याकडे राहायला येणार आहेत. तुला काही त्रास नाही ना होणार?'

जमुना लगेच म्हणाली, 'मला रजा नाही. दुसरं म्हणजे दोन्ही वेळेचा स्वयंपाक करायचा म्हणजे कष्टाचं काम! एखाद्या हॉटेलात का उतरत नाहीत ते? भरपूर श्रीमंत आहेत ना ते?'

'असू दे गं! मी करेन स्वयंपाक-पाणी. येऊ दे त्यांना!' असं एकीकडे म्हणत असताना गौरम्मांच्या मनात आलं, एवढं राजवाड्यासारखं घर असून पाहुण्यांना हॉटेलमध्ये उतरवा म्हणायला हिची जीभ कशी उचलते? पण हे स्पष्ट बोलून दाखवायचं त्यांना धैर्य झालं नाही. विनितेनं हेच म्हटलं असतं तर गौरम्मांनी लागट बोलून तिला रडवलं असतं.

पण इथं जमुनेला कसं सांगायचं? डॉलर-बहू ना ती!

राधाकृष्णांचं कुटुंब येणार म्हणताच गौरम्मा मनापासून आनंदल्या होत्या. त्यांना इथं येऊन सहा महिने होऊन गेले होते आणि हे पहिले पाहुणे घरी येणार होते. इथं भाजी, फळं, किराणा सामान उत्तम प्रकारचं मिळत होतं पण त्यात फारसं वैविध्य नव्हतं.

गौरम्मांनी सुनेची कुठलीही मदत न घेता खसखशीची खीर, ताकाची कढी, चित्रान्न, भजी- एक ना दोन! कितीतरी पदार्थ हौसेनं तयार केले. तरीही जमुना अस्वस्थ होती. गौरम्मा नसत्या तर तिनं चंद्रूला पटवून त्यांची बाहेरच राहण्याची व्यवस्था केली असती. अशा परिस्थितीत चंद्रूनंही पाहुण्यांना घरी बोलवण्याचं धैर्य दाखवलं नसतं. बायकोनं केलं नाही तरी आई करेल, या खात्रीनं चंद्रूनं त्यांना घरीच राहायला बोलावलं होतं.

पण जमुनेला हा स्वत:चा अपमान वाटला होता. आपल्या घरी आपलं मत डावललं जातं, याचा तिला राग आला होता.

राधाकृष्ण कंपनीमध्ये बऱ्याच वरच्या हुद्द्यावर होते. त्यांचं नाव खूपच प्रसिद्ध होतं. त्याचबरोबर भरपूर पैसाही त्यांनी कमावला होता. सुमारे पन्नाशीचं त्यांचं वय होतं. त्यांच्या पत्नी सावित्री सुरेख, रेशमी साडी नेसून, मोजके दागिने लेऊन प्रत्यक्ष लक्ष्मीसारख्याच दिसायच्या. त्यांच्याबरोबर दहा वर्षांची त्यांची मुलगीही आली होती.

विमानातून आल्यावर गाडीनं ते घरी येऊन पोहोचले. घरात आल्या आल्या सावित्रीनं गौरम्मांना वाकून नमस्कार केला.

क्षणभर गौरम्मा सुखावल्या. अमेरिकेत येऊनही हिनं आपली पद्धत सोडली नाही, या विचारानं त्यांना बरं वाटलं.

एक गोष्ट मात्र त्यांना खटकली. एवढी श्रीमंती असली तरी त्यांच्या चेहऱ्यावर विषादाची छाया होती. दोघांच्याही चेहऱ्यावर!

औपचारिकपणे चार वाक्यं बोलून जमुना बेसमेंटमध्ये कपडे धुवायला निघून गेली.

कॉफी प्यायल्यावर दोघंही पुरुष हॉलमध्ये गप्पा मारू लागले. गौरम्मांनी भाजी चिरण्यासाठी विळी काढली. सावित्रीही स्वयंपाकघरात येऊन म्हणाल्या, 'मी चिरून देते. पण मला विळीनं चिरायची सवय मोडली आहे. चाकूनं चिरते.' आणि सराईतपणे चाकूनं भाजी चिरू लागल्या.

सावित्रीचं गौरम्मांशी चांगलंच जमलं. छोट्या मानसीबरोबर सविता खेळू लागली. एवढी श्रीमंत बाई असूनही सावित्रीनं प्रत्येक कामात गौरम्मांना मदत केली.

स्वयंपाक होताच गौरम्मांनी भरल्या मनानं सगळ्यांना जेवायला वाढलं. सगळेच स्वयंपाकाचं कौतुक करत भरपेट जेवले.

दररोज मानसीला फ्राममध्ये ठेवून फिरायला घेऊन जायची गौरम्मांना सवय होती. त्या दिवशी सावित्री त्यांना म्हणाली, 'मीही येऊ?'

'चला ना!' त्याही म्हणाल्या.

चालता-चालता गौरम्मांनी सहजच विचारलं, 'तुम्हांला किती मुलं?'

यावर सावित्री रडू लागली. गौरम्मा संकोचून गेल्या. त्यांनी विचारलं, 'काय झालं? दुखावलं का मी?' गौरम्मांना वाटलं, कदाचित मुलं गमावलेली आई असावी ही-

सावित्रीच पुढं म्हणाली, 'नाही. मी स्वत:च सांगणार होते तुम्हाला. मन हलकं करायला म्हणून. मनातलं हे ओझं कुणापुढे सांगणार मी तरी?'

'एवढं काय झालंय?'

'काही नाही. अठरा वर्षं झाली इथं येऊन. त्यामुळे हाच आमचा देश झालाय आता. भारतातून इथं आलो तेव्हा आम्हांला एक मुलगी होती. शामा तिचं नाव. इथं आल्यानंतर ही सविता झाली. शामा मोठी होऊ लागली. आम्हांला सतत भीती वाटायची- ही इथल्या मुलींसारखी तर होणार नाही ना? तिच्यावर आपले संस्कार व्हावेत म्हणून सगळे सण, इतर अनेक पूजा आणि धार्मिक विधी करण्याची आम्ही पद्धत ठेवली. सतत तिला सांगत होतो- हा आपला देश नाही- आपण भारतातले- इथं पैसे मिळवायला म्हणूनच आलो आहोत. वरचेवर भारतातच नव्हे, गावाकडे

नेऊन तिला तिकडचीही सवय ठेवली.'

'तुमचं गाव कुठलं?'

'तिपटूरमध्ये आमच्या वडिलांची खोबऱ्याची वखार आहे. मी फक्त इंटरपर्यंत शिकले. लग्नही लवकर झालं होतं. शामालाही विसाव्या वर्षीच आम्ही नवरा शोधला.'

'शिकणाऱ्या मुलीला नवरा?'

'आपल्याकडे विसाव्या वर्षीच नवरा शोधतात ना?'

'होय!' गौरम्मा गप्प बसल्या.

'ती कॉलेजमध्ये शेवटच्या वर्गात शिकत होती. आपण योग्य नवरा शोधला नाही, तर तीच एखादा शोधेल, अशी भीती वाटली. आम्ही पटवल्यावर अखेर ती म्हणाली, ठीक आहे. मी तुम्ही म्हणाल त्या मुलाशी लग्न करायला तयार आहे. पण भारतात मात्र राहणार नाही.'

'खरंय तिचं. तिची अपेक्षा स्वाभाविकच आहे. इतकी वर्षं इथं राहिल्यावर तिथं कसं जमेल तिला?'

'मग आम्ही पेपरमध्ये एक जाहिरात दिली. त्याला कितीतरी तरुणांनी अर्ज टाकले! चांगली शिकलेली मुलं होती. चांगल्या घरची मुलं! अखेर तिनंच चार-सहा मुलांची निवड केली. त्यातही सुरेंद्र नावाचा एक इंजिनियर मुलगा तिला आवडला. मुलगा हुशार होता, पण गरीब. कुठलंही व्यसन नव्हतं.'

'त्याच्या घरची गरिबी-श्रीमंती घेऊन तुम्हांला काय करायचं! नाहीतरी तुमची मुलगी कुठं त्यांच्या घरी नांदायला जाणार होती?'

'होय. त्याविषयीही आधीच बोलणं झालं. नंतर बेंगळूरच्या कुचलांबा देवळामध्ये पाच लक्ष खर्च करून तीन दिवसांचं उत्तम लग्न करून दिलं.'

'पाच लाख.'

'होय. प्रत्येकाला भेटवस्तू, कुणाला काही कमी पडणार नाही असं लग्न केलं. सुरेंद्र तिच्याबरोबर इथं आला. एम.एस्सी. साठीही त्याला सीट मिळाली होती. पण स्कॉलरशिप मिळाली नव्हती. आम्हीच त्याची फी भरली. त्या दोघांना स्वतंत्र घर विकत घेऊन दिलं. सगळं ठीक झाल्यावर आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला. पण नियतीला हे पटलं नाही की, काय कोण जाणे!'

आपल्या मुलीच्या दुर्दैवाची कथा सांगता-सांगता त्या भावनाशील झाल्या होत्या. त्यांना रडू फुटलं.

पुढं फिरायला जाणं गौरम्मांना अवघड झालं. या साऱ्या समस्या त्यांच्या समजून घेण्याच्याही पलीकडच्या वाटत होत्या. त्या म्हणाल्या, 'असू दे सावित्री! माणसाच्या हातात काय आहे? तुमच्या जावयाचं आयुष्यच तेवढं असेल! तुम्ही

मनस्ताप करून घेऊ नका!'

एकाएकी सावित्री रडायची थांबली आणि संतापानं म्हणाली, 'त्याला कसली धाड भरलीय? पापी मेला! असल्या नतद्रष्ट माणसांना देव आयुष्यही भरपूर देतो!'

गौरम्मा गडबडल्या.

सावित्री पुढं सांगू लागली, 'सुरेंद्राला दुसऱ्या टर्मला स्कॉलरशिप मिळाली. त्यानंतर तो पूर्णपणे बदलून गेला. दररोज नवरा-बायकोमध्ये भांडणं सुरू झाली. एकदा त्यानं भांडणाच्या भरात सांगून टाकलं- मी काही तुझा चेहरा बघून तुझ्याशी लग्न केलेलं नाही. तुझ्याकडे ग्रीनकार्ड होतं म्हणून लग्न केलं मी! यावर शामाही म्हणाली- मी नसते तर तू इंडियातच सडत पडला असता. माझ्याशी लग्न करून तुझ्या सगळ्या घराण्याचा उद्धार झालाय! शब्दानं शब्द वाढत गेला. अखेर शामा रडत घरी आली. डायव्होर्स घेऊनच आली ती!'

'आता कुठं आहे ती?'

'या घटनेला आता एक वर्ष झालंय. सुरेंद्रनं शिक्षण पुरं केलंय आणि तो पुन्हा लग्न करायला भारतात गेलाय म्हणे. तिथं काय! मुलगा अमेरिकेत हमाल आहे म्हटलं तरी मुलगी देतात! सहज एखादी चांगली मुलगी मिळूनही जाईल किंवा एव्हाना मिळालीही असेल.'

'शामा कुठं आहे?'

'डायव्होर्स झाल्यावर तिनं सगळा राग आमच्यावरच काढला. ती म्हणते- तुम्ही तुमची संस्कृती- तुमची विवाहपद्धती यासाठी माझा बळी दिलात. पाच मिनिटं परस्परांना भेटून, एकमेकांना जाणून न घेता केलेलं लग्न ते! भारतात डॉलर म्हटला की लाचार होणारे भिक्षुक! ग्रीनकार्ड असलेल्या गाढवीशी लग्न करायला ते तयार असतात! तुम्ही दोघांनी माझं जीवन मातीमोल केलंय! यानंतर मला वाटतं तसं मी राहणार! आता तुम्ही माझ्या आयुष्यात ढवळाढवळ करू नका- आणि ती निघून गेली.'

'आता ती कुठं आहे?'

'कॅलिफोर्नियामध्ये एका ब्राझील मुलाबरोबर ती राहते. सकाळी कॉलेजला जाते आणि संध्याकाळी रेस्टॉरंटमध्ये वेट्रेस म्हणून काम करते.'

'असं किती दिवस चालेल?'

'देवालाच ठाऊक! आमचं वेदपारंगतांचं घराणं! आमचे आजोबा महापंडित होते. मठाचे स्वामीही धर्मजिज्ञासेसाठी त्यांच्याकडे येत. माझे सासरे अवधानी. अशा घराण्याचं रक्त असलेली शामा अशी वागते- अशी राहते! सगळं आठवलं की पोटात आग पडते! हे सगळं सहन करून आम्ही जिवंत तरी कसे राहिलो कोण जाणे!'

दु:खाचा बांध फुटून असह्य वेदना अश्रूंवाटे वाहू लागल्या. असहाय्य असल्याची भावना त्यांना घेरून टाकत होती. बेसुमार डॉलर्स असूनही त्या हताश झाल्या होत्या.

गौरम्मा घाबरून गेल्या. चौथीपर्यंत शिकलेल्या गौरम्मांना परिस्थितीच्या जटिलतेचं सर्वंकष दर्शन होणं किंवा त्याचं विश्लेषण करणं शक्य नव्हतं. पण दु:खानं हताश झालेल्या समोरच्या व्यक्तींच्या दु:खावर समाधानाची फुंकर घालून शांत करण्याची बुद्धी आणि मन त्यांच्याकडे होतं.

'आता सवितेची काळजी असेल ना तुम्हाला?'

'तर! थोरल्या बहिणीचे गुण हिच्याही अंगात येऊन हीही तशीच वागली तर काय करायचं, हा खरा प्रश्न आहे! रात्रंदिवस हा विचार मला छळत असतो. म्हणूनच मी त्यांच्या मागे लागले आहे- आपण भारतात निघून जाऊ या. हवा तेवढा पैसा मिळवलाय. बेंगळूरमध्ये आमचं स्वत:चं घर आहे. निदान हिला तरी तिथं वाढवू या. आपली मुलं इथं वाढली तर चेहरा-मोहरा आपला असला तरी मन इथलं होऊन जातं. विचार इथल्यासारखेच बनतात. म्हणून मी मागं लागलेय-'

'होय. तेच योग्य दिसतंय.'

'या साऱ्या घटनेमुळे आमची मनं उद्विग्न झाली होती. तुम्हांला भेटून मन मोकळं केल्यावर बरं वाटेल म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो. तुम्हाला त्रास झाला?'

'छे! नाही. तसं तुम्ही समजू नका. एकमेकांना एकमेकांनी मदत केली पाहिजे ना!' गौरम्मा म्हणाल्या. पण त्यांचंही मन अव्यक्त भीतीनं ग्रासलं होतं. आणखी वीस वर्षांनंतर, मानसी वयात आल्यानंतर तीही असाच चंद्रूला त्रास देईल काय?

यावर काळच उत्तर देईल म्हणा!

चंद्रू आणि राधाकृष्ण बाहेर हॉलमध्ये बसून याच विषयावर गंभीरपणेच विचार करत होते.

राधाकृष्ण फ्लोरिडाला आल्यापासून त्याचा त्यांच्याशी परिचय होता. त्यांच्या घरची सारी परिस्थिती त्याला ठाऊक होती.

तो एकदा काही कामासाठी कॅलिफोर्नियाला गेला होता. सॅनफ्रान्सिस्कोमधल्या एका रेस्टॉरंटमध्ये मित्रांबरोबर गेला तेव्हा शामानं सगळ्यांना ड्रिंक्स सर्व्ह केलं होतं.

त्यानं तिला ओळखलं. अवाक् झाला. सगळे मित्र निघून गेल्यावर तो पुन्हा तिथं आला होता.

'शामा, तुझ्याशी थोडं बोलायचंय.'

'काम संपल्यानंतर पिझ्झा-हटला येईन.' शामा एवढं बोलून मंद स्मित करत

निघून गेली. निर्विकार आणि आत्मविश्वासानं भरलेल्या शामाचं ते रूप पाहून चंद्रू अवाक् झाला होता.

अर्ध्या तासानंतर शामा कामाचा युनिफॉर्म बदलून सांगितलेल्या ठिकाणी आली. दिवसभर भरपूर काम झाल्यामुळे ती दमलेली दिसत होती. तिच्या कपाळावर घामाचे थेंब उमटले होते.

चंद्रूनं लहानशा रंगीत फ्रॉक घातलेल्या शामाला पाहिलं होतं.

वधू-वेषात नटलेल्या शामाला त्यानं अमेरिकेतल्या रिसेप्शनच्या वेळी पाहिलं होतं.

आता डायव्होर्स घेतलेल्या, दिवसभर राबून दमलेल्या शामालाही तो पाहत होता.

'हे काय शामा! तू अशी वागलीस तर तुझ्या पप्पांना काय वाटेल?'

कोकचा घोट घेत शामानं विचारलं, 'अंकल, काहीही माहिती नसताना तुम्ही माझ्या वैयक्तिक आयुष्यात डोकावत आहात. हे योग्य आहे काय?'

तिच्या थेट प्रश्नानं चंद्रू गडबडला.

तीच पुढं म्हणाली, 'अंकल, तुम्हां सगळ्यांची विचार करायची पद्धत सारखीच आहे. हे मला ठाऊक आहे. तुम्ही माझ्या दृष्टीनं विचार करून पाहिलाय काय?'

'केलाय तर!'

'नाही केला!' ती ठामपणे म्हणाली, 'मम्मी-पप्पाही हेच करतात. त्यांनी इथं शंभर जन्म काढले तरी त्यांना इथलं जीवन समजणार नाही. तुमची मुळं तुमच्या भारतात, तुमच्या कर्नाटकात, तिपटूरमध्ये खोलवर रुजली आहेत. तुमची निष्ठा नेहमीची त्या मुळांशी राहणार! इथं येऊन तुम्ही भरपूर पैसा मिळवताय- पण तुम्ही कधीही इथले होऊ शकणार नाही. कागदोपत्री तुम्ही इथले नागरिक असालही- पण तुमचं हृदय कधीच इथं नाही.'

शामाच्या बोलण्यात उद्वेग होता. आजवर अत्यंत शांत आणि संयमानं वागणारी शामा आता ज्वालामुखी झाली होती.

'तुम्हाला तुमचा देश भारतच वाटत असेल, पण माझा देश हा आहे. मी इथं जन्मले आणि इथं वाढले. तुम्ही मात्र तुमची मूल्यं वापरून माझं मूल्यमापन करता! रेस्टॉरंटमध्ये नोकरी केली म्हणजे काय वाईट केलं मी? तुम्हां भारतीयांच्या दृष्टीनं हे हलकं काम असेलही. माझ्या एका मैत्रिणीचे वडील न्यूयॉर्कमध्ये मोठे सर्जन आहेत. तीही इथं माझ्यासारखी नोकरी करते; पण तिच्या घरी कुणी तिला काही बोलत नाहीत. तिचं आयुष्य तिचं आहे म्हणतात.'

शामाच्या बोलण्यावर काहीही न बोलता चंद्रू घरी परतला होता.

राधाकृष्ण सांगत होते,

'चंद्रू, मी शिक्षण संपल्यावर इथं आलो नाही. संशोधक होऊन भारतात सरकारी नोकरी करत होतो. पगाराचा फारसा विचार कधीच केला नाही. आधी दिल्लीत नोकरी होती. तेव्हा घरी फक्त जेवणापुरता येत होतो. तरुण वय, रक्तही गरम होतं. माझ्या जीवनात तेवढं काम मी कधीच केलं नाही.'

'का? इथंही काम करता ना!'

'तिथल्या कामाच्या तुलनेत हे कमीच. तिथं असताना संशोधनपर निबंध लिहिला. तिथल्या माझ्या बॉसचा माझ्यावर राग होता. त्यामागे भाषा कारणीभूत होती की जात हे मला समजलं नाही. त्यानं मला माझा निबंध वाचून दाखवण्याची कॉन्फरन्समध्ये संधी दिली नाही. शिवाय पैशाची चणचण होतीच. मन खूप निराश झालं. बॉस दररोज काही ना काही चूक शोधून काढायचा, मिळाली नाहीतरी उगाच वाकड्यात शिरायचा. मला मदतीला माणसं द्यायचा नाही. तरीही काम करत राहिलो.'

'इथं कसे आला तुम्ही?'

'शेवटी माझी गुजराथेतल्या एका कोपऱ्यात बदली करण्यात आली. माझ्या अभ्यासाच्या विषयाशी संबंध नसलेल्या एका पोस्टवर. हताश झालो. काम करायला मी तयार होतो- पण राजकारणामुळे मला कुणीही मदत करायला तयार नव्हतं. अखेर मुंबईला येऊन एक निबंध लिहिला. तो इथल्या संस्थेच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी वाचला. त्यांनी मला इथं बोलावून घेतलं.'

'इथं आल्यावर तुम्हाला काही त्रास झाला नसेल.'

'इथं जुळवून घेताना जेवढा त्रास झाला असेल तेवढाच. माझ्या कामासाठी मी मागेन तेवढा फंड, असिस्टंट, सोयी मला मिळू लागल्या. मला काहीही कमी पडलं नाही. बॉसचंही कुठल्याही प्रकारचं दडपण नाही. संपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव कामाच्या बाबतीत मी आजही घेतो. आता तर मीच संस्थेचा सर्वोच्च अधिकारी आहे. मीही केवळ गुणवत्तेला महत्त्व देण्याची त्यांची प्रथा सांभाळतो.'

'मग कसलं दु:ख?'

'कामात काहीच दु:ख नाही. घरी गेलं की मात्र वाईट वाटतं. सावित्री सतत शामाची आठवण काढत असते. इथून निघून जाऊ या म्हणून मागं लागते. मी भारतात जाऊन काय करू? पैसा भरपूर आहे; पण संशोधनापुढे मला पैशाचं महत्त्व कधीच वाटलं नाही. भारतात जाऊन काय करू मी? माझ्या संशोधनाचं स्वरूप असं आहे की, तो खर्च केवळ श्रीमंत देशांनाच परवडेल.'

'मला पटतंय तुमचं. ही तुमचीच नव्हे, अनेक वैज्ञानिक, शास्त्रज्ञ आणि विचारवंतांची कथा आहे.'

'फार विचित्र आहे हा देश!' चंद्रू! हे एक रंगीबेरंगी कोळ्याचं जाळं आहे. इथं

नोकऱ्या आहेत, यंत्र-तंत्र आहे. सुख-संपत्ती आहे, डॉलर्स आहेत. आपली माणसं त्यातल्या कशाला तरी बळी पडून इथं येतात- पण माघारी जायला जमत नाही. इथून जावं असा आपला देशही नाही. तिथून बाहेर पडण्यासाठी शेकडो खिडक्या आहेत. पण आत बोलवणारा एकही दरवाजा नाही.'

'होय. त्यामुळे विद्यार्थी-व्हिसावर इथं आलेल्यांपैकी नव्वद टक्के मुलं इथंच राहतात. पण अलीकडे कॉम्प्यूटर सॉफ्टवेअर क्षेत्रातली मुलं मात्र माघारी जाताहेत. इथं येणारी मुलं असामान्य बुद्धिमत्तेची असतात.'

'चंद्रू, आपल्या देशात आपल्याला कुठल्याही प्रकारचा मान-सन्मान मिळत नाही. बेंगळूरमध्ये मी सावित्रीच्या आग्रहासाठी एक घर बांधलं. मी अमेरिकेत राहतो म्हटल्यावर गृहप्रवेशाचे भटजी, आचारी, काँट्रॅक्टर- सगळ्यांनी दुप्पट दर सांगितले. ते तर बाहेरचे आहेत. माझ्या सख्ख्या भावंडांना वाटतं- तू डॉलरमध्ये मिळवतोस- आम्हांला पैसे का देऊ नयेस? मन खूप दुखावतं!' त्यांच्या स्वरात वेदना होती.

चंद्रू म्हणाला, 'होय. त्यांना वाटतं, इथं डॉलरची झाडं आहेत आणि त्यांना डॉलर्स लटकलेले असतात! घर-दार सोडून, इथल्या थंडी-वाऱ्याला तोंड देत आम्ही डॉलर्स मिळवतो तेव्हा केवढी किंमत देत असतो, हे त्यांना समजत नाही. शामाच्या संदर्भात द्यावी लागणारी मूल्याची किंमत, मुलांच्या मूल्यांची किंमत! छे! फारच महाग पडतो हा डॉलर! पण हे भारतात कुणालाही समजत नाही. त्यांच्या दृष्टीनं डॉलर म्हणजे चाळीस रुपये- एवढंच!'

राधाकृष्णांनी ह्याचा पुरेपूर अनुभव घेतला होता. चंद्रूला किटीची आठवण आली.

किटीनं चंद्रूला पत्र लिहिलं होतं,

'तू आपल्यापैकी आहेस आणि अमेरिकेत राहतोस हा आम्हाला अत्यंत अभिमानाचा विषय आहे. इथं येशील तेव्हा आमच्यासाठी एक टू इन वन घेऊन येशील काय? अम्माला सिंथटिक डायमंड हवा आहे. लीलानं पोवळ्याचा सर आणायला सांगितला आहे. तिथं शिकॅगोमध्ये पद्मनाभन् नावाचे एजंट आहेत. तू सारं सामान घेऊन येशील अशी मी लीलाला ग्वाही दिली आहे! बघ हं! माझा अपमान होऊ देऊ नकोस!

तू इथं येशील तेव्हा सगळे पैसे रुपयांच्या स्वरूपात देईन.'

चंद्रूला फक्त टू इन वन न्यायला जमलं तेव्हा त्यानं नाराजी व्यक्त केली होती.

तो म्हणाला होता, 'चंद्रू, तू मी सांगितलेलं सोडलं असतंस तर एक वेळ चाललं असतं. पण लीलानं सांगितलेलं आणायला हवं होतं! आता तिला काय वाटेल? अरे, तू डॉलरमध्ये कमावतोस आणि टू इन वन देखील चंद्रूवर उपकार

केल्याप्रमाणे घेऊन गेला होता. जाता जाता म्हणाला होता, 'आमच्या शेजाऱ्यांकडे खूपच हँडी पीस आहे. तूही तसलाच आणशील असं मला वाटलं होतं. तू हा पीस आणणार हे ठाऊक असतं तर मी नकोच म्हटलं असतं!'

त्यानंतर त्यानं रुपये देण्याचाही विषय काढलाच नव्हता!

चंद्रूला या प्रसंगाचं वाईट वाटलं होतं. किटीला लीला काय म्हणेल, याची काळजी वाटली- पण चंद्रूला आपल्या बोलण्यामुळे काय वाटेल, याचा त्यानं विचारही केला नाही!

तो गेल्या खेपेला बेंगळूरला गेला होता तेव्हा सुरभी आणि सुरेशही आले होते. सुरेशनं दोन-तीनदा म्हटलं होतं, 'तुमचं घड्याळ मात्र फारच छान आहे हं! अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे!'

चंद्रूनं त्या बोलण्याकडे मुद्दामच दुर्लक्षच केलं होतं. पण गौरम्मांनी चंद्रूला एकीकडे बोलावून सांगितलं, 'चंद्रू, तू भरपूर डॉलर्स मिळवतोस! ते आपल्या घरचे जावई आहेत- एवढं मागताहेत- दे त्यांना. तुला हवं तर दुसरं घे.'

आईच्या शब्दाखातर चंद्रूनं मनाविरुद्ध घड्याळ त्याला दिलं. आईनं आणखी गोंधळ करू नये म्हणून हातातलं पाचशे डॉलर्सचं घड्याळ काढून 'ही माझ्याकडून तुम्हांला भेट!' म्हणत सुरेशच्या हातावर ठेवलं.

सुरेशनंही सहज म्हटलं. 'कशाला दिलंत? नको-' म्हणत वॉच मनगटावर बांधून घेतलं.

अमेरिकेत परतल्यावर रिकामं मनगट बघून जमुनानं चौकशी केली. सारं समजताच ती संतापानं म्हणाली, 'तुमची घरची माणसं अगदी भिकारी आहेत! घरी आलेल्या माणसाला लुटतात नुसते! इथं येऊन पाहिलं तर कळेल किती कष्ट आहेत ते!' त्यानंतर चार दिवस तिनं त्याच्याशी बोलणं सोडून दिलं होतं.

गौरम्मांना येऊन सहा महिने होऊन गेले होते तरी त्या परगावी म्हणून गेल्या नव्हत्या. त्यामुळे चंद्रूनं दोन दिवस जास्तीची रजा काढली आणि सगळ्यांना शिकॅगोला घेऊन जायचं ठरवलं. तिथं त्याच्या ओळखीच्या अनेक कन्नड मित्रांची घरं होती. जमुना आणि मानसीही प्रवासासाठी तयार झाल्या.

प्रवास म्हटल्यावर गौरम्मा उत्साहानं वेगवेगळे पदार्थ करू लागल्या. रव्याचे लाडू, करंज्या, चकली, कडबोळी, वेगवेगळ्या चटण्या आणि मसाल्याचे पदार्थ.

आईच्या उत्साहावर चंद्रूनं अजिबात पाणी ओतलं नाही. शिकॅगोमध्ये जमुनेच्याही अनेक मैत्रिणी असल्यामुळे तिनंही गौरम्मांच्या पाककलेला प्रोत्साहनच दिलं!

गौरम्मा आल्यापासून जमुनेनं स्वयंपाकघरात यायचं सोडूनच दिलं होतं. शेवटी चंद्रूच म्हणाला, 'अम्मा उत्साहानं कामं करतेय खरी! पण दमली वाटतं.'

'काही नाही रे! नाही तरी मला इथं काय काम असतं?' त्या म्हणाल्या खऱ्या,

पण जमुनेनंही अशी भावना व्यक्त करावी अशी त्यांच्या मनातली आशा काही पूर्ण झाली नाही. एकदाच ती म्हणाली होती, 'उद्यापासून तुम्ही रेस्ट घ्या. मी कांचीपुरम् इडली करते.' पण तेवढंच! तिनं कधीच इडली केली नव्हती.

गावाला जायची तयारी झाली. आकाश निरभ्र होतं. कडाक्याची थंडी जाऊन वसंत ऋतू आला होता. सगळी झाडं नुकतीच पालवत होती. वातावरण उत्साही होतं. गौरम्मांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता उमटली.

त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू बघून चंद्रूनं विचारलं, 'का गं? का हसलीस?'

'माझं सुदैव बघून मला हसू आलं बघ! देव किती दयाळू आहे! तू अमेरिकेला आलास, मला बोलावून घेतलंस! किती नशीबवान मी! तुझ्या गाडीतून फिरतेय आरामात!'

'यात काहीही विशेष नाही, अम्मा! इथं सगळेच गाडी घेतात. इथं गाडी पाण्याइतकीच अत्यावश्यक गोष्ट आहे! ते काही श्रीमंतीचं लक्षण नाही.'

'असू दे! आमच्या दृष्टीनं ही कौतुकाचीच गोष्ट ना!'

गाडी शिकॅगोत पोहोचली. तिथं काळ्या-सावळ्या-गोऱ्या माणसांची गर्दी पाहताच गौरम्मांना वाटलं, हीही अमेरिकाच काय?

राजीव आणि पद्मा चंद्रूचं मित्र-दांपत्य. पद्मा मूळची मैसूरची. त्यांनी घरात प्रवेश करताच तिनं आत्मीयतेनं हसत त्यांचं स्वागत केलं. त्यांची चौकशी केली.

त्यांचं चार बेडरूमचं घर होतं. पाहुण्यांसाठी तिनं एक खोली रिकामी करून ठेवली होती. घर नेटकं होतं. तिनं कॉफी देत म्हटलं, 'निवांतपणे कॉफी प्या. प्रवासामुळे तुम्ही दमून गेला असाल. आधी विश्रांती घ्या!'–

गौरम्मांना आपण बेंगळूरमध्येच असल्यासारखं वाटू लागलं.

कॉफी घेतल्यावर चंद्रू-जमुना-राजू बाहेर गेले. गौरम्मा, सपना आणि पद्मा घरात राहिल्या. पद्माला स्वयंपाकात मदत करायची गौरम्मांना अपेक्षा होती.

'पद्मा, भाजी चिरून देऊ का?'

'कालच चिरून फ्रीजमध्ये ठेवलीय मी.'

'पुरणाचा वास येतोय. पोळ्या करायच्या आहेत काय?'

'नको. पुरण वाटून तयार आहे. करेन मी!'

करायला काहीही कामच नव्हतं. बेंगळूरात अबोल असलेल्या गौरम्मा इथं आल्यापासून गप्पा मारायला आसुसल्या होत्या.

'पद्मा, इथं आपल्याला लागणारं सामान मिळतं? बन्सी रवा, सुकं खोबरं, पोहे, साबुदाणा-'

'शिकॅगोमध्ये भरपूर भारतीय राहतात. बेंगळूरच्या किराणा मालाच्या दुकानात जे मिळतं, ते सगळं इथंही मिळतं. एम.टी. आर मसाले, बेडेकरांचं लोणचं,

लाह्याचं पीठ- सगळं मिळतं. पापड-कुरडया-शेवया एवढंच काय, इथं कन्नड सिनेमाच्या कॅसेट्सही भाड्यानं मिळतात. मी गणेशन मदुवे, मयुरा वगैरे सिनेमा इथंच पाहिले.'

'होय?' गौरम्मांनी डोळे विस्फारून विचारलं.

'गेल्या दहा वर्षांत तर इथं फारच भारतीय आले आहेत. आता पूर्वीप्रमाणे इथं भारतातून फारसं काही आणावं लागत नाही. मी तर काहीच आणत नाही. उगाच लगेज कशाला वाढवायचं? सूटकेस खराब होते. माझ्या बहिणीही मला सांगतात- तिथून काहीही आणू नकोस- इथं सगळं मिळतं- म्हणून! मीही तिकडून काही फारसं घेऊन येत नाही.'

हा मुद्दा गौरम्मांच्या लक्षातच आला नव्हता. फॉरेन म्हणजे उत्तम, आपलं म्हणजे वाईट असंच डोक्यात असल्यामुळे जमुनाला त्याही 'अमुक पाठव- तमुक पाठव' म्हणून पत्रं लिहायच्या. जमुनाला हे ठाऊक असलं तरी ती गप्प राहायची. का बरं?

'आज कोण-कोण येणार आहे?'

'कुणी नाही. तुम्ही आणि माझी नणंद तारा.'

'तुमची नणंद इथंच असते? तिचे यजमानही येतील ना?'

'जमुनानं तुम्हाला काही सांगितलं नाही?'

'नाही.'

'माझ्या नणंदेची एक कथाच आहे. तारा तिचं नाव. दिसायला सुंदर. तुम्ही पाहालच म्हणा! आमच्या सासूबाई तुमकूरच्या. ताराला शिक्षणात फारसा रस नव्हता. हप्ता-हप्त्यानं बी. ए. झाली. घरातली कामं, स्वयंपाकपाणी यात मात्र अगदी पारंगत आहे. त्यांचा मामेभाऊ रमेश. त्याच्याशी लग्नही झालं.'

'रमेश कुठं असतात मग?'

'इथंच वॉशिंग्टन नावाच्या गावात राहतो. लग्नाआधी आम्हाला येऊन भेटायच्या. ताराच्या लग्नासाठी आमच्या मालकीची एकुलती एक नारळाची बागही सासऱ्यांनी विकून टाकली. ती एकच मुलगी ना! त्यामुळे आम्हीही विरोध केला नाही. व्हिसा मिळून तारा इथं आली तर इथं वेगळीच कथा!'

'काय झालं होतं?'

'इथं रमेशनं एक गोरी बायको आणली होती. एवढंच नव्हे, एक मूलही झालं होतं. त्यामुळे तारा त्याच्याबरोबर राहायला तयार झाली नाही. त्या गोऱ्या बायकोनं रमेशला सोडलं नाही. त्यानं गयावया केल्या, चूक झाली- मोठ्यांचं ऐकून लग्नाला तयार झालो म्हणाला. क्षमाही मागितली. पण काय करणार? डायव्होर्स झाला. शिक्षणात रस नाही- त्यामुळे छोटी नोकरी करून स्वत:पुरती राहते. आमच्या घरी

राहा म्हटलं, पण तिची तयारी नाही. त्यामुळे वेगळं छोटंसं घर घेऊन राहते. नवरा पोटगी देतो. अधून-मधून आमच्या घरी येऊन जाते.'

यावर काय बोलावं ते गौरम्मांना सुचेना.

तीच पुढं म्हणाली, 'आम्ही ताराला सांगितलंय- आता उगाच जात-पात म्हणू नको. विश्वासानं संसार करणारा कुणी चांगला भेटला तर लग्न कर. पुन्हा तुमकूरलाही जाऊ नकोस. तिथं तर आणखी अपमानित जिणं जगावं लागेल. त्यापेक्षा इथंच राहणं चांगलं. कुणीतरी अन्याय केला आणि हिचं आयुष्य कष्टी होऊन गेलं.'

ताराची कथा ऐकत असताना गौरम्मांना तीव्रपणे विनितेची आठवण झाली. सुरभीसाठी एक अमेरिकेतला मुलगा पाहिला होता तेव्हा तिनंच सावधपणे माहिती मिळवून लग्नाला विरोध केला होता. त्या वेळी आपण तिला किती वाईट शब्दांत बोललो होतो! केवढी मोठी चूक करायला निघाले होते मी तेव्हा! सुरभीचं ते लग्न झालं असतं आणि नंतर तिचीही तारासारखीच कथा झाली असती तर?

केवळ या विचारानंही गौरम्मांच्या अंगावर काटा आला.

दुसऱ्या दिवशी श्रीकांत नावाच्या आणखी एका मित्राकडे जायचं ठरलं. त्यांचं घर स्प्रिंग फिल्डमध्ये होतं. लिंकनची समाधी असलेलं ते गाव.

चंद्रूनं लगेच सांगितलं, 'अम्मा, उरलेलं सारं खाणं तू श्रीकांतसाठी ठेव. त्याला आपल्याकडचे कुरकुरीत पदार्थ फार आवडतात.'

सगळे निघाले तेव्हा पद्मानं गौरम्मांना वाकून नमस्कार करत म्हटलं, 'इथं तांबूल नाही आणि नारळही नाही. इंडियन स्टोअरमध्ये गेलं तर विड्याची पानंही मिळतील आणि नारळही मिळतील. आपली मैसूर-बेंगळूरकडची पद्धत पाळायला जमत नाही म्हणून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका-' आणि पन्नास डॉलर्स त्यांच्या हातात ठेवले.

गौरम्मांना अवघडल्यासारखं झालं. त्या नको-नको म्हणत मागं सरल्या.

पण पद्मानं ऐकलं नाही. ती म्हणाली, 'तुम्हाला बघितलं आणि आईच भेटल्यासारखं वाटलं मला! तिला भेटून दोन वर्षं होऊन गेली. कुणीतरी सांगत होतं, तिला बरं नाही म्हणून. फोनवर विचारलं तर सगळं ठीक आहे म्हणूनच सांगतात. फार वाटतं, तिला जाऊन भेटून यावं म्हणून! पण ते शक्य नाही. तुम्ही नको म्हणालात तर मला वाईट वाटेल.'

बोलता-बोलता पद्माचा आवाज ओला झाला. गौरम्मांच्या डोळ्यांमध्येही अश्रू उभे राहिले. निघताना त्यांनी मागं वळून पाहिलं.

पद्माही डोळे पुसत त्यांना निरोप देत होती.

जड मनानं गौरम्मा श्रीकांतच्या घराच्या दिशेनं निघाल्या. वाटेत त्यांनी विचारलं, 'चंद्रू, श्रीकांतच्या घरी बायको-मुलं आहेत ना?'

'अम्मा, इथंच हा प्रश्न विचारलास हे छान झालं! त्याच्या घरी विचारला असतास तर अवघड झालं असतं!'

'का रे? बायको वारली की काय त्याची?'

'अगदी सुखात आहे. पण त्याच्याबरोबर राहत नाही.'

'हे काय नवंच सांगतो आहेस?'

'माझ्याआधीच श्रीकांतचं लग्न झालं होतं. मद्रासमधल्या श्रीमंत घरातली ती मुलगी. रूपा तिचं नाव. डॉक्टर झाली होती. सुट्टीवर गेला असता एक दिवस धाडकन मुलगी बघितली, सहा दिवसांत धाडकन लग्नही करून मोकळा झाला. माझ्यासारखाच!'

जमुना मध्येच फणकाऱ्यानं म्हणाली, 'तुम्ही माझी रूपाशी तुलना करू नका, सांगून ठेवते मी!'

'पुढं काय झालं?'

'रूपा इथं आली. इथल्या डॉक्टरीच्या काही परीक्षा असतात- त्याही पास झाली. लगोलग चांगली नोकरीही मिळाली. प्रचंड हुशार ती! भरपूर पैसे मिळवू लागली.'

'आपल्याकडेही असंच असतं ना?'

'नाही. इथले डॉक्टर आणि वकील फारच उत्तम प्रमाणात पैसा मिळवतात. रूपाही भरपूर मिळवत होती- श्रीकांतपेक्षा कितीतरी जास्त! रूपाचा अहंकारही वाढू लागला. दोघांमध्ये भांडणं होऊ लागली. पुढं-पुढं तिची भाषाही बदलली. तुझ्यासारख्याला मी पगारावर कामावर ठेवेन म्हणून हिणवू लागली. त्याला जेव्हा सहन करणं अशक्य झालं, तेव्हा त्यांचा डायव्होर्स झाला.'

'असं कसं शक्य आहे?'

'का शक्य नाही? आता सहज शक्य आहे ते! रूपानं एका गोऱ्या डॉक्टरशी लग्न केलंय. एकुलत्या एका मुलीला तिनं मद्रासमध्ये आईकडे ठेवलं आहे. आई-वडिलांनीही तिला खूप समजावलं, पण तिनं ऐकलं नाही.'

'आणि श्रीकांत?'

'डायव्होर्स झाल्यावर त्यानं खूप मनस्ताप करून घेतला होता. आता त्यानं स्वत:च्या मालकीची कंपनी काढली आहे. फार छान चालली आहे ती. आता तर तो रूपापेक्षाही श्रीमंत झाला आहे. पैशामुळे आपल्या आयुष्याची ही गत झाली म्हणून त्वेषानं राबतो आणि पैसा मिळवतो. कितीतरी भारतीयांना त्यानं नोकऱ्या दिल्या आहेत.'

'मुलगी?'

'वर्षाकाठी दोन आठवडे रजा काढून हाच आई-वडील आणि मुलीला भेटून

येतो.'

'त्यानं का दुसरं लग्न केलं नाही?'

गाडी चालवता-चालवता चंद्रू स्वगत बोलल्याप्रमाणे म्हणाला, 'इथं राहता-राहता स्वत:च्या न कळत त्यांच्याही विचारांचा आमच्यावर परिणाम झाला आहे. श्रीकांत माझा अगदी जवळचा मित्र आहे हे तर खरंच- पण त्याच्या वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करायला माझी तयारी नसते. इथल्याप्रमाणे आम्हीही वैयक्तिक स्वातंत्र्याला फार महत्त्व देतो. आई-वडीलही मुलांच्या जीवनात हस्तक्षेप करत नाहीत. ज्या क्षणी ती लक्ष्मणरेषा ओलांडली जाते, तेव्हा प्रचंड मानसिक उत्पाद घडतात. या व्यक्तिस्वातंत्र्याला धक्का लागणार नाही अशा प्रकारे आपण वागलं पाहिजे. हे स्वातंत्र्य राखण्यासाठी इथली माणसं किती त्याग करताहेत ठाऊक आहे? तेवढ्यावरून डायव्होर्सही होतात.'

चंद्रूचं बोलणं गौरम्मांना किती समजलं कोण जाणे; पण हे ठाऊक असूनही चंद्रू आपलं मन मोकळं करत होता.

काही क्षण गौरम्माही विचारात पडल्या.

नंतर त्या म्हणाल्या, 'चंद्रू, श्रीकांतला बायको नाही आणि ताराला नवरा नाही. त्या दोघांनी का एकमेकांशी लग्न करू नये?'

'असं कसं शक्य आहे, अम्मा? श्रीकांतचं विवाहाच्या संदर्भात मन विटलं आहे. दुसरं म्हणजे त्या दोघांची परस्परांशी ओळख आहे, तरीही दोघे याविषयी मौन बाळगून आहेत. त्यासाठी त्यांचं काहीतरी वैयक्तिक कारण असेल. मी यात पडून मैत्री गमवायला मुळीच तयार नाही.'

गौरम्मांना हे मुळीच पटलं नाही. रामदेवाच्या दर्शनाला देवळात गेलेल्या असताना सहज गप्पांच्या ओघात 'इथं एक मुलगा लग्नाचा आहे', 'तमक्यांची मुलगी लग्नाची आहे' एवढं सांगून कितीतरी लग्न ठरल्याचं त्यांनी जवळून पाहिलं होतं.

इथलं पाहावं तर सगळंच वेगळं! असला कसला देश हा कोण जाणे!

श्रीकांतच्या घरी ते जाऊन पोहोचले तेव्हा दुपार झाली होती. घराची मालकीण नसल्यामुळे ते भलं मोठं घर सुनं-सुनं वाटत होतं.

ते पोहोचले तेव्हा श्रीकांत घरात नव्हता. तो कुठं तरी कामावर गेला होता. पण एक सुदृढ, उमदा तरुण त्यांची वाट पाहत होता. त्यांना ओळखून त्यानं सांगितलं, 'श्रीकांत संध्याकाळी येतील. तोपर्यंत तुम्ही आमच्या घरी चला.'

आश्चर्य म्हणजे तो कन्नडमध्ये बोलला. त्याचं बोलणं अत्यंत नम्र होतं. सगळ्यांनी त्याची विनंती मान्य केली. त्यानं स्वत:ची ओळख सांगितली.

'मला नाथ म्हणतात. मी मूळचा बेंगळूरचा. इथं येऊन साडेतीन वर्षं झाली.'

'काय काम करता तुम्ही?' चंद्रूनं विचारलं.

'आधी श्रीकांतनी आपल्या कंपनीत छोट्या कामासाठी म्हणून आणलं. इथं आल्यावर काही दिवसांत मी स्वत:चा व्यापार सुरू केला.'

'कसला व्यापार?'

नाथनं अभिमानानं सांगितलं, 'या छोट्या गावात मी इंडियन स्टोअर' सुरू केलं. यानंतर इंडियन रेस्टॉरंटही सुरू केलंय. आधी सगळा व्यापार फक्त संध्याकाळीच करत होतो. सकाळी श्रीकांतकडे काम करत होतो. त्यांनीच मला या व्यवसायात पूर्णपणे पडायला सांगितलं. एवढंच नव्हे, सुरुवातीला त्यांनी मला धनसहाय्यही केलं. सर, माझ्या दृष्टीनं तेच माझे देव!

त्याच्या बोलण्यातून श्रीकांतचं आणखी एक कनवाळू रूप समोर आलं.

नाथाचंही तीन बेडरूम असलेलं घर होतं. घर बेताचं असलं तरी नीटनेटकं होतं. पाहुण्यांसाठी त्यानं रेस्टॉरंटमधून अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ आणून ठेवले होते.

त्याची पत्नी मालती हसतमुख होती. तिनं पाहुण्यांचं मनापासून स्वागत केलं. आग्रह करून तिनं सगळ्यांना जेवू घातलं. सगळ्यांना बरं वाटलं.

मालती घरातच मोती, पोवळी, खडे यांचा व्यापार करायची. शिवाय नवऱ्यालाही त्याच्या कामात ती मदत करत होती.

नाथनं सांगितलं, 'मला बेंगळूरमध्ये पार्ट-टाईम नोकरी होती. खूपच ओढाताण व्हायची. आता मीच लोकांना नोकरी देतो. केवळ साडेतीन वर्षांत एवढा फरक झालाय! मला तर हा देश फार आवडला. इथं कशाचीच कमतरता नाही. मी इथं न येता तिथंच राहिलो असतो तर कुठं तरी कारकून होऊन खर्डेघाशी करत बसलो असतो. या देशाला कुणी नावं ठेवू लागलं तर मला मुळीच आवडत नाही. मी काही तुमच्याइतका शिकलेला नाही. मला जे वाटलं ते बोललो.'

त्याचं काही खोटंही नव्हतं. बेताचं शिक्षण घेतलेल्या मुलाचं भारतात काय भविष्य आहे? त्याची कष्ट करायची तयारी असली तरी तशी संधी कुठं मिळते?

रात्री श्रीकांत आला. नाथाच्या हॉटेलात सगळे रात्री जेवले. नाथानं कुणाच्याच जेवणाचं बिल घेतलं नाही.

निघायची वेळ झाली. गौरम्मांनी चौकशी केली, 'बेंगळूरमध्ये तुमचं घर कुठल्या भागात आहे?'

'जयनगर भागात. सदोतिसाव्या क्रॉसच्या अगदी अखेरीस. अर्थात तिथं नाथ म्हटलं तर कुणाच्याही लक्षात येणार नाही. गोपीनाथ माझं नाव. आमच्या कंपनीत दोन गोपीनाथ झाले, त्यामुळे त्याला गोपी हे नाव पडलंय आणि मला नाथ

म्हणतात, आमचं जुनं घर पाडून त्या जागी 'श्रीकांत कॉम्प्लेक्स' करायचा माझा विचार चाललाय.'

गाडीनं वेग घेतला. गौरम्मांचं डोकं गरगरल्यासारखं झालं. कारण हा नाथ म्हणजे कोण हे त्यांच्या स्पष्टपणे लक्षात आलं होतं.

याच गोपीनाथशी लग्न करायची सुरभीची इच्छा होती आणि त्या वेळी आपणच 'हा नको- आपण अमेरिकेचा नवरा शोधू या' असं सांगून तिला त्यापासून परावृत्त केलं होतं. त्या वेळी विनिता आणि गिरीशनं 'मुलगा चांगला असेल तर काय हरकत आहे?' असंही म्हटल्याचं आठवलं.

त्या वेळी आपण संतापानं 'तू तुझ्या मुलीला दिली असतीस काय?' म्हणून विचारलं होतं.

खरोखरच सुरभीचं याच्याशी लग्न झालं असतं तर मालतीच्या जागी तीच दिसली असती.

गौरम्मांनी निःश्वास टाकला.

एका दुपारी चंद्रूनं घरी फोन केला. फोन गौरम्मांसाठी होता. 'अम्मा, अर्ध्या तासात तयार हो. तुला लगेच शिकॅगोला गेलं पाहिजे.'

'का रे? आणि तुम्ही?'

'ते सारं आल्यावर सांगेन.'

तपशील समजला नाही, तरी गौरम्मा एका किटमध्ये चार साड्या कोंबून तयार झाल्या.

घरी आलेल्या चंद्रूनं सांगितलं, 'अम्मा, पद्माचा फोन आला होता. राजीव आणि तारा इंडियाला गेले आहेत. पद्माच्या थोरल्या मुलाला खूप ताप आलाय म्हणे. तिच्या बाळंतपणाला आणखी पंधरा दिवस आहेत, पण त्या घाबरल्या आहेत. सोबतीला कोण येईल असं वाटून त्या रडू लागल्या.'

'अरे, दिवस भरलेल्या गर्भारशी अशी एकटी टाकून राजीव-तारा आता का गेले?'

'त्यांच्या वडिलांना हार्ट अॅटॅक आलाय म्हणे. त्यांचं काही सांगता येत नाही. एकच मुलगा आणि एकच मुलगी. अखेरच्या क्षणी त्यांना न जाऊन कसं चालेल?'

'तेही खरंच आहे म्हणा!'

असं म्हणाल्या तरी गौरम्मांना पद्माविषयी कणव दाटून आली. त्या म्हणाल्या, 'तू आणि जमुना चार दिवस मुलीकडे पाहा. मी पद्माकडे राहायला जाते. अचानक बाळंतीण झाली तर अगदी अनाथासारखं वाटायला नको तिला! बाळंतपण केलं तर काशी यात्रेचं पुण्य मिळतंय बाबा!'

प्रथमच चंद्रूच्या मनात आईविषयी अभिमान दाटून आला. डॉलरवरच्या अपरिमित

प्रेमापायी विनितेच्या मनाला होरपळून टाकणाऱ्या गौरम्मा परक्या स्त्रीच्या दु:खामुळे मृदू झाल्या होत्या. आपण होऊन मदतीसाठी जाण्याची इच्छा व्यक्त करत होत्या. यापुढे त्याला मागं घडून गेलेल्या गोष्टी गौण वाटल्या.

पद्माचा फोन येताच चंद्रूनं तिला सांगितलं होतं, 'तुम्ही काहीही काळजी करू नका! मी माझ्या आईला तुमच्याकडे पाठवून देतो. ट्रेल बसनं पाठवून देईन तिला. उतरवून घ्यायला कन्नड येणाऱ्या कुणाला तरी पाठवून द्या. कारण तिला कन्नडशिवाय दुसरी कुठलीही भाषा येत नाही. शिवाय तिनं एकटीनं कधीच प्रवास केलेला नाही.'

हे सांगताना 'अम्मानं घाबरून जायला नकार दिला तर?' असा विचारही त्यानं केला नव्हता.

घाईनं निघताना, तेवढ्याच वेळात गौरम्मांनी गावाकडून आणलेल्या शेवया आणि पापड सोबत बांधून घेतले.

चंद्रूनं जमुनाला फोन करून सारं सांगितलं. बहुधा तिला गौरम्मांचं अचानक निघून जाणं आवडलं नसावं. कारण चंद्रू फोनवर थोड्या रोषानंच सांगत होता,

'जमुना, तुला त्रास होणार असेल तर तू चार दिवस रजा घे. मानसीलाही तुझ्या मैत्रिणीच्या घरी कदाचित ठेवावं लागेल. अम्माला मात्र मी ठरल्याप्रमाणे पाठवून देणार आहे!' आणि त्यानं फोन आपटून ठेवला. गौरम्मांना मात्र त्यानं काहीही सांगितलं नाही.

मानसीला थोपटत तो म्हणाला, 'अम्मा, अगदी शेवटच्या स्टॉपवर उतरायचं. कितीही वेळ लागला तरी तिथंच उभी राहा. कुणी कन्नडमध्ये बोललं तरच त्यांच्याबरोबर घरी जा. घरी जाऊन पोहोचताच पद्माला इथं फोन करायला सांग. वाटेत हात-खर्चाला हे शंभर डॉलर्स राहू दे. हा कागद जपून ठेव. यावर इथला आणि पद्माचा घरचा फोन नंबर आहे. तू घाबरू नकोस. जमुनाच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नकोस.'

'पण मानसीला कुठं ठेवशील?'

'तू त्याची काळजी करू नकोस. सगळी व्यवस्था होईल. तू निश्चिंतपणे गावाला जाऊन ये.'

चंद्रूनं गौरम्मांना ट्रेलबसमध्ये बसवून दिलं. काय ती बस! किती मोठी आणि आरामशीर तर इतकी की कल्पना करणंही कठीण! पण बसमध्ये अगदीच मोजके प्रवासी होते.

अंबाडा बांधून कासोट्याचं लुगडं नेसलेल्या आणि वर कोट घातलेल्या गौरम्मांकडे अनेकांनी दृष्टी टाकली.

गौरम्मांनी सभोवताली पाहिलं. खिडकीपाशी एक त्यांच्याच वयाची गोरी प्रौढा बसली होती. त्या तिच्यापाशी जाऊन बसल्या. यावरच्या तिच्या प्रतिक्रियेचा मात्र त्यांना धक्का बसला. तिनं त्यांच्याकडे तीव्र निषेध व्यक्त करणारा कटाक्ष टाकला

आणि ती ताडकन उठून दुसऱ्या जागी बसली!

गौरम्मांना कुणी तरी मुस्काटात मारावं तसं झालं. पाठोपाठ त्यांना बेंगळूरात घडलेली एक घटना आठवली.

एकदा दुपारी गौरम्मा सिटी मार्केटच्या बसमध्ये चढल्या. त्यांच्या घरासमोरचा रस्ता झाडणारी मुक्तालम्बाही त्याच बसमध्ये चढली आणि त्यांच्या शेजारची जागा रिकामी असल्यामुळे तिथे येऊन बसली. त्या वेळी गौरम्मांचा संताप शिगेला पोहोचला होता. काय हे! रस्ता झाडणाऱ्या मुक्तालम्बानं आपल्याला खेटून बसण्याइतकी सलगी दाखवायची म्हणजे काय! त्या वेळी त्याही अशाच ताडकन उठल्या होत्या.

या अमेरिकेत मीही मुक्तालम्बाच आहे काय?

तोंडातून अवाक्षर न काढता त्या बाईनं 'मी गोरी- तू काळी' हे वागण्यातून स्पष्टपणे दाखवून दिलं होतं!

गौरम्मांना तीव्रपणे जाणवलं- आपल्याला या क्षणी जे वाटलं, तेच त्या वेळी मुक्तालम्बालाही वाटलं असेल ना! काही झालं तरी या गोऱ्यांशी आपलं जमणं शक्य नाही. आपल्याच विचारांच्या तंद्रीत गौरम्मा खिडकीबाहेर पाहत बसल्या.

शिकॅगोच्या बसस्थानकावर गौरम्मा उतरल्या तेव्हा त्या गांगरून गेल्या होत्या. न्यायला कुणीच आलं नाही तर काय करायचं? आपल्याला भाषाही येत नाही!

अर्धा-एक तास गेला असेल.

'तुम्ही गौरम्मा ना?' अचानक गौरम्मांच्या कानांवर कन्नड शब्द पडले. त्यांनी वळून पाहिलं- पन्नाशीच्या घरातली एक स्त्री त्यांच्याशी बोलत होती.

'होय. तुम्ही?'

'मी वत्सला. पद्मानं फोन करून सांगितलं होतं. ट्रॅफिक जाम झाल्यामुळे अर्धा तास उशीर झाला मला. क्षमा करा.'

दोघीही वत्सलाच्या गाडीत बसल्या. वाटेत गौरम्मांनी आपण होऊन चौकशी केली तेव्हा थोडी माहिती मिळाली.

वत्सलाचं माहेर बीदर. नवरा रुदेश मैसूरचा. इथं येऊन अठ्ठावीस वर्षं झाली होती. कुठल्याशा मोठ्या कंपनीमध्ये ते वरच्या जागेवर नोकरी करत होते.

त्या घरी पोहोचल्या तेव्हा पद्मा त्यांचीच वाट पाहत उभी होती. वत्सलानं त्यांना सोडलं आणि तशीच बाहेरच्या बाहेर निघून गेली.

गौरम्मांना पाहताच पद्माला समाधान वाटलं. ती बोलू लागली,

'तुम्ही याल की नाही असं वाटलं होतं! जमुना काय म्हणेल असं वाटलं होतं. मला तर खूप भीती वाटते!'

'बाळंतपणाला एवढं काय घाबरायचं बाईच्या जातीनं? आमची नाही का बाळंतपणं झाली? आता तर मीही आलेय ना!'

दोघी घरात आल्या. पद्मा म्हणाली, 'तुमचा काळ वेगळा होता. देशही वेगळा होता. त्या वेळी घरात कितीतरी मोठ्या बायका असायच्या. इथं आम्हीच घुबडासारखे राहत असतो ना! कुणाचीच सोबत नसते.'

'पद्मा, घरी फोन करून मी येऊन पोहोचल्याचं चंद्रूला कळवता का? त्यानं अगदी बजावून सांगितलंय.'

पद्मानं लगेच चंद्रूला फोन करून गौरम्मा पोहोचल्याची बातमी कळवली.

पद्माच्या मुलाचा विकासचा ताप उतरला असला तरी चेहरा सुजला होता.

'डॉक्टरांनी असलेलीच औषधं सुरू ठेवायला सांगितलंय. इथून दहा मैलांवर त्यांचं शॉप आहे. मलाच गाडी चालवायला हवी ना! पोटात दुखल्यासारखं होतं.'

'तुमच्या यजमानांच्या ऑफिसमधला शिपाई असेल ना! त्याला तात्पुरतं घरी झोपायला बोलवायचं.'

'इथं तशी पद्धतच नाही ना! प्रत्येकजण आपापल्या कामांमध्ये गुंतलेला असतो. प्रकृती ठणठणीत असताना इथं राहावं बघा! प्रकृतीच्या अडचणी असतील तर कुणीही मदत करायला येत नाही. कुणालाही वेळ नसतो इथं!' दुखावलेली पद्मा मोकळेपणानं बोलत होती.

गौरम्मांनी लवकरच स्वयंपाकघराचा ताबा घेतला आणि आजारी विकाससाठी काढा उकळायला ठेवला. पद्मानं विचारलं, 'काय हे? कुणासाठी?'

'तुझ्या आजारलेल्या विकाससाठी. आम्ही आमची मुलं अशीच वाढवली आहेत. हवं तर उद्या डॉक्टरांकडे घेऊन जाऊ या.'

मुलाला काढा पाजत पद्मा म्हणाली, 'अपॉइंटमेंट असल्याशिवाय हे शक्य नाही.'

एवढ्यात फोन वाजला. राजीवचा फोन होता. फोनवर बोलल्यानंतर पद्माचा चेहरा आणखी उतरला.

'माझे सासरे वारले! आता आणखी पंधरा दिवस त्यांना येता येणार नाही म्हणत होते. तुम्ही आल्याचं सांगितलंय त्यांना. तुम्हीच सांगा, इथं दिवस भरलेल्या बायकोला टाकून गेलेत! त्यांना समजायला नको काय?'

'अगं, पण मुलानंच अंत्यविधी केले पाहिजेत ना! ते त्यांचं कर्तव्य नाही काय?'

'पण जिचा हात धरलाय, त्या बायकोच्या संदर्भातही कर्तव्ये नाहीत काय? तुम्ही बघताय- घरात आजारी मूल- मी अशी! तुम्ही आहात म्हणून ठीक आहे. नाही तर माझे किती हाल झाले असते!'

दोनेक दिवसांत विकास बरा झाला. त्याला घेऊन दवाखान्यात जाताना पद्माच गाडी चालवत होती. जाताना गौरम्मा काळजीयुक्त स्वरात म्हणाल्या, 'सावकाश

चालव गाडी! आधीच गर्भारशी तू!'

'इथं तसं चालत नाही, अम्मा! रस्त्यावरून अमुकच वेगानं गेलं पाहिजे असा कायदा आहे!!' पद्मा म्हणाली.

पद्मासाठी गौरम्मा दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या कोशिंबिरी, खिरी आणि इतर खाद्यपदार्थ करत होत्या. मधूनच काढे पाजत होत्या. इतरही खाद्यपदार्थ करून तिला कौतुकानं वाढत होत्या, आग्रह करत होत्या.

एकदा त्या उत्साहानं म्हणाल्या, 'मला बोलवायला त्या वत्सला नावाच्या बाई आल्या होत्या ना? त्यांना आणि त्यांच्या घरच्यांना बोलाव हवं तर! मी खाणं-पिणं करेन.'

'वत्सला शक्यतो कुणाच्याही घरी जात-येत नाही.'

'का?'

'ती एक मोठीच कथा आहे. वत्सलाचे आई-वडील खेड्यात राहायचे म्हणे. वत्सला हुशार असूनही तिच्या आई-वडिलांनी तिचं लवकर लग्न लावून दिलं. तिला शिक्षणाची खूप आवड. इथं येऊन ती शिकली.'

'त्रास झाला असेल पण!'

'होय ना! त्या वेळी इथं इतके भारतीयही नव्हते. मुलाला बेबी-सिटिंगमध्ये ठेवून रात्रं-दिवस अभ्यास केला. घरचं सगळं करून. नंतर मात्र चांगली नोकरी लागली.'

'किती मुलं तिला?'

'एकच मुलगा आहे. अशोक त्याचं नाव. पण-'

'का? काय झालं? संसारात किरकोळ खटके उडाले की संसारच मोडतात इथं! तसं काही झालं का?'

'छे:! तसं काही नाही. तुमची काही तरी चुकीची समजूत झाली आहे. वत्सलेचे यजमान रुद्रेश अतिशय चांगले गृहस्थ आहेत. नवरा-बायको परस्परांशी अत्यंत प्रेमानं राहतात. दोघांनीही इथं चांगलं नाव कमावलं. राजवाड्यासारखी चार घरं आहेत त्यांची. घरात चार गाड्या आहेत. भरपूर पैसा मिळवलाय त्यांनी.'

'मग त्रास कसला आहे?'

'अशोकचाच त्रास! तो लहान असताना त्याला सांभाळण्यासाठी वत्सलानं घरी एक नोकर ठेवला होता. काम मात्र सोडलं नाही. आणखी मूल झालं तर सांभाळायचा त्रास होईल म्हणून मूल होऊ दिलं नाही. त्यामुळे अशोक एकटाच वाढला. आई-वडील सतत कामाच्या निमित्तानं घराबाहेर असतात. घरात आजोबा-आजी किंवा आणखी कुणी नसतं. येणारी-जाणारी आत्ते-मामे-मावस-चुलत भावंडं नाहीत. तो

सोळाव्या वर्षीच घराबाहेर पडला.'

'काही भांडण झालं काय?'

'झाल्याशिवाय कसं राहील? वाईट मित्रांच्या नादानं त्याला ड्रग्सचं व्यसन लागलं. पिणंही आहेच. घरात इटालियन, स्पॅनिश, कोलंबियन अशा वेगवेगळ्या संस्कृतीच्या आणि भाषांच्या लोकांची वर्दळ असल्यावर कशी चांगली संस्कृती राहणार? घरात मोठी माणसं असली की मुलं चांगल्या सवयी शिकतात.'

'अगदी खरंय बाई तुझं! आमचा हर्ष- तुला सांगते, आजोबांची पूजा झाल्याशिवाय दूध पीत नाही!' गौरम्मांच्या अंतर्मनाच्या कोपऱ्यातून नातवाची आठवण वेगानं वर आली.

'आधी या दोघांच्या ते लक्षातच आलं नाही' पद्मा पुढे सांगत होती, 'नंतर घरातले पैसे अदृश्य होऊ लागले तेव्हा संशय आला. मग मात्र एक दिवस पाळत ठेवून त्यांनी मुलाला पकडलं. भांडण झालं.'

'दोन दणके द्यायला हवे होते!'

'इथं तसं करता येत नाही. आई-वडिलांनी मुलांना छळलं तर मुलं पोलिसात तक्रार देतात. मुलगा घर सोडून गेल्यापासून वत्सलेची मात्र रयाच गेली आहे. तिनं कुठं जाणं-येणंच सोडून दिलंय.'

'वत्सलेचे किंवा रुद्रेशचे आई-वडील इथं असते तर मुलगा इतका हाताबाहेर गेला नसता असं वाटतं.'

'वय झालेलं कोण अखेरपर्यंत इथं राहायला येणार? तुम्ही याल? इथंच कायम राहाल? हेच सगळ्यांच्याही बाबतीत होतं. ते बिदरचे जमीनदार. तिथलं घर-शेत सोडून इथं कशाला येतील? रुद्रेशचे आई-वडील तर इथं येऊन जायलाही तयार नाहीत. तिथं असलेल्या मुलगा-सुनेशी त्यांचं व्यवस्थित पटतं. त्या सुनेवर त्यांचं मुलीसारखं प्रेम आहे. इथली ही सून कामावर निघून गेली की त्यांनी दिवसभर काय करायचं?'

'वत्सला घरातच असती तर असं झालं नसतं की काय कोण जाणे!'

'तसंही म्हणता येणार नाही. वत्सलेची मन:स्थितीही आपण समजू शकतो. परदेशातला जावई मिळतो म्हटल्यावर लग्न लावून दिलं जातं. पण प्रत्यक्ष मुलीची काय इच्छा आहे हे पाहिलं जात नाही. आपल्या समाजात मुलीही ठामपणे आपला विरोध व्यक्त करत नाहीत. ती इथंच जन्मली असती तर हवं तसं शिक्षण घेऊन मनाचं समाधान होईपर्यंत नोकरी करून त्यानंतर तिनं लग्न केलं असतं. मूल झाल्यावर चार-सहा वर्षं नोकरी सोडून घरी राहिली असती. नंतर पुन्हा नोकरी केली असती. पण आपल्या देशातून आलेल्या वत्सलेच्या मनात सतत अस्थैर्याची भावना असते. अगदी मुळंच रोवली आहेत तिच्या मनात! बघा ना सगळं कसं होऊन

बसलंय!'

पद्मा या देशातली सुख-दुःखं आणि रीति-नीतिविषयी विस्तारानं सांगत होती. तिच्याशी बोलताना गौरम्मांना कितीतरी गोष्टी समजत-उमजत होत्या.

'असं असेल तर पद्मा, तू का भारतात यायचा विचार करत नाहीस? तुला राग नाही येत ना माझ्या बोलण्याचा?'

'नाही. हा प्रश्न मी स्वत:ही स्वत:ला अनेकदा विचारला आहे.'

'मग? का येत नाही?'

'मला माझ्या सासरचं घर मुळीच आवडत नाही. माझ्या सासूबाई सोवळ्या-ओवळ्याच्या नावाखाली प्रचंड वैताग देतात. राजीव हा त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. आम्ही भारतात परतलो तर आम्हांला एकत्रच राहावं लागेल. त्यांच्या दृष्टीनं आम्ही श्रेष्ठ! कुणातही मिसळायचं नाही. महिन्याची अडचण आली की तीन दिवस बाहेर! शिवाय तिथं आम्हाला ढीगभर नातेवाईक आहेत. तिथं गेल्यावर आमचं घर, घर न राहता, धर्मशाळा होऊन जाईल! माझी आई एका कॉलेजची प्रिन्सिपॉल आहे. आम्हाला तिनं भरपूर शिक्षण दिलं. माझी छोटी बहीण इंग्लंडमध्ये डॉक्टर आहे. तिनं पंजाबी तरुणाशी लग्न केलं आहे. भाऊ दिल्लीत असतो. त्यानं तमिळ मुलीशी लग्न केलं आहे. माझी आई कुणावर कसलंही दडपण आणत नाही. तिथं सोवळ्या-ओवळ्याचं नावही नाही. अशा घरातून मी आले! आणि मला असल्या सासूबरोबर राहावं लागेल! तुम्हीच सांगा, हे कसं जमेल?'

'तुझ्या सासूबाई इथं आल्या नाहीत?'

'विकासच्या जन्माच्या वेळी तिकीट पाठवतो- या म्हटलं तर म्हणाल्या, सप्तसागर ओलांडायचे म्हणजे गोमूत्र आणि गंगाजलानं शुद्धी व्हायला हवी. विमानातून न्यायला देतील काय? शेवटी राजीवनंच नको म्हणून कळवलं.'

सारे ऐकता-ऐकता गौरम्मांच्या अज्ञानाच्या अंधारात प्रकाश-किरणांचा प्रवेश होत होता. त्या किरणांमुळे त्यांना अमेरिकेतील कुटुंबांच्या समस्यांची जटिलता नजरेसमोर येत होती.

प्रत्येकाची स्वतंत्र अशी एकेक समस्या दिसत होती आणि त्यातून मार्ग काढण्याची जबाबदारी प्रत्येकाचीच दिसत होती.

'इथं किती वर्षं राहणार आहात?' गौरम्मांनी विचारलं.

पद्मा म्हणाली, 'कायम इथंच राहायचं आता! माघारी जायचं नाही: मुलं मोठी झाली की इथल्यासारखीच होतात. मुलं वेगळी राहायला लागतात. त्याला उद्धटपणा म्हणत नाहीत. पिल्लाचे पंख बलिष्ठ झाले आहेत, त्याला स्वातंत्र्य हवं-असं त्याकडे बघितलं जातं. आई-वडील कितीही श्रीमंत असले तरी मुलं कुठं तरी नोकरी करून पैसे मिळवतात आणि स्वत:चं शिक्षण घेतात. आपल्यासारखे ते

आई-वडिलांच्या संपत्तीत वाटा मागत नाहीत.'

गौरम्मा चकित झाल्या. 'होय? आणि आई-वडील म्हातारे झाल्यावर?'

'वृद्धाश्रमात राहतात. त्यांच्या वयाच्या वृद्धांबरोबर राहतात. बहुतेक वेळा आपली मिळकतही अशाच आश्रमांना देऊन टाकतात.'

गौरम्मांना विनितेची आठवण झाली. स्तनात गाठ आली तेव्हा मुलीसारखी तिनं आपली सेवा केली! त्या वेळी तिनं आपल्यासाठी गोकर्णाची ट्रीपही कॅन्सल केली होती.

कुठं आपलं घर आणि कुठं वृद्धाश्रम! त्यांना तीव्रपणे बेंगळूरच्या आपल्या घराची आठवण झाली.

त्याच रात्री पद्माच्या पोटात दुखू लागलं. खरं तर बाळंतपणाची तारीख आणखी आठवड्यावर होती. पण तेवढा वेळ जाण्याची लक्षणं नव्हती.

गौरम्मा उठल्या तेव्हा पद्मा विव्हळत आपली किट्-बॅग भरत होती. गौरम्मांनी पुढं होऊन म्हटलं, 'दे इकडं. मी भरते.'

'नको. मीच भरते. म्हणजे कुठं काय आहे ते माझं मला सापडेल.'

तरीही तिचं विव्हळणं सुरूच होतं. न राहवून गौरम्मा म्हणाल्या, 'कुणाला तरी फोन करून बोलावून घे. हॉस्पिटलपर्यंत पोहोचवायला सांग.'

'मी हॉस्पिटलच्या ॲम्ब्युलन्सला फोन केला आहे. एवढ्यात येईल.'

गौरम्मांनी आपल्या पद्धतीनं सांगितलं, 'तू आपली कमरेवर आणि ओटीपोटावर गरम पाणी घे. तेवढीच लवकर सुटका होईल.'

'नको-नको! हॉस्पिटल बरंच लांब आहे. त्यामुळे थोडा वेळ लागला तर हवाच आहे.'

तिच्या वेदनेने व्याकूळ झालेल्या गौरम्मा म्हणाल्या, 'थांब, तुला कॉफी करून देते, की कषाय करून देऊ?'

'नको. डॉक्टरांनी सांगितलंय काहीही प्यायचं नाही.'

गौरम्मांना पुढं काय बोलावं ते सुचेना. त्यांचा एवढ्या वर्षांचा अनुभव इथं निरुपयोगी ठरत होता. त्यांच्या भारतात अत्यंत मौल्यवान वाटणाऱ्या अनुभवाच्या सूचना इथं निष्प्रभ ठरत होत्या. त्यांनी देवापुढे दिवा लावला आणि मनापासून प्रार्थना केली, 'देवा, पद्माची आणि पोटातल्या बाळाची सुखरूपपणे सुटका कर!'

'पद्मा, आणखी कुणाला फोन करू का?'

'नको. डिलिव्हरी झाल्यावर मीच तुम्हाला फोन करून कळवेन.'

ॲम्ब्युलन्सचा आवाज ऐकून पद्मा बाहेर आली. निघताना ती गौरम्मांना म्हणाली, 'देवापुढच्या दिव्याकडे लक्ष ठेवा! हे लाकडी घर आहे!'

'पद्मा, तू घराविषयी किंवा मुलाविषयी अजिबात काळजी करू नकोस. निश्चित

मनानं जाऊन ये!' त्यांनी सांगितलं.

त्या वेदना सहन करतानाही मंद हसत पद्मा निघाली.

हे सगळंच गौरम्मांच्या दृष्टीनं विचित्र होतं. बाळंतपणाच्या वेळी घरातल्या आणि शेजारपाजारच्या प्रौढ स्त्रिया त्या तरुणीला कितीतरी प्रकारे मदत करतात हे त्यांना ठाऊक होतं.

सासवा-सुनांमध्ये एरवी कितीही तेढ असली तरी सुनांच्या बाळंतपणाच्या वेळी रात्रभर सासवा हॉस्पिटलात जाग्या बसून राहतात!

एवढ्या समृद्ध देशामध्ये गर्भारशी कशी अनाथ असल्याप्रमाणे एकटीच दवाखान्यात गेली! तिच्या सोबत जाण्यासाठी कुणालाही वेळ नाही. सगळे आपापल्या कामात गढले आहेत. कामात गढून जाणं याच गुणामुळे हा देश एवढा पुढे गेला आहे. पण याच एकलेपणामुळे अनेक मनोरुग्णही झाले आहेत. एकाच देशाचे दोन चेहरे हे!

त्या विकासच्या शेजारी झोपल्या असल्या तरी त्यांचं मन जड झालं होतं. कारण त्यांनी कितीही नको म्हटलं तरी विनितेच्या बाळंतपणाची आठवण त्यांच्या मनात घेरून टाकत होती.

बाळंतपणासाठी विनिता धारवाडला गेली होती. त्या वेळी आपण तरी तिला 'इथंच थांब. मी बाळंतपण करते' म्हणून आश्वासन दिलं नव्हतं. सुरभीच्या लग्नाचं निमित्त असलं तरी जमुनेनं मन व्यापून टाकल्यामुळे आपण तसं वागल्याचं आता मन स्पष्टपणे सांगत होतं.

एवढ्यात पद्माचा फोन आला. आठवणींमधून स्वत:ला बाहेर ओढून त्यांनी फोन उचलला.

'मुलगा झालाय. दोघंही छान आहोत. नॉर्मल डिलिव्हरी. एव्हाना राजीवला आणि चंद्रूला कळवलंय मी.'

'मी केव्हा येऊ? दुपारी की रात्री?'

'मी टॅक्सी ठरवली आहे. संध्याकाळी ती घरी येईल तेव्हा विकासला घेऊन या. विकासलाही त्याला भाऊ झाल्याचं सांगा.'

पद्मा आणि राजीव यांना बरेच मित्र-मैत्रिणी असल्याचं गौरम्मांना ठाऊक होतं. पण आज वर्किंग-डे असल्यावर ते कसे येतील? इथं काही आपल्यासारखी भरपूर रजेची सोय नसते. वर्षाकाठी केवळ दहा दिवस रजा असते. आपल्या कुटुंबातल्या अडीअडचणी आणि भारतात जाणं यासाठी ती अत्यंत सांभाळून वापरावी लागते.

जर पद्मा शनिवारी किंवा रविवारी बाळंत झाली असती तर कदाचित सगळे स्नेहीजन तिच्या मदतीला आले असते!

तिसऱ्या दिवशी पद्मा छोट्या विनितबरोबर घरी आली. गौरम्मांनी आरती

ओवाळून तिचं आणि बाळाचं स्वागत केलं. थोड्याच वेळात पद्मा त्यांना घरकामात मदत करण्यासाठी आली तेव्हा गौरम्मांनी तिला सांगितलं,

'इथं ही गोष्ट सर्वसामान्य मानली जात असेल, सगळे असंच वागत असतील- पण मी इथं असेपर्यंत तू काम करू नकोस. ओल्या बाळंतिणीनं काम करणं मला तर बघवत नाही.'

जमुनाचा फोन आला, 'आणखी दोन दिवसांत राजीव येणार म्हणून समजलं. इथं मलाही खूप ताण पडतोय. लवकर याल का?'

पद्माला घरी येऊन आठ दिवस झाले होते. पद्माही म्हणाली, 'खरंय! जमुनाला किती त्रास होत असेल याची मला कल्पना आहे. तुम्ही इतके दिवस थांबून माझं बाळंतपण केलं. तुम्ही कितीही दिवस राहिलात तरी मला हवंच आहे!'

गौरम्मा निघाल्या. पद्मानं त्यांना तीनशे डॉलर दिले. त्यांनी कितीही नको म्हटलं तरी ती म्हणाली, 'बेंगळूरला गेल्यावर एक छान साडी घ्या. त्या वेळी माझी आठवण काढाल काय?'

पद्माला भावनावेग अनावर झाला. गौरम्मांनाही रडू आलं. गेल्या काही दिवसांत त्यांचे तिच्याशी दृढ स्नेहसंबंध जुळले होते.

या वेळी हरबऱ्याची डाळ लवकर संपली होती. कदाचित आल्या-गेल्यांचा चांगल्याप्रकारे पाहुणचार झाल्यामुळे! आधी जमुना कामावर जायची, नंतर चंद्रूच्या जाण्याची वेळ होती.

गौरम्मांनी सांगितलं, 'चंद्रू, तू येताना हरभऱ्याची डाळ आणशील काय? उडदाचीही डाळ तू घेऊनच ये. थोडीच राहिली आहे.'

'अम्मा, माझा ऑफिसचा रस्ता आणि इंडियन स्टोअरचा रस्ता वेगवेगळा आहे. पण गुरुवारी माझं इंडियन स्टोअरच्या रस्त्यावर काम असतं. तू लिस्ट कर.'

नंतर तो म्हणाला, 'अम्मा, तूही बरोबर चल. म्हणजे तुला हवं ते सामान घेता येईल.'

'मानसीला घरात ठेवून बाहेरून कुलूप लावून जायचं काय? नाही तरी ती झोपली आहे.'

'बाप रे! असं करणं या देशात कायद्यानं गुन्हा आहे! मुलांना घरात एकटं ठेवायचं नाही.'

'मग काय करायचं?'

'माझी मिटिंग फक्त तासाभराची आहे. तू तुझी खरेदी उरक. त्यानंतर तुम्हाला मी घरी आणून सोडेन.'

'तुलाच उलट-सुलट फेरा पडेल ना! ड्रायव्हिंगही भरपूर होईल.'

'अम्मा, अमेरिकेत दहा-पंधरा मैल म्हणजे काही फार अंतर नाही.'

बाँबे ग्रोसरी छोटंसं दुकान होतं. मागं चित्राबरोबर त्या एकदा आल्याचं त्यांना आठवलं. याहून मोठी किराणा मालाची दुकानं इतर मोठमोठ्या गावांत होती. काही ठिकाणी तर 'लिटिल इंडिया' म्हणून वेगळा विभागही होता. भारतीय साड्या, सलवार-कमीज, दाग-दागिने, बांगड्या, खाद्यपदार्थ मिळणारी मोठमोठी दुकानं! पण घाई-गडबडीत काही हवं असेल तर मात्र जवळपासचे भारतीय याच दुकानात यायचे. हेही दुकान चाललं पाहिजे ना!

मानसी प्राममध्ये झोपली होती. गौरम्मा सामानाची यादी घेऊन काउंटरपाशी आल्या. त्यांना इंग्लिश थोडं-फार समजत होतं. पण सावकाश बोललं तर! यादी कन्नडमध्ये होती.

'चंद्रू, उडदाच्या डाळीला इंग्लिशमध्ये काय म्हणतात रे?'

काउंटरजवळ उभ्या असलेल्या बाईच्या हे कानावर गेलं. ती म्हणाली, 'मला कन्नड येतं. इकडं या!'

चंद्रूला हसू आलं. कन्नड भाषा कानावर पडताच गौरम्मांचा चेहरा सुपाएवढा झाला. अरे! इथंही कन्नड बोलणारं भेटतं ना!

'मग मला काळजी करायचं कारण नाही. मी निघतो. येईन तासाभरानं.' असं सांगून चंद्रू निघून गेला.

सकाळची दहाची वेळ होती. वारही सुट्टीचा नव्हता. त्यामुळे गर्दी बेताचीच होती. असलेली एक-दोन माणसंही निघून गेल्यावर दुकानात दोघीच राहिल्या.

गौरम्मांनी आपलेपणानं हसत विचारलं, 'तुमचं नाव?'

'माझं नाव आशा पाटील. मी कोल्हापूरची. माझी आई अक्कलकोटची. त्यामुळे कन्नड येतं. फारशी सवय नाही. त्यात मराठी मिसळलेलं कन्नड आमचं.'

गौरम्मांना यातला फारसा तपशील समजला नाही. तरी त्या म्हणाल्या, 'कुठली का असेना, कन्नड भाषा आहे ना!' त्यांच्या आवाजातला आनंद लपत नव्हता.

'या बसा. चहा करते.'

ही आशा पाटील पस्तिशीची असावी. चुणचुणीतपणा तिच्या प्रत्येक हालचालीतून दिसत होता. गौरम्मा चकित होऊन तिकडे पाहत होत्या. एकीकडे कॉडलेस फोन घेऊन चहा करणं, काउंटर पुसणं, गणेशाच्या चित्राभोवती उदबत्ती ओवाळणं चाललं होतं.

गौरम्मांच्या यादीप्रमाणे आशानं पटापट सामान बांधून दिलं. केवळ पंधरा मिनिटांत सगळं काम झालं.

गौरम्मांच्या मनात कुतूहल दाटून आलं-ही एकटी बाई कसं काय दुकान सांभाळते?

त्यांनी विचारलं, 'एक विचारू? राग मानणार नाहीत ना?'
निवांतपणा असल्यामुळे आशाही म्हणाली, 'विचारा.'
'तुम्ही एकट्याच दुकान आणि घर कसं काय सांभाळता?'
आशा खदखदून हसली.
'माझं लग्न झालंय. नवरा दोन वाजता येईल. मग मी घरी जाते. खाद्यपदार्थ तयार करते.'
'म्हणजे?'
'इथं तुम्ही पाहताय ना? या पातळ चपात्या मी स्वत: घरात करते. दररोज शंभर-दोनशे, किंवा ऑर्डर असेल तशा करते. समोसे करते. कटलेट करते.'
'भरपूर कष्ट आहेत ना?'
'आहेत. पण फुकट काय मिळतं जगात? कुठं तरी कष्ट करावेच लागतात.'
'होय. तेही योग्यच आहे म्हणा! तुम्हाला इथं येऊन किती वर्षं झाली?'
'दहा वर्षं होऊन गेली बघा!'
'भारताची आठवण येत असेल ना!'
'आठवण येते-पण तिथं जावंसं वाटत नाही.'
'का?'
'दहा वर्षांत एकदाही गेले नाही. माझे आई-वडील एकदा येऊन गेले.'

अपरिचितांपुढे आपल्या आयुष्याविषयी काय सांगायचं असा विचार करून आशा गप्प झाली. गौरम्माही गप्प बसल्या. एवढ्यात चंद्रूही आला. निघताना आशानं भारतीय इंग्लिशमध्ये चंद्रूला सांगितलं, 'तुम्ही पुन्हा एकदा तुमच्या आईला घेऊन या.'

पुढं हीच पद्धत पडली. दर गुरुवारी चंद्रू त्यांना बाँबे स्टोअर्समध्ये उतरवू लागला. काही विकत घ्यायचं असो वा नसो, गौरम्मा आशाबरोबर गप्पा मारत बसायच्या.

हळूहळू त्या दोघींचा स्नेह जुळला. दोघींनाही एकमेकींचे स्वभाव आवडले.
एकदा गप्पा मारताना आशा म्हणाली,
'तुम्ही मागं विचारलं होतं, आम्ही इंडियाला का गेलो नाही म्हणून!'
'होय. पण मी तुम्हाला मनस्ताप दिला असावा हे विचारून! कारण तुम्ही त्यावर काहीच उत्तर दिलं नाही.'
'तसं नाही. माझी कथाच वेगळी आहे. सगळ्यांसमोर काय म्हणून सांगू? म्हणून गप्प राहिले.'
'मीही आग्रह केला नाही.'
'आता सांगते. आई अक्कलकोटची आणि वडील सांगली-कोल्हापूरकडचे.

तालुक्याच्या गावात आम्ही राहत होतो. धड शहर नव्हे, धड खेडं नव्हे अशा गावात. घरात कन्नड बोलत होतो आणि घराबाहेर मराठी. लिहिणं-वाचणं मराठी.'

'असू दे! कुठली भाषा झाली म्हणून काय झालं?'

कथेचा धागा पकडून ती पुन्हा सांगू लागली,

'मी फक्त मॅट्रिक झाले होते. माझ्या पाठीवर दोन भाऊ होते. घरची परिस्थिती अगदीच सामान्य. गावातल्याच एका गौड घरातलं स्थळ आलं. मुलाचा मुंबईला स्वत:चा धंदा आहे म्हणून सांगितलं होतं. मुंबईला चौकशी करणारं कुणीच नव्हतं. ते बघायला आले. मुलगा काही फार बोलला नाही. मीही बोलले नाही. पंधरा दिवसांच्या आत लग्न झालंदेखील!'

'तुमच्या यजमानांचं नाव?'

'अशोक पाटील. मी मुंबईला गेले. तिथं पाहिलं तर काय! चाळीत एवढंसं घर. घरात भरपूर माणसं. दोन नणंदा. दुष्ट राक्षसिणीसारखी सासू. तोंडाला येईल तसा, आरडा-ओरडा करणारा सासरा, आईच्या कह्यात असणारा नवरा.'

तिच्या चेहऱ्यावरचं चिरंतन हास्य नाहीसं होऊन त्यावर विषाद दिसत होता.

'मी खेड्यात वाढले होते. शेत-मळा, मोठी-मोकळी जागा आणि घर. स्फटिकासारख्या पाण्याची परसात विहीर. थंडगार निंबाच्या झाडाखाली वाढले मी. तिथलं खुराड्यासारखं घर, सतत किंचाळणारा रेडिओ-टी.व्ही. घरात सुनेचं स्थान मोलकरणीचं. नवऱ्याबरोबर चार शब्द बोलायची सोय नाही.'

'तुमचे यजमान कसला धंदा करायचे?'

'छोटीशी चहा-पावाची हातगाडी होती. त्यालाच 'बिझनेस' असं गोंडस नाव दिलं होतं! आपल्या देशात कुणाच्याही शब्दावर विश्वास ठेवू नये बघा! हजार खोटं बोलून एक लग्न ठरवावं म्हणतात- पण एवढं दुसरं कुठलंही पाप मोठं नाही असं मला वाटतं.'

गौरम्मांच्या मनात सुरभीच्या लग्नाची आठवण तरळून गेली.

'मला तर माहेरीही गाढवासारखं राबायची सवय होती. तरीही इथं दिवस-दिवस राबून कामंच संपत नव्हती. माझ्या राक्षसिणी नणंदा माझ्या साड्या नेसून मिरवायच्या आणि वर मलाच शिवीगाळ करायच्या. आता विचार करताना वाटतं, बिचाऱ्या! त्यांचीही लग्नाची वयं झाली होती. घरातल्या परिस्थितीमुळे त्याही बिथरत असतील कदाचित!'

'हं-'

'अशा परिस्थितीत माझ्या विनयचा जन्म झाला. मी कपडे धुताना आणि स्वयंपाक करताना एकच स्वप्न बघत होते. माझं घर असावं, त्यात आम्ही दोघं आमची मुलं. आईसारखी प्रेम करणारी सासू, मैत्रिणीसारख्या नणंदा, घराभोवती

स्वच्छ हवा आणि हिरवीगार बाग, शांत वातावरण!'

'पण तुमच्या भोवतालचं वातावरण तर-'

'होय! अगदी माझ्या स्वप्नाविरुद्ध होतं ते. त्यामुळे माझं मन अधिकाधिक स्वप्नातच रमू लागलं. त्यामुळे माझ्या हातून नेहमीसारखं कामही व्हायचं नाही. संतापलेली सासू अनेकदा डोक्यावर भांडी आदळायची.'

गौरम्मांच्या डोळ्यांसमोर ते दृश्य तरळून गेलं. त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेली आशा सांगत होती.

'सासूच्या छळामुळे माझी स्वप्नं कमी न होता वाढतच राहिली. वास्तव जगात राहण्यापेक्षा स्वप्नांच्या दुनियेतच मी जास्त वेळ राहत होते. मला त्या वेळी कशातही रस राहिला नव्हता. कुणाशी बोलणं नको, स्नेह नको, जेवण-खाण नको! मी आणि माझी स्वप्नं बस्स!'

गौरम्मांना हे आकलन करून घेण्यालाही कठीण होत होतं.

'किती दिवस असं चाललं होतं?'

'किती तरी महिने. तेव्हा माझं माझ्या विनयकडेही लक्ष नव्हतं. एकदा तर सासूबाईंनी संतापानं मला डागलंदेखील!' बाही वर सारून आशानं सासूच्या क्रूरपणाचा पुरावा दाखवला.

गौरम्मा घाबरून गेल्या.

सासू-सूनेचं नातं उंदरामांजरासारखं असतं हे त्यांनाही ठाऊक होतं. त्याला स्थल-कालाचं बंधन नाही हेही त्या मानत होत्या. पण तरीही स्त्रीच स्त्रीशी एवढ्या शत्रुत्वानं वागू शकते?

गौरम्मांकडे आशाचं लक्ष नव्हतं. ती आपली कथा पुढं सांगू लागली.

'एकदा माझे बाबा सहज म्हणून मला भेटायला आले. माझी परिस्थिती बघून त्यांचा जीव कळवळला. आमच्या गावचा एक मुलगा डॉक्टर होता. त्याला भेटून ते खूप रडले म्हणे. शेवटी तोच आमच्या घरी आला. माझ्या यजमानांना त्यानं सांगितले, हिला मनोरोग झालाय.'

गौरम्मांच्या भुवया उचलल्या गेल्या. 'होय?'

मनोरुग्ण म्हणजे वेड एवढंच ठाऊक असल्यामुळे त्यांची ती प्रतिक्रिया होती.

'पण माझ्या यजमानांनी माझ्या बायकोला काहीही झालं नाही असं सांगून त्याला पिटाळून लावलं.'

'पुढं?'

'पुढं काय! दररोज कोपऱ्यात रडत बसणाऱ्या बायकोला बघून तेही कंटाळले. शिवाय बायकोचा कामालाही उपयोग होईनासा झाला ना! मग सासूही आरडा-ओरडा करू लागली. आपल्या सरकारनं एकच बायको करायचा कायदा केला ते

बरं झालं! नाहीतर एवढ्या अवधीत मला नक्की सवत आली असती!'

'अय्यो!'

'शेवटी पुन्हा एकदा बाबा आले आणि मला तीन मुलं आहेत असं समजून हिला कायमची सांभाळेन असं सांगून मला माहेरी घेऊन आले. मेंटल हॉस्पिटलमध्येही दाखवलं.'

'लवकर गुण आला?'

'लवकर कसला? दोन वर्षं लागली त्यासाठी. औषधं, गोळ्या एक-ना दोन! डॉक्टरांनी सांगितलं, सगळंच हिच्या मनाविरुद्ध होत गेल्यामुळे ही अशी झाली आहे. हिला पुन्हा सासरी पाठवू नका, म्हणूनही त्यांनी सांगितलं. मी आणि विनय माहेरीच राहू लागलो.'

'मग इथं कशा आला?'

'आमच्या बाबांचे एक गुजराथी मित्र होते. त्यांना न्यूयॉर्कमध्ये किराणा मालाचं दुकान आणि हॉटेल काढायचं होतं. विश्वासू जोडप्याची त्यांना गरज होती. स्वयंपाक करावा लागणार होता. हिशेबही पाहायचा होता. माझे बाबा मला आणि माझ्या यजमानांना पाठवायला तयार झाले.'

'तुमचे यजमान तयार झाले?' त्यांनी आश्चर्यानं विचारलं.

'तयार नसायला काय झालं? त्यांनाही डॉलर म्हणजे काय हे ठाऊक होतंच. माझी खडूस सासूही मला 'तूच आमच्या घरची भाग्यलक्ष्मी' म्हणू लागली!'

'आणि तुम्ही?'

'माझं मन पूर्णपणे कोमेजून गेलं होतं. नवऱ्याला सोडायची तर इच्छा नव्हती. दुष्ट सासूच्या हातून सुटका करून घेण्याची सुसंधी वाटली मला ती! देवानंच हा मार्ग दाखवला असं वाटलं मला.'

'भीती वाटली नाही?'

'भीती कसली? एकदा त्या मनोरोगातून फिरून आल्यावर काहीही वाटेनासं झालं होतं. एकदाचे इथं आलो. आमच्या बाबांनी त्यासाठी किती कर्ज काढलं, किती कष्ट काढले, ते सारं पाहिलं तर त्यापुढे माझे कष्ट काहीच नाहीत! माझ्या भावांनी आपल्या वाट्याची जमीन गहाण टाकली!' भावनावेगानं आशाला हुंदका आला. गौरम्मांनी अनुकंपेनं तिला थोपटलं.

भावनावेग आवरून ती म्हणाली,

'आणि इथं कुणी आमच्यासाठी स्वर्गाचे दरवाजे उघडून वाट पाहत नव्हतं. न्यूयॉर्क म्हणजे आपलं मुंबईच म्हणा ना! शरीर स्वयंपाकघरात शिजून निघत असलं तरी मन मात्र शांत होतं. अतिशय कष्टानं एकेक डॉलर साचवू लागलो! एकदाही त्या न्यूयॉर्कमधून बाहेर पडलो नाही. प्रत्येक डॉलर आणि पगार साचवून

बाबांना, शेत सोडवून घेण्यासाठी आणि कर्ज फेडण्यासाठी पाठवत राहिले.'

'तुमचे यजमान गप्प होते?'

'अशोक? आईजवळ असताना आईचं लेकरू होतं. आता बायको बरोबर असताना बायकोचा नवरा! माझं सगळं तो ऐकू लागला. तीन वर्षांत आम्ही सारा व्यवहार शिकून घेतला. त्यानंतर आम्हाला घेऊन आलेल्या गुजराथी भाईंना आम्ही वेगळे होऊ म्हणून सांगितलं.'

'ते रागावले असतील!'

'राग आल्याशिवाय कसा राहील? पण मीच त्यांना नीट पटवून सांगितलं, 'तुम्ही आमच्या दृष्टीनं प्रत्यक्ष देव आहात. पण आम्हीही आमचं जीवन जगायला हवं की नाही?' त्यांनाही ते पटलं. अजूनही आम्ही न्यूयॉर्कमधल्या त्यांच्या दुकानातूनच सामान आणतो. इथं जया म्हणून आहेत ना, त्यांच्या घरी गुढीपाडव्याच्या पूजेच्या वेळीही मी स्वत: यादी तयार करते आणि सामान आणून देते. आम्ही व्यापारात फसवणूक करीत नाही. हे लहान गाव आहे. लगेच नाव बिघडतं. शिवाय फसवणुकीनं कुणी फार मोठाही होत नाही. त्या आकाशातल्या शंकरानं द्यावं, आपण ते झोळीत घ्यावं!'

'आता कसे आहात?'

'फारच छान! देवानं आम्हांला काहीही कमी केलं नाही. आम्ही काही गडगंज श्रीमंत नाही. तरी आमचं छोटंसं घर आहे. घरापुढे बाग आहे. विनय मोकळ्या हवेत खेळतो. माझं ऐकणारा नवरा आहे. सासरचा त्रास नाही. मला त्यानंतर कधीही डिप्रेशन आलं नाही. माझ्या छोट्या घराची मीच मालकीण आहे!'

'आता तुमच्या सासूबाई काय म्हणतात?'

'पैसा पाहिला की लाळ घोटणाऱ्यांची जात त्यांची! सारख्या म्हणायच्या, तुझ्या दुसऱ्या बाळंतपणाच्या वेळी मी येईन. आम्ही त्यांना कधीच बोलावून घेतलं नाही. हं! नणंदांच्या लग्नाच्या वेळी मात्र पैसे पाठवले. त्यांचं पत्र आलं तर पाकीटही न फोडता केराच्या टोपलीत टाकून देते. मला मात्र हा देश म्हणजे स्वर्ग वाटतो!'

तिच्या बोलण्यात सरळपणा होता. तिच्या आवाजातून पदोपदी जीवनाचा उत्साह दिसत होता. तिचा तरतरीतपणा तिच्या हालचालीतून दिसत होता.

गौरम्मा तिच्याकडे लक्ष देऊन पाहत होत्या.

'मी भारतातच राहिले असते तर आतापर्यंत वेडी झाले असते किंवा आत्महत्या करून मोकळी झाली असते! कदाचित सासूचा जीवही घेतला असता! मला ठाऊक आहे, माझ्यासारख्या लक्षावधी बायका तिथं आजही असतील. सासूच्या छळानं विटून जाऊन मरत असतील. सगळ्यांचं माझ्यासारखं सुदैव कुठून असणार?

अरुणभाई गुजराथींच्या रूपानं माझ्या आयुष्यात देव आला. मी इथं आल्यानंतर बाबांचं सारं कर्ज फिटलं, माझ्या नणंदांची लग्न झाली, माझा मनोरोग कुठल्या औषधाशिवाय नाहीसा झाला!'

'तुम्हाला तुमच्या मुलीच्या लग्नाची काळजी नाही वाटत?'

'नाही कशी? ती काळजी सगळ्यांनाच आहे. पण मुंबईमधल्या चाळीत राहणाऱ्या मुली इथल्या मुलींपेक्षा फास्ट असल्याचं मीही पाहते. काहीही झालं तरी मी पुन्हा तिथं जाणार नाही!'

चंद्रूच्या गाडीचा आवाज आला. गौरम्मा उठल्या.

'फार लांबड लावली मी! कंटाळा आला?'

'नाही. डोळे उघडल्यासारखे झाले!' गौरम्मा म्हणाल्या.

गौरम्मांनी त्याआधी कधीही जमुनाच्या बेडरूममधला वॉर्डरोब उघडला नव्हता. कुणाच्या न कळत असले उद्योग करण्याइतका हलकेपणा त्यांच्या स्वभावात नव्हता.

त्या दिवशीही चंद्रूनं ऑफिसला जाता-जाता सांगितलं होतं, 'अम्मा, शर्टचं बटण लावून ठेवशील? वॉर्डरोबमध्ये शर्ट ठेवलाय-'

सतत काम करायची आवड असल्यामुळे गौरम्मा दुपारी काही ना काही काम शोधत असायच्या.

चंद्रूचा शर्ट काढण्यासाठी त्यांनी वॉर्डरोब उघडला आणि तिथं कोपऱ्यात ठेवलेला फोटोंचा अल्बम खाली पडला. त्यांनी तो सहजच उचलला आणि पाहू लागल्या.

तो चंद्रू आणि जमुनाच्या लग्नानंतर लगेच काढलेल्या फोटोंचा अल्बम होता. वेगवेगळ्या गावी ते फिरून आले होते. गौरम्मांना त्याचंही बरंच कौतुक होतं.

अल्ब चाळता-चाळता एका फोटोनं त्यांची नजर खेचून घेतली. नायगरा फॉल्सच्या समोरचा तो फोटो होता. त्या फोटोतल्या जमुनाच्या अंगावरच्या साडीनं त्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं.

सुरभीच्या लग्नात जमुनानं तिला पाच साड्या भेट दिल्या होत्या, त्यांत या साडीचा समावेश होता. होय. त्यांनी आणखी निरखून पाहिलं- नेसलेली साडी तिनं भेट म्हणून- तीही लग्नाचं प्रेझेंट म्हणून दिली होती.

गौरम्मांनी तिथं असलेले सगळे अल्बम बाहेर काढून प्रत्यक्ष फोटो लक्ष देऊन पाहिला. त्यांना वेगळाच शोध लागला. हीच नव्हे, जमुनानं भारतात आणून दिलेल्या सगळ्या साड्या, या ना त्या फोटोत तिच्या अंगावर झळकत होत्या.

अमेरिकेतल्या साड्या विटत नाहीत, कितीही वेळा नेसलं तरी चुरगळत

नाहीत, भोकं पडत नाहीत. त्यामुळे जुनी साडी आणि नवी साडी यातला फरकही कळत नाही. जमुना इथं साड्या नेसून नंतर भारतात येताना त्याच साड्या 'या मी तुमच्यासाठी आणल्या आहेत' असं सांगून देत होती.

हेच सत्य समजून गौरम्माही डॉलर सुनेचं भरपूर गुणगान करत होत्या!

आता मात्र गौरम्मांचं मन कडवट बनलं. नेसलेली साडी एकमेकींना देण्यात गैर नसेलही. पण लग्नासारख्या शुभप्रसंगी देऊन फसवणूक करणं योग्य नव्हे.

जमुनानं चलाखपणे ही फसवणूक केली होती.

आता हा विषय काढून विचारायला गेलं तर ती म्हणेल, 'सुरभीला मी माझी बहीणच मानते. त्यामुळे मी एकसारख्या दोन साड्या घेतल्या होत्या.'

'तर मग तुझी साडी दाखव' म्हटलं तर म्हणेल 'आईकडची जुनी मोलकरीण सारखी साडी मागत होती- तिला दिली मी!'

गौरम्मांना आणखीही आठवलं.

'कस्टम्स'मध्ये अडचण येऊ नये म्हणून मी जुन्या वापरलेल्या साडीसारखी आणली आहे असंही तिनं सांगितलं होतं. वापरलेलीच साडी असल्यावर पुन्हा हे नाटक करायची काय गरज होती?

गौरम्मांना तीव्रपणे वाटलं- आम्ही गरीब असू. आम्हाला अमेरिकेतल्या वस्तूंविषयी आवड असेल- तरीही जुन्या वापरलेल्या साड्या भेट म्हणून घेण्याइतकी वाईट परिस्थिती मुळीच नाही!

गौरम्मांना वाईट वाटलं. यानंतर जमुना किंवा चंद्रूला काहीही आणायला सांगायचं नाही हे त्यांनी मनोमन ठरवलं.

दर आठवड्याला शनिवारी-कन्नड मैत्रिणी एखाद्या ठिकाणी भेटायची जमुना आणि तिच्या मैत्रिणींची पद्धत होती. या शनिवारी मैत्रिणींच्या गप्पा जमुनाच्या घरी ठरल्या होत्या. सगळ्याजणी काही ना काही खाद्यपदार्थ करून घेऊन यायच्या. चार-पाच तास एकत्र राहून गप्पा, गाणी वगैरे करून करमणूक करून घ्यायच्या आणि आपापल्या घरी निघून जायच्या. या गप्पा फक्त बायकांच्याच असत.

जमुनानं सासूला 'तुम्हाला हवा तो खाद्यपदार्थ करा' असं सांगून मोठीच मोकळीक दिली होती! पण अलीकडे गौरम्मा मात्र सारं तिलाच विचारून करायच्या. का कोण जाणे, अलीकडे त्यांना 'हे आपलं घर नाही- जमुनाचं आहे' हे तीव्रपणे जाणवत होतं.

गौरम्मांनी शेवयाचं उप्पिट आणि वडे करून दिले. प्लेटीची तयारी करणं आणि चहा-कॉफीची व्यवस्था करणं जमुनाचं काम होतं.

या मुलींमध्ये आपलं काय काम, असा विचार करून गौरम्मांनी मानसीला

प्रॉममध्ये घातलं आणि त्या फिरायला बाहेर पडल्या. नऊ-दहा महिन्यांची मानसी आता मुकाट्यानं बसून न राहता भरपूर दंगा करायची. गौरम्माही थोड्या अस्वस्थच होत्या. इथं येऊन खूपच दिवस झाले असं वाटून त्यांना पुन्हा-पुन्हा बेंगळूरच्या आपल्या घराची आठवण येत होती.

गौरम्मांना फिरायला जायचा उत्साह वाटेना, तेव्हा त्या निम्म्या रस्त्यावरूनच मागं वळल्या. येता-येता मानसीही झोपी गेली.

घरात गप्पांना ऊत आला होता. त्या दाराजवळ आल्या आणि आपला संदर्भ ऐकताच त्या थबकल्या. जमुना बोलत होती. तिला गौरम्मांची चाहूल लागली नव्हती.

खरं तर गौरम्मांना चोरून ऐकायची कधीच सवय नव्हती. आपलं नाव ऐकून त्यांना वाटलं, जमुना कदाचित आपलं कौतुक करत असेल, वर्षभर राहून आपण इथलं सगळं पाहिलं, त्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करेल. गावी तिला किती मान मिळतो, त्याविषयी सांगेल-

त्या कुतूहलानं ऐकू लागल्या.

'तुम्ही काहीही म्हणा, तुमच्याइतकं शहाणपण मला नाही हे मी मान्य करते! माझ्या पीएच.डी. चा काहीही उपयोग नाही इथं! तुम्ही सासूचं मन पूर्णपणे काबीज केलं आहे!' डॉक्टर सुधा मनापासून म्हणत होत्या.

'होय तर! माझ्या सासूनं मला लिहिलेली पत्रं दाखवेन हवं तर! लेकीसमान असलेल्या जमुनास असा त्या मायना लिहितात. तूच तेवढी माझी सून आहेस असंही त्यांनी मला लिहिलंय.'

'हे तर आश्चर्यच आहे! पण तिथं एक सून आहे ना? तरीही या असं लिहितात?'

'छेः! ती सून यांच्या खिजगणतीतही नाही. फक्त रूप काय कामाचं? अगदी गावंढळ आहे ती. भारतातच राहायची लायकी आहे तिची! तोंड मिटून गाढवासारखी राबत असते- तरीही सासूचा तिच्यावर रागच आहे. माझ्यावर मात्र जीव उतू जातो त्यांचा!'

'नणंद कशी आहे तुमची?'

'अगदी आशाळभूत! प्रत्येक पत्रामध्ये अमूक पाठवा- तमूक पाठवा एवढंच लिहिते. तिचा नवराही तसलाच आहे. त्यांची इथं यायची फार इच्छा आहे. तसं स्पष्टपणे बोलून दाखवलेलं नाही. पण मला ठाऊक आहे- त्यानं याचसाठी तिच्याशी लग्न केलंय. पण मी मात्र अजिबात दाद दिली नाही.'

गौरम्मा चकित झाल्या. म्हणजे हिला सुरेशचा प्लॅन ठाऊक आहे तर! सुरेश चटईखाली शिरलाय तर जमुना रांगोळीखाली शिरली आहे!

जमुना पुढं सांगत होती, 'कॅमेरा हवा, अमूक हवं, तमूक हवं म्हणून भिकाऱ्यासारखे मागत असतात. म्हणून मी तर पत्रच पोहोचलं नाही म्हणून सांगत असते.'

'त्यांना तुमच्यावर संशय येत नाही?'

'छेः! माझ्यावर त्यांचा पराकोटीचा विश्वास आहे. माझ्या जुन्या साड्या त्यांना नव्या म्हणून भेट देते. शंका येऊ नये म्हणून कस्टमची कथा सांगते. अहो, अमेरिकेचं काहीही सांगितलं तरी त्यावर विश्वास ठेवतात! आमच्या सासूबाईंचं काय सांगू! खरं तर त्यांना विनितेबरोबर अखेरपर्यंत राहायचं आहे! पण त्यांचा माझ्यावर जास्त विश्वास! तिच्याविषयी बरं-वाईट सांगत असतात मला.'

'अशा आहेत त्या? कठीण आहे!'

गौरम्मा चांगल्याच दचकल्या. डोळे पाण्यानं भरले.

'होय. लग्नाआधीच मी हे ओळखलं होतं. माझ्या वडिलांचा गहाणवटीचा धंदा आहे ना! पैसा देण्याआधी समोरच्या माणसाची पारख करण्याची कला त्यांना अवगत आहे. नाहीतर दिलेला पैसा पाण्यातच जाईल ना! मीही तो गुण घेतलाय. उटीला दोन दिवस माय-लेकी आल्या होत्या. तेव्हाच मला हे समजलं. माझी सासू आहे गावठी आणि नणंद आहे मूर्ख! जाऊ बावळट! इथं माझंच राज्य राहील हे माझ्या लक्षात आलं. त्यात विनितेला माहेरचा आधार नाही. पैशाचं पाठबळ नाही. नवरा बँकेत क्लार्क. वेगळं घर करून राहायची धमक नाही. या घरात नोकरासारखी राबत असते. मी मात्र सासूशी गोड-गोड बोलते. त्या आल्यापासून मी स्वयंपाकघरात फिरकलेच नाही! त्यांना लाँड्रीही शिकवली आहे.'

'तुम्ही खरं तर कंपनीमध्ये एक्झिक्युटिव्ह व्हायला हवं होतं. प्रत्येकाकडून कशी कामं करवून घ्यायची हे तुमच्याइतकं कुणालाच जमणार नाही!'

'इथला जावई शोधण्यासाठी माझ्या सासूनं खूपच प्रयत्न केले; पण मी मुलगा चांगला नाही म्हणून खोटंच सांगून टाकलं!'

वा किती परोपकारी जमुना! नणंदेचं केवढं कल्याण केलंय हिनं!

'ती नणंद इथं आली असती, तर आमच्या संसाराची इतिश्रीच झाली असती! त्यापेक्षा प्रसंगी पन्नास-शंभर डॉलर्स तोंडावर फेकले की नावही होतं आणि नसता तापही टळतो. आता डॉलरचे चाळीस रुपये होतात. भारतातली मंडळी त्याच गुणाकारात रमून जातात!'

'खरंय! तुम्ही म्हणता ते अगदी खरंय!'

'बघा ना! इथं आपल्याला हवं तसं आपण राहत असतो. मुलांना नॉनव्हेज देऊ शकतो. केस कापू शकतो. बियर घेतली तरी कुणी विचारत नाही. येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांचा त्रास नाही. सासू-सासरे आणि म्हाताऱ्या-कोताऱ्यांची सेवा करावी लागत नाही. मला तर असल्या कामाची किळसच येते. सगळ्यात महत्त्वाचं

म्हणजे इथं असताना आपले नवरेही आपलं ऐकतात. कारण दुसरी सपोर्ट-सिस्टिमच नसते ना!'

'समजा, तुमच्या मिस्टरांनीच भारतात जाऊ या म्हटलं तर काय कराल?' उमानं जमुनेशी वाद सुरू केला.

'उमा, मी तर यांना सांगितलं, तुम्हाला इंडियात जाऊन सेटल व्हायचं असेल तर व्हा! मी मात्र येणार नाही. तीन वर्षांतून तीस दिवस जाऊन येण्याची पद्धत चांगली आहे. हे अमेरिकेत नोकरी करतात. म्हणून माझ्या वडिलांनी माझं यांच्याशी लग्न लावून दिलं आहे. बेंगळूरमध्ये नोकरी करत असते तर त्यांनी मुळीच दिलं नसतं. माझ्या वडिलांकडून मला मिळणारा पॉकेटमनी यांच्या बेंगळूरमधील पगारापेक्षा जास्त असायचा.'

'तुमच्या सासूबाई केव्हा परत जातील?'

'उमा, आमच्या सासूबाईंचं काय सांगू! अमेरिका म्हटली की त्यांच्या तोंडून टपा-टपा लाळच टपकते! चंद्रूच्या मनात आपल्या आईला बोलावून घ्यायचं होतं. मी म्हटलं, माझ्या बाळंतपणाच्या वेळी बोलावून घेऊ या. म्हणजे त्यांची हौसही फिटेल आणि मलाही मदत होईल. म्हणून त्यांचा एक वर्षाचा व्हिसा काढला.'

म्हणजे? हिनं मला नोकरासारखं राबवून घेण्यासाठी बोलावून घेतलं आहे तर! ही माझी लाडकी थोरली सून! गौरम्मांना कुणी तरी आसूड ओढल्यासारखं झालं.

यावर उमाही समर्थन करावं तसं म्हणत होती, 'खरंय! सगळ्यांचा हिशोब केला तर बेबी-सिटींग, भांडी विसळणं, घर सांभाळणं, स्वयंपाक- तिकिटाचा खर्च कमीच म्हटला पाहिजे! असं कुणी घरात असलं तर चोरीचंही भय नसतं. वा जमुना! काय डोकं आहे तुमचं! एका वर्षात केवढे पैसे वाचवलेत!'

'माझ्या सासूचा हात मात्र ढिला आहे. कुणी थोडं कौतुक केलं की भांडंच रिकामं करते. त्यामुळे मी जास्तीचं सामान डीप-फ्रीजमध्ये काढून ठेवते. अलीकडे सांगते- इथल्या इंडियन स्टोअर्समध्ये खूप महाग मिळतं, मेन स्टोअर्समधून आणून देते.'

डोळ्यांसमोरचा पापुद्रा बाजूला सरून सारं स्पष्ट होत असल्याचा अनुभव गौरम्म्मांना येत होता. सुनेनं आपल्याला राबणारं यंत्र म्हणून वापरलं आहे हे त्यांना उमजलं. यांच्या शनिवारच्या केवळ बायकांच्या गप्पांमध्ये याच प्रकारच्या विषयांवर चर्चा होत असाव्यात.

देवा रे! इतके दिवस अशी कशी मी मूर्ख होते?

त्यांना तीव्रपणे जाणवलं, आपले पती इथं आले नाहीत, हे किती चांगलं झालं! ते आले असते तर ह्या सुनेनं त्यांनाही राबवून घेतलं असतं. आपणही इथं राहता कामा नये. पेज किंवा आंबिल पिऊन राहावं लागलं तरी हरकत नाही-

आपण आपल्या हक्क्याच्या झोपडीत राहिलं पाहिजे.

सगळ्या सुना जमुनासारख्या असतात काय? तसं काही नाही. सावित्री किती चांगली आहे. आणि पद्मा? तीही फार चांगली आहे. आपण ज्या घरातली मुलगी आणतो, त्या घरचे गुण त्या मुलीबरोबर आपल्या घरी येतात. म्हणतात ना, सुतासारखी साडी असते आणि आईसारखी मुलगी असते. म्हणूनच मास्तराच्या मुलीशी लग्न करावं म्हणतात हे खरं. त्या मुलींना शिक्षणाचं महत्त्व असतं आणि पैशाची किंमत असते. शामण्णा हे वरचेवर सांगायचे ते अगदी पटलं.

आता स्पष्टपणे त्यांना आठवलं- जमुनाच्या माहेरची श्रीमंती बघून आपले डोळे दिपून गेले होते. मागं-पुढं न बघता ही मुलगी आपण चंद्रूच्या गळ्यांत बांधली ना!

मानसीच्या रडण्याचा आवाज ऐकताच आतलं बोलणं थांबलं. तिला घेऊन गौरम्मा आत आल्या.

थोड्याच वेळात सगळ्या बायका आपापल्या घरी परतल्या. काहीही न दाखवता जमुना हसतमुखानं उठली.

गौरम्मांना रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही. त्यांच्या दु:खाला उशी साक्षी होती. पश्चात्तापाच्या फुफाट्यात त्या शिजून जात होत्या.

त्यांच्या डोळ्यांसमोर सारखी विनितेची मूर्ती येत होती.

आई-वडील नसलेली पोरकी विनिता त्यांच्या प्रेमासाठी हपापली होती. तिच्या वागण्या-बोलण्यातून ते स्पष्ट दिसत होतं; पण गौरम्मांनी तिकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केलं होतं.

जमुना घरात येण्यापूर्वीचं वातावरण त्यांना आठवलं. त्यानंतर मात्र वातावरण कडवट झालं होतं. आपण विनितेसाठी काहीही केलं नाही हे त्यांना तीव्रपणे जाणवू लागलं. तिच्या लग्नात आपण तिच्यासाठी चांगली साडी घेतली नाही. त्यांनी आपल्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या जमुनेला दिल्या होत्या- पण तिच्या लेखी त्यांची काहीच किंमत नव्हती.

जर आपण त्याच बांगड्या विनितेला घातल्या असत्या, तर तिनं संदर्भ येताच प्रत्येक वेळी सगळ्यांसमोर 'आमच्या सासूबाईंनी दिल्या' म्हणून सांगत कौतुक केलं असतं. आपण तिच्या बाळंतपणाच्या वेळीही असंच वागलो. त्यामुळे ती धारवाडला निघून गेली. सुरभीच्या लग्नाचा मुहूर्तही अलीकडचा काढता आला असता; पण केवळ जमुनाचा विचार करून आपण लग्न पुढं ढकललं. त्या वेळी आपण विनितेचा विचारच केला नाही.

हाच भेदभाव आपण नातवंडांच्या बाबतीतही केला. हर्षसाठी आपण शंभर

रुपये पाठवले होते, तर मानसीच्या बारशाला सोन्याची साखळी केली होती.

आणि डोहाळेजेवणाचंही असंच! विनितेसाठी हिरवा ब्लाऊजपीसही त्यांनी आणला नव्हता. गिरीशचा बेताचा पगार आहे- आपण का साडी आणायची असं त्यांना वाटलं होतं; पण जमुनासाठी हिरवी रेशमी साडी आणली होती. गेल्या जवळ-जवळ वर्षभरात जमुनानं ती साडी अंगालाही लावली नव्हती. तिच्या श्रीमंतीमध्ये त्यांनी साडीसाठी खर्च केलेल्या पाच हजार रुपयांची काहीच किंमत नव्हती!

म्हणजे दुरून डोंगर साजरे म्हणतात ते खरं तर! रंगीत आकर्षक पंख्यामागील काट्या-चोयट्या दिसल्या.

जर मी अमेरिकेला आले नसते तर अशाच अज्ञानात राहून जमुनाचं गुणगान करत राहिले असते!

गौरम्मांना आता या क्षणी निघून जावंसं वाटलं. जवळच मैसूर असतं तर त्या तशा निघूनही गेल्या असत्या; पण अमेरिकेतून तडकाफडकी निघून जाणं शक्य नव्हतं. एखाद्या पिंजऱ्यात बंदिस्त केलेल्या प्राण्यासारखं त्यांना वाटत होतं.

त्यांनी चंद्रूपुढे प्रस्ताव मांडला, 'चंद्रू, कुणी भारतात जाणार असेल तर मीही जाईन म्हणते.'

'का गं?'

'वर्ष झालं घर सोडून! मानसीही आता मोठी झाली. आता तुम्ही दोघंही निश्चिंत मनानं नोकरीवर जाऊ शकाल.'

चंद्रूला आश्चर्य वाटलं नाही, पण जमुना चकित झाली. ती म्हणाली, 'एवढ्यात जाणार? एवढ्या लवकर तिथं जाऊन तरी काय करणार? आता तर बेंगळूरमध्ये पाण्याची खूपच अडचण आहे म्हणे. विजेचाही त्रास आहे. कशाला जाता तुम्ही? आपण अण्णांनाच इथं बोलावून घेऊ या. आणखी वर्षभर राहून जा.'

'नको बाई! पाण्याची अडचण असो किंवा आणखी काही असो, आपलं घरच आपल्याला बरं वाटतं! इथं ज्यासाठी आले, ते तर झालंच! सगळं पाहूनही झालं! तुम्हाला आमच्याकडून शक्य तेवढी मदत झाली. आता मला गेलं पाहिजे. आता आम्हा दोघांचंही वय झालंय. इथं काही आजारपण आलं, तर तुम्हालाही उगाच त्रास! आम्ही तिथंच राहणं चांगलं!'

'जमुना, अम्मा म्हणते ते खरंय! तिलाही कंटाळा आला असेल. सोबत मिळाली की अम्माला पाठवून देऊ या.'

त्या दिवशी ऑफिसातून घरी आलेल्या चंद्रूनं विचारलं, 'अम्मा, तुझ्या अलमेल आडनावाच्या कुणी मैत्रिणी आहेत काय?'

'त्या आडनावाची कितीतरी कुटुंबं माझ्या ओळखीची आहेत. तू कुणाविषयी

सांगतोयस?'

'आमच्या कंपनीत न्यूयॉर्कहून शांता नावाच्या सॉफ्टवेअर इंजिनियर आल्या आहेत. बोलता-बोलता त्या म्हणाल्या- तुमच्या आईंना अलमेल शांता आठवते काय विचारा!'

'टी नसरीपूरचे अलमेल माझ्या चांगल्या माहितीचे आहेत. श्याम अयंगारांची मुलगी. माझ्याच वयाची असेल ती. तुला आठवत नाही! रामानुज अग्रहारात राहायचे ते. शांता तुझ्यापेक्षा वयानं थोडी लहान असेल. मी तिच्या केसांची नागवेणी घालायची. फार दिवस झाले तिला भेटून. आता कुठं आहे कोण जाणे!'

'मला काहीच आठवत नाही. तूच बोल त्यांच्याशी.'

गौरम्मांना फार आनंद झाला. खेड्यातल्या मैत्रिणीची मुलगी! अगदी लाडक्या मैत्रिणीची मुलगी. रक्ताचं माणूस म्हणता येईल, इतक्या जवळचं!

चंद्रूनं शांताला फोन करून सांगितलं, 'शांता, माझी आई तुला भेटायचं म्हणते.'

'आणखी दोन तासांत जिम आटोपून येईन. तिथून येताना तुमच्या घरी मावशींना भेटायला येईन. आज रात्री त्यांना माझ्या घरी गप्पा मारायला घेऊन जाईन. नाही तरी उद्या सुट्टी आहे. येते संध्याकाळी. मावशींना सांगा!'

चंद्रूनं तो निरोप गौरम्मांना सांगितला.

सारं ऐकून गौरम्मांनी विचारलं, 'चंद्रू, जिम म्हणजे काय रे?'

'शरीराला व्यायाम देण्याचं ठिकाण.'

'म्हणजे तालीम की काय? व्यायाम-शाळा असते तशी?'

'नाही. तिथं वेगवेगळ्या मशिनी असतात. घाम गळेल एवढा दररोज व्यायाम केला तर फिगर छान राहते. तुम्ही गावाला गेल्यावर मीही सुरू करणार आहे! माझ्या शनिवारच्या मैत्रिणींनी जिम सुरू केलंय. किती स्लिम झाल्या आहेत त्या!' जमुना म्हणाली.

'मी म्हणते, स्लिम व्हायला जिम कशाला पाहिजे? शरीर वाकवून घरातली कामं केली तरी पुरेसं आहे. आमची विनिता पाहा! कपडे धुते, फरशी पुसते, बागेतली कामं करते. जिमशिवाय स्लिम आहे ती!'

प्रथमच विनिताचं एवढं कौतुक सासूच्या तोंडून जमुना ऐकत होती. तिनं नकळत भुवया उडवल्या.

गौरम्मांच्या मनात बेंगळूरच्या आठवणी फेर धरत होत्या. विनितेची अविश्रांत श्रमणारी आकृती त्यांच्या डोळ्यांसमोर आली.

शांताच्या घरी जाण्यासाठी गौरम्मा तयार झाल्या.

अलीकडे त्यांचं मन या घरात मुळीच रमत नव्हतं. जाण्यासाठी त्यांनी जमुनाला

विचारलंही नाही. वाटलं, हिला काय विचारायचं त्यात? हिची कसली भीती?

शांताला भेटून खूपच दिवस– अंहं, वर्षं झाली होती. गौरम्मांच्या पांढऱ्या केसांमध्ये लक्षणीय भर पडली होती. शांताही स्थूल वाटत होती. गौरम्मांना पाहताच ती उत्साहानं म्हणाली, 'मावशी, ओळख पटते की नाही? तुम्ही माझी नागवेणी घालत होता तेव्हा! आता पाहा तर! साधी वेणीही नाही.'

'तुझंच काय सांगतेस बाई! आता बहुतेक कुणीच वेणी घालत नाही. माझ्या धाकट्या सुनेची, विनिताची वेणी मात्र चांगली हातभर लांब असते हं! अगदी नागासारखी जाड आणि काळीभोर!'

जमुनाचा काही क्षण आ वासलेलाच राहिला.

शांता आणि गौरम्मा निघून गेल्या.

'शांता, तुझ्या आई कुठं असतात गं? कितीतरी दिवसांत त्यांचीही भेट झाली नाही.'

'हासनमध्येच राहते ती.'

'तू इथं कशी आलीस? तुझं लग्न झाल्याचं समजलं. तुझे यजमान कुठं असतात?'

'ती एक मोठीच कथा आहे. मन-मोकळ्या गप्पा मारण्यासाठीच मी तुम्हाला माझ्या घरी घेऊन चाललेय. चंद्रू आणि जमुनापुढे सांगायला संकोच वाटतो, पण तुमच्यापुढे मात्र सांगावंसं वाटलं.'

असं काय घडलं असेल? गौरम्मा या विचारात गढल्या असतानाच तिचं घर आलं.

तो बंगला नव्हता- अपार्टमेंट होतं. शांतानं आपल्या घराचं दार उघडलं. त्या भागात अशी शेकडो अपार्टमेंटस् दिसत होती. ते दोन बेडरूमचं सर्वसाधारण घर होतं. तिथं अमेरिकेमधलं कुठलंही वैभव दिसत नव्हतं. घरात मोजकंच आवश्यक तेवढंच सामान होतं.

टेबलावर शांता आणि तिच्या मुलीचा फोटो होता.

गौरम्मा आणखी बुचकळ्यात पडल्या.

'मावशी, जेवता ना? माझा स्वयंपाक चालेल का तुम्हाला?'

'शांता, अमेरिकेत मला सगळं चालतं. पण आज गुरुवार ना! माझं जेवण नाही.'

शांतानं त्यांना केळी दिली. स्वत:चं जेवण तिनं मायक्रोवेव्हमध्ये गरम करायला ठेवलं आणि म्हणाली, 'माझी कथा ऐकताना कंटाळा येणार असेल तर सांगणार नाही. काही वेळा वाटतं, उगाच आपलं दु:ख कशाला वाटत जायचं?'

'असं का बोलतेस? तू तर माझ्या सुरभीसारखी मला!'

'सांगते. माझं लग्न मुकुंदाबरोबर झालं तेव्हा तो सॉफ्टवेअर कंपनीत ऑपरेटर म्हणून लहान नोकरी करत होता. माझे वडील देवळातले पुजारी- म्हणजे परिस्थिती साधारण होती. अभ्यासात मी नेहमी पुढं असायची.'

'होय. तुला बक्षीस मिळाल्याचं मीही पाहिलं आहे.'

'अप्पांनी तर अश्रू ढाळत सांगितलं- बाळ, तुला इंजिनियर करायची माझी ताकद नाही! मला मेरीट-सीट मिळूनही मी जाऊ शकले नाही. शेवटी फक्त बी. एस्सी केलं. तिथंही चांगले मार्क्स मिळाले. बेंगळूरला आले आणि कॉम्प्यूटर कंपनीमध्ये ट्रेनिंगचं काम मिळालं. त्याच वेळी लग्नही झालं.'

'तुझ्यासारख्या नोकरी करणाऱ्या मुलीचं लग्न होणं काहीही कठीण नाही.'

'लग्न झालं तरी नोकरी सुरूच होती. माझ्या सासू-सासऱ्यांनाही पैसे मिळवणाऱ्या सुनेचा अभिमान होता. मुकुंदाला माझ्यासारख्या पगाराची नोकरी मिळाली नाही. नवं काम पटकन आत्मसात करण्याची आणि भरपूर कष्ट घेण्याची माझी तयारी असायची. पगाराच्या रकमेतली पाऊण रक्कम सासू-सासऱ्यांकडे देत होते.'

'का? आम्ही आमच्या सुनेकडून एक पैसाही घेत नव्हतो.'

'सगळे तुमच्यासारखे नसतात, मावशी! पुढं मला आणखी चांगली नोकरी मिळाली. त्यातून मला इथं येण्याची संधी मिळाली. कॉम्प्यूटरच्या कामाच्या निमित्तानं खूप जणं इथं येतात. गेल्या वर्षी सुमारे पन्नास हजार कॉप्यूटर विषयातील लोकांना इथला व्हिसा मिळाला म्हणे. मुकुंदही आला.'

'आणि बाळ?'

'आम्ही इथं आल्यानंतर लता जन्मली. मुकुंद काही फार बुद्धिमान नाही. इथं आल्यानंतरही तो कुठल्या विशेष कामात रमला नाही. मीच भरपूर कष्ट घेऊन मुलीला वाढवत होते. शिवाय घरीही पैसे पाठवत होते.'

'म्हणजे तूही डॉलर-सून झालीस तर!'

'म्हणजे काय मावशी? डॉलर-सून, येन-सून, पौंड-सून– असे सुनांचे प्रकार आहेत की काय? सून म्हणजे सून!'

'जाऊ दे शांता! तुझ्या हे लक्षात येणार नाही. तू पुढं काय झालं ते सांग.'

'माझ्या सासूला कितीही डॉलर्स पाठवले तरी तिची भूक शमत नव्हती. दरवर्षी आम्ही येणार म्हटल्यावर लांबलचक सामानाची यादी पाठवून द्यायच्या. मीही न चुकता सगळं घेऊन जायची. पुढच्या वेळी पुन्हा तीच यादी- तेच सामान!'

'म्हणजे काय? तुझी सासू व्यापार करायची की काय?'

'देवाला ठाऊक! काय करायच्या कोण जाणे! एवढं करून त्यांच्या तोंडात सतत माझ्या जावेचंच गुणगान चालायचं, बिचारी, ती काही अमेरिकेत राहत नाही

ना- वगैरे वगैरे. यावर मुकुंदही म्हणायचा- म्हातारपणी आई-वडिलांची सेवा करायची सोडून या परदेशात काय राहायचं- माघारी जाऊ या. पण मी मात्र नकार दिला. यातूनच भांडणं सुरू झाली.'

'केव्हा थांबली ही भांडणं?'

'डायव्होर्स झाल्यावर! दररोज माझ्या पैशावर तो मजा करायचा, दारू प्यायचा आणि वर मलाच मारायचा. शिवाय तक्रार करायचा- तू माझी सेवा करत नाहीस, उषा-वहिनी कशा माझ्या भावाच्या बुटांना पॉलिश करते- पायांना चोळून देते- तेल लावून न्हाऊ घालते- उलट उत्तरं देत नाही. तू मात्र काही ऐकत नाहीस. माझ्यापेक्षा जास्त कमावतेस म्हणून मस्तवाल झालीस- वगैरे-वगैरे.'

'तुझी हुशारी बघून त्याला मत्सर वाटत असेल.'

'तसंच होतं. नवऱ्याच्या हुशारीचा बायकोनं अभिमान वाटून घ्यायचा- बायको हुशार असली तरी तिनं मार खायचा काय? हा कुठला न्याय? आपल्या समाजात आया मुलांना उगाच फार शेफारून ठेवतात. माझ्या सासूबाई तर म्हणतात- 'पतीची सेवा करणं हा तुझा धर्म आहे!' एकीकडे तुम्हाला माझ्या कमाईचा पैसाही हवा आणि मी सेवाही केली पाहिजे. मावशी, तुम्हीच सांगा- हे दोन्ही कसं शक्य आहे? एवढा वेळ आणि शक्ती कुठून आणू? दोन्ही नाटकं कशी जमणार?'

'शांता, मी काही घराबाहेर पडून नोकरी केली नाही. काय सांगू मी? मी फक्त गृहिणी म्हणून संसार केला. तरीही एक सांगते- सगळ्यांनी परस्परांना सांभाळून गुण्या-गोविंदानं राहिलं पाहिजे- हाच जीवनाचा परमधर्म! घरातल्या मोठ्यांनी संयम पाळायला पाहिजे- लहानांवर प्रेम करायला पाहिजे. मी चौथीपर्यंत शिकले- काय सांगू आणखी?'

'मावशी? माझ्या मुलीला मी उटीच्या हॉस्टेलमध्ये ठेवलंय. मुकुंदशी डायव्होर्स झाला, माहेरच्या माणसांनीही मलाच दोष दिला. घराला काळिमा लावलास म्हणाले. मला मात्र आजही मी जे वागले ते योग्य केलं असं वाटतं. मावशी, मला हा देश अतिशय आवडतो. माझ्यासारखीला आपल्या देशात उपेक्षेनं पाहिलं जातं. त्या समाजात माझ्या मुलीलाही स्थान नाही. इथं कुणीही माझ्या वैयक्तिक जीवनात डोकावायला येत नाही. माझं काम पटल्यावर प्रमोशन देऊन मला इथं पाठवलं आहे. पुढच्या वर्षी लतालाही इथंच बोलावून इथल्या शाळेत घालेन. मी तर इथं सुखात आहे. तिथं असते तर असल्या नवऱ्याबरोबर सारं आयुष्य मला तळमळत काढावं लागलं असतं. इथं मी स्वतंत्र पक्ष्यासारखी राहते.'

दुसऱ्या दिवशी सकाळीच शांतानं विचारलं, 'मावशी, इथं जवळच लक्ष्मीचं देऊळ आहे. जाऊ या?'

'पण बरंच दूर आहे ना ते?'

'नाही. फक्त पाचशे मैलांवर आहे. तिथंच प्रसादाची व्यवस्था आहे. मी ड्राईव्ह करेन. चला जाऊ या!' तिच्या स्वरात उत्साह ओतप्रोत भरला होता.

आपलं कष्टमय जीवन बाजूला सारून शांता किती उत्साहानं वावरत होती! चार-चौघांसारखा सुखी संसार असता तर कशी असती ही! त्या मूर्ख मुकुंदाचंच दुर्दैव म्हणायचं!

शांता अय्यंगारी पद्धतीनं रेशमी साडी नेसून समोर आली तेव्हा गौरम्मा भानावर आल्या. शांताचं ते रूप पाहून त्यांना आनंद झाला.

'मावशी, अलीकडे इथं खूप देवळं झाली आहेत. आधी पीट्सबर्गचं तिरुपतीचं देऊळ तेवढं होतं. आता भारतातल्या वेगवेगळ्या भागांतून अनेक माणसं इथं येतात. सगळे देव-देवतांच्या छायेत वाढले आहेत ना! त्यामुळे आता कितीतरी देवळं बांधली आहेत.'

'हे फक्त लक्ष्मीचं देऊळ आहे?'

'नाही. इतरही अनेक देव तिथं आहेत. गणपती, विष्णू, राम, शंकर, षण्मुख- प्रत्येकजण आपापल्या देवाची पूजा करू शकतो.'

'आणि पुजारी?'

'त्यांना भारतातून बोलावून घेतात. पाच वर्षांचा व्हिसा असतो त्यांचा.'

सुट्टीचा दिवस असल्यामुळे देऊळ भक्तांनी भरून गेलं होतं. तरीही गडबड-गोंधळ नव्हता. कार पार्किंगसाठी वेगळी जागा होती. डस्टबीन, पावती-ऑफिस– थोडक्यात सांगायचं तर भारतातले देव आणि देऊळ अमेरिकेतल्या स्वच्छतेमुळे देखणे दिसत होते!

एकीकडे क्षीराभिषेक आणि रुद्राभिषेक चालले होते, तर दुसरीकडे एका तमिळ तरुणाचा गोऱ्या तरुणीशी विवाहविधी चालला होता. संस्कृत उच्चार न येणाऱ्या मुलाची इंग्लिशमध्ये उपनयनाची तयारी चालली होती. आणखी एकीकडे सुदर्शन होमाची तयारी चालली होती.

गौरम्मा आता एक नवाच अनुभव घेत होत्या.

रात्री शांतानं गौरम्मांना चंद्रूच्या घरी सोडलं आणि पुन्हा-पुन्हा भेटीचा आनंद घोळवून निघून गेली.

गौरम्मांचं भारतात परतायचं नक्की झालं तेव्हा एक दिवस चंद्रू म्हणाला, 'अम्मा, जाण्याआधी विनोद शहाच्या आईंना माधुरी बेनना भेटू या. त्या तुला भेटायचं म्हणतात.'

'कोण रे?'

'माझ्या मित्राची आई. त्यांच्या घरी जाऊन येऊ या?'

'अरे, मला त्यांची भाषा येत नाही. नुसतं भेटून काय करायचं?'

'तेही वैष्णव आहेत. भेटायची खूप इच्छा आहे त्यांना.'

लगेच जमुना म्हणाली, 'तुम्ही तिथं जात असाल तर मला वाटेत उमाकडे ड्रॉप करा. तिच्याकडे आजची शनिवारची मीटिंग आहे.'

गौरम्मांच्या मनात आलं- आज कुणाच्या सासूचा उद्धार होणार आहे कोण जाणे!

चंद्रूचं मन राखण्यासाठी गौरम्मा विनोद शहाच्या घरी गेल्या तेव्हा कुत्र्याएवढ्या मांजराला माशाचे तुकडे भरवत त्याची पत्नी मीरा अंगणात उभी होती.

'विनोद इथं नाही. त्याच्या आईच्या घरी गेलाय. आत या-'

'नको. माधुरीबेन कुठे आहेत?'

'त्या इथं राहत नाहीत. जवळच एक लहान अपार्टमेंट आहे. तिथं राहतात.'

'का?' अभावितपणे गौरम्मांच्या तोंडून प्रश्न आला.

नंतर चंद्रू म्हणाला, 'सासवा-सुनांचं पटत नाही. एकत्र राहून भांडण्यापेक्षा वेगळं राहणं चांगलं ना?'

'मग इथं कशाला राहतात? त्यापेक्षा भारतात का राहत नाहीत?'

'विनोद त्यांचा एकुलता एक मुलगा. आणखी कुणीही नाही त्यांना. त्यामुळे इथंच राहतात.'

गौरम्मा मनोमन आनंदल्या- 'देवा रे! माझी आज तशी परिस्थिती नाही ना!'

छोट्याश्या फ्लॅटमध्ये माधुरीबेन आणि रामभय्या त्यांचीच वाट पाहत होते.

भाषा कळायचा प्रश्न होता- पण भावना समजत होती. गौरम्मांना हिंदी बरंचसं समजत होतं, पण बोलता येत नव्हतं. माधुरीबेन जवळपास त्यांच्याच वयाच्या होत्या.

गौरम्मा भारतात परतत आहेत, त्या नशीबवान आहेत, अशी माधुरीबेनची भावना होती.

गुजराथी मिठाई, ढोकळा, खिचडी, चिवडा असे अनेक खाद्यपदार्थ त्यांनी तयार करून ठेवले होते. त्यांच्या पायाच्या दुखण्यासाठी विनोद औषध आणायला गेला होता. ते समजताच चंद्रू म्हणाला, 'तो सी. व्ही. एस.ला गेलाय ना? मीही जाऊन येतो.'

तिथं तिघंच राहिले.

'तुम्हाला प्यायला काही आणू? चहा-कॉफी की लस्सी-सरबत?'

'काहीही नको!' गौरम्मांनी खुणेनं सांगितलं.

'का बरं? आमच्या घरी येऊन तसेच कसे जाल? तुम्ही खरं तर आमच्या गावी यायला हवं होतं. बडोद्याजवळ खेडं आहे. तिथं आम्ही तुमची एवढी सरबराई केली असती की, काही विचारू नका. आमचे यजमान पोस्टमन होते. खेड्यातली सगळी मुलं पोस्टमनकाका म्हणून मागं लागायची. मीही गावातल्या बायकांना स्वयंपाकात किंवा पापड करण्यात मदत करत होते. काकांवर तर सगळ्यांचा फार जीव होता. स्वप्नातही आमचं गाव येतं आमच्या!'

त्या दोघींच्या डोळ्यांत पाणी होतं.

'असं असताना इथं का आलात?'

'कितीतरी मुलं देवाघरी गेल्यावर हा विनोद जगलाय! आम्ही याच्यासाठीच जगत होतो. त्याला सोडून राहणं कठीण होतं. त्यात आमच्या यजमानांची प्रकृती तोळा-मासा! त्यामुळे विनोदनं आग्रह धरला- सगळे एकेठिकाणी राहू या म्हणून. म्हणून इथं आलो आणि अडकून पडलो.'

'तुमची सून कुठली?'

'आमच्याच गावची. तिच्या वडिलांची गावात गिरणी होती. चार मुली त्यांना. घरची गरिबी होती. ओळखीचं घर-माणसं. मुलगीही रोज येणारी-जाणारी. ती आपलं करेल असं वाटलं होतं, पण तेच चुकलं. अगदी गरीब घरच्या मुलीला सून करून आणू नये. गरिबाला ऐश्वर्य मिळालं की तो मध्यरात्री छत्र घेऊन फिरायला लागतो म्हणतात! अगदी खरंय ते!'

गौरम्मा मनात म्हणाल्या- 'श्रीमंताघरची मुलगीही सून म्हणून आणू नये. नाहीतरी आमच्यासारखी गत होईल!'

त्या पुढं सांगू लागल्या, 'ती इथं येऊन इंग्लिश शिकली, मच्छी-मांस खाऊ लागली! परवा तर गोमांस स्वस्त झालंय म्हणून निम्मं वासरूच घेऊन आली! देवा देवा! कसं बघवणार ते? दररोज भांडणं झाल्याशिवाय कशी राहतील? तिला भारताचा तिटकारा आहे. इथलं तेच योग्य, तेच मॅनर्स खरे म्हणते ती! शोभतंय की नाही हे न बघता ती त्यांच्यासारखे कपडे घालते. शेवटी विनोदनं आमच्यासाठी वेगळं घर केलं. घरात ती चुकूनही गुजराथी बोलत नाही.'

'विनोद काय म्हणतो?'

'काय म्हणणार? हिडिंबा गळ्यात बांधली, म्हणून रागावतो आमच्यावरच! बिचारा! आमच्या आणि तिच्यामध्ये तो अडकलाय. आमचं दुर्दैव! त्यानं इथल्याच एखाद्या गोऱ्या मुलीशी लग्न केलं असतं तर सुखी झाला असता की काय कोण जाणे!'

चंद्रू आणि विनोद औषध घेऊन परतले.

मिनिसोटाहून मुंबईपर्यंत विनोद निघाला होता. त्याच्या सोबतीनं जाण्यासाठी

गौरम्मा तयार झाल्या.

त्यांनी चंद्रूला सांगितलं, 'मी जाईन त्यांच्याबरोबर. मला सांताक्रूझच्या विमानतळावर सोडलं तर पुढं बेंगळूरला जाईन. तू काहीही काळजी करू नकोस!'

याचा अर्थ अम्माच्या मनातली घरी जाण्याची इच्छा प्रबळ झाली! चंद्रूच्या लक्षात आलं.

विनोदनंही बेंगळूरच्या विमानात बसवून देईन असं कबूल केलं. जमुना म्हणाली, 'तुम्ही गेल्यावर आम्हाला त्रास होणार आहे! पण काय करणार! सुरभी-विनिताला इथली खुशाली सांगा. तुम्हाला आणि सुरभीला साडीच घेऊन देऊ की आणखी काही वस्तू हवी?'

'काहीही नको! अमेरिकेतल्या साड्या फाटत नाहीत की विरत नाहीत. त्या आपल्या प्रेझेंट म्हणून द्यायला चांगल्या! आमच्या गावी उत्तम, मैसूर सिल्क मिळतं. दुसऱ्या देशापुढे उगाच का नाक घासायचं?' गौरम्मा ठसक्यात उत्तरल्या.

त्यानंतर पद्मानं दिलेल्या पैशांमधून विनिता आणि सुरभीसाठी चांगल्या पर्सेस, सुरेशसाठी आणि गिरीशसाठी शर्ट विकत घेतले. हर्षसाठी काही खेळणीही घेतली. मानसीला सोडून जायच्या विचारानं मात्र डोळ्यांत पाणी उभं राहात होतं. त्याचबरोबरच हर्षची आठवणही तिकडं खेचत होती.

निघायचा दिवस येऊन ठेपला. चंद्रू-जमुनानं वाकून नमस्कार केले. यानंतर आपण पुन्हा मुलाच्या घरी येणार नाही हे गौरम्मांना ठाऊक होतं. अशा सुनेबरोबर एवढ्या दूरवर चंद्रू एकटाच कसा निभावून जातो या विचारानं त्या प्रथमच कष्टी झाल्या.

विमानतळावर सगळ्यांना हात हलवून निरोप घेत गौरम्मा मायदेशी निघाल्या.

विमान नेहमीच्याच वेगानं चाललं असलं तरी गौरम्मांना मात्र वाटत होतं- किती सावकाश जातंय हे! किती उशीर होतोय! कधी एकदा बेंगळूरला पोहोचते असं त्यांना झालं होतं.

एक वर्षानंतर गौरम्मा बेंगळूरला येत होत्या.

या वर्षभरात त्यांनी पाहिलेलं जग, ऐकलेलं बोलणं आणि घेतलेल्या धड्यांचा अखेरचा श्वास असेपर्यंत विसर पडणार नाही एवढा प्रभाव होता.

नदीपलीकडचं कुरण नेहमीच हिरवंगार दिसत असतं.

वर्षापूर्वी दूरवर असणारी अमेरिका त्यांच्या रंगीत स्वप्नाचा एक महत्त्वाचा भाग होता. मनात येईल ते देणारा तो कल्पवृक्ष होता. तिथं दुःखाला थारा नाही असं त्यांना वाटत होतं.

या अमेरिकेत दुःख-दुखवटा नाही, संकटं नाहीत, प्रतिकूल परिस्थिती नाही-

थोडक्यात देव-देवता ज्याला स्वर्ग म्हणतात तो हाच असला पाहिजे असा गौरम्मांचा गाढ विश्वास होता.

त्याचबरोबर, जमुनाच आपली तारणहार आहे, तिच्या कृपादृष्टीमुळेच आपण या जगातील अडी-अडचणींना तोंड देऊ शकू अशा भ्रमात त्या होत्या.

याच कारणामुळे भारतातल्या देशी सुनेकडे त्या अनास्थेनं पाहत होत्या. हिची मला काय गरज? जमुनाचा मला पाठिंबा आहे, या भावनेत त्या होत्या. विनितेचं रूप, गुण, विद्या आणि प्रेमाची त्यांच्या लेखी काहीच किंमत नव्हती.

त्यामुळे कटु शब्दांनी दुखवणं किंवा अनुल्लेखानं तिला टाळणं हे अगदी स्वाभाविक होतं.

या साऱ्यामागचं कारण होतं, तो अमेरिकेतला डॉलर! कारण एक डॉलर म्हणजे सुमारे चाळीस रुपये होतात ना!

आता मात्र सारं बदललं होतं. एखाद्या नाटकातल्या ट्रान्स्फर-सीनप्रमाणे! आता त्यांची मतं पूर्णपणे बदलली होती.

आता नव्या जाणिवेच्या पार्श्वभूमीवर त्यांना विनिता पूर्णपणे वेगळी असल्याचा प्रत्यय येत होता. तिचा प्रत्येक गुण आता थोडा अधिकच चांगला वाटत होता. मातृप्रेम गमावलेली विनिता प्रेममयी असल्याचं त्यांना जाणवत होतं. ती प्रेमासाठी आसुसली होती. आपण दुर्लक्ष केल्यामुळे ती करपून गेली होती.

अशा अनेकविध भाव-भावनांनी भरलेल्या प्रवाशांना घेऊन विमान बेंगळूरच्या विमानतळावर उतरलं.

विमानतळावर आपल्या स्वागतासाठी शामण्णा, हर्ष, गिरीश आणि विनिता हजर असतील याविषयी त्यांची खात्री होती.

पण विमानतळावर केवळ शामण्णाच त्यांना दिसले.

क्षणभर त्या संतापल्या. एवढ्या लांबचा प्रवास करून आले तरी मुलगा-सून स्वागताला कसे आले नाहीत? पाठोपाठ मनात आलं, कुठल्यातरी अर्जंट कामामध्ये अडकून पडले असतील.

बॅगा ट्रॉलीवर ठेवून त्या बाहेर आल्यावर शामण्णांनी चौकशी केली, 'कसा झाला प्रवास?'

'छान झाला. घरी सगळे ठीक आहेत ना? गिरी-विनू आले नाहीत तुमच्याबरोबर?'

'आधी घरी चल. सगळे आरामात आहेत.' पुढं बोलू न देता शामण्णांनी रिक्षा बोलावली.

समोर चिरपरिचित दृश्य दिसू लागलं. गाड्या, सायकल, रिक्षा, भाजीच्या हातगाड्या, गाई-वासरं, असह्य उकाडा, चित्र-विचित्र वास, धूळ- त्यांची आपण भारतात येऊन पोहोचल्याची खात्री झाली.

'आपल्यापैकी तू पहिली फॉरेन-रिटर्न झालीस! मला तर भीती वाटत होती- तू तिथंच रमशील आणि तिथं या म्हणून मलाच हट्टानं यायला लावशील. वाचलो मी!'

'काहीतरीच तुमचं! तुम्हाला इथं टाकून शेवटपर्यंत कसं कोण तिथं राहील?' त्या तीव्र दृष्टिक्षेप टाकत म्हणाल्या.

'तू तर अमेरिकेला स्वर्ग मानतेस ना! म्हणून वाटलं, तिथंच तळ ठोकशील म्हणून!'

'काही नको तो स्वर्ग आपल्याला! किती केलं तरी आपलं गाव ते आपलंच! जाऊ दे तो विषय. विनिता-सुरभी काय म्हणताहेत? मला तर वरचेवर विनिताची आठवण होत होती. हर्षचीही!'

'काय? विनिता आणि हर्षची आठवण?' शामण्णांनी दचकून विचारलं. सूर्य पश्चिमेला उगवल्याचा त्यांना भास झाला, 'दोघांचीही?'

'होय. फारच आठवण झाली! सांगेन घरी गेल्यावर!'

'हं! मीही घरी गेल्यावरच सांगेन!' शामण्णाही म्हणाले. त्यांचं मन दोन महिन्यांपूर्वी घडलेल्या घटनांकडे धावलं.

विनितानं कितीही प्रयत्न केले तरी तिला 'उत्तम सून' हे बिरूद मिळालंच नाही.

पदोपदी जमुनाचं कौतुक आणि विनिताचा पाणउतारा ठरलेला होता. कधी प्रत्यक्ष बोलून तर कधी न बोलता वागण्यातून दाखवलं जायचं.

विनितानंही पाहिलं होतं- गौरम्मांचा पूर्वीपासूनच असा स्वभाव होता असंही नव्हे. जमुना घरात आल्यानंतर त्यांच्यामध्ये हा बदल झाला होता.

विनितेला गिरीशचा राग यायचा. ती त्याच्यासमोर मन उघडं करून बोलायची आणि शेवटी म्हणायची, 'या असं का करतात? माझं काय चुकलं यात?'

तो सांगायचा, 'अगं, तो अम्माचा स्वभावच आहे. ती माझ्यापेक्षा चंद्रूला महत्त्व देत नाही काय? त्याचं मी कुठं वाईट वाटून घेतो?'

चंद्रू-गिरीश सख्खी भावंडं. त्यामुळे कदाचित तो सहन करत असेल. पण मी का सहन करू?

या विचारांमध्ये घेरली गेली की स्वभावतः शांत स्वभावाची विनिता भडकून उठत होती. तिथं हजारो डॉलर्स कमावून इथं कधीतरी केवळ शंभर डॉलर्स पाठवणारी जमुना दरमहा तीन हजार रुपये मिळवणाऱ्या विनितापेक्षा श्रेष्ठ होऊन बसल्याचं ती पाहत होती. इथं विनिता जे शारीरिक कष्ट घेत होती, त्यांची तर गौरम्मांच्या दृष्टीनं काडीमात्रही किंमत नव्हती.

घरात सतत जमुनायण चालायचं.

अशा वेळी विनितेला तीव्रपणे जाणवायचं- या डॉलरनं माझं आयुष्य खराब करून टाकलं!

दिवस जातील तसं विनिता स्वत:च्याच कोषात गुरफटून जाऊ लागली. अशाच मन:स्थितीत तिनं आपल्या गावी जाऊन आपलं बाळंतपण करून घेतलं होतं.

शामण्णा तिची मनस्थिती निरखत होते. पत्नी अमेरिकेला जाऊन आल्यानंतर तर विनितेचं जगणं आणखी मनस्तापानं भरून जाईल हे कुणा ज्योतिष्यानं सांगायची गरज नव्हती.

लहानग्या हर्षला सांभाळत घरची कामं करणं तिला कठीण जाणार नाही, पण रात्रं-दिवस जमुना-पुराण मात्र तिला मनस्ताप देत राहील हे स्पष्ट होतं.

तसं पाहिलं तर विनिता शांत स्वभावाची होती. तिच्या अवास्तव अपेक्षाही नव्हत्या. पण कुठल्याही गोष्टीचा अतिरेक झाला की कडेलोट होणारच.

याचा परिणाम म्हणून तिच्या मनात जमुनाविषयी पराकोटीचा द्वेष निर्माण झाला होता. आपण सर्वच बाबतीत जमुनापेक्षा सरस आहोत हे सत्य तिलाही समजत होतं. पण जमुना डॉलर-बहू झाली होती ना! विनिता भिक्षुकिणीच्या स्थानावर होती.

तिलाही वाटत होतं- मीही अमेरिकेत असते तर अशीच तीन वर्षांतून तीस दिवसांसाठी आले असते, येताना सगळ्यांसाठी साड्या आणल्या असत्या, वृद्ध सासू-सासऱ्यांची कणभरही सेवा न करता त्यांची लाडकी सून होऊन राहिले असते!

कधीकधी तिला वाटायचं- देवा रे, या डॉलरची किंमत एक रुपया कर. म्हणजे या सगळ्यांची मस्ती भुईसपाट होईल! रुपयापेक्षा कमी किंमत होऊन त्यांची परिस्थिती आमच्यापेक्षाही हीन होऊ दे! मग पाहतेच त्या डॉलर-सुनेचा तोरा!

यापासून दूर जायचं असेल तर त्या घरापासून दूर जायला पाहिजे, त्या डॉलर-बहूच्या छायेपासून दूर- या सासूपासून दूर- त्या लोभी नणंदेपासून दूर! जिथं केवळ आपल्याला आपल्या कर्तृत्वावरून मान मिळेल अशा ठिकाणी जायला पाहिजे!

पण हे कसं शक्य आहे? अपार मायेचा सागर असलेल्या शामण्णांना सोडून कुठं जायचं?

शामण्णा काही तिचे केवळ सासरे नव्हते! तिच्या प्रत्येक भावनेची जाण ठेवणारे घरातले आत्मीय होते. तिच्या बारीकसारीक सुखदु:खाची दखल घेणारे अत्यंत जवळचे स्नेही झाले होते. अनेकदा गिरीशनं तिच्या भावनांची हेळसांड केली तरी ते तिचं अंतर्मन स्पष्टपणे वाचत होते. तिच्या मौनाचाही अर्थ त्यांना

उकलत होता.

एकदा मौनाचा अर्थ उमजण्याइतकं जवळचं नातं जुळल्यावर शब्दांचा अर्थ समजून घेणं फारच सोपं होतं.

गौरम्मा 'जमुना, वीणा काय सुरेख वाजवते!' असं कौतुक करू लागल्या की शामण्णा लगेच म्हणायचे, 'पण आमच्या विनूच्या आवाजाची सर कुणाला येईल? विनू, म्हण ना एखादं गाणं! किती दिवसांत ऐकलं नाही!-'

साहजिकच जमुनेच्या कौतुकाला तेवढ्यापुरती का होईना खिळ बसायची. काही वेळा तर सुरभीही आईवर या कौतुकामुळे चिडायची.

अशा सासऱ्यांना कसं सोडून जायचं? एकीकडे विनिताचं मन स्वातंत्र्याची अपेक्षा करत असलं, तरी दुसरीकडे या पितृहृदयी सासऱ्यांच्या मायेत गुरफटून जाऊ इच्छित होतं.

अशा गौरम्मा अमेरिकेतून परतल्यावर हर्षची उपेक्षा करून मानसीचं गुणगान केल्याशिवाय कशा राहतील?

अशा परिस्थितीत वाढणाऱ्या हर्षच्या मनावर काय परिणाम होईल? तोही बधिर झाल्याशिवाय राहणार नाही.

गिरीश आपल्या अनेक उद्योगांमुळे सतत घराबाहेरच राहतो. ह्या गुणगानामुळे सतत घरात असणाऱ्या विनितेच्या कानाला भोकं पडतील.

मग तिनं कुठं जावं? काय करावं?

आपण न पाहिलेली, केवळ इतरांकडून जिचं भरपूर वर्णन ऐकलं, जिनं फक्त फोटोमध्ये दर्शन दिलं ती अमेरिका असेल तरी कशी? तीन-चार हजारांत भागण्यासारखं असतं तर एकदा बघून तरी आली असती! पण साठ हजारांचं तिकीट ही गरीब मास्तरीण कशी काढू शकेल?

शशीसारख्या मुलीशी ठरलेलं लग्न शंकरनं केवळ अमेरिकेला जायला मिळावं म्हणून मोडलं होतं. असलं वागायला लावणारी अमेरिका असेल तरी कशी?

केवळ अमेरिकेला गोपी जाणार नाही म्हटल्यावर आईचं ऐकून प्रेम पायदळी तुडवणाऱ्या सुरभीची आठवण झाली. हेही करायला लावणारी अमेरिका असेल तरी कशी?

कृष्णाच्या मोहक मुरलीवर मोहित होऊन सगळ्या गोप-स्त्रिया घरदार सोडून निघून यायच्या म्हणे. तसंच या अमेरिकेच्या हाकेसरशी साऱ्या जगातील माणसं प्रेम, माया आणि इतर नात्याची बंधनं सोडून धावत सुटतात! कोणती शक्ती आहे अमेरिकेकडे?

आईच्या मुलांवरील प्रेमामध्ये भेदभाव नसतो असं सगळे म्हणतात. पण विनिता हे कसं मान्य करेल? एका डोळ्यात चुना आणि दुसऱ्या डोळ्यात लोणी

घालायची कला गौरम्मांनाच जमते! गिरीश खिजगणतीत नाही आणि चंद्रू मात्र देवतासमान!

आपल्या डोक्याची दोन शकलं होतील की काय असं विनितेला वाटू लागलं. असह्य झालं तेव्हा ती अर्ध्या दिवसाची रजा टाकून घरी आली. पुढच्या महिन्यात सासू येणार या विचारानंच तिचं डोकं भणभणू लागलं.

सासऱ्यांना जाग येऊ न देता हळूच दार उघडत असताना शामण्णांनीच दार उघडलं. म्हणजे शामण्णा जागेच होते तर! विनितेला आश्चर्य वाटलं. कारण तिला ठाऊक होतं, शामण्णांना ही दुपारची झोप अत्यंत प्रिय होती.

विनितानं लगोलग शामण्णांना कॉफी करून दिली. शामण्णांचा चेहरा उतरला होता.

कॉफी पिता-पिता ते म्हणाले, 'विनिता, माझ्या मनात एक विचार आला आहे. त्यावर तूही तुला काय वाटतं ते सांग. संकोच करू नकोस.'

'काय अण्णा?'

'तुझी सासू आणखी एक-दीड महिन्यांत परत येईल. आतापर्यंत तिनं जी अमेरिका वर्णनाची लांबलचक पत्रं लिहिली आहेत, त्याचं मोठालं पुस्तकच होईल. मला वाटतं, अजूनही तिच्या मनातला अमेरिका-मोह कमी झालेला नाही.'

त्यांची नजर झोपलेल्या हर्षकडे गेली. घशाशी आलेला आवंढा गिळत ते म्हणाले, 'तू मला मुलीपेक्षाही अधिक जीव लावला आहेस! तुझ्या मानसिक दुःखाला हे सारं कारणीभूत झालंय हे मीही पाहतोय. तू वेगळं घर करून निघून जा.'

आश्चर्यचकित व्हायची पाळी विनितेची होती.

मनात हजार वेळा आलेला तो विचार संस्कार, संकोच आणि सासऱ्यांचा स्वभाव यामुळे व्यक्त न करता ती घुसमटत होती, तोच विचार अण्णा सरळपणे मांडत होते! हे स्वप्न नाही, वास्तव आहे! विनितेचा स्वतःवरच विश्वास बसेना.

शामण्णाच पुढं म्हणाले, 'विनू, हा निर्णय तुझ्या दृष्टीनं अत्यावश्यक आहे. अर्थात हर्षला सोडून राहाणं मलाही सोपं जाणार नाही!' त्यांनी डोळे टिपले.

त्यांच्या डोळ्यांतलं पाणी पाहून विनिता विरघळली. वाटलं, 'मीच जमुना आणि सासूबाईंबरोबर नीट जुळवून घेऊ शकले नाही की काय? माझंच चुकलं की काय?'

तिनं हे बोलून दाखवताच ते म्हणाले, 'नाही, विनू! तुझं काहीही चुकलेलं नाही. मला तुझ्या मृदु स्वभावाची ओळख पूर्णपणे आहे. त्यामुळेच मी तुला वेगळी राहा म्हणतोय. इतकं चांगलं असणं योग्य नव्हे, विनू! मातीमध्ये दगडाचीही आवश्यकता असते! तुझीच चूक आहे असं का तू मानतेस? जमुनानं तुझ्याशी कुठं

जुळवून घेतलं? गौरीनं कधी तुझ्या मनाचा विचार केला? सतत इतरांची चाकरी करण्याची गुलामगिरी तू पाळू नकोस. त्यामुळे मनात स्वत:विषयी क्षुद्रतेची भावना खोलवर रुजली जाते. तुझं आजवरचं आयुष्य इतरांसाठी कष्ट करण्यात गेलं आहे. यानंतर तरी तू मोकळ्या मनानं गा! तुझ्यासाठी जग!'

'अण्णा, कुठं जाऊ मी?'

'तुझ्या घरी. धारवाडमध्ये तुझं घर आहे, विसरलीस? गिरीशला बेंगळूरहून धारवाडला बदली मिळणं कठीण नाही. डी.इ.ओ.ला सांगून मी तुझीही तिथं बदली होईल हे पाहीन. आणखीही सांगून ठेवतो ऐक. यानंतर तुम्ही इथं पैसे पाठवायचे नाहीत. चंद्रूनंही पाठवायची गरज नाही. आम्हां दोघांना पुरेसं पेन्शन येतं. तुम्ही गेल्यावर माडीवरची जागा भाड्यानं देईन. आमच्यावर तशी कुठली जबाबदारी नाही. खर्चही कमी आहे.'

वृद्धत्वाच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या सासऱ्यांच्या मनातली उदारता बघून विनितेचा आवाज कातर झाला, 'अण्णा, तुम्ही आमच्याबरोबर येत नाही?'

'विनू, तुझं घर ते माझंच नाही काय? तुम्ही काही परदेशी जात नाही! इथं रात्री बसमध्ये बसलं तर सकाळी तुझ्या घरी येऊन पोहोचू. हात-पाय चालेनासे झाल्यावर आम्हांला तरी कोण बघणार आहे? तूच आमची म्हातारपणाची काठी आहेस. आमची म्हातारपणाची काठी मोडून जाऊ नये, म्हणूनच तुला वेगळी राहा म्हणतोय मी!'

विनिता आश्चर्यानं सासऱ्यांकडे पाहत राहिली.

'विनू, ती पुराणातली कथा ठाऊक आहे ना? कद्रू आणि विनुता नावाच्या दोन सवती होत्या. इथं तुम्ही दोघी जावा-जावा आहात एवढाच फरक. ती विनुता होती आणि तू विनिता!'

विनितेच्या चेहऱ्यावर त्याही परिस्थितीत हसू उमटलं.

'कद्रूला नेहमीच विनुतेविषयी असूया वाटायची. कद्रूला शंभर मुलं होती. विनुतेला मुलं नव्हती. पुढं क्षुद्र फसवणुकीमुळे विनुता कद्रुची दासी झाली. तिची दास्यातून सुटका करण्यासाठी तिच्या पोटी पुत्र जन्मतो आणि स्वर्गातून अमृत घेऊन येतो. तोच गरूड. ही कथा खरी आहे की काल्पनिक आहे कोण जाणे! ही कथा ऐकताना मला मात्र नेहमीच तुझी आठवण होते. हर्ष भरपूर शिकून अमेरिकेत जाईल आणि जमुनापेक्षा जास्त डॉलर्स मिळवेल तेव्हा तुझी या डॉलर-शापातून मुक्तता होईलच. पण त्यासाठी एवढा काळ तू गुलामीतच राहायचं काय?'

'असं का म्हणता, अण्णा?'

'एखाद्या घराचं राहणं-टिकणं त्या घरच्या बाईवर अवलंबून असतं. तुझ्या मनावरचा संयमाचा बांध फुटून संताप उफाळून आला, तर त्या ज्वाळेत आम्ही सारे

होरपळून जाऊ! तू मनोरुग्ण झालीस तर आमचा संसार नष्ट होऊन जाईल. त्या वेळी आपण सगळेच एकमेकांना अपरिचित होऊ! एकमेकांचा द्वेष करू. कठीण हृदयी होऊ. विनुतेची कथा ही दास्य-नष्टतेची कथा आहे. त्यामुळेच सांगतो, गोष्टी टोकाला जाण्याआधीच तू निघून जा.'

'पण गिरीशला विचारलं पाहिजे.'

'आजच सकाळी मी त्याच्याशी या विषयावर सविस्तरपणे बोललोय आणि बदलीचा अर्ज द्यायलाही सांगितलंय. विनू, गिरीश स्पष्टपणे बोलत नसला तरी तोही तुझी कुचंबणा जाणून आहे! त्यामुळे अधिक वाद न घालता त्यानं माझी सूचना मान्य केली.'

हाही विनितेला सुखद धक्का होता.

'आई-वडिलांचं छत्र आवश्यक आहे, त्या छत्राखाली असताना वटवृक्षाच्या सावलीत असल्यासारखं समाधान वाटतं. पण तिथं इतर झाडं वाढत नाहीत! चंद्रू अशा विचारांमध्ये वाढला आहे. आपल्या पायावर उभा राहून त्यानं स्वत:चं व्यक्तित्व साकार केलं आहे. आत्मविश्वासही खूपच वाढलाय त्याचा. अमेरिकेनं त्याला जीवनाचे उत्तम धडे दिले आहेत.'

'अण्णा, कशी असेल हो ही अमेरिका?' मनाला लक्ष-लक्ष वेळा छळणारा प्रश्न तिनं बोलून दाखवला.

'विनू, मी तरी काय सांगू? मी कुठं पाहिलाय तो देश? पण माझ्या अनुभवाच्या आधारे एवढंच सांगू शकेन- चंद्रू अमेरिकेला जाऊन डॉलर मिळवू लागला. त्यामुळे आमच्या घरात काही सुखसोयीही आल्या. माडीवरचं घर बांधणं शक्य झालं. सुरभीचं लग्न थाटामाटात करू शकलो. डॉलर नसता तरी हे सारं घडलंच असतं. पण इतक्या सुलभतेनं झालं नसतं. गौरी चौथीही पास झालेली नाही. ती नरसीपूरला माहेरी जातानाही सोबत हवी म्हणायची. आता एकटीच अमेरिकेला गेली. त्या देशाच्या संपत्तीनं आपल्या देशातल्या कुटुंबांवर प्रचंड परिणाम घडवला आहे. पण—'

'पण काय?'

'कुठलीही गोष्ट फुकट मिळत नसते! या डॉलरमुळे आमच्या गरिबीचं रूपांतर श्रीमंतीत होतं, तसंच घरांमध्ये भेगही पडते. घरात चढ-उतार निर्माण होऊन मनाची शांती नष्ट होते. हीच गोष्ट बऱ्याच जणांच्या लक्षात येत नाही. तुझ्या सासूला तर याची कणभरही जाणीव झालेली नाही. ती जाणीव असती तर तीही अशी वागली नसती. आपल्या संसारावर तिनंच निखारे ठेवले नसते. सोन्यासारख्या सुनेला डॉलरच्या बदल्यात तिनं गमावलं नसतं. मला ठाऊक आहे विनू, अज्ञान आणि गरिबी यांमुळे ती तशी झाली आहे. स्वभावत: गौरी दुष्ट नाही हे तूही मान्य

करशील! परिस्थितीमुळे ती तशी झाली आहे.'

एवढ्यात गिरीश आल्याची चाहूल लागली.

'अण्णा, पुढच्या महिन्यात बदली होईल. येता-येता डी. इ. ओ. ऑफिसमध्येही जाऊन आलो. डी. इ. ओ. तुमचे विद्यार्थी होते म्हणून सांगत होते. फार आदरानं बोलत होते तुमच्याविषयी! या महिनाअखेर विनितेचीही बदली होईल म्हणे.'

सारं इतक्या वेगानं घडलं होतं की विनितेचाही त्यावर विश्वास बसू नये!

सारं पूर्णपणे विचार करून केलं असलं तरी शामण्णांचं हृदय रडत होतं. ते दाखवू न देता ते हर्षला उचलून बाहेर निघून गेले.

एक ना एक दिवस हे घडायलाच हवं होतं.

गिरीश-विनितेनं परस्परांकडे पाहिलं. विनिता शामण्णांच्या पाठोपाठ जात म्हणाली, 'आम्ही अम्मा आल्यानंतर जाऊ.'

'नको. ट्रान्सफर झाली की तुम्ही निघून जा. गौरीला सांगेन मी. पत्र लिहून आणखी गोंधळ करायला नको.'

रिक्षा घरापुढे थांबली. शामण्णा आठवणींच्या खाईतून बाहेर आले.

रिक्षाचे पैसे देऊन जेव्हा शामण्णाचं घराचं कुलूप उघडू लागले तेव्हा गौरम्मा चकित झाल्या.

'विनू शाळेला गेली?'

'तू घरात चल. सामान ठेव. फ्रेश हो. सांगेन सगळं.'

'काय झालं?' गौरम्मा घाबरल्या.

'काहीही झालेलं नाही! मी तिला तिच्या घरी पाठवलंय.'

'धारवाडला?'

'होय. कायमची.'

'काय? घरात म्हाताऱ्या सासऱ्यांना टाकून निघून गेली ती?' गौरम्मा संतापल्या, 'गिरीला टाकून गेली?'

'गिरीला कशी टाकून जाईल? हर्ष आणि गिरीही गेलेत. ट्रान्सफर घेऊन.'

'काय सांगता! गिरीशनं बेंगळूर सोडून धारवाडला बदली करून घेतली?' त्या अविश्वासानं विचारू लागल्या.

'होय. मीच तसं करायला सांगितलं!' शामण्णांचा आवाज शांत होता.

'का?'

'कारण सांगू? त्या अमेरिकेत राहणाऱ्या सुनेवरच्या मोहापायी इथं आपल्यापाशी राहून आपल्यासाठी राबणाऱ्या सुनेला तुच्छ लेखून तू पाणउतारा करत होतीस. आता अमेरिकेहून आल्यावर प्रत्येक बाबतीत मानसीशी तुलना करून हर्षला उगाच

हलकं लेखणार यात शंका नव्हती. तुझ्या सान्निध्यात विनू मनोरुग्ण होऊन डिप्रेशनमध्ये गेली असती. त्याची लक्षणं हळूहळू तिच्या वागण्यात दिसायला लागली होती. माझ्या एका जुन्या विद्यार्थिनीशी- आता ती मनोरोगतज्ज्ञ आहे- या विषयावर मी चर्चा केली. डॉक्टरांनीच हा सल्ला दिला. एका सालस गुणी मुलीला मनोरुग्ण बनवण्याच्या पापापासून बचाव करून घेण्यासाठी एवढाच उपाय माझ्यापुढे होता.'

गौरम्मा दुखावलेल्या स्वरात म्हणाल्या, 'पण तिच्या वागण्यावरून तसं काही वाटलं नव्हतं. बरीच दिसत होती!' तरीही हे बोलताना मनाच्या कोपऱ्यातून आशा पाटील डोकावून गेली.

'खरंय, अजून ती मनोरुग्ण झालेली नाही. पण अशा वातावरणात राहिली तर व्हायची शक्यता आहे, म्हणून ही उपाययोजना! व्यक्ती असो वा प्राणी, आशा असते ती डॉलरची नव्हे, प्रेमाची! कितीही पोर धडपडली तरी आपल्या घरी तिला ते कधीच मिळालं नाही. आपल्याबरोबर मनोरुग्ण होऊन राहण्यापेक्षा दूर का होईना, सुखी राहू दे तिला!'

ह्या बदललेल्या परिस्थितीचं आकलन गौरम्मांना व्हायला काही वेळ जावा लागला. अमेरिकेला जाऊन आल्यावर उत्साहाच्या फुग्याला सुई टोचली गेली होती.

अशा परिस्थितीची त्यांनी कधीच कल्पना केली नव्हती. पण तेच आज वास्तव होतं!

'तुझ्या प्रत्येक पत्रात अमेरिकेचं वैभव, तिथल्या सामानाचं कौतुक असायचं. तरल स्वभावाच्या विनितेविषयी तू चुकूनही कधी एखादं वाक्य लिहिलं नाहीस. जमुनेनंही कधी तिचा उल्लेख केला नाही. कुणीही स्वाभिमानी व्यक्ती हा तिरस्कार सहन करू शकणार नाही!'

गौरम्मा म्हणाल्या, 'तुम्हाला माझ्या मन:स्थितीची कल्पना नाही. ते पत्रातही लिहिण्यासारखं नव्हतं. आता मला सगळ्यांचे स्वभाव उमजले आहेत. जमुना कशी आहे आणि विनिता कशी आहे हे समजलंय! जमुनाचं क्षुद्र मन आणि पैशाचा अहंकार याचा मीही अनुभव घेतलाय!'

त्यांचा आवाज आर्द्र झाला होता.

'अहो, तिथंही इथल्यासारखी सुख-दु:खं आहेत. त्यांच्या दु:खाचा प्रकारही वेगळा आहे. तिथं गेल्यावर हे समजलं. या अमेरिकेच्या यात्रेनं माझे डोळे उघडले. येताना सारखं मनात येत होतं, किती नशीबवान आहे मी! विनितेसारखी सून मला मिळाली आहे! इथं येऊन पाहतोय तर ही तऱ्हा!'

गौरम्मांना दु:ख अनावर झालं. डोळ्यांमधून उष्ण पाण्याच्या धारा लागल्या.

त्यांनीही त्या आवरायचा प्रयत्न केला नाही. त्या अश्रूधारांमध्ये शामण्णांना प्रामाणिक पश्चात्ताप दिसला.

'गिरीशला पुन्हा इथंच बदली घेऊन यायला कळवा ना!'

'का? तुला पश्चात्ताप झालाय म्हटल्यावर त्यांना या म्हणून कळवू? आम्ही म्हातारे झालोय- तुम्ही आमची सेवा करा म्हणू? गौरी, तुझ्या मुलांना तू तुझ्या घरात तुला जसं पटलं तसं वाढवलंस! तसंच आता विनितेला तिच्या घरात तिला वाटेल तसं आपल्या हर्षला वाढवू दे. त्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हायची आपण संधी द्यायला पाहिजे. त्यांनी सतत आमच्याच छत्राखाली राहिलं पाहिजे असा आग्रह ठेवायला नको. जसा चंद्रू मोकळ्या वातावरणात वाढत आहे तसं गिरीशलाही वाढू दे. हेच खरं जीवन! आपले हात-पाय जोपर्यंत चालताहेत, तोपर्यंत आपण इथंच राहू या. नंतर त्यांच्या घरी जाऊन राहू या. तेव्हा आपण त्यांच्याशी जुळवून घेऊ.'

गौरम्मांनी डोळे पुसले.

'गौरी, दुसरं म्हणजे ही मुलं काही आपल्याबरोबर भांडून घराबाहेर पडलेली नाहीत. आनंदानं बाहेर पडली आहेत. त्यामुळे त्यांच्या मनात कटुता नाही. तूही कडवटपणा न धरता इथं आरामात राहा.'

तरीही त्या म्हणाल्या, 'जाऊ दे! निदान आपण तरी धारवाडला जाऊन हर्षबरोबर आठ-दहा दिवस राहून येऊ या! वर्ष होऊन गेलं त्याला बघून! त्याला माझी आठवण तरी आहे की नाही देव जाणे!'

'एवढंच ना? उद्याचंच रिझर्वेशन घेऊन येतो! एक मात्र बजावून सांगतो- तिथं गेल्यावर तू फक्त अमेरिकेच्याच गोष्टी बोलत राहायचं नाहीस!'

'नाही!' दुखावलेल्या स्वरात गौरम्मा उत्तरल्या.

गौरम्मांनी आपली सूटकेसची चावी काढण्यासाठी पर्स उघडली. वाटेत खर्चासाठी म्हणून चंद्रूनं दिलेले शंभर डॉलर्स तिथंच होते. चावीबरोबर ते बाहेर पडले. गौरम्मांनी विषादानं तिकडे पाहिलं. त्यांच्या दृष्टीनं आज डॉलर्सची कायमची हार झाली होती!

रुपया जिंकला होता!

○ ○ ○

INDIAN BOOK SHELF
55, Warren St., London W1T 5NW
Ph. : (020) 7380 0622
E-mail : indbooks@aol.com

'फार विचित्र आहे हा देश! ते एक रंगीबेरंगी कोळ्याचं जाळं आहे.
तिथं नोकऱ्या आहेत, यंत्र-तंत्र आहे. सुख संपत्ती आहे, डॉलर्स आहेत.
आपली माणसं त्यातल्या कशाला तरी बळी पडून तिथं येतात -
पण माघारी जायला जमत नाही. तिथून जावं असा आपला देशही नाही.
इथून बाहेर पडण्यासाठी शेकडो खिडक्या आहेत,
पण आत बोलावणारा एकही दरवाजा नाही.

तिथल्या जीवनाची तुम्हाला कल्पना नाही. सेलमध्ये खरेदी करायची आणि डॉलरला चाळीसनं गुणायचं! असं जगणारी मंडळी सुखी असतात काय? तिथं हजार डॉलर्समध्ये सामान्य काम करत राहायचं आणि इथं चाळीस हजार रुपये पगार मिळतो असं सांगून भाव खायचा. तिथं डॉलर मिळविण्यासाठी आम्ही आपली माणसं, घर-दार सगळं सोडून, तिथल्या थंडी-वाऱ्याला तोंड देत तिथं राहतो, पण तिथल्या समाजाचं अविभाज्य अंग होऊ शकत नाही. फारच महाग पडतो हा डॉलर! पण हे भारतात कुणालाही समजत नाही.

पैशाच्या दलदलीत सापडलोय आम्ही! आमच्या लायकीपेक्षा फार उत्तम नोकरी मिळते तिथे. जाती, भाषा, यांचं राजकारण नाही तिथे. सुखानं आपलं आपण काम करु शकतो. तिथलं सगळं सोडून मी इथं आलो तर आणखी दु:खी होईन.'

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

ONLINE SHOPPING
www.mehtapublishinghouse.com

ISBN 81-
9 78817
INR 120/-